# अनंतनाथस्फूर्ति

यांत

परमात्मभजनरूप अपरोक्ष भावी स्वात्मलीलादर्शक
अशा सर्व विषयांचा संग्रह आहे.

हा ग्रंथ

श्रीमदनंतभक्तमंडळीच्या आज्ञेवरून

बापूराव विनायक बावळे, वकील नेवासकर,

ह्यांनीं तयार केला,

तो

आबालवृद्ध जनांच्या अवलोकनार्थ आणि आनंदार्थ

मुंबईंत,

निर्णयसागर छापखान्यांत छापिला.

सन १९००.

( सर्व प्रकारचे हक्क तयार करणाराकडे आहेत. )

किंमत ·।।।· आणे.

श्रीमदनन्तसद्गुरवे नमः

# विनंती.

### अभंग.

विद्या ऐसी यावी शांतवी मनासी ॥ आठवी भवासी स्वबळानें ॥ १ ॥
विद्या ते परम आत्मप्राप्तीकर ॥ जाणता शंकर महायोगी ॥ २ ॥
तयाच्या प्रसादें नाना संत ज्ञानी ॥ झाले देहमानी समाधान ॥ ३ ॥
अनंत सुविद्या निजानंद भक्ती ॥ दासी भुक्ती मुक्ती होती पायीं ॥ ४ ॥

॥ २ ॥

शांती घर रिघे जया मानवाचें ॥ सज्जन तयाचें नाम साजे ॥ १ ॥
देहअहंभाव भंगे जयांतरीं ॥ वसे तयांतरीं श्रीहरी तो ॥ २ ॥
श्रीहरी तो समभावें सर्वाधार ॥ वर्ते निर्विकार सहजानें ॥ ३ ॥
अनंत प्रमाण अंतरदृष्टीचें ॥ स्वानंदवृष्टीचें शांतवन ॥ ४ ॥

"श्रीअनंतनाथस्फूर्ति" ह्या नांवास सदरील अभंगवाणी साक्षीदार आहे. हें नांव ग्रंथाचे उच्चारार्थ भक्तमंडळींनीं दिलेलें आहे. नाम, ग्राम, पंथ, आणि बोली संतस्वानंदाला शोभत नाहीं. आनंद असाक्ष आहे. बहुधा सर्वच नामदर्श गुणलक्षणादिकांवरून उत्पन्न होतात.

ह्या ग्रंथांतील काव्यविलास नमुन्यादाखल आहे. हा ज्यांच्या लेखणींतून बाहेर पडला त्या श्रीपरमात्मलीलाविग्रही मानवी तनूचा वूड्कट जितका वठविला गेला, तितका दिला आहे. ह्यांचीं चित्रें राजा रविवर्म्याहून कमी नसल्याचें बाहेरीलनाथीं श्रीक्षेत्र पैठण येथें स्पष्ट होत आहे. बहुधा चितारी आपल्या गुणाची छाया चित्रांत दाखवतो ह्मणोन वगैरे कारणांनीं महाराजांनीं जीं जीं मंदिरें रंगविलीं त्यांमधील चित्रांचे देखावे बहुजनसमाजाचे दृष्टीं पडावे या हेतूनें खटपट केल्यास चित्राचें रक्षण होऊन सशास्त्र चित्राचे ज्ञानाचा प्रसार होईल. असो. स्थूळसूक्ष्माचे चित्रकार परमनिर्लोभ निजानंदभक्त श्रीअनंतमहाराज सांगत कीं माणुसपणा अवघड आहे; त्याप्रमाणें त्यांचे प्रेमळ भक्तांस प्रचिती दाखवून पश्चात् सर्व जगतास माणूस कोण? शब्दसंत कसे? ह्याचा

अनुभव आपल्या अद्भुत काव्यविलासांत ठेऊन गेले. परमात्मरूप मानवी नरतनूचें गीत–गणपतिस्तव–३॥ मात्रागण प्रणव, ॐकार मात्रासह, वेदाचें बीज, चतुर्दल, सर्वाधार आहे. तो ह्या ग्रंथाचे वाचकांस स्वात्मस्फूर्ति करो. अनंतनाथलीला हितसार सारहित होवो असें वाटतें.

सु-दामचरित्र, ध्रुवचरित्र इ० चरित्रें श्रीस्वानुभूती, सशास्त्र, अवतारापूर्वींच्या गोष्टी आहेत. सर्व धर्मांचे नीतीस मान्य आहेत. जसें रामायण रामजन्मापूर्वीं वाल्मिकानें केलें, उ० निजबोध राम आणि चित्शक्ती सीता इ० नित्यप्रचारांतील नाटकाधार नवरस परिपूर्ण अर्थानें सर्वधर्मांत आत्मानुभव कबूल होतात, त्याच भावार्थानें प्राकृत भाषेंत वरील चरित्रें श्रीमदनंतसद्गुरुविरचित आहेत. हीं चरित्रें नवीं नाहींत परंतु प्राकृत आणि सुबोध या नात्यानें नवींच आहेत. प्राकृत–ह्मणजे मराठी नव्हत प्रकृती धर्मापासून झालीं तीं प्राकृत. आत्मभक्ती, रंगलूट आहे तेथें कमी कांहींच नाहीं. नवविधावर्णन अपूर्व आहे.

प्रथमभक्ती अर्चन आहे वगैरे खुलासा प्रस्तुत ग्रंथांत वे. मास्तर यांचे टीपांवरून उत्तम झाला आहे. करुणाबत्तिसी व मानसपूजा पूज्य आहेत. आर्या, स्फुट, पारिजात फूल, सुंदर फुलें आहेत. आणि अभंग तर निर्वाणीचें विष्णुपद आहे.

भुपाळी, पदें, आरती, मालवणभाषेचीं पदें हिंदुस्थानी पदें; कोयाळ वाणीचीं–केवळ आनंदाच्या उकळया अशीं उल्हासाचीं गाणीं, सज्जन विद्वान्, पंडित यांस रंजविणारीं श्री अनंतपालोपदाचीं प्रासादिक काव्यें निगम वर्णिलेलीं आनंदकारक आहेत. पारमार्थिक जनांनीं सर्वकाव्य प्रसिद्ध होण्याचे उत्तेजनार्थ अनंतनाथस्फूर्तीची खरेदी करावी. असा समभावाचा पदाभिलाष आहे. काम आटोपतें घेतल्यावरून पुस्तकाची किंमत कमी केली आहे. हे विनंती.

श्रीचा भक्त

बा० वि० वाबळे, वकील.

ता० २९।२।१९००

# शुद्धिपत्र.

| पृष्ठांक. | विषयांक. | अशुद्धाक्षरें. | | शुद्धाक्षरें. |
|---|---|---|---|---|
| ८ | ८५ | समराघना | = | समराधना. |
| १७ | ५० | करावा | = | करावे. |
| २३ | २९ | टीप ५ शय्या | = | छाया. |
| ३१ | ७५ | याचनी | = | याचेनी. |
| ४५ | २ | धारणाधती | = | धारणाधृती. |
| ४८ | ११ | कुळी | = | कळी. |
| ५८ | ७ | संपत्ती | = | संपती. |
| ९४ | १ | यांतील टीप ५ परमात्मारूप | = | परमात्मरूप. |

# या चरित्रांतील विषय.



पृष्ठ.

१ मंगलाचरण .... .... .... .... .... .... १
२ कालमान .... .... .... .... .... .... २
३ संतसाधु याविषयीं .... .... .... .... .... २
४ श्रीमदनंतसद्गुरु यांचें वर्णन .... .... .... .... ६
५ कविता कोठें झाल्या त्याविषयीं माहिती .... .... १९
६ मुक्त (पारतंत्र्यरहित) स्थितीचा विचार.... .... .... ३०
७ नाम विचार .... .... .... .... .... .... ३९

## श्रीमदनंतनाथस्फूर्ति या पुस्तकांतील विषयांची

# अनुक्रमणिका.


| विषयांक. | विषयांचीं नांवें. | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | गणपतिस्तव. ... ... | १ |
| २ | श्रीनाथलीला. अध्याय ५ | |
| | ,, अध्याय १ | ३ |
| | ,, अध्याय २ | ९ |
| | ,, अध्याय ३ | १४ |
| | ,, अध्याय ४ | २१ |
| | ,, अध्याय ५ | २७ |
| ३ | हितसार. ... ... | ३३ |
| ४ | प्रेमरंग. ... ... | ३६ |
| ५ | निजभक्ति. ... ... | ३७ |
| ६ | नवविधगोपी (नवविध भ.) | ३८ |
| ,, | अर्चनं. शिखरिणी छंद. | ४० |
| ,, | दास्यं. ... ... ... | ४२ |
| ,, | स्मरणं. ... ... | ४३ |
| ,, | पादसेवनं. ... ... | ४५ |
| ,, | वंदनं. ... ... ... | ४७ |
| ६ | श्रवणं. ... ... | ४९ |
| ,, | कीर्तनं. ... ... | ५० |
| ,, | सख्यं. ... ... | ५२ |
| ,, | आत्मनिवेदनं. ... | ५३ |
| ७ | सुदामचरित्र. ... ... | ५७ |
| ८ | ध्रुवचरित्र. ... ... | ७८ |
| ९ | करुणाबत्तिसी. ... | ९४ |
| १० | पारिजातफूल. ... | ९९ |
| ११ | मानसपूजा. ... ... | १०१ |
| १२ | स्फुटश्लोक. ... ... | १०८ |
| १३ | श्रीएकनाथस्तुति. ... | १०८ |
| १४ | श्रीअमृतराययश. ... | १०९ |
| १५ | अभंग. ... ... | ११० |
| १६ | पदें. ... ... ... | १२१ |
| १७ | भूपाळी. ... ... | १२७ |
| १८ | आरति. ... ... | १२७ |



॥ श्री परमात्मलीलाविग्रहीतनु श्रीअनंत ॥

श्रीगुरुदेवदत्त.

# श्रीमदनंतसद्गुरु एकनाथ यांचें चरित्र.

## मंगलाचरण.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥

नमो एकानाथा सदय मनसा सद्गुरुवरा ॥
प्रतिष्ठा[1]निवासा करुनि बरवा गौतमितिरां ॥
गुरूभक्तीभावो मन सममता दत्तवरदा ॥
वरासाठीं द्वारावरि वसतसे अत्रिय सदां ॥ १ ॥
सदां गाऊं भावें गिरिं गुरुवरा[2] ऐक्य मतिचा ॥
निजाचा जो ठेवा जगनगभवां[3] प्रेम गतिचा ॥
गती जाची ऐसी घरिं हरि भरी कावडि सदां ॥
सदां रिद्धीसिद्धी बटकुरिमिसें राबति पदां ॥ २ ॥
पदाचीया गोडी मधुवरउडी मासिवतसी ॥
जडोनीयां चित्तां गिरिं रुचि जडे अन्नि भुकसी ॥
सदां गाथा गातां सदय[4] मतिची नाथ कविता ॥
हितां आली हातां अनुभवमतां चित्तसमता ॥ ३ ॥

अशा श्रीसद्गुरुचरणीं माथां ठेऊन, श्रीमदनंत सद्गुरुकृत काव्यग्रंथ छापद्वारें प्रसिद्ध होत आहे; त्याविषयीं कांहीं संक्षिप्त माहिती वाचकांस समजणें अवश्य आहे; तो सर्व प्रकार कळवितों. हल्लीं जीं तुकाराम, रामदासप्रभृति संतांचीं चरित्रें प्रसिद्ध आहेत; त्यांचा व ग्रंथाचा मेळ असा दृष्टीस पडतो कीं, सिद्धि ह्या खोट्या आहेत असे प्रत्येक ग्रंथांत लेख असतां चरित्रांत सिद्धिचमत्कारा-वांचून गोष्ट नाहीं. त्याप्रमाणें या चरित्रांत कांहीं गोष्टी देण्यास आधार नाहीं. फक्त ग्रंथ कोठें झाला, त्याचें वर्तन कसें काय, याविषयीं सुमारें वीस वर्षांतील माहिती मिळते ती सर्वांस अनुभवसिद्ध कळवितों.

---

१ चित्तअधिष्ठानीं. २ शांति गौतमितिरां. ३ संसारां. ४ परमात्ममतां.

## कलिवर्णन.

कृत, त्रेता, द्वापार या कालमानाप्रमाणें चित्तशुद्धिद्वारें, परमेश्वरप्राप्तीला साधनें निरनिराळीं सांगितलीं. या कलियुगामध्यें नामावांचून अन्य साधनें सर्वोत्तम जो परमात्मा यानें निंदिलीं. आत्मप्राप्तीला सुलभ उपाय नामामृत न्याय रचिला आहे. तो संतसमागमावांचून समजणार नाहीं. नामअधिकार सर्वांना सारखा आहे. हा काल फार भयंकर; तो असा कीं शक्तिहीन देह, अपारसंदेह, स्वकीयांचा स्नेह फार, आपपरभाव. मिथ्या व्यवसाव, सर्वांचा अंतरांत निरंतर चिंता, नेहमीं गर्वाचा पर्वात असणें, सर्व तमाम मोहमदिरेनें गर्क झालेले, मत्सरावांचून कोठेंच कांहीं दिसत नाहीं. वेदकर्माचा ऱ्हास, निंदा हिची वडील बहीण, प्रत्येकास जातीचा अभिमान. ह्मणजे मी ब्राह्मण हा, असा सर्वप्रकार उलट दृष्टीस पडतो. सांप्रत जीवित फारच क्षणिक झालें आहे; असें हें कालमान प्रत्यक्ष असतां यांत साधन कशाचें साधितां येईल ? करितां नामावांचून संसार तरण्यास सुलभ उपाय दुसरा नाहीं.

कलेर्दोषनिधेराजन्निति. कलि हा दोषनिधि आहे. परंतु याचा मोठा गुण हा कीं, अमोल भजनानंदगति चित्तशुद्धिद्वारा प्राप्त होते. ह्मणून या कालासारखा दुसरा काल उत्तम नाहीं. यांतील सुलीन भक्तावस्था पाहून चारी युगें तल्लीन होऊन गेलीं. स्वर्गस्थ देव, योगी, मुनी आदिकरून सर्व कलियुगीं नरतनूची इच्छा करितात. कारण चित्तशुद्धीवांचून भजनाधिकार नाहीं, ती याकालीं नामानें सहज होते. सर्व साधनें व कर्में एक चित्तशुद्धिकरितांच. परंतु ती होणें कठीण. सांप्रत जिकडे तिकडेभजनच सर्व, सर्वच संत, खाणेंपिणें विलास भरपूर, असा नाममहिमा श्रेष्ठ आहे. पण यांत तुकारामादिकांची जी पद्धती त्यांतील लवलेश सुद्धां दृष्टीस पडत नाहीं; पण सर्व वर्तनक्रम त्यांचा वचनाविरुद्ध सर्व कलिद्योतक असा आहे. याचें कारण अर्थभावहेतु समजला नाहीं. तो समज संतसंगतीवांचून नाहीं. संगती ओळखीवांचून नाहीं.

## संतवर्णन.

सांप्रतकालीं संतसाधु यांची ओळख पंथभेषावांचून नाहीं. ते भेष जे मागें रामदासादिक संत झाले त्यांचे, उदाहरणार्थ रामदासपंथांत जे शिरले त्यांणीं त्यांचा सारखा बाणा केला ह्मणजे संत बनला. याचप्रमाणें कबीर, नानक आदिकरून सर्वसंतांचे पंथभेष नसून हल्लीं जिकडेतिकडे त्यावांचून कांहीं

ओळखच नाहीं. केवढें आश्चर्य. प्रत्यक्ष पंथभेष, सिद्धिचमत्कार यांचा निषेध केला आहे तो असा.

अभंग.

**तुका ह्मणे वेषधारी ॥ हिजड्या कैशा होती नारी ॥**

ओवी.

**सोंगें घेऊनि साधु होणें ॥ येथें अर्थ सिद्ध जाणें ॥**
**नाहीं परी जग भोंदणें ॥ याचि कारणें सोंग तें ॥**

असा सर्वांनीं निषेध केला असूनही दुर्धर कालगती पहा.

श्लोक.

**माळेंत पाणि धरुनी किति ते जपाला ॥**
**लावोनि नेत्र बसले किति खाति पाला ॥**
**फांसोनि राख कितिएक जटा धरोनी ॥**
**भोंदीयलें दिनभु तें भुलती भरोनी ॥ १ ॥**
**ऐसे कलीमधिल संत परोपकारी ॥**
**सारेचि संत असले फिरती भिकारी ॥**
**येथें नसे भजन तें मग पूजनाचा ॥**
**चाले नची विधि बरा स्मरि राम साचा ॥ २ ॥**
**या हो भवीं गुरु घरोघरिं राबताती ॥**
**शिष्यां नसे गणितते बहु बोडिताती ॥**
**नाहीं अशांत गति गा उलटी फजीती ॥**
**संसार सांडुनि फुकां जनिं हीन होती ॥ ३ ॥**

असा या कालीं संत, साधु, गुरु यांचा प्रभाव आहे. तात्पर्य पंथभेष, कांहीं सिद्धिचमत्कार यावांचून संतसाधूंची ओळख नाहीं. जगतींत संतांची ओळख संताला, कारण सृष्टिक्रमच दोन प्रकारचा आहे. संत व असंत यांत भावावांचून कांहीं फरक नाहीं. यामुळें संतांची महिमा काय आहे, हें सर्वांस समजत नाहीं. ठीकच, हा शोध करणें मुमुक्षू दशेवांचून नाहीं असें वेदमत आहे. तो संतमहिमा कसा आहे याविषयींचा भाव पुढील अभंगांवरून सर्वांचा सहज लक्षांत येईल.

अभंग ॥ १ ॥

**संतांची महिमा, नेणवे निगमां[1] ॥ कैसी जगक्रमा, कळों येई ॥ १ ॥ सज्जन ओळखी, सज्जनची जाणे ॥ इतरासी बाणे, टकमक ॥ २ ॥ ज-**

---

१ उपनिषद्भागाला.

नाचे सारीखे, कोणाना परीके ॥ परी भाग्य नीके, तेथें दृश्य[1] ॥ ३ ॥ नाहीं तया नाम, नाहीं वेषरूप ॥ सहजीं अरूप, वागताती ॥ ४ ॥ न होती अंकीले, न होती पांगले ॥ अनंत सांचले, नीज प्रेम ॥ ५ ॥

॥ २ ॥

जैशा तैसे दिसताती ॥ संत नोहे पक्षपाती ॥ १ ॥ सर्वसाक्षी गुणातीत ॥ तया अंगीं सर्वनीत ॥ २ ॥ सान मोठेंपण नाहीं ॥ भूतजांत देखे मही ॥ ३ ॥ परी जेथें लीन[3] भाव ॥ तेथें होती रूप नांव ॥ ४ ॥ आत्मभावें शांतवीती ॥ धेनु[4] जैसी वत्साप्रती ॥ ५ ॥ अनंत मायाभ्रमवारी ॥ संत तोची नरहरी ॥ ६ ॥

॥ ३ ॥

कायावाचामनोभावें ॥ सम व्हावें पायीं गा ॥ १ ॥ संताचीया सलगींत ॥ होय हीत जीवांचें ॥ २ ॥ तेथें नाहीं उपदेश ॥ भ्रमनाश पावणें ॥ ३ ॥ स्वयं आत्मा होवोनीया ॥ तोषे ठायां आपुल्या ॥ ४ ॥ अनयासी मन नीवें ॥ लीन भावें वर्ततां ॥ ५ ॥ संत नोहे देह भावें ॥ अनूभवें पीकले ॥ ६ ॥ अनंत मानीं एकाकार[5] ॥ सर्वाधार जयांनीं ॥ ७ ॥

॥ ४ ॥

लीन भावें वागताहे ॥ सर्वांभूतीं येक पाहे ॥ १ ॥ आत्मवत सर्वांभूतीं ॥ होय साक्षी मनोगती ॥ २ ॥ सर्वांलागीं आवडता ॥ प्राणाहुनी पढीयंता ॥ ३ ॥ अधिकारें जैशा तैसा ॥ भावे करी सहवासा ॥ ४ ॥ ऐसा मान सज्जनांचा ॥ वेद गर्जे नीजवाचां ॥ ५ ॥ अनंत भावें योग तप ॥ सर्व भ्रमाचे आरोप ॥ ६ ॥

याप्रमाणें संतांचि महिमा वेद आत्मवाणीनें गर्जना करीत आहे. ही महिमा सृष्टिक्रमांत दृश्यभावानें परोक्ष समजानें भावना करितात. यामुळें सर्व घोंटाळा आहे. हा अपरोक्ष भावावांचून दूर व्हावयाचा नाहीं. यावरून संतांची ओळख, दर्शन देहाचे ओळखीनें व दर्शनानें नाहीं; तर भावदर्शनच सर्व सुखाला कारण आहे. तो भाव अभंगपणाचा, आत्मन्यायवंत, असे भाविक संत स्वयें भगवंत या जगामध्यें विरळ, व त्यांची संगती अवघड; पूर्वप्रवाहानें कोणासी होईल त्यास स्वानुभावानें संतपण प्राप्त होऊन अनंत ( अविनाशी ) वैभव आकलन करणारा असा तो मानव सनातन धर्मे चालेल.

---

१ दृष्टीस पडण्यास योग्य आहेत. २ प्राणिमात्रसमूह. ३ नम्र, तदाकार ४ स्वानंदभाव. ५ आत्माकार. ६ रूप=दृश्य नाशिवंत जाणून.

## अनंतसद्गुरु यांचें वर्णन.

श्रीमदनंतसद्गुरु हा संतावतार अपारभावी आहे. यांचें चरित्र सर्व अपार, हा अविनाशी परमात्मा पंथभेषरहित अवधूतवेषानें (अद्वैतरूपानें) या जगतामध्यें सर्वकाल भावानुसार अधिकारपरत्वें सर्वांना भेटत आहेत. यांची सर्व लीला श्रीमत्सद्गुरु एकनाथाप्रमाणेंच समजावी. फक्त कालमान याशिवाय दुसरा प्रकार कांहीं नाहीं. समभावी वर्तन श्रीसद्गुरु एकनाथावांचून नाहीं. ॥ तो सर्वक्रम श्रीमदनंतसद्गुरु यांचे वर्तनांत उघड रीतीनें दृष्टीस पडतो. करितां या ठिकाणीं सर्व चरित्रभाग तोच समजावा. नांव, जन्म, ठिकाण, वर्ण, गोत्र, हा सर्वप्रकार देहभावपक्षीं सृष्टिव्यवसायामध्यें आहे. सर्व देहभाव झडून सर्वत्र आत्मभाव जा संगतीपासून होऊन सर्वच हरी नटला आहे असा अविनाशिभाव होतो, असा संतमहिमा आहे. तर त्या ठिकाणीं लोकत्रयमायाव्यवसाय कोठून असणार, हें उघड सर्वांचा लक्षांत येणार आहे. आतां जगतीमध्यें देहवर्तन, जनाप्रमाणें जनाला दिसणार संतांना संतांप्रमाणें. असा हा निगम गुरु अनंत यांना पैठणी ब्रह्मचारीबुवा असें ह्मणतात. चित्रकला अप्रतिम, बाहेरचे नाथीं चित्राचा देखावा फार मनोरम पाहण्यासारखा आहे. उद्योग जो तेंच नांव असा जगक्रम आहे. त्याप्रमाणें चितारीबुवा जटाधारीबुवा असीही प्रसिद्धी आहे. गांव कोणतें हा जगक्रमामध्यें पहिला प्रश्न कोणींही केला तर गोकर्ण असें सांगत. कपटनाटकी चित्तचोर सर्वसाक्षी, कोणाचा भाव किती आहे. हें पहात पहात स्वैर गतीनें भूमंडळावर पर्यटण करीत करीत प्रतिवर्षीं नाथषष्ठीस येण्याचा नेम खरा. येथें येऊन जाऊन सुमारें ३०।४० वर्षें होत आलीं. परंतु हा पुरुष किती अधिकाराचा आहे हें समजण्यास जनाला अधिकार नाहीं. कारण जांचा पंथ निराकार असें अपूर्व वर्तन.

### श्लोक.

**ना आग्रहो कोणहि जा प्रसंगीं ॥ संगीं असोनी नच देह संगीं ॥**
**ताठा कदांही नच जेथ येई ॥ गोविंद गीतीं प्रचितार्थ देयी ॥ १ ॥**
**बोले बहू जो परि नाचि बोले ॥ ऐसा प्रभावो निजरंग लीले ॥**
**माझें न तूझें सहजार्थ[1] साजे ॥ वागे तयातें कवणू न साजे ॥ २ ॥**
**जसा कोण भेटे तसा त्यास दीसे ॥ असा भाव हा आत्मवीणा नदीसे ॥**
**जयां पारखीतां कदां पार नाहीं ॥ नसे ज्ञान अज्ञान मुळीं[2] कांहि नाहीं ३**

---

१ अविनाशार्थ. २ मुळाला नामरूपरंग.

असा अपार भाव, ही निगम रहा, सारस भाव, या ठिकाणीं आगमगतीचा लाग नाहीं, कां ह्मणाल तर जेथें.

**ओंवी. शुद्ध मतीनें सगळे ॥ न फोडितां रांधिले कोहाळे ॥ चवी आले सोहं मेळे ॥ खाद गोपाळें जाणिजे ॥ १ ॥** (रुक्मिणीस्वयंवर.)

स्वरूपीं ( आत्मरूपीं ) नामरूपरंग याचा अभाव, करितां जनांत देह वर्ततां हा अमका आहे अशी वृत्ति फुटूं न देतां सहजी वागणूक पुरी.

**अभंग.**

**संताची सहजी, नांदणूक पूरी ॥ वसोनी संसारीं, फसेनाती ॥ १ ॥**
**स्वानूभवबळें, निरापेक्ष जाले ॥ मूळ पदां आले, भूल न त्या ॥ २ ॥**
**जयाचें वागणें, दिसे अनुमानी ॥ कवणाही मानी, न तोलवे ॥ ३ ॥**
**साधकें देखोनी, व्यवंचना करणें ॥ संकल्पासी हरणें, जाणण्याचा ॥ ४ ॥**
**जाणतां जाणवें, नची मनां संत ॥ ह्मणोनी अनंत, नाम तयां ॥ ५ ॥**

यावरून संतवर्तन सर्वांचा लक्षांत भावानुसार येणार आहे.

**ओंवी ॥ विदेहपणीं भक्ती ॥ हीचि सायुज्य मुक्ती ॥ निसंगाची स्थिति ॥ निसंगची जाणे ॥ १ ॥**

नरतनू ही सर्वांत श्रेष्ठ आहे. या ठिकाणीं जन्ममरणभ्रमरहित व्हावें हाच कार्यार्थ समजावा. या मानवीसारखा संभ्रम इतर योनींचे ठिकाणीं नाहीं. असा हा भवभ्रम सर्व दुःखाला कारण त्याचा नाश करून सर्वसुखी असा अविनाशी भाव प्रगट करावा. याकरितां ही विधात्यानें निर्माण केली. भवभ्रमाचा-नाश ज्ञानावांचून नाहीं. तें ज्ञान सद्गुरुवांचून नाहीं. संतसंगानें अनुतापप्राप्तीनंतर सत्यभाव प्रगटला कीं, भ्रांतीरूप द्वैतपक्षोद्भवी भवभ्रमाचा आपोआप नाश होऊन अखंड आत्मप्रेमा होतो. हा कार्यार्थ साधण्याकरितां साधन दुर्गम आहे. कारण ही मूळची मोहकाया ह्मणून शब्दज्ञानानें माया सुटणार नाहीं. एक संत-समागमच. **श्लोक.–सदा संतोभिगंतव्या यद्यप्युपदिशंति न ॥ या हि स्वैरकथा तेषामुपदेशा भवंति ताः ॥ १ ॥** असें श्रीमद्भागवतीं परिक्षितीला शुकाचार्य सांगतात कीं, तेथें उपदेश नाहीं मात्र भ्रमनाश पावणें असी शिक्षणा पद्धती संतावांचून नाहीं. या जगतीमध्यें बोधनायोग्य गुरुराव एक श्रीमदनंत सद्गुरु एकनाथ असें सर्वमत आहे.

**श्लोक.**

**मन अमन कराया संगती सज्जनाची ॥ सदपद[1] अनुभावो वागतो**

---

१ परमात्म.

**येथ साची ॥ रित नच इतरांची दूरची गोष्ट आहे ॥ सदय हृदय जाचें नाम त्यां संत पाहे ॥ १ ॥ तळमळ भवभानापासुनी सूटला जो ॥ हरिसम सकळीकीं साच जाणे मनीं जो ॥ द्विविधपण नसे ज्या ऐक्यभावो स्वभावो ॥ भुमिवर गुरुरावो बोधनां योग्य मावो ॥ २ ॥ अभिमति नच गेहीं ह्मंत साधूपणाची ॥ दिनजन कळवाहे अंतरीं जास साची ॥ जगनग दिठिं मार्जी माधवो मानिताहे ॥ नमन चरणिं त्याचें साच हें चित्त बाहे ॥ ३ ॥ समपणनिति शब्दो भाव दावी सुखाचा ॥ रसिकपण[1]रसाची वाणिती सत्य वाचा ॥ जिव शिव द्विपणाचें नाहिं पीसें जयासी ॥ जगिं सुजन ह्मणावा ठाव हा आत्मवासी ॥ ४ ॥ भवभय हरवाया कासयाची धरावी ॥ नच दुजि उपमा यां यां जगीं साक्ष भावीं ॥ सकळ निति पुराणें वेद सिद्धांत बोली ॥ गुणचि वदति याचे साक्षपी[2] जाण बोली ॥ ५ ॥**

असा हा अनंतचरित्रमहिमा सर्व वर्णन करीत आहेत तो सर्व प्रसिद्ध आहे.

### श्लोक.

**मनसुमन प्रभातीं कांचनीं कोंदणाची ॥ निगमनिळ हरी हा जोडिला अंतरींची ॥ नवविधि मुळसूत्रीं बैसवी सांख्यशास्त्रीं ॥ प्रभु दिननिशि त्याचे अंतरीं प्रेमपात्रीं ॥ ६ ॥**

याप्रमाणें भक्तियुक्त अंतःकरणांत जो सर्वव्यापक प्रभू (अनंत) तो वास करितो. हा समपणा परोक्षभावानें लयाला जातो, मग हरिप्राप्ति कोठून होणार ही सर्व भ्रांती पसरली आहे याचा शोध नाहीं करितां संतभजनपद्धती सर्वांनीं स्वीकारावी. संतवृत्ती अनुतापी राहते ह्मणून देहभावपक्षीं उदासीनता असते यामुळें अनन्यभावानें हरीचा आठव करितात.

### अभंग.

**बाळपणीं अनुताप ॥ भक्तिभावाचा प्रताप ॥ १ ॥ एकनाथ नामीं साजे ॥ दुजेपण जया लाजे ॥ २ ॥ पापपुण्य नम्र जालें ॥ अनूतापें ऐक्य जालें ॥ ३ ॥ चित्त चैतन्यीं मिळालें ॥ ऐसें हरीनामें केलें ॥४ ॥ जनार्दनकृपाबळें ॥ एका एकपण कळे ॥ ५ ॥ आत्मदर्शी सुदर्शन ॥ एकनाथ संकीर्तन ॥ ६ ॥ सदानंत दास तधीं ॥ होता पासीं सत्य मदीं ॥ ७ ॥**

या अभंगांत जनार्दनानें नाथांना जगाचा स्वामी कोण आहे हें स्पष्ट रीतीनें आत्मदर्शी सुदर्शन हेंच एकनाथ यांचें संकीर्तन असा बोध केला. त्या वेळीं हा

---

१ परमात्मभावगोडीची. २ निश्चयपूर्वक.

अनंतदास जवळ होता असें स्पष्ट रीतीनें ह्मटलें आहे. यावरून सर्वांच्या लक्षांत सहजच, जो नाथ अवतार तोच हा अनंत आहे असें दिसून येईल. करितां जो नाथांचे भजनाचा थाट तोच या ठिकाणीं ज्याचा त्यानेंच वर्णन केला आहे.

**अभंग.**

**गाणें तें वेगळें, अनुतापि याचें ॥ जनांहुनी साचें, मना ठायीं ॥ १ ॥**
**चित्त जेथें धांवे, तेथें हरि दर्श ॥ दाविती आवेश, स्वभावानें ॥ २ ॥**
**मनासी करीती, अपरोक्ष संत ॥ भजन पसंत, पद्धती ही ॥ ३ ॥**
**दुजा भाव अंगीं, एउनची देती ॥ सर्वभावें होती, साक्षी स्वयें ॥ ४ ॥**
**अनंतभक्ती ही, बोलती चवथी ॥ अनन्य पद्धती, सनातनी ॥ ५ ॥**

ही संतांची अपरोक्ष अशी अनन्य भजनपद्धती सर्वांनीं ग्रहण करण्याला योग्य आहे.

**अभंग.**

**येडका हा काम, करुनीया सम ॥ चित्ताला आराम, करी बापा ॥ १ ॥ कलिमल सारा, द्वैत भाव सारा ॥ शांतीचा तो वारा, लागो मज ॥ २ ॥ नारी[1] घर चारीं[2], नको घालूं हरी ॥ चित्तां पार करी, जगदीशा ॥ ३ ॥ थाली हो बोधाची, प्रेमाच्या कामाची ॥ अनंतरंगाची, गोडी द्यावी ॥ ४ ॥**

**॥ १ ॥**

**यतीरूप जाचें, चित्त जालें साचें ॥ राम भजनाचें, प्रेम मोठें ॥ १ ॥**
**करी गूणनाश, भ्रांतिचा तो देश ॥ निरंजनीं[3] वास, सदां करी ॥ २ ॥**
**नामगोत्र नसे, पूर्णानंद असे ॥ सोडूनीया पीसें, भवाब्धीचें ॥ ३ ॥**
**थारा नित्य जासी, क्षेत्र पैठणासी ॥ अनंत विलासी, गुरुराव ॥ ४ ॥**

**॥ २ ॥**

**येमनेमींसम, वृत्ती मनोधर्म ॥ गुणत्रय कर्म, जेथ नसे ॥ १ ॥**
**करुणासागर, दिनांचा उदार ॥ दासांचा तो भार, घेत असे ॥ २ ॥**
**नाश केला आधीं, मोहाचा उदधी ॥ मनालागीं बोधीं, आत्मज्ञान ॥३॥**
**थाट हा पंतांचा, एकनाथ संताचा ॥ मांड अनंताचा, मांडियेला ॥४॥**

**॥ ३ ॥**

**येणें झालें जगीं, हित उपदेशा ॥ साठीं अविनाशा, साहाकारी ॥ १ ॥ कर्मधर्मयोगें, मुमुक्षु जो होई ॥ तयालागीं देई, उपदेश ॥ २ ॥ नामावरी गोडी, जिवाचीये परी ॥ समभाव धरी, अवतार ॥ ३ ॥ थार हाची पारीं, भवाचे हो असे ॥ अनंताला दीसे, जगनगीं ॥ ४ ॥**

---

१ माया. २ आचारी. ३ परमात्मठिकाणीं.

॥ ४ ॥

एकूणही नव, विध ऐक्यभक्ती ॥ येकनाथ संतीं, वसतसे ॥ १ ॥
करावी घोकणी, निंदा टाकुनीयां ॥ समाधानीवायां, टांकूं नको ॥ २ ॥
नामसंकीर्तन, भजनानंदीं राहे ॥ सुख बापा घे हें, अमोलीक ॥ ३ ॥
थारयाचे पायीं, अनंतासी जाला ॥ कज्जा तो मिटला, जन्मकर्मीं ॥ ४ ॥

॥ ५ ॥

असा हा समभावावतार धारण करणारा श्रीमदनंतसद्गुरु यांचा भजनमहिमा सर्वांत श्रेष्ठ आहे. कारण हा अपरोक्षभावी अशी अनन्यभक्ती हीच होय. ही सर्व भक्तीमध्यें श्रेष्ठ आहे. इचें वैभव भोगणारा अधिकारी निराधार भाव योगीच आहे.

अभंग.

अनन्य भक्तीचें, वैभव अपार ॥ भोगी निराधार[1], भावयोगी ॥ १ ॥
भक्त तो विभक्त, संसारविषयीं ॥ आत्मत्वाची सयी, जयां स्फुरे ॥ २ ॥
दुजेपणावीण, करीत चिंतन ॥ समत्व वर्तन, जनीं ज्याचें ॥ ३ ॥
अनंत तयाचे, पदीं लीन होय ॥ वेगळा न होय, वरी कदां ॥ ४ ॥

॥ २ ॥

हरीभक्ती श्रेष्ठ, अनन्य भावाची ॥ भक्तदेव याची, विभक्तीन ॥ १ ॥
अनन्य ह्मणीजे, अन्य नाहीं दूजा ॥ भक्तीचीया काजा, आत्मप्राप्ती ॥ २ ॥
सहज भावाचा, वर्तनीं वसती ॥ अनन्य पावती, पद जे ते ॥ ३ ॥
न ते पंथवादी, नते आपपर ॥ पर्णी जगभर, फिरणारे ॥ ४ ॥
जेनीं[2] वसोनीयां, जगांत अनंत[3] ॥ महंतीचा पंथ, लपवीती ॥ ५ ॥

॥ ३ ॥

प्रतिष्ठा नावडे, नावडे रिद्धीसिद्धी ॥ सदां समबुद्धी, आत्मरती ॥ १ ॥
न दाविती जे, जनांत आपणां ॥ वदती मीपणां, वेगळोनी ॥ २ ॥
वाचाळता बहू, परीपरभावें ॥ जैशा तैशा भावें, पटवीती ॥ ३ ॥
अनंत अनन्य, भावीजन ऐसें ॥ हरि दुजा नसे, ययाहुनी ॥ ४ ॥

असा परमात्मरूपीं अनंत यांचें चरित्र श्रीमद्भागवतीं शुकाचार्य परिक्षितीला सांगतात. तें सर्व जगप्रसिद्ध तोच महिमा गात आहेत. परंतु भावांत फरक आहे. तो असा.

अभंग.

गोपिका येकांतीं, हरीं आलिंगीती ॥ शूक भागवतीं, सांगे नृपां ॥ १ ॥
गीत ते नितीचें, अकाम कामीक ॥ जगाचे न्यायीक, न होतील ॥ २ ॥

---

१ परमात्माधार. २ देहीं. ३ परमात्मरूपसंत.

**हरीनें भोगील्या, नारी मनोवृत्ती ॥ कामादि निवृत्ती[1], तया भोगें ॥ ३ ॥**
**जयासंगभोगें, भवरोग जाय ॥ अनंततो गाय, मीतें[2] भोग ॥ ४ ॥**

यावरून उघड दृष्टीस पडतें कीं अकामीक न्याय अपरोक्षभाव अशा आत्मभावानें वर्णन केला आहे याकरितां—

**अभंग.**

**आत्मभावें जरी, श्रीहरि भजसी ॥ मानवा पावसी, आत्मसिद्धी ॥ १ ॥**
**आत्मस्थिती प्राप्ती, वरी भवव्याप्ती ॥ होईल समाप्ती, अनायासें ॥ २ ॥**
**सूर्योदयीं रातीं, जेवीं नाहीं होय ॥ आत्मत्वानें होय, तैसी भ्रांती ॥३॥**
**निभ्रांतपणानें, विचरे अवनीं ॥ संत आत्मज्ञानीं, सर्वज्ञ जो ॥ ४ ॥**
**अनंत भोगुनी, भोग नसे रोग ॥ त्यागाचा संयोग, तयां नको ॥ ५ ॥**

याकरितां सर्व अनंतचरित्रमहिमा संतसंगतीवांचून भवरोगनाशक होणार नाहीं. जोंपर्यंत भवभ्रम आहे, तोंपर्यंत कामीकन्यायानें सर्वच अनर्थ. आत्मभावावांचून आत्मसिद्धी नाहीं; या नरतनूला प्राप्त होउन आत्मभावसिद्धी करणें हें कृतकार्य आहे. आत्मभावपद्धती सर्वांचे लक्षांत येण्याकरितां व श्रीमदनंतसद्गुरु यांचेंही चरित्र पूर्ण लक्षांत येण्याकरीतां हे पुढील श्लोक रुक्मिणीविलासांतील दिले आहेत.

**ऐकें सुंदरि बोल ते तुजप्रती ठावी नसे रीत गे ॥**
**ऊगां राग कशासगे करिसि हा दुःखां बहू सांगगे ॥**
**बोली ना कळली निजासनिचिती उगां कसा राग तो ॥**
**शांतीहो मन ऐक सांगत असे आत्मी भला लाभतो ॥ १ ॥**
**तूला चीड कशासगे भरलि हे वीनोद ठावा नसे ॥**
**तूझा पासुनी रूपगे मज बरें गूणास साक्षी असे ॥**
**नाहीं रूप मला अगूण मुळचा बोली असे सत्य ही ॥**
**कूळी नाहि खरी रमे अकुळते नीरामयी[3] निर्भहीं[4] ॥ २ ॥**
**नाहीं देश मला स्थिती नच मला निर्मोह मायापुरी ॥**
**सत्ता मात्र वसे जगीं नगपदीं काळारूपें सांवरी[5] ॥**
**तूं नोहे भिमकात्मजा मम प्रभा नीजासनीं ऐक्यती ॥**
**कांती तूं समशांत मी हरी असें जोडे मुळीं हे निती ॥ ३ ॥**
**गौळी ऐक कसा असें वदत हें पूरे धरीं अंतरीं ॥**
**इंद्रियें नवहींच गोकुळपुरीं गायीरुपें सुंदरी ॥**

---

१ शांती. २ आत्म, स्वभावित. ३ भवरोग रहित स्थलीं. ४ निराधारी. ५ संव्हार करितो.

राखी काळ सदां भुमी निजवनीं गोपाळ ते बोधनीं ॥
सद्भावें मज नंद तो निजपिता माता विदेही जनीं ॥ ४ ॥
कांते आणिक ऐक गे मिपणतें नाहीं नृपा आसन ॥
प्रेमाचा सदनीं सदां परघरीं भावावरी आसन ॥
निभ्रांता मननीं बसे अनुदिनीं बोधासरोजावरी ॥
तूं गे सुंदर तेथही सुनितीतें साक्षी स्वरूपावरी ॥ ५ ॥

असा हा श्रीमदनंतसद्गुरुज्ञान, ऐश्वर्य, शक्ति, बल, वीर्य आणि तेज ह्यांनीं सर्वदा संपन्न ह्यानें सर्वांचे उत्पत्तीला कारणीभूत असी जी आपली वैष्णवी माया तिला आपले आधीन ठेविली असतांही व जन्ममरणरहीत आणि भूतांचा ईश्वर असून नित्य, शुद्धबुद्ध व मुक्त अशा स्वरूपानें तो युक्त असूनही त्या मायेच्या योगानें देहधारी व जन्मास आल्यासारखा तो भासून तो लोकांवर अनुग्रह करीत आहे असा दृष्टोत्पत्तीस येतो. पतितपावन दीनबंधू अनाथपालक हें ज्याचें ब्रीद आहे याप्रकारें अनंतचरित्रमहिमा अनुभवनीय आहे.

### अभंग.

गोष्ट ही हिताची, मानवाजनांत ॥ वसावे मनांत, समभावें ॥ १ ॥
आपणां पहावें, देहातीतपणीं ॥ अभ्यासें पहाणी, पावे ठायां[1] ॥ २ ॥
देहातीत गती, वसोयेयी भावें ॥ देह अहंभावें, न वसवे ॥ ३ ॥
अभ्यास कारण, तारण मारण ॥ काळनिवारण, धारणा ही ॥ ४ ॥
निर्धारें धरावी, अंतरीं शूरांनीं[2] ॥ मानवी नरांनीं, न त्यागावी ॥ ५ ॥
अनंत संतांचीं, मतें समत्वांचीं ॥ ममत्वें जनांचीं, दुर्दशा हे ॥ ६ ॥

याप्रमाणें ही संतांचीं समत्वाचीं मतें सर्वांस ग्रहण करण्यास योग्य आहेत.

॥ पूर्वार्ध समाप्त ॥ हरिःशरणंः ॥

---

१ आत्मठायां. २ एकांग वीरांनीं.

॥ श्रीगुरुदेवदत्त ॥

# ॥ चरित्र उत्तरार्ध ॥

**श्रीमदनंत सद्गुरवेनमः ॥ श्लोक ॥ दृष्टांतोनैव दृष्ट स्त्रिभुवन जठरे सद्गुरोर्ज्ञानदातुः ॥ स्पर्शश्चेत्तत्रकल्प्यस्सनयति यदहो स्वर्णतामश्मसारं ॥ न स्पर्शत्वं तथापिश्रितचरणयुगे सद्गुरु स्वीयशिष्ये ॥ स्वीयं साम्यं विधत्ते भवति निरुपम स्तेनवा लौकि कोपि ॥ १ ॥**

**आचा. कृ. शतश्लोकी.**

श्रीमदनंत सद्गुरु ज्ञानदायक परमात्मा यांला या त्रिभुवनांत दृष्टांत नाहीं. परंतू कल्पतरु व स्पर्श ( परिस ) इत्यादिकांचे दृष्टांत देतात; पण ते या ठिकाणीं शोभत नाहींत.

**अभंग.**

**संत कल्पतरू, समसत्य होती ॥ भावीकासी देती, भावीलेलें ॥ १ ॥**
**बोलणें हें साजे, गांवडे जनांत ॥ संत भजनांत, नची वर्ते ॥ २ ॥**
**अकल्पित देती, संत अनिर्वाच्य ॥ कल्पनेची आंच, शांतवोनी ॥ ३ ॥**
**कल्पतरू उणा, संतजन तोलां ॥ अमोलासी मोलां, न विकावा ॥ ४ ॥**
**अनंत बोलानें, शोधावें अंतर ॥ संत निरंतर, डोलवावे ॥ ५ ॥ १ ॥**

करितां ज्ञानदाता सद्गुरु यांना दृष्टांतानें दाखवूं नये, व त्यांचे ठिकाणीं देह भावी ( नाशिवंतभावी ) बुद्धि नसावी. जो सर्वकाल, अखंड, अपरोक्ष ( प्रत्यक्ष ) असा आहे.

**अभंग.**

**आत्म स्थितीवंता, संताव्यवधान ॥ असंख्यावसान, विराजत ॥ १ ॥**
**सर्व साक्षीपणें, जिणें परातपर ॥ भावार्थें तत्पर, स्वभावी जो ॥ २ ॥**
**तयां दृष्टांतानें, नये दाऊं कदां ॥ सहज जो सदां, निराधार ॥ ३ ॥**
**दिसे सर्वपणीं, सिद्ध कर्ता हर्ता ॥ शांतीचा जो भर्ता, अतर्क्य तो ॥४॥**
**अभंग स्फुरणें, अनंत पोसवी ॥ आत्मज्ञानी भवीं, भवातीत ॥ ५ ॥**

आत्मबोध झाल्यावर आत्मस्थिति होते; तीच कृष्णलीला सर्वांनीं समजावी. व्यासादिकांची वाणी याच भावाची आहे.

---

१ आत्मा. २ बाधा, उष्णता. ३ आनंदित करावे. ४ ध्यान, एकाग्र लक्ष लागणें. ५ देह.

॥ २ ॥

**आत्मारामा तूज, नीज भक्ती प्रेम ॥ निर्जराचें धाम, देसी तयां ॥ १ ॥**
**समाधान झाला, उमेचा तो पती ॥ जीवपणें भीती, जयां नसे ॥ २ ॥**
**शीव भावें शक्ती, पासीं उपदेशी ॥ नित्य अहर्निशी, लोकहीतां ॥ ३ ॥**
**वाल्याकोळी पाहे, उलट्या नामें झाला ॥ वाल्मीक बोलीला, श्रेष्ठ कूळीं**
**नाटक आधार, जगलीला हेची ॥ साक्षी पुराणाची, मुनीकरी ॥ ५ ॥**
**थोर थोर ऐसे, समाधान झाले ॥ अनंताचे बोलें, नीज साधी ॥ ६ ॥**

सर्व गुण भावलीला आत्मरूपानें आहे. तेथें गुणाकृति नाहीं. सगुणावांचून साक्ष नाहीं, साक्षीकरितां कर्मानुबंध, सगुणी, स्वानंदविलासी, परमात्म विश्राममंदिर असी ही नराची तनु निर्गुण[1] भाव युक्त आहे. हा गीत गाण्याचा ठिकाणा होय. आत्मार्थ भावजडणी हा सगुणाचा प्रभाव आहे. ह्मणून जी निर्गुण तीच सगुणाकृति असी ही जगलीला नाटकाधार आहे. मुनीनें पुराणाची साक्षी केली, सर्व आत्मरचना या भावानें थोर थोर समाधान ( आत्म स्थितिवंत ) झाले. असो. परमात्म भावी संत असंख्य अवसानें यांनीं शोभिवंत, सर्व साक्षी भाववंत, सर्व भावानें सिद्ध, जो अतर्क्य, शांतीचा भर्ता तो सर्व कर्ता, हर्ता सदां सहज निराधार हाच सर्वांला आधार आहे. अर्थात् भवभावरहित आत्मज्ञान दाता असा सद्गुरु या देहीं पहावा. विनाशी देहामध्यें जो अविनाशी पहातो तोच सर्वांत श्रेष्ठ होय.

### अभंग.

**सहजची चाले, जगतप्रभाव ॥ पंचभूतभाव, आत्म साक्षी ॥ १ ॥**
**पंचभूताकार, आत्मयां आधार ॥ जेथें हा विचार, तोची धन्य ॥ २ ॥**
**तोची धन्य येक, येकपणें उभा ॥ चैतन्याची शोभा, शोभवी तूं ॥ ३ ॥**
**समाधानी जया, अंगीं आतूडली ॥ तेथें प्रसवीली, आत्मविद्या ॥ ४ ॥**
**अनंत जन्मांचें, सार्थक जहालें ॥ सज्जन निमाले, मनोभावें ॥ ५ ॥**

या विचारें आत्मभावक्रमानें भवभ्रमाचा अनायासें नाश होऊन, नंतर सनातन धर्मे जो सहज स्थितीनें वर्तन करितो तो महात्मानर स्वयें परमात्मा होय. परंतु ही सोय श्रीमदनंत सद्गुरुसहवासा वांचून नाहीं, तो सहवास अनुतापावांचून होणार नाहीं, करितां अनुतापवृति धन्य आहे. संत सहवास करून होणार नाहीं. कारण तेथें अधिकार पाहिजे. सहवास करण्याला एक नियमितस्थल नाहीं. ज्यांचा भाव अपार ( सर्वव्याप्त ) असा असल्यामुळें शोध करणें नको.

---

१ परमात्म.

अभंग.

न लगति सायास, जावें वनांतरा ॥ सुखें येतो घरां, नारायण ॥ १ ॥
ठायींच बैसोनी, करा येक चित्त ॥ आवडी अनंत, आळवावा ॥ २ ॥

जाचे प्राप्तीला कांहीं सायास नकोत.

श्लोक.

नको जाऊं रानीं हट मठ खटाटोप हरवी ॥
असे तैसा राहे सहजपण हे युक्ति बरवी ॥
सदां घेई गोडी सगुण चरितीं निर्गुणपणीं ॥
धरी भक्ती भावो अजित विभवो[1] होय तरणी ॥ २ ॥
भजे आत्मारामा विमलचरितें सादरपणें ॥
जिणें याणें होणें जननमरणातीत करणें ॥
जया ध्यावें तैसें मन तद् वसें होत सहजी ॥
निजध्यासीं प्राप्ती भ्रमर अलिचा न्याय तुकजी ॥ २ ॥

ठायींच बैसोनी, करा येक चित्त ॥

मी जीव, मला मरण आहे असा जो विनाशी भाव चित्ताचे ठिकाणीं तो सोडून जीवात्मा तोच परमात्मा अशा ऐक्यपणानें अविनाशी भावयुक्त चित्त करून चित्त अधिष्ठानीं आवडीनें अनंत जो अपार सर्व व्यापी, अविनाशी परमात्मा आळवावा. तो प्रकार—

श्लोक.

जिवा ध्यासें शीवा अजप जपवा जाप्य विवरा ॥
वरा भावार्थाला सुजन पथिं या भाव विवरा ॥
भराया दुर्नाशांतुनि झडकरी दूर असणें ॥
धनें ना याहूनी स्वसुख वळखी नित्य वसणें ॥ ३ ॥

या अविनाशी भाव विचारानें श्रीमंदनंतभेटी होते. नंतर सद्गुरुमुखानें श्रवण त्याचें मनन होऊन निजध्यासानें अंतीं साक्षात्कार होतो. येथें भ्रमर अलिच्या न्यायाचे तुक आहे.

श्लोक.

हरिरुप सुजनाचे भक्तिरूपें हरीचा ॥
इहरिति समसाक्षी कीटकी भृंगिणीचा ॥
घर करुनि अळीतें भृंगिणी आंत कोंडी ॥
निजकळ अनुतापें भृंगिणी रूप जोडी ॥ १ ॥

---

१ ऐश्वर्य.

याचप्रमाणें

**मनहरिरुपध्यासें ध्यानध्याताचि होतो ॥**
**कलित घडत लाभो फार हा साक्ष देतो ॥**
**हरिभजनिं बहू गा साधु[1] झाले जगींया ॥**
**ह्मणुनि हरि भजावा प्रेमवाणीं तनूंयां ॥ २ ॥**

हा प्रकार लक्षांत घेतला ह्मणजे जसा भृंगीचा स्वभाव अळीला भृंगिणीरूप जोडतो त्याप्रमाणें संतानंत यांनीं जाला पसंत केलें तो अविनाशी भावाला प्राप्त होतो. पतिताला (अहंकार रहिताला) तारणारा एक संतानंत इतराला अधिकार नाहीं. सर्वांना गतिदायक हाच परमात्मा.

पद.

**जाचें त्यासचि रे ॥ २ ॥ इतरांतें नाहिं जिरे ॥ धृ० ॥ घालेपण जा अंगीं ॥ त्याचा मायिक नठरे संगीं ॥ जाचे ॥ १ ॥ संत समागम वायां जंववरीं अंतरिं कायिक माया ॥ जाचे ॥ २ ॥ अभाव जनिया भरला ॥ अनंत गति दावाया उरला ॥ ३ ॥**

जनीं सर्व अभाव (मी देही ह्मणणें असा भाव) भरला आहे. तो दूर होणें करितां संतानंत हे सर्वकाल या भूमंडळावर पर्यटण करीत आहेत. बहुत करून समुद्रकांठीं फिरत. कारवार, रामेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, गोमंतक, मलबार किनारा, सांवतवाडीप्रांत. इत्यादि सर्वत्र प्रसंगानुसार कालक्रमणा होत असे. प्रतिषष्ठीस अधिष्ठानीं (पैठणास) मोठ्या प्रेमानें येण्याचा नेम खरा. गुरुभक्तीभाव, समता असी लोकत्रयांत नाहीं. उद्योग चित्रकलेचा फार अप्रतिम. सर्व लीला परिपूर्ण असे लीलाविग्रही, समभावावतार भवभ्रमाचा नाश करण्याला समर्थ आहेत. नित्य नवा वास, नित्य नवा भजनाचा प्रेमा, एकाकी अवधूत (अद्वैत पंथ) वेषानें स्वच्छंद गतीनें फिरण्याचा क्रम असे. फिरत फिरत १८०० सालीं जिल्हा कुलाबा तालुके महाड या ठिकाणीं आले. ते वीरेश्वराचे देवळांत राहिले. या वेळीं जटा होत्या त्यामुळें लोक जटाधारी, बैरागी, कोणी आहेत असें ह्मणत. पुढें चित्रांचा देखावा जसा दृष्टीस पडला तसें कांहीं लोक नादीं लागले. लोकप्रवृत्ति नादिष्ट आहे. सर्व कांहीं नादानें होतें असें आहे. हे तर प्रत्यक्ष अंतर्बाह्य चित्र काढणारे मग काय पाहावयाचे आहे. सर्वत्र सर्वांना प्रिय असें वर्तन.

श्लोक.

**संतोषकारी जगिं प्राण जैसा ॥ तैसा मिळेतो मिळणींत सैसा ॥**

---

१ निजबोध राम याचा शोध करणारा, नित्यार्थ इच्छु.

**भावार्थनीधी निगमो पुराणा ॥ प्रेमोद्भवानें करुणेकराणा ॥ १ ॥**
**नसे पक्षपाती नसे लक्ष लक्षीं ॥ सदाचार ठायीं दिसे जो सुरक्षी ॥**
**जया देह भावो सिवेना कदांचा ॥ जगीं तोचि तो जाणता सर्वसाचा २**

हें उघड असे, पण सर्व साचा जाणता, माहाभूत साक्षी हा सर्वांचे लक्षांत येणारा नाहीं. कारण भेददृष्टी आहे ह्मणून. असे गुप्त मार्गें प्रगट स्थितीचा पुरुष विरळ. या ठिकाणीं कांहिं दिवस राहिले. उद्योग्य चित्रें काढणेचा, येथें विष्णुमंदिरांत चित्रांचा देखावा पाहण्यासारखा आहे. प्रसिद्धि चितारीबुवा अशी आहे. विशेष सहवासी काशीनाथ कुळकर्णी व लक्ष्मण गुरव यांचें प्रेम महाराजांचे ठिकाणीं फार असे.

शके १८०१ या सालीं महाड नजीक कसबे नाते या गांवीं रा. रा. रावसाहेब भिवराव बापुजी रुइकर यांना चित्रांचा नाद फार असे. त्यांना महाडांत उत्तम चित्तारी बुवा आले आहेत असें समजलें. नंतर त्यांणीं मनुष्य पाठवून आणविले. राहण्यास एकांतस्थळ मळयांत उत्तम सर्व सोयी असें पाहून राहिले. सर्व व्यवस्था रावसाहेब मर्जीनुरूप ठेवीत असत. चित्रें काढणें तीं घरीं येकांतस्थळीं काढीत, त्या स्थळीं सर्वांना जाण्याची मनायी असे. फक्त त्यांचे शुश्रूषेकरितां एक दोन मनुष्यें मर्जीनुरूप वागणारीं जवळ राहत असत. गरीबावर फार दया, सर्व स्वभाव चित्तचोर, मनमोहक अशी संतमाया तेथें काय पत्ता लागणार; स्वयंपाक मळयांत स्वहस्तें होत असे. कांहीं दिवस गेल्यावर मंडळीची रहा पाहून चातुर्मास्य राहून स्वच्छंद स्वैर गतीनें चालते झाले. रावसाहेब यांना चित्रें पाहून फारच आनंद झाला. पण लवकर गेल्यामुळें त्यांचे व कांहीं मंडळीचे मनाला चटका लागून राहिला. पुढें १८०२ या सालीं पुन्हा आले ते शिवराम बाजीराव देखमुख यांचे घरीं राहिले. सखाराम बापू देशमुख, रामभाऊ शिकेकर, विनायक बुवा, व त्यांचे बंधू हरी भाऊ, प्रभृति मंडळी यांचा फारच प्रेमा जडला. स्वभाव सर्वरंगी, चित्रावांचून दुसरी बात नाहीं. रात्रौ मंडळी सहवर्तमान अधिकारपरत्वें मौजेचा काल जायीं १८०३ सालीं विनायक बुवा हरदास याचे घरीं कांहीं दिवस राहिले. रावसाहेब सर्व व्यवस्था ठेवीत असत; रा. रा. रावसाहेब यांचे घरीं चित्रांचा देखावा पाहण्यासारखा आहे तो अपूर्व आहे. नित्य नवा वास. राहणें येक ठिकाणीं नाहीं. स्वच्छंद भ्रमण गतीनें कृष्णातीरीं १८०४ या सालीं हवेचें ठिकाण नहर नजीक महाबळेश्वर येथें आले. प्रथम कृष्णाबाईचे मंदिरांत राहीले. पुढें वेदशास्त्रसंपन्न मोर दीक्षित व माहाबळेश्वर

संस्थान कारकून यांची गांठ पडली. त्यांणीं महाबळेश्वराचे देवालयांत चित्रें काढणे विषयींचा हेतु दर्शविला. नंतर महाराज चितारीबुवा यांचे मर्जीनुरूप सर्व व्यवस्था ठेवून कांहीं दिवस ठेवून घेतले. मंदिरांत चित्रें फार सुरेख पाहाण्यासारखीं आहेत. सुमारें दोन महिन्यांनंतर पंढरपुरास जाण्याचे हेतूनें निघून गेले. बरोबर संस्थान कारकून यांचे कनिष्ठ बंधु विनायकराव कुळकर्णी अंगापुरकर हे घरीं जावें या हेतूनें समागमें होते. ते नांदगांवीं दत्तो पांडुरंग कुळकर्णी यांचे घरीं घेऊन गेले. तेथें बळवंतराव मास्तर यांची गांठ पडली. लीनवृत्ति पाहून संत कृपा करितात. पंच पंच उषःकाळीं मास्तर याचे मनोगतानुरूप कांहीं संवाद होऊन बोरबनचे बाजूस उभयतां स्नानास गेले. त्या वेळीं संभाषण पूर्वक स्नानादिक विलास आटोपून घरा नजीक दत्तमंदिर आहे त्या स्थळीं आले. मग कांहीं रुक्मिणीस्वयंवर या ग्रंथाचें व्याख्यान झालें. नंतर सर्व ग्रंथ संपेपर्यंत राहावें असा मास्तर यांचा हेतु पाहून सुमारें दोन महिनेपर्यंत वास्तव्य नांदगांवीं झालें. पांडुरंग नाना कुळकर्णी व घरांतील मंडळी यांचा प्रेमा माहाराजांचे ठिकाणीं फारच असे. कालक्रमणा दिवसा मंदिरांत चित्रें काढीत. नजीक संत ठिकाण बोरबन येथेंही मंदिरांत उत्तम देखावा काढलेला आहे. रात्रौ दत्तमंदिरांत येकांतस्थळीं स्वयंवराचा अर्थ चालत असे. तो फक्त उभयतां सुमारें ९ पासून चारपर्यंत. नंतर स्नानादिक विलास होऊन आपआपले उद्योगीं निमग्न होत असत. स्वयंवरार्थ संपल्यावर रहिमतपुरीं मास्तर यांचे बिऱ्हाडीं चार दिवस राहून महाराजांची स्वारी पंढरपुरास गेली. परत एक महिन्यानें ब्रह्मपुरी येथें मास्तर यांची भेट झाली. नंतर नांदगांवचे उत्तरेस नजीक कृष्णाकांठीं दत्तमंदिरांत येऊन राहिले. खाणेंपिणें वगैरे सर्व व्यवस्था पांडुरंग नाना ठेवीत. मास्तर यांची वृत्ति पाहून सुमारें दोन महिने राहिले. पुढें कोकणप्रांतीं स्वैरगतीनें नहरा वरून समुद्रकांठीं आले. ते १८०५ सालीं हरिहरेश्वर महाक्षेत्र स्थान या ठिकाणीं कांहीं दिवस राहिले. रात्रौ एकांतास पश्चिम बाजूस संन्याशाची मठी समुद्रकांठीं आहे तेथें जात. जागा फार भयंकर. या ठिकाणापासून कवित्वास आरंभ आहे. हा नाम गंगाप्रवाह नामरूप रहीत अनंतनिधीला मिळून अखंड मिळत आहे.

### श्लोक.

**स्वानंदप्राप्तीवरि भेद नाहीं ॥ सायुज्य सिद्धी वदताति पाही ॥**
**त्याहोनि भक्तीवरि नित्य लाहे ॥ सोन्यां सुगंधीपण शोभताहे ॥ १ ॥**

बहुविध स्वरुपाचा भाव मानी स्वमानीं ॥
सहज उभवलाहे नीज भक्ती समानी ॥
अमन करुनि संतीं शांति हे भाववीली ॥
विजय हरि गुणांची जोडणी जी उदेली ॥ २ ॥
अनंतीं समाधी नसे ताठ मुद्रा ॥ सदां संग मेळीं निजानंद मुद्रा ॥
समुद्रावरी जा रितीं त्या तरंगीं ॥ तसें स्वात्मभावी हरी रंग रंगी ॥३॥
असे नित्य हे जी नवी निर्मळांगा ॥ स्वओघें भली मातली भाव गंगा ॥
मिळे सागराला सहस्रामुखानें ॥ अनंती वदे नाम एकात्मतेनें ॥ ४ ॥

ओंवी.

तरंगलहरी मिळे ॥ तेथें विजाती हे नाढळे ॥ तेवीं सकळीं सकळ फळें ॥ सर्वात्मभावें ॥ १ ॥

सर्व जगदाकार हाच निर्विकार आत्मा प्रकाशला आहे.

ओंवी.

तेथें देवाचें देवपण सरे ॥ भक्तांचें भक्तपण नुरे ॥ तरी भजन उरे ॥ निर्विशेषीं[1] ॥ १ ॥ उदकाचें मोर्ती होय ॥ तेथें उदकपण निःशेष जाय ॥ तरी ह्मणती पाणी आहे ॥ अति दीप्तिप्रभा ॥ २ ॥ तैसी आत्मसिद्धी देऊनि भेटीं ॥ सर्व साधनें तत्काळ घोटी[2] ॥ तें आत्मसिद्धीवरी उठी ॥ सद्गुरु भजन ॥ ३ ॥ (स्वात्मसुखांतील)

या प्रकारचें हें चोखडें असें अद्वैत भजन अनुभवी जाणतात. या सद्गुरु-भजनरूप कवित्वांत सर्व अनुसंधान रुक्मिणीस्वयंवराचें आहे. त्यांत सर्व प्रकारचे छंद, सर्व अलंकार, सर्व प्रकारचे रस, सर्वत्र अपरोक्षभाव, शब्दरचना यमक-पूर्वक फारच आनंदकारक, सर्व अनुभव हिरे कोंदणयुक्त जडलेले आहेत. संत कवित्व कोकिळन्यायाचें आहे. करितां अनिर्वाच्य रूप, वळीनें अध्यात्मभाव, सरणी निगम, खरोखर सुरभीच अशा रसाची समभाव कविता, स्वात्मसुखदा-यक अपूर्व आहे. पतितपावन, साधकास, सिद्ध, साधु, संत, मुनी, ब्रह्मनिष्ट, ब्रह्मज्ञानि, संती, भुक्ती, समाधानी, हे नवविध पदभाव अजात घरचें लेणें लेव-वीत आहेत. असा हा अपार लीलावी श्रीमदनंत यांचा कवित्वभाव पुढील अभंगांवरून लक्षांत येईल.

अभंग.

देहां आहे अंत, अनंत केविं तो ॥ अंतरस्थ घेतो, नची भार ॥ १ ॥

---

१ परब्रह्मीं. २ घोट घेइ=गिळून टाकी.

ऐसा अपार हा, लीलावी अच्यूत ॥ बोलताहे च्यूत, देहाधारें ॥ २ ॥
निवारोनी वारें, अहं सोहं सारें ॥ लेख निराधारें, गात स्वयें ॥ ३ ॥
नाहीं अनुमान, प्रत्यक्षां प्रमाण ॥ साक्षीचें निशाण, नची लावी ॥ ४ ॥
अनंत मायावी, अगोचर स्वामी ॥ गोचर हा ग्रामी, गोकुळ या ॥ ५ ॥

॥ २ ॥

परम पदाचा, अनुवादकर्ता ॥ परात्पर वर्ता, भाव सिद्धी ॥ १ ॥
अभाव संसार, जेथें न विस्तारे ॥ ममत्व निस्तारे, जया दर्शें ॥ २ ॥
संत तो श्रीहरी, अभिन्न स्वभावें ॥ गीत स्वानूभवें, गात सदां ॥ ३ ॥
छंद गोविंदासी, कीर्तनाचा भारी ॥ आपुलीच करी, कथा स्वयें ॥ ४ ॥
अनंत देहाचा, आधारें बोलवी ॥ परम लाघवी, कवी न हा ॥ ५ ॥

॥ ३ ॥

नित्य नवा चाले, प्रसंग लेखन ॥ स्वभाव वर्तन, स्वानूभवें ॥ १ ॥
आपपरपक्ष, नये वचनोक्तीं ॥ अतर्क्य हे शक्ती, हरी दासीं ॥ २ ॥
अबोलाचे बोल, सखोल भावार्थीं ॥ स्वार्थीं पारमार्थीं, न दीसती ॥३॥
पाहतां अनंत, जनां थक्क पडे ॥ तर्कही मुरडे, लाजोनीया ॥ ४ ॥

॥ ४ ॥

अपूर्वही वाणी, आहे बिनाधारी ॥ ययां अधिकारी, सर्व नाहीं ॥ १ ॥
अर्थ न गवसे, भव अनर्थीया ॥ अभीमान माया, वंता लागीं ॥ २ ॥
भजन अत्यंत, प्रळयाचा वरी ॥ स्वयें करी हरी, अभंगाचे ॥ ३ ॥
वाच्य अनिर्वाच्य, जनीं हें शोभलें ॥ सहजत्वां आलें, मन जधीं ॥ ४ ॥
अनंत नामाची, निशाणी या साठीं ॥ सर्वत्र समेटी, पोटीं लीला ॥५॥

असी ही निगमवाणी प्रत्यक्ष सनातन सिद्धीच भूमंडळावर भवभ्रमाचा नाश करून अविनाशी सुखप्राप्ति करणारी सर्व लीला परीपूर्ण आहे. प्रथम हरिहरेश्वर क्षेत्रमहात्म वर्णन करून पंचवटी आख्यान व कांहीं स्फुट अभंग या ठिकाणीं झाले. तो सर्व ग्रंथ घेऊन नातें मुकामीं रा० रा० शिवराम बाजीराव देशमुख यांचे घरीं आलें. देशमुख यांचा सहवास आज तीन वर्षें आहे पण चित्रांवाचून दुसरी गोष्ट नाहीं. कारण अधिकारपरत्वें संतवर्तन असतें. कवित्वप्रभाव पाहून देशमुख व सर्व मंडळी यांचा फार प्रेमा जडला. लिहिण्याचा क्रम सारखा अहोरात्र चालत असे. लिहिलेले कागद मधून मधून देशमुख वाचीत असत. हे प्रेमी खरे. प्रत्यक्ष परमात्मा लेखन करीत आहे. त्या स्थितिचें वर्णन करितां येणार नाहीं. यांचे घरीं जो ग्रंथ जाला तो फारच महत्वाचा आहे. त्यांचीं नांवें

१ आत्माचे. २ अद्भुत=आत्म.

खालीं दिलीं आहेत. अपरोक्ष भावीस्वात्मभावपर श्रीरामलीला फारच मनोहर छंदांनीं युक्त असी आहे. ती अध्यात्मपर रामचरित्रें. ग्रंथांचीं नांवें १ श्री सीता-स्वयंवर २ बोधरूप भुजंगप्रयात वृत्त ३ दशरथवार्धक्यविचार कथानक ४ रामराज्यप्राप्तिविघ्नकथानक ५ श्रीरामदंडकारण्यगमनचरित्र ६ दशरथ-मरणकथा ७ प्रेमपर रामप्रार्थना अध्यात्मपर श्रीरामचंद्राचीं स्तोत्रें व ध्यानें १ करुणापर रामप्रार्थना २ श्रीरामध्यान ३ बोधपर श्रीरामस्तव ४ श्रीराम निर्गुण ध्यान.

श्रीकृष्ण लीला फारच मजेची. अध्यात्म प्रकरणें. १ बोधपर श्री रामकृष्ण भक्तिसुधा २ गोपीगीत कुब्जान्योक्ति ३ श्रीकृष्ण बाललीला. निदिध्यास प्रकरण ४ स्नेहलीला ५ रुक्मिणीविलास ६ दामाजीपंताचें चरित्र ७ ध्रुवचरित्र ८ का-लियामर्दन पूर्वार्ध ९ वाल्मिकचरित्र १० कालियामर्दन उत्तरार्ध ११ श्री-शुकजन्म चरित्र १३ बोध प्रकरणें. १ मानसहेत २ मनोबोध ३ मनोबोध ४ हितबोध ५ नीतिबोध ६ हितसार ७ बोधामृत ८ मानसबोध ९ करुणालहरी १० बोधतत्व ११ नामसुधा १२ ज्ञानपरश्लोक १३ स्फुट विबुधप्रिया १४ म-नोबोध १६ मानसबोध १७ साधनतत्व नीति १८ स्तोत्रें व अष्टकें आदिकरून अध्यात्मपर छंद. १ शंकरस्तव २ विश्वनाथस्तव ३ बोधपर श्रीरामस्तव ४ श्रीशंकरध्यान ५ करुणापर श्लोक ६ मुरली ७ गीतसुधा ८ महालक्ष्म्यष्टक ९ वासुदेवस्तोत्र १० सद्गुरु शंकराष्टक ११ शंकराष्टक १२ प्रेमयोग १३ करु-णा बत्तीसी १४ शंकरध्यान १५ जगदंबिका स्तोत्र १६ तुळजापुर निवासिनी स्तोत्र १७ पार्वतीस्तोत्र १८ लक्ष्मीस्तोत्र १९ भीमरूपी भक्तीप्राधान्य. १ नव-विध गोपी (नवविध भक्ती) २ मानसपूजा ३ चिरंजीवपत्र ४ प्रभातबोध ५ दत्तात्रेयाष्टक ६ श्री सूर्यनारायणस्तोत्र ७ सुबोधनिका ८ शंकरस्तुति ९ अभंग-पर चरित्रें. १ राधाविलास २ कात्यायनीव्रत. याशिवाय कांहीं अभंग व पदें. हा सर्व ग्रंथ देशमुख यांचे घरीं आहे. यांत सर्व प्रकार अपूर्व आहे. चातुर्मास्य संपल्यावर येथून श्रीमदनंत सद्गुरु कृष्णातीरीं गेले.

१८०६ नहर महाबळेश्वर या ठिकाणीं कांहीं दिवस राहिले. आतां चित्रें काढणें, व कविता लिहिणें दोन्ही उद्योग अखंड सुरूच असत. येथें मंडळीचा प्रेम फार असे. येथून परत नांदगांवीं कुळकर्णी यांचे घरीं आले. तेथें पुन्हा बळ-वंतराव मास्तर यांची भेट झाली. महाराजांचा मुक्काम सुमारें दीड महिना होता. कविता लिहिणें दत्तमंदिरांत होत असे. निगम वाणी फारच मनोहर, सर्व विलास

परिपूर्ण. भवभ्रमाचा नाश करणारी आहे. या ग्रंथावरून रुक्मिणी स्वयंवरार्थ साधकाचा उघड लक्षांत येईल. सर्व लीला अपरोक्ष भावानें, सर्वांग डोळस, सर्व साक्षित्वानें अशा ठिकाणीं परोक्षभाव आपोआप लयास जाऊन सर्वात्मभाव होतो. असा कवित्वप्रभाव आहे. नांदगांव येथें जो ग्रंथ झाला तो १ राधाविलास २ सुभद्राहरण ३ शुकरंभासंवाद ४ सुदामचरित्र व दुसरीं कांहीं बोध प्रकरणें. चरित्रें. सर्व विलास सर्व कांहीं छंद सर्व रसांनीं परिपूर्ण अशीं अखंडानंदकारक आहेत. नातें मुक्कामीं जो ग्रंथ जाला तो सर्व पाहावा असा दृढ निश्चय मास्तर यांचा होऊन ते माहाराज समागमें परळीस समर्थदर्शन घेऊन महाबळेश्वर येथें आले. या वेळीं विनायकराव अंगापुरकर हेही बरोबर होते. महाराज व मास्तर हे उभयतां वासुदेव शास्त्री यांचे घरीं राहिले. मोर दीक्षित प्रभृती मंडळी सर्व व्यवस्था ठेवीत असत. मंडळीचा हेतू चित्रानें परिपूर्ण व मास्तर याचा कवित्वप्रभावानें या प्रकारें अपार भावलीला वर्तनानें कालक्रमणा होत असे. कृष्णाबाईचे उत्साहाकरितां येक मोठा पडदा देवीचे चित्राचा फार सुरेख देखावा असा मंडळीचे हेतूप्रमाणें काढिला आहे. येथें जो ग्रंथ झाला तो. १ चिरंजीव पत्र २ मनोबोध ३ दधीमंथन ४ गोपीगाराणी ५ नौकाचरित्र ६ गोपीविनोद ७ राधाप्रीति ८ करुणा मालिनी ९ समाधीरंग १० ऋषिपत्न्याख्यान ११ राधाभुजंग १२ गोपीगीत कुब्जानुवाद. या ग्रंथावरून सर्व श्रीकृष्णलीलामहिमा काय आहे, तो अध्यात्मभाव उघड लक्षांत येऊन आपोआप भवभ्रमाचा नाश होईल. सर्वांना शृंगार फार प्रिय आहे. यांत सर्व श्रीकृष्णशृंगार वर्णन केला आहे तो अकामविलास सर्व मनोरथ वाचकांचे पूर्ण करणार आहे. रामलीला—भावार्थ निरोष्ठरामायण २ मंत्ररामायण ३ उत्तररामचरित्रांतरगत भावार्थरूप लहुकुशाख्यान. ही रामायण लीला. हे अपूर्व ग्रंथ फारच महत्वाचे आहेत. वाचनाअंतीं महत्व कळून येईल. कृष्णाबाईचा उत्साह जाहल्यानंतर मास्तरसह माहाराज नातें मुक्कामीं रावसाहेब रहकर यांचे मळ्यांत राहिले. चार दिवसांनंतर मास्तर यांस राहण्याकरितां नजीक कोळसे गांवचे हद्दींत योजित एकांतास योग्य सर्व सोयकर असें उपाध्ये यांचें महादेवमंदिर आहे. त्या ठिकाणीं गेले. मंदिर फार दिवसांचें यामुळें नादुरुस्त होतें. तें मंडळीसह स्वतः लागून राहण्यास योग्य करून मृगाचे संधीस मृगगतिरूप स्वच्छंद निघून गेले. येकाच ठिकाणीं राहून सर्वांचे मनोरथ पूर्ण होण्याचा संभव नाहीं. मुळीं अनंत, अपार, भाविकांला दिसणारा, अभाविकांला नाहीं. असा चित्तचोर–भाव, भक्त–भावा-

नुसार नामाचा विलास दाखविणारा तो स्वभावानें कोठेंही ठाऊक होणारा नाहीं असा हा लीलावतार भ्रमनिरसनार्थ भूमंडळावर सर्वकाल वास करीत आहे. मास्तर देवळांत येकटेच राहत. उद्योग देशमुख यांचे घरीं श्रीमदनंतकृत कवित्व याचा उतारा करणें. उदरनिर्वाह नातेंगांवीं भिक्षा. महाराज वर्षांतून सुमारें चार सहा महिने या गांवीं राहत असत. कधीं चातुर्मास्य, कधीं मध्यंतरीं, प्रतिपष्टीस मास्तरसह पैठणीं जात असत, व मृगाचे अगोदर येत असत. मास्तर हे मंदिर नजीक येक लहान झोंपडी बांधून राहत. महाराज मंदिरीं असत. कालक्रमणा चित्रें व कवितालेखन नित्य नवा प्रसंग अखंड सुरूच असे. कवित्वप्रभावापासून गोकुळभाई व विठुभाई यांचा प्रेमा महाराजांचे ठिकाणीं फारच जडला. रावसाहेब, नारायण मोतीरामगुजर आदि सर्व मंडळीचा प्रेमा प्रथमपासूनच आहे. नातेगांवीं चित्रांचा देखावा अति रमणीय आहे. मुख्यत्वें याचे भोक्ते रावसाहेब खरे. सीतारामबापु उपाध्ये यांचे घरीं शंकरपार्वतीचा पडदा याचा देखावा फार सुरेख आहे. याच प्रमाणें कवित्वप्रभाव अवर्णनीय आहे. सर्वछंद सर्वावस्था लेखनांतीं अभंग व पदें छंद अखंड लिहित असत. अनंतांची लीला अपार आहे. मंदिरीं १८१० पर्यंत जो ग्रंथ झाला त्यांतील मुख्य प्रकरणें. सुरस निरनिराळ्या चालीचीं पदें सुमारें दोन हजार १ ओंवीबद्ध नाथलीला अध्याय ५ शिवाय श्लोकबद्ध कांहीं प्रकरणें २ गानबंधु आख्यान फारच अपूर्व तद्वत् काक भ्रुशुंडी चरित्र हें तुळसीदासकृत रामायणांत शिरोभाग आहे. हा सर्व ग्रंथ मास्तर याजपासीं आहे. १८१० पासून १८१७ पर्यंत जो ग्रंथ झाला तो सर्व अभंग, पदें. अभंग गाथा सुमारें पांच हजार, सर्व विलास परिपूर्ण असा व पदें सुमारें दीड हजार मात्राबद्ध सर्व रसभरीत असीं आहेत. यांत कांहीं पदें मलबारी भाषेचीं आहेत. हा सर्व ग्रंथ विठुभाई यांचे घरीं आहे. येथें श्रीविठ्ठलमंदिरीं वेदशास्त्र संपन्न महादेव काशिनाथ देव पुजारी हे महाभागवत फार प्रेमी असल्यामुळें या ठिकाणीं महाराज यांचा प्रेमसंवाद होत असे. बहुतकरून वेदांत विषय चालत असे. हे पुजारी फार अधिकारी होते. देवालयांत चित्रें दश अवतार लीला फार रमणीय असे पडदे काढले आहेत. त्याप्रमाणें येथें पदें व अभंग येक हजार फार रमणीय गाथा आहे. मंडळी फारच प्रेमी. या ठिकाणीं अखंड स्मारक असी श्रीमदनंताची लीला अपार आहे. असें हें स्थल पहावें व महाराजांची भेट घ्यावी अशा हेतूचें बापुराव वाबळे वकील गंगापुरकर, दामोदरपंत वाहेगांवकर प्रभृती मंडळीचें पत्र येथील प्रेमी विठुभाई प्रभृति मंडळीस शके १८१३ आषाढशु॥

११ स आलें तें महाराजांस वाचून दाखविलें. नंतर येण्याविषयीं गोकुळभाईस उत्तर लिहिण्यास सांगितलें पण तत्काळ लिहिलें नाहीं. करितां स्वतः अभंग छंदानें उत्तर लिहिलें तें वाचकांचे लक्षांत चरित्रभाव पूर्ण येण्याकरितां पुढें दिलें आहे यावरून श्रीमदनंत सद्गुरु यांचे ठिकाणीं पूर्ण विश्वासभाव बसून बसल्या ठिकाणीं भेट होईल. यांत संशय नाहीं.

अभंग.

**श्री स्वानूभुतीचा, मंदिरीं वसल्या ॥ अत्यंत अगत्या, सद्भावया ॥ १ ॥**
**भक्तीचा संकेता, स्तव निजहेता ॥ उभवणी स्वहीता, उभारली ॥ २ ॥**
**[१]अमित भाषणी, अखंड वाहिनी ॥ वास प्रतिष्ठानीं, उगमाचा ॥ ३ ॥**
**अनंत जीवनीं, अभंग कवनी ॥ दासां विनवणी, दास भावें ॥ ४ ॥**

॥ १ ॥

**जोडी हे भाग्याची, मोडी अक्षरांची ॥ बोडीत वीरांची, वीरश्रेणी ॥१॥**
**गोडी घे मनाची, [२]अमनानें साची ॥ सोडि या जनांची, आंगवणी[३] ॥२॥**
**सोडी द्विविधेची, गांठी मीपणाची ॥ सज्जनां [४]सदांची, बुद्धी तुझी ३**
**अनंतपणाची, आवड तुलाची ॥ भोग अभंगाची; सुगी आतां ॥ ४ ॥**

॥ २ ॥

**भजनी गुरूची, विनवणी करूं ॥ भावें भक्ती वरूं, चरणांची ॥ १ ॥**
**न वरूं जडाची, आशा कदां मनीं ॥ पाहुं सर्व जनीं, जनार्दन ॥ २ ॥**
**समान भावनें, करोनी वावरूं ॥ अहंता निवारूं, अनिवार ॥ ३ ॥**
**अनंत मनांत, ठसला वसावा ॥ नाहिंसा नसावा, कदां काळीं ॥ ४ ॥**

॥ ३ ॥

**भाव भक्ती योगें, नांदावें अंतरीं ॥ भ्रमणा अंतरीं, मानसाची ॥ १ ॥**
**नसो तळमळ, येण्याची जाण्याची ॥ दिठी देखण्याची[५], मिळालिया २**
**सोर्य सज्जनाची, लाधलियावरी ॥ भेटती अंतरीं, सर्व काळ ॥ ३ ॥**
**अनंत विचारी, आपणा आपण ॥ तधीं दुजेपण, दुरावलें ॥ ४ ॥**

॥ ४ ॥

**अजुनिया कसी, उरली अंदेशा ॥ भेटायाचि आशा, देहभावें ॥ १ ॥**
**देखणा अंतरीं, सर्वदा भेटतो ॥ मजसी पटतो, भाव चित्तीं ॥ २ ॥**
**तोची जासी तेथें, संगी तुजावसे ॥ परी नची दिसे, कसातरी ॥ ३ ॥**

---

१ परमात्म. २ संकल्प विकल्प व आपपर हे द्विविधभाव रहित=आत्मभावानें. ३ पद्धती=ठेवण. ४ परमात्मभावाची. ५ देखणा=आत्म. ६ दूर करी. ७ परमात्मभावाची. ८ आश्रय भाव.

कसा तरी छंद, अनंतभेटीचा ॥ कायीक वेठीचा, भास त्यागी ॥ ४ ॥

॥ ५ ॥

वसें प्रतिष्ठानीं, निवास करोनी ॥ सन्यस्त होवोनी, क्षेत्रवासी ॥ १ ॥
सिमा उलंघन, कदांही न करी ॥ जाणेल ये हरी, मनोगत ॥ २ ॥
देह भावावरी, नसावी पारखी ॥ सर्वत्र सारखी, भुतें जेथें ॥ ३ ॥
अनंत रमणी, स्वतेज जडणी ॥ अभंग भरणी, स्वानूभूती ॥ ४ ॥

॥ ६ ॥

नात्यांत न राहे, मात हे वायांची ॥ तुज भेटण्याची, आशा वायां ॥ १ ॥
देह संगभरें, अवनी वावरें ॥ काळगती भारें, जाणवीत ॥ २ ॥
जाणोनि हें गुज, अंतर्यामीं रीज ॥ भेटेनजी तुज, तव ग्रामीं ॥ ३ ॥
अनंत सहज, भक्ती भावसाज ॥ अर्थाअर्थी काज, कार्यातति ॥ ४ ॥

॥ ७ ॥

सहज असावें, सदोघ भावनें ॥ अच्युत चिंतनें, करोनिया ॥ १ ॥
नसो हय राणी, अंतरीं कदांही ॥ होयील ते पाही, साक्षी भावें ॥ २ ॥
अपरोक्ष भेटी, लक्षी यया लाभ ॥ जोडींरे सुलभ, साधनानें ॥ ३ ॥
अनंत जनांत, वनांत न वसे ॥ दिसे भक्ती वसे, जेथें तेथें ॥ ४ ॥

॥ ८ ॥

मना हें पहावें, आपणांत सदां ॥ मिळोनी विनोदां, गोपाळाचा ॥ १ ॥
दुजेपण दूर, करोनी वावरे ॥ तरीं हरी भरे, अंतर्यामीं ॥ २ ॥
अंतर्यामीं हरी, जर्धी प्रगटेल ॥ भवाचा फिटेल, पांग सारा ॥ ३ ॥
अनंत मनाची, समजूत करी ॥ मनें मनावरी, रिजणूक ॥ ४ ॥

॥ ९ ॥

सर्व भावें हरी, जरीये नजरें ॥ मग देह भरें, वावरेना ॥ १ ॥
वावरेना चित्त, माजे तुजेपणीं ॥ अखंड स्मरणीं, आपल्याची ॥ २ ॥
आपुल्याची बळें, सोयही आकळे ॥ निजभाव बळें, सज्ञनाचा ॥ ३ ॥
सज्ञनासी कळे, अनंत अबोल ॥ जन भावें डोल, नो भवती ॥ ४ ॥

॥ १० ॥

सुखां नसे पार, अपार व्यापार ॥ संत सदाचार, नित्य नवा ॥ १ ॥
दामाचे न काम, फुकाचा विश्राम ॥ पावे निजधाम, जिव जेथें ॥ २ ॥
परी अवघड, पण जना लागीं ॥ न होती विभागी, सुखाचेया ॥ ३ ॥
अहंता अंतरीं, वसे जंव वरीं ॥ अनंत भांगारी, होयी ना तो ॥ ४ ॥

---

१ नाम=आत्मा. २ आत्म धनवान.

॥ ११ ॥

भाव नाहीं हाटीं, जाचे त्याचे गांठी ॥ नांदतसे पोटीं, परी पाठें ॥ १ ॥
देव नसे दुजा, जैशां तैसा दीसे ॥ निजभाव वसे, प्रत्यक्ष तो ॥ २ ॥
प्रगटे संताचे, वचनांत सदां ॥ नाशी अहंमदां, शब्द घायीं ॥ ३ ॥
अनंत नांवायी[1], अभंगपणाची ॥ सज्जन मनाची, रिजणूक ॥ ४ ॥

॥ १२ ॥

अहंकारयोगें, संतसंगमांत ॥ जो कां झगडत, विरोधी तो ॥ १ ॥
विरोध पक्षानें, संत अपरोक्ष ॥ होताती परोक्ष, अधीकारी ॥ २ ॥
रावणादी भक्त, निर्धारी समस्त ॥ राममय होत, लढोनीया ॥ ३ ॥
विरोध्यास मुक्ती, सायूज लाधली ॥ अनंत मातली, कार्यसिद्धी ॥४॥

॥ १३ ॥

समानता बाणे, लीन भाव मानें ॥ संतसंगमानें, आत्मा होणें ॥ १ ॥
आत्मा होणें तधीं, होणें जाणें नाहीं ॥ चारी साही पाहीं, हेंचि गाती २
हेंची गाती संत, करोनी पसंत ॥ त्यागिती असंत, भववार्ता ॥ ३ ॥
भववार्ता मानीं, अनंत तुफानी ॥ यास्तव काननीं वास योजी ॥ ४ ॥

॥ १४ ॥

हेंचि गा मागणें, अच्युता तुजसी ॥ ठेवी तव दासीं, मज सदां ॥ १ ॥
दुजेपण नको, दाऊं देहवरीं ॥ तूंची चराचरीं, उदीत हो ॥ २ ॥
स्वगीत वदवी, वाणी वाटे नेटें ॥ हेंचि भाग्य मोठें, मज साजो ॥ ३ ॥
नको मोक्षमुक्ती, योगादिक युक्ती ॥ सर्व केली चुक्ती, गुरुपायीं ॥ ४ ॥
अनंत भक्तीचें, वैभव देखतां ॥ नेणे आदिअंता, आहे ऐसा ॥ ५ ॥

॥ १५ ॥

जंव वाजे अंगीं, अहंतेचें भूत[2], ॥ तंव मजबूत[3], भाव नोहें ॥ १ ॥
वांयाची चावटी, संतसंगमाची ॥ कदांही मनाची, शांती नोहें ॥ २ ॥
संत बोध जाला, तरी वायां जाय ॥ पडोनिया काय, खडकीं मेघ ॥३॥
सदां वसवसा, खाण्यापिण्याठायीं ॥ अनंत नडांयीं[4], लाभे ययां ॥ ४ ॥

॥ १६ ॥

निजभावयोगें, नित्य निरंतर ॥ हरी गातां नर, हरी होय ॥ १ ॥
हरी होय तधीं, जनाचा उलटा ॥ दिसे नष्ट खोटा, दांभिकासी ॥ २ ॥
भक्तीभावयोगें, प्रगट दिसेल ॥ भेटतां वसेल, अंगीं शांता ॥ ३ ॥
अनंत संताची, समानता भली ॥ मितूंपण बोलीं, दुरावली ॥ ४ ॥

---

१ नित्यनूतन भाव, यश गाणें. २ वारें=जोर=शक्ती. ३ दृढ. ४ खेळीं.

॥ १७ ॥

नचिगा विठ्ठला, तुजविण कोणी ॥ भाव भक्तीं रिणी, पतीताचा ॥ १॥
तुजी होय कृपा, तधीं सारा नफा ॥ मनोमार्ग सफा, दशदिशा ॥ २ ॥
मारीनची गफा, जाणिव दर्शनें ॥ नांदे निजमानें, अंतर्यामीं ॥ ३ ॥
अनंत दासांसी, पायीं दिला ठाव ॥ तयानें प्रभाव, तव नामीं ॥ ४ ॥

॥ १८ ॥

आज एकादशी, हरी दिननिशीं ॥ गाऊं अविनाशी, भावबळें ॥ १ ॥
वसूं पंढरींत, चंद्रभागातीरां ॥ अभंग गजरां वाणी लाऊं ॥ २ ॥
निराश भावनें, उपवासी वसूं ॥ स्वानंदाचा रसू, सेवूं खासा ॥ ३ ॥
अनंत संतांचे, वंदूं पाय माथां ॥ जे कां जगन्नाथां, आवडते ॥ ४ ॥

॥ १९ ॥

दुर्गम पंथानें, चालतां चालतां ॥ येयीनची हातां, संतग्राम ॥ १ ॥
संतग्राम भीमा, तिराची पंढरी ॥ जाय वारकरी, विरळाजी ॥ २ ॥
धन्य भाग्य त्याचें, स्वात्मभावें नाचे ॥ दृष्टी न जनाचे, देखूं येत ॥ ३ ॥
जेथें तेथें हरि, दिसे चराचरी ॥ वसों ती पंढरी, नित्य भावें ॥ ४ ॥
अनंत अंतरीं, चित्त चोर सदां ॥ मांडित विनोदां, स्वानंदाचा ॥ ५ ॥

॥ २० ॥

प्रतिष्ठानवासी, संत महाभावी ॥ वंदूनी गोसावी, सुखी जालों ॥ १ ॥
दिली भेट जधीं, तिधीं ते भुललों ॥ समूळ हरलों, देहपणां ॥ २ ॥
जडलों चरणां, मुकलों मरणां ॥ अभंगा चरणां, लागलोंजी ॥ ३ ॥
अनंतपणानें, नाम उच्चारीलें ॥ अनंत जहाले, गीत त्यांचे ॥ ४ ॥

यापमाणें–सर्वलीलापरिपूर्ण असे येथून १८१७ साली निघून गेले.

पत्रांतील अभंग येकवीसही येकवीस स्वर्गमाला सर्वांनीं कंठीं धारण करण्यायोग्य आहे. कारण काळाचा नियंता हा सद्गुरु स्वामी, भक्त, संत, वैष्णव, व प्रेमीयांना प्रार्थना करित आहेत कीं, असा भाव धारण कराल तर काळ हा सेवा करूं लागेल. अशा महत्वाचा हा पत्रोत्तर बोध आहे, मी या प्रतिष्ठानीं सीमा उल्लंघन न करितां निवास करून अखंड आहें असें स्पष्टपणें कळविलें आहे. असे हे क्षेत्रवासी श्रीमदनंत १८०७ पासून कवित्वप्रभावानें श्रीसद्गुरु एकनाथस्वरूपी नारायण बुवा यांचे कारकीर्दींत प्रगट प्रसिद्धीस आले. ही संतभूमिका या ठिकाणीं अनंतलीला अवर्णनीय आहे. कारण गुप्तवास, भावानुसार वर्तन, चित्तचोर स्वभाव, लीलाकपटनाटकी, निजभक्तांतरी प्रगट वास करणारा, दीन

१ बंदा. २ परमात्म गांव=अविनाशी स्थल=परिपूर्ण चैतन्य.

ह्मणजे अनुतापी याविषयीं दयालु, अनाथ ह्मणजे नाथ जो स्वामी अहंकाररहित त्याचे पालक (पालन करणारा) पतित (अहंकाररहित) यांनां पावन करणारा, असा हा परमात्मा सर्व चराचर नटला आहे. हा सृष्टिचक्राचा चालक सूत्रधारी, निरामय ह्मणजे सर्वोपद्रवरहित अशा सहज मेळामध्यें पंथसांप्रदाय गुरुशिष्यभाव, ब्रह्मचारी हे अहंकारधर्म कोठून असणार? हें उघड लक्षांत येईल. नाथषष्टी सृष्टिक्रमातीत आहे. ती लीला पहावी. या हेतूनें नातेहून महाराजसमागमें मास्तर या सालीं आले. प्रथम बाहेरचे नाथी राहिले. नंतर महाराजांनीं श्री सद्गुरु नारायणबुवा यांची भेट करवून चार दिवसांनीं वेदशास्त्रसंपन्न रामकृष्ण पुराणीक यांचे घरीं राहण्यास गेले. माडीवर राहत. मास्तर हे भिक्षा मागून सर्व व्यवस्था करित असत. महाराजांचा लिहिणेचा क्रम सारखा सुरु असे. या ठिकाणीं अभंग सुमारें ८०० झाले. पंधरा दिवसांनीं नाथकारभारी रामराव पिंपळ वंडीकर यांचें बिऱ्हाड नाथमंदिराचे वरचे माडीवर होतें. त्या स्थळीं गेले. येथें सर्व व्यवस्था कारभारी ठेवीत असत. रात्रौ रामगीता, रुक्मिणीस्वयंवर यांचें व्याख्यान चालत असे. श्रवणार्थ सद्गुरु नारायणबुवा, गोपाळअप्पा जोसी, रामराव कारभारी प्रभृति असत. या ठिकाणीं ग्रंथ जाला तो १ अनुताप प्रकर्ण २ निजध्यास ३ स्वात्मबोध. हा ग्रंथ स्वात्मसुख ग्रंथाचें सार आहे. ४ श्रीनाथस्तोत्रकलाप अष्टकें १२. शिवस्तुती-अभंग व पदें. हा सर्व ग्रंथ मास्तर याजपासीं आहे. कांहीं कारणानें राहिलेल्या जटा या ठिकाणीं विसर्जन झाल्या. शके १८०८ या सालीं गणपतिक्षत्री, लक्ष्मण, व रामप्रभृति साळी मंडळी एकताऱ्यावर भजन करणारी. यांना नाटक करण्याचा नाद होता यामुळें प्रथम नाटकाकरितां पडदा महाराजांपासून काढून घ्यावा या हेतूनें आली. पुढें समागम होऊन पूर्वीचा नाद सुटून श्रीमदनंत संत यांचे भजनीं रंगून गेली. यांना लिहून दिला तो ग्रंथ १ संगीत रासनामक नाटक-नानाप्रकारचे चालीचीं पदें व अभंग व श्लोक हा सर्व ग्रंथ लक्ष्मण यांचे घरीं आहे. यांचा प्रेमभाव फार महत्वाचा तसाच दास्यभाव सर्व लक्ष महाराजचरणीं आहे. रात्रौ ज्या स्थलीं महाराज असतील तेथें एक ताऱ्यावर लिहून दिलेली व नाथादिक संतांचीं पदें मोठ्या प्रेमानें ह्मणत असत. अमृतराय वंशस्थ हरिभक्तपरायण रा. रा. राजाराम भाऊ यांना भावानुसार लिहून दिला तो १ स्नेहलीला २ सुभद्राहरण व निरनिराळ्या चालीचीं पदें सुमारें ६००. हा ग्रंथ फारच रसभरीत आहे. जी० कृष्णराव पोष्टमास्तर, पैठण, यांची भेट या सालीं

झाली. नंतर मास्तर यांचा पूर्ण भक्तभाव, शांत स्वभाव, वृत्ति लीन पाहून संत कृपा करितात. १८०८ पासून १९ पर्यंत या ठिकाणीं जो ग्रंथ झाला तो सर्व पदसहित अभंग गाथा मास्तर यांजपासीं आहे. लिहिणें बहुतकरून अनंतऋषींच्या मठांत होत असे. प्रतिषष्ठीस मास्तरसह महाराज या ठिकाणीं राहत असत. ठिकठिकाणची प्रेमी मंडळी जमून आनंदाचा काल जात असे. सर्व व्यवस्था पोस्टमास्तर व अण्णासाहेब कारभारी हेही ठेवीत. साळीमंडळी सर्वांचें दास्यत्व करणेंस हजरच असे. लिहिणें अखंड चालत असे. असा हा क्षेत्रवासी परमात्मा सर्वलीलापरिपूर्ण सर्व विलास करित आहे.

श्लोक.

श्रीक्षेत्र पैठणपुरी तट गौतमीचा ॥
वैकुंठनाथ वसला वळुनी सुखाचा ॥
कार्यें अनेक करितां महिमार्थ दावी ॥
जो शांत संत गतिचा मति हेत दावी ॥ १ ॥

दावी करून भजनां गुरुगम्यतेचा ॥
जाचाचि तो करितसे निजरंग साचा ॥
वेदांत वंद्यपण दे सहजाकृतीला ॥
सायूज काय करणें गुरुनाथजीला ॥ २ ॥

तो भाव यावरून लक्षांत येईल. बाहेरचे नाथीं चित्रांचा देखावा फारच मनोहर आहे. त्याप्रमाणें पोस्तमास्तर यांजपासीं सर्व ग्रंथ सर्वरसपरिपूर्ण असा सर्वांना रसग्राह्य आहे. आतां पैठणप्रांतीं इतर ठिकाणीं जो ग्रंथ झाला त्याजविषयीं माहिती—नजीक तीन कोसांवर वाहेगांव येथें दामोदरपंत हे प्रति महिन्याचे वारीस येत असत. यामुळें साधुसंत यांच्या भेटीचा योग घडत असे. वाहेगांवकर संन्यासी मठांत असत. यांजकडे पंतांचा येण्याचा नेम असे. या योगानें अनंतऋषीचे मठांत सहजच महाराजांचे भेटीचा योग घडून आला. पुढें समागमाअंतीं पंतांचा प्रेमा अतिशय जडला. वाहेगांवीं महाराज मळ्यांत राहत. सर्व व्यवस्था पंतमर्जीनुरूप ठेवीत. येथें झालेला सर्व अभंगगाथा सुमारें २००० हा ग्रंथ फार महत्वाचा आहे. येथून पुढें औरंगाबाद येथें नागेश्वर महादेवमंदिर या स्थळीं राहत. येथील पुजारी जानकीरामभाई फारच योग्य, खरे वर्तनाचा जो भेटेल त्याची सेवा कायावाचामनें करीत. हें स्थळ फार रमणीय आहे. रमणीय होण्याला हेंच कारण. स्वभाव फारच मेहनती. नागेश्वरस्थळ या ठि-

कार्णी फारच प्रसिद्ध आहे. मंदिरांत चित्रें काढून घेण्याचा नाद फार होता. यामुळें महाराजांचे ठिकाणीं प्रथम प्रेम असे. नंतर सहवासाअंतीं कवित्वप्रभावावरून यापरतें त्रैलोक्यांत दैवत नाहीं असा भाव जडला. ओंवी०रु०स्व०.

**नानापरीच्या घेतल्या बुंथी ॥ तरी अंतर शोभा बाह्य फांकती ॥**
**अलंकारील्या निजवृत्ति ॥ त्या न झांकिती झांकिल्या ॥ १ ॥**

जसा सूर्य लपून राहणार नाहीं त्याप्रमाणें परमात्मा श्रीमदनंत आत्मवृत्तीनें अलंकृत हा कसा दडून राहील. आत्मवृत्तीनें अलंकृत ह्मणजे

**श्लोक.**

**आत्मा प्रचीतीं नटल्या पराधी ॥ अज्ञान ज्ञानाकृतितें न बोधी ॥**
**ना पंथ दीक्षा मग तेथ कांहीं ॥ एकात्मताही बुडवी प्रभावी ॥ १ ॥**
**साक्षिला वदवुनी जन पालवी ॥ पक्षि हा जगनितीं नकळे भवीं ॥**
**लक्षिला जरि तयां तरि संभ्रमी ॥ नातुडे भवतिचा गति जो क्रमी॥२॥**

(स्वात्मबोध.) असा हा अलंकृत प्रकार समधारणा भक्तियोग चवथा बुध जाणतात. मग तेथें भक्तिप्रेम काय पाहावयाचें आहे. महाराजांचे मर्जीनुरूप सर्व व्यवस्था ठेवीत असत. ही मोंगलभूमि भाविक. या ठिकाणीं मंडळीचा प्रेम यामुळें महाराजांचें राहाणें एखादे वेळीं साहा साहा महिने होत असे. मंदिरांत भिंतीवर १८१७ सालीं कौरवपांडवसभेचा देखावा काढला आहे. तो फारच मनोहर आहे. त्याप्रमाणें या ठिकाणीं जो ग्रंथ झाला तो सर्वांत शिरोभाग आहे. १८०९ सालीं मास्तरसह महाराज बगीचांतील धर्मशाळेंत राहिले होते. तेथें लिहिणें झालें तें योगेश्वर निजलीला हा ग्रंथ अद्भुत आहे. हा मास्तरपासीं आहे. अभंग सुमारें १००० हिंदुस्थानी निरनिराळ्या चालीचीं पदें १००० १ सद्गुरुशंकराष्टक २ महिम्न ३ योगेंद्रवर्तन ४ विनयार्जव. हा ग्रंथ जानकी रामभाई यांजपासीं आहे. अनंत रंगनाथ नगरकर यांजपासीं अभंगगाथा सुमारें दोन हजार आहे. यांचे घरांतील सर्वांचें अति प्रेम असे. भीमण्णा मिस्तरी सोलापूर कामाटीपुरा, यांची येथें गांठ पडली. यांचा मनोभाव महाराजांचे ठिकाणीं पूर्ण असे. यांजपासीं अभंगगाथा सुमारें पांचशें आहे. १८१७ कन्हैयालाल वायजीपुरा याजपासीं अभंगगाथा सुमारें एक हजार फार महत्वाचा आहे. राम हा गंवडी कामगार आहे. याचा भाव महाराजचरणीं पूर्ण आहे. अनंतलीला अपार आहे.१८१५ या सालीं प्रसिद्ध नाटककार वासुदेवराव डोंगरे यांनीं बृहदारण्य भाष्य समजून घेतलें. याचवेळीं गणपतराव महादेव परांजपे महाडकर यांनीं पोटो काढिला.

स्थळ बगीचांतील चौतरा. बापुराव वाबळे वकील गंगापुरकर याचा प्रेमा अनिवार. यांनीं बहुतेक ग्रंथाची प्रत करून घेतली आहे. या गावीं महाराज यांचे घरीं किंवा मळ्यांत राहत. सर्व व्यवस्था मर्जीनुरूप ठेवीत. यांचे स्नेही रामभाऊ तेली नेवासेकर यांचा भाव पूर्ण लक्षणयुक्त, स्वभाव देवबुद्धी मग त्या भक्तिप्रेमाचें वर्णन काय करावें ? नेवासे येथें ज्ञानदेवाचे मंदिरीं किंवा मोहनीराज यांचे पाकशाळेंत राहत. येथें मोहनीराजांचे मंदिरांत चित्रें फार सुरेख काढिलीं आहेत. रामभाऊ याचे स्नेही शेषाबापु हे महाराजापासीं चित्रकलेंत निपुण झाले. १८१५ सालीं ज्ञानदेवमंदिरीं अभंग सुमारें ३००।४०० झाले. हा ग्रंथ रामभाऊ याजपासीं आहे.

नेउरगांव हद्द मोंगल तालुके गंगापुर जि० औरंगाबाद या गांवीं. पश्चिमेस गोदातटाक नजीक शंखेश्वर महादेवाचें मंदीर फारच रमणीय स्थळ आहे. येथील पुजारी ग्यानगिरी हल्लीं या गांवचे पोलिसपाटलाचें काम करतात. बुद्धि फारच तीव्र मग त्या हुशारीचें काय वर्णन करावें ? यांचा फार दिवसांचा हेतु असा कीं महाराजांनां आपले गांवीं आणावें असा होता. तो योग १८१७ या सालीं घडून आला. महाराज औरंगाबादेहून गंगापुरीं बापुराव वाबळे वकील यांचे घराननजीकचे बागेंत राहिले. कांहीं दिवसांनीं ग्यानगिरी हे स्वतः तांगा घेऊन गेले नंतर महाराज आले ते महादेवमंदिरनजीक पुजारी यांची राहण्याची जागा आहे तेथें राहिले. सर्व व्यवस्था ग्यानगिरी व नारायणराव मोजणीदार हे ठेवीत असत. येथें तसबिरा व कांहीं मंदिरांत चित्रें फार उत्तम काढलीं आहेत. येथें जो ग्रंथ झाला तो सर्व अभंगगाथा सुमारें चार हजार आहे. हें सर्व लिहिणें आत्यंतिक प्रळयांतील आहे. हा सर्व ग्रंथ ग्यानगिरी यांजपासीं आहे. कविता विषय समाप्त.

## मुक्त ( पारतंत्र्यरहित ) स्थितीचा विचार.

सर्व स्थिरचरांत नरतनु श्रेष्ठ आहे. त्यांत बुद्धिमान ( परमात्मज्ञाता ) श्रेष्ठ आहे. बुद्धिबलावांचून कांहीं नाहीं, याला शब्दविलास कारण आहे. हा विलास मानवीवांचून इतर तनूंमध्यें नाहीं. या योगें बंध, मोक्ष व जन्ममरणादि द्वैतभाव उत्पन्न झाले. कारण या ठिकाणीं अधिष्ठानीं सर्प जिव्हा मुख जिचा गुणत्रयीं ताल अशी द्वैताकारें बुद्धी वास करीत आहे. ही या नरतनूमध्यें खरोखर कर्माचें माप आहे. जीव शीव हे भ्रांतिभाव आहेत. द्वैताकारें हीच माझें तुझें मानून घेते. यामुळें शब्दही द्वैताकार आहे. सर्व हें चराचर जांचें सर्वांग-

भूषण असा हा सर्वजनखटला स्वतः नटून रमण्याकरितां दशांगुलीं भरला आहे. तो भाविकाला ( आत्मभाविकाला ) भावबळानें अंतरांत भेट देऊन आनंदाचें उटणें करितो. यावरून भावबळ हें, नसतांना जन्ममरणादि दुःखाला व परमात्मप्राप्तीला कारण आहे. एकच भाव पात्रभेदानें पात्राकार आहे. भावपूर्वक विचार केला असतां या जगतामध्यें भाव व अभाव या भावाची नांदणूक दृष्टीस पडते. यामध्यें जे भाविक ते संत व अभाविक ते असंत हा सृष्टिक्रम आहे. याचप्रमाणें शब्द विषय हा द्व्यर्थी आहे. हे दोन अर्थ पदाचा अर्थ करतेवेळीं उत्पन्न होतात. ते पहिला विष ह्मणजे विषयार्थ व दुसरा अमृत ह्मणजे अविनाशी. याला व्यवहारांत बाह्यार्थ व अंतरार्थ व वेदांतशास्त्रांत वाच्यांश व लक्ष्यांश असें ह्मणतात. जसा क्षीरनीराचा निवाडा करणें याला हंसन्याय ह्मणतात, तसाच विषामृताचा निवाडा करणें हा वाच्य ( शब्द ) न्याय आहे. वाणीचा प्रभाव प्रकृतिअभावभारानें देह अहंभावी असा स्फुरण होतो, ह्मणून देहभावचिंतनानें जी भावना तिला अभाव असें ह्मणतात. हा शब्द बाह्यार्थ संसार वाढण्याला व विषयीं मन आसक्त होण्याला कारण आहे. या बाह्यभावीं संसाराला जो नाशक ह्मणजे अभाव मानणारा, मी कोण हा विचार करून आत्मभाव शब्दातीत लक्षांत सर्वकाल गांठिवणारा जो त्याला भाव असें ह्मणतात. हा शब्दांतरार्थ परमात्मप्राप्तीला कारण असा हा वाच्य (शब्द) न्याय आहे. हा सृष्टिक्रम, अभाविक, परोक्ष ह्मणजे रामकृष्णादिक अवतारलीला मागें होऊन गेल्या या बाह्यमुख भावीं आहे, ही विपरीत भावना यामुळें सर्व भावना नाशिवंत. रामकृष्णादिक अवतार मागें होऊन गेले, ते आह्मासारखेच होते. त्यांचा लीलागुणानुवाद पठणश्रवणमात्रें, वैकुंठादि भोगेच्छा व इहजन्मीं पुत्रादिक इच्छा पूर्ण करील या सकामभावनेनें अर्थार्थी भक्ती सर्व जगीं पसरली आहे. हिलाच परा भक्ति ह्मणतात. ही कनिष्ठ आहे. हा परोक्षभाव नाशिवंत आहे. वाच्यन्याय न समजल्यानें व्यासादिकांचे वाणीचा कपटार्थ समजत नाहीं यामुळें देहभाव वृद्धिंगत होऊन देहातीत भावाचा ऱ्हास आहे. अर्थात् श्रीकृष्ण निजधामास गेले हे सत्पुरुष समाधिस्थ जाले. स्वरूपीं पावले, अशा प्रकारची ही जगवाणी देहभावी समजाप्रमाणें बरोबर आहे. श्रीमत्एकनाथीभागवत सर्वांच्या पहाण्यांत व वाचनपरिपाठांत आहे. त्यांत श्रीकृष्ण निजधामास गेले याचा अभिप्राय देह मिथ्यत्व मानावें इतकाच दर्शविला आहे. हा भवभ्रम निरसन करण्याकरितां नरतनू श्रेष्ठ आहे. यावांचून इचा कांहीं उपयोग नाहीं.

## ओवी.

**चौऱ्यासी लक्ष योनीं ॥ नरजन्मीं आलों फिरोनी ॥ ह्मणुनी विश्व कुटुंबी मानी ॥ निजधनी व्हावयां ॥ १ ॥ द्वैतभाव मनीं धरणें ॥ तेंची निजहितां अंतरणें ॥ विकल्पासी वरणें ॥ घडे जाणें अधोगतीं ॥ २ ॥**

हा विकल्प अभावभावानें अधोगतीला व भाविकभावानें परमात्मप्राप्तीला कारण आहे.

**सर्वांठायीं परमानंदू ॥ परी द्वैतपणें झाला भेदू ॥ चित्त चिंति जैसा स्वादू ॥ तोची आनंदू प्राप्त होय ॥ १ ॥** कारण **दशांगुली याचा ठाव ॥ पूर्णानंदीं सदा भाव ॥ लागतां दुजेपणाचा धाव ॥ विषयीं अभाव पैं झाला ॥ २ ॥ मन चिंती जो विषय ॥ किंवा इंद्रियांचा अभिप्राय ॥ सुखप्राप्ति तेथेंचि होय ॥ आनंद लाहे मनोवृत्ति ॥ ३ ॥**

असा अविनाशी भाव या तनूमध्यें आहे. परंतु गुणत्रय माया दुरत्यय आहे. करितां हा भवभ्रमनाशक विचार करण्याचें काम साधनचतुष्टयसंपन्न अधिकारी याचें आहे. परोक्षभावी आरोपित जीवदशेचें नाहीं असें वेदमत आहे.

**अधिकारिया मोक्षभावो ॥ द्यावयालागीं कृष्णदेवो ॥ मिष भीमकीचा विवाहो ॥ समय पहाहो लग्नाचा ॥ १ ॥** रु० स्वयं०.

असे हे पतितपावन श्रीमदनंत सद्गुरु अखंड गतिनें वास करीत आहेत. यांच्या सहवासानें परोक्षभाव नाहींसा होऊन साधकाचा अपरोक्षभाव होतो. कारण संतवर्तन देहभावरहित, नामाधारी, साक्षिभावानें देहाचे नियंते अनन्यभावानें अखंड भजनीं रत असे आहेत.

## अभंग.

**संतजन सदां हरीनामीं रत ॥ तयासी जगत दिसे हरी ॥ १ ॥**
**अंतरीं जें वसे तेंची बाह्य दीसे ॥ दुजें कांहीं नसें जाचें तयां ॥ २ ॥**
**नाहीं हा संसार नाहीं हरी कांहीं ॥ सत्य दृश्य होई सर्वा ऐसा ॥ ३ ॥**
**भाविल्या भावानें दिसे सर्व कांहीं ॥ भाव सत्य पाही येक आहे ॥ ४ ॥**
**अनंतभावानें जन हें विस्तारे ॥ अभाव निस्तारे आत्मभावें ॥ ५ ॥**

एक सत्यभाव आहे त्या अनंतभावानें हे सर्व जन विस्तार पावते, करितां सर्व अविनाशीरूप आत्मभाव आहे.

## ओवी.

**जेथें दुजें नाहीं एक ॥ तेथें काय सेव्य सेवक ॥ ह्मणाल तरी कौ-**

**तुक ॥ ऐसें आहे ॥ १ ॥ वरावरपणाचा सोहळा ॥ वोसरोनी जाय त्याची कळा ॥ परी भोगिलेपण वेळों वेळा ॥ सोहळेवीण भोगी ॥२॥**

( स्वात्मसुख. )

अशा ह्या आत्मसोहळ्यांत अपरोक्षभावानें सदां हरिभजनीं निमग्न असे हे सर्वांना भावानुसार गतिदायक व अधिकारी जे वीर यांचा अभावरूप संसार याला कारण जो अज्ञानजन्य मोह तो आत्मभावानें नाहींसा करून निर्मोह अशी अविनाशी गति देतात. हा अधिकार सर्वांना नाहीं.

**श्लोक.**

**मोह एव महामृत्युर्मुमुक्षोर्वपुरादिषु ॥**
**मोहो विनिर्जितो येन समुक्तिपदमर्हति ॥**

मोह हाच महामृत्यु हा भ्रम नाहींसा केला. भ्रमनाशांतीं सर्व अनंतरूप हें गीतातत्व प्रसिद्ध आहे. ( वि० चूडामणी )

**नवल गुरुकृपा कीजे ॥ काळें काळ निवारिजे ॥ मग अनाकाळीं उतरिजे ॥ आपण पै स्वयें ॥ १ ॥ ह्मणोनी काळाचिये माथां ॥ गुरुकृपेची आहे सत्ता ॥ यालागीं काळाचा नियंता ॥ सद्गुरुस्वामी ॥ २ ॥**

( स्वात्मसुख. )

असा हा काळ नियंता श्रीमदनंत सद्गुरु यांचे ठिकाणीं आलें गेलें. या भावाचा कांहीं संबंध नाहीं. हे जगद्भाव या सद्गुरुसंगतीच्या योगानें जाऊन अविनाशी भाव प्राप्त होतो. हाच संतमहिमा वेदादिक सर्व वर्णन करित आहेत. असें असून परोक्षभावानें सर्व सृष्टिक्रम हें मोठें आश्चर्य आहे.

**पद.**

**विश्वात्म्याचें आत्में झालें ॥ पूर्ण निजानंदीं रंगलें ॥ त्यासी ह्मणती मेले गेले ॥ ते भ्रांतीचे शिरोमणी ॥ एक मीच प्रियकर ॥** (निजानंदस्वामी)

**ओंवी.**

**जो जागा होऊन स्वप्न सांगे ॥ तें लटकेपणची अवघें ॥ परी स्वप्न देहासी अंगें ॥ आतळला नाहीं ॥ १ ॥ तैसी साचार वस्तुप्राप्ति ॥ तो नातळे देहस्थिति ॥ तरी देह वर्ते कवणें रितीं ॥ ते प्रारब्धशेषें ॥ २ ॥ वारा जाउनि वोसरे ॥ रुखीं हेलावा थारे ॥ लक्ष भेदोनियां तीरें ॥ चालिजे पुढें ॥ ३ ॥ मेघ वोसरोनी सरे ॥ जळ अवघेंचि जिरे ॥ परी भुई वोलथावरे ॥ तेणें पिकति शेष ॥ ४ ॥ तैसी अविद्या नासोनिया जाये ॥ परी प्रारब्धभोग शेष राहे ॥ तेणें शेष देह वर्तताहे ॥ ज्ञानियाचा ॥ ५ ॥ तेवीं हा पूर्व संस्कारी ॥ मद्यपवस्त्र खांदीं धरी ॥ आहे**

**नाहीं आठवो निर्धारी ॥ तैसें देह मुक्तासी ॥ ६ ॥ सर्प कांचोळी सांडोनि जाये ॥ ते वारेनिहाले चालों राहे ॥ मुक्ताचे देह तैसे पाहे ॥ कर्मी वर्तें ॥ ७ ॥** (स्वात्मसुख.)

असा हा मुक्तस्थितीनें देहभानरहित वर्तन करणारा क्षेत्रवासी परमात्मा अज ह्मणजे जन्मास येत नाहीं. मग ऱ्हास वृद्धी कोठून ? ह्मणून अव्यय, षडविकाररहित, अजाति अविनाशी आहे.

**श्लोक.**

**अविनाशितु तद्विद्धि येन सर्वमिदं ततं ॥**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १ ॥**

**अर्थ**—ज्यानें हें जगत् व्याप्त करून टाकिलें आहे, तें ब्रह्म सतसंत होय. हें स्वतः अविनाशी असून इतरही कोणी ह्या व्ययरहित ब्रह्माचा नाश करण्यास समर्थ नाहीं. आतां स्वस्वरूपापासून च्युत होणारे असे जे असंत ते कोणते ह्मणून विचारसील तर सांगतों.

**श्लोक.**

**अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ॥**
**अनाशिनो प्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥ २ ॥** (गीता अ० २)

नित्य अविनाशी आणि अप्रमेय असा जो शरीरयुक्त आत्मा याचे हे देह नश्वर ह्मणून विवेकीपुरुषांनीं सांगितले आहेत. सर्वसाक्षी श्रीमदनंत सद्गुरु यांचा नश्वर देह याचा १८२० चैत्र शुद्ध ६ रात्रौ ९ वाजतां मांजरीं मुक्कामीं अदर्शन ह्मणजे अभाव झाला. येथून नेउरगांव येथें शंकराचे मंदिरनजीक पश्चिमबाजूचे जागेंत देहदहनविधि झाला. जवळ शुश्रूषेस बापुराव वाबळे वकील गंगापुरकर, धोंडोपंत साठे वरंधकर तालुके माहाड जिल्हा कुलाबा व ग्यानगिरी पोलिसपाटील नेऊरगांव तालुके गंगापूर जिल्हा औरंगाबाद या त्रिवर्गांनीं सर्व व्यवस्था केली. दोन्ही ठिकाणीं समाधी व उत्साह सुरु आहेत. याखेरीज तालुके माहाड जिल्हा कुलाबा कसबे नातें येथें उत्साह सुरु आहे. या चरित्रांत शरीरी जो जीवात्मा तोच परमात्मा असा ऐक्यभाव धारण करून श्रीमदनंत सद्गुरु हा अविनाशी सर्वांतरवासी आहे असा भाव ग्राह्य आहे.

**अभंग.**

**देह तो नासेल न नासे देहाचा ॥ विलासी देहाचा अविनाशी ॥ १ ॥**
**दिसेना सर्वांसी देह अहंकारें ॥ भ्रमणा विस्तारे नोभारे तो ॥ २ ॥**
**वसोनी ना वसे कोठेंही श्रीहरी ॥ प्रगटे अंतरीं आत्मभावें ॥ ३ ॥**

आत्मभावें रती जया मानवासी ॥ तयाचा मनासी दर्श होतो ॥ ४ ॥
न होतो वरी जो वेगळा मनाचा ॥ तदाकारें वाचा वाच्यवीत ॥ ५ ॥
तृप्तीवरी येती ढेंकर जा रीती ॥ सहजाची गती भजनाची ॥ ६ ॥
अनंत वदनीं उभवे प्रसंग ॥ भावार्थअभंग सर्वांमाजीं ॥ ७ ॥

जो ग्राह्यभाव तो सर्वांमाजीं अभंग भावार्थ ह्मणजे अविनाशी आत्मार्थ हा आहे. आतां नामें हीं देहाला नाहींत, शरीरी जो आत्मा याला आहेत.

## नामविचार.

### अभंग.

नाम ते अनामी वर्ते क्रियावर्ती ॥ विवंची पदार्थीं बळाग्रहें ॥ १ ॥
बहू वाच्य नाम आत्मयासी साजे ॥ देहासी विराजे देह हेंची ॥ २ ॥
रामकृष्णादिकीं नामें न देहासी ॥ विचारी मनासी ज्ञानिया तूं ॥ ३ ॥
साक्ष व्यवसाया नामाधारीं देह ॥ अनंतासंदेह नसे यांत ॥ ४ ॥

### अभंग.

हरी नाहीं आला गोकूळीं जन्मासी ॥ अजाती तयासी जन्म नाहीं ॥१॥
लीलामात्र खरी व्यासें वर्णीलीती ॥ सज्जन जाणती स्वानूभवें ॥ २ ॥
जनाला भाव तो जन्मलाणी मेला ॥ निजधामा गेला कृष्णराव ॥ ३ ॥
मूढ हा प्रभाव विपरीत झाला ॥ हरी आला गेला नाहीं कोठें ॥ ४ ॥
सर्वांठायीं सदां वसे परीपूर्ण ॥ अनंत ही खूण संत जाणे ॥ ५ ॥

### श्लोक.

खंडे ना गति हे अखंडपणिंची ना अंत आदी असे ॥
प्रारंभूं नच शेवटूं वरुं नची देहांत भावो नसे ॥
मोक्षाचें नच माखलें मति पिसें बंधी नसे संगमीं ॥
बंदा मीपण भावदेह उगमीं स्वामीहि माझाचि मी ॥ १ ॥
ना लोक कोणी मजवांचुनीया ॥ मी लोकवीणा नच कोण ठायां ॥
भेदार्थभावां हरुनी अनंता ॥ वंदीन माथां गुरु येकनाथा ॥ २ ॥

इति श्रीमदनंत सद्गुरु येकनाथचरित्र समाप्त.

हरिः शरणं

हें चरित्र शके १८२१ जेष्ठ वद्य ३ रोजीं उतरून तयार.

वेद० बळवंतराव मास्तरकृत.

# श्रीमदनंताष्टक.

## शार्दूलवृत्त.

शब्दा खंड नसे जयासि मथिता वेदांतिच्या सौरसा ॥
आत्मानात्म विचार वर्णुनि जनां पाजी अभेदा रसा ॥
बोले तेसरि वर्तुनी जगिं निजानंदांत राहे सदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ १ ॥
सह्याद्री तटि पार पश्चिम समुद्राचे पुनीता भुमी ॥
तेथें पूर्व वयांत काल आपुला सच्छोधनीं आक्रमी ॥
भासे बाळपणीं अनित्य जग हें मानीं भवीं आपदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ २ ॥
सौख्याचा लवलेश शोध करितां न येत दृष्टीस ज्या ॥
नित्यानित्य विचार भाव सहजी ठायीं उदासीनि त्या ॥
क्षेत्रीं वास करी बहू महि असे ना एकदेशीं कदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ३ ॥
चारी धाम फिरे वनीं उपवनीं ग्रामीं दरीं पर्वतीं ॥
राहोनी मठ देव देवि बघुनी तीर्थें बरीं सर्व तीं ॥
घेई सारचि काढुनी अनुभवा मानीतसे संपदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ४ ॥
साधू संत मुनी महंत कविही वैरागि कोवीद त्या ॥
संगें वास करोनि नृत्य कसणी देहास लावीत त्या ॥
जेथें ढोंग दिसे पळे तिथुनिया थारा न कामा मदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ५ ॥
पक्षातें त्यजुनी विवाद मिटवी ठावा नसे मीपणा ॥
सोहंभाव स्फुरे करी समपर्णीं तल्लीन हो आपणा ॥
पूर्णानंद पदा निजीं मिळवि जो शोधोनि सच्चित्पदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ६ ॥
होतां प्राप्त वसंत संत सहजी कोयाळ वाणी फुटे ॥
स्फूर्तीची कविता करी अमित ती देखोनि भ्रांती तुटे ॥
नेवासीं कधिं कोंकणीं मठिं प्रतिष्ठानांत राहे कदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ७ ॥
ऐसें वागुनि जो जनातित जनीं देहावसाना करी ॥
षष्ठी सोमदिनीं सुशुद्ध प्रथमी मासांत त्या मांजरीं ॥
अठाराशें विस अब्दि शांतसमयीं गा माधवा सत्पदा ॥
पूर्ण ब्रह्म गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ८ ॥

जी० कृ० पोष्टमास्तर पैठण.

# अनंतनाथस्फूर्ति.

## भाग १ ला.

### गणपतिस्तव.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरु दत्तात्रेयाय नमः ॥ ॐ नमोजी गणाधिपा ॥ मोरेश्वरा गुणतापा ॥ चारी देहांचा प्रतापा ॥ मायबापा जगेशा ॥ १ ॥ मुळाधारा सर्वकार्या ॥ निजानंदकंदा[1]न्वया ॥ हारवाया भव[2]भया ॥ तुझी दया अवश्यक ॥ २ ॥ बागेंतील सुमनाची ॥ प्राप्ती व्हावयासाठीं ॥ स्तुती करावी माळ्याची ॥ मग सहजची प्राप्ती ते ॥ ३ ॥ निजा[3]नंद आरामता ॥ सदचिदवटिका हिता ॥ अनुभव सुमना गाथा ॥ द्वारहीता बोधाचें ॥ ४ ॥ प्रेमाचे सहजासनीं ॥ निर्गुणाचा माळी गुणी ॥ जाचेनी स्थूळाची उभारणी ॥ गजवदनीं विराजत ॥ ५ ॥ सबाह्यांतर समता ॥ व्हावया तुझी सत्ता ॥ तव नामें निर्विघ्नता ॥ ह्मणोनी माथां वंदितों ॥ ६ ॥ भावा[4]र्थाचा शिरीं किरीट ॥ पूर्वउत्तर मीमांस धीट ॥ कुंडलें झळकती सुभट ॥ श्रवणीं कीर्णे प्रकाशती ॥ ७ ॥ शूर्पकर्ण याचेसाठीं ॥ घाली वदनीं झपाटी ॥ विकल्पमाशा घोंघाटी ॥ बैसों न दे सर्वथा ॥ ८ ॥ सुक्षम नेत्र मंदगती ॥ [5]दृश्यभावें देखों येती ॥ परी अंतरिक्ष त्यांची गती ॥ ऐक्यगती पाहाया ॥ ९ ॥ निजान्वयाचा एक दंत ॥ गती सरळ शुंडाकृती ॥ वक्रतुंडही ह्मणती ॥ नीज निती मानेना ॥ १० ॥ स्वानंदसुखाचा मोदक ॥ झेली वरिवरी देख ॥ दावी भक्तांसी कौतुक ॥ स्वात्मसुख निजबळें ॥ ११ ॥ बांधाया संकल्पाचा कंठा ॥ पाश करीं दिसे मोठा ॥

---

१ परमानंदरूपा. २ जन्ममरणभय. ३ आत्मानंद. ४ आत्मअर्थाचा. ५ देह.

अनुभवांकुश हाटा ॥ कामाधीटा हाणाया ॥ १२ ॥ सदानंद[1] प्राप्तीसाठीं ॥ वरदहस्त जगजेठी ॥ निजभक्तीचे कसोटी ॥ अंतीं भेटी ययाची ॥ १३ ॥ लंबोदर निगमागम ॥ समावले परमधाम ॥ गुणत्रयांसी आराम ॥ पूर्णकाम पूर्णत्वें ॥ १४ ॥ विवेकाचा नागबंधी ॥ कटीवेष्टीत समबुद्धी ॥ नाभीं निजतत्व सुगंधी ॥ फांके गंधी भाविकां ॥ १५ ॥ नारीनराकृती पाउलें ॥ सदचिद येकमेळें ॥ पुरवाया भक्तलळे ॥ धांवसी बळें निजाचा ॥ १६ ॥ ऐसा तूं गा मुळारंभू ॥ विश्वभावार्थ कदंबू ॥ नामान्वय हेरंभू ॥ स्वस्वभावें[2] प्रार्थिला ॥ १७ ॥ तुजा सलगीचा कैवारें ॥ सुशांतिचा वास थारे ॥ प्रपंचची ब्रह्माकारें ॥ अभिमान नुरे कल्पांतीं ॥ १८ ॥ आद्यगुरू गणनाथा ॥ येकभावें नमी माथां ॥ येकपण हे अहंता ॥ व्यापकता तुझी गा ॥ १९ ॥ सहजेसहज एकात्मता ॥ तरी शब्दभाव भावितां ॥ सहजे दिसे द्वैतता ॥ हे तो सत्ता अलक्ष ॥ २० ॥ सागर जलपणें येकटा ॥ नानाकार उठती लाटा ॥ अपारपणाचा सांटा ॥ प्रेमवांटा त्याहुनी ॥ २१ ॥ जी कां प्रणवकारातें ॥ दाविती त्रिविध नातें ॥ नमो ते वागेश्वरीमातें ॥ जीचेनी ब्रह्मनातें पोसणें ॥ २२ ॥ चत्वारी नाम इसी साजे ॥ जीचेनी चित्त चतुष्ट रीजे ॥ निजवृत्तीनें विरजे ॥ निराकारें निर्मयीं ॥ २३ ॥ मीपणाचा नाश होई ॥ तेथें सर्वसाक्ष चिन्मयीं ॥ करोनी नकर्त्ती नवाई ॥ साक्षी येई भाविंया ॥ २४ ॥ सूर्य कीर्णें प्रकाशला ॥ जगव्येव्हार जहाला ॥ हा दोष काय त्याला ॥ पुण्यपापां ॥ २५ ॥ सहजची कीर्ण प्रचंड ॥ विश्वभावें उदंड ॥ नानाकार तरंग ॥ चित्ता भाववी ॥ २६ ॥ तैसी वाचाही उभय ॥ बाह्यअंतर येक होय ॥ निजानंद प्रेमालय ॥ हीची माय जगदंबा ॥ २७ ॥ चैतन्याची तेजज्योती ॥ महाकारण प्रकाशती ॥ तेची चित्तचैतन्या निती ॥ येक गती दोघांची ॥ २८ ॥ जया ज्ञानें इसी मौन्य ॥ तेंची जाणावें खलमान्य ॥ राहु ग्रासी सोमकीर्णे ॥ बिंब खग्रास करितसे ॥ २९ ॥ तेज झांके जनांवरिचें ॥ हें

---

१ परमानंद. २ परमात्मभावें.

कर्मंची राहुचें ॥ तैसें विपरीत मनाचें ॥ तमांधाचे कळे येई ॥ ३० ॥ तेव्हां वाचा मौनावे ॥ कारणाकृतीचा संभवें ॥ महाकारण स्वस्वभावें ॥ बिंबची आहे अलिप्त ॥ ३१ ॥ ब्रह्मवास आननांत ॥ उपनिषदार्थे ॥

---

## ॥ अथ श्रीनाथलीला ॥

### अध्याय १ ला.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ अथ श्रीगुरुनाथलीला ॥ ओवी छंद ॥ ॐ नमोजी मोरया ॥ येकदंता समोर या ॥ गुणईशा अघोरया ॥ पासोनियां जन्मसी ॥ १ ॥ सकळांदी तुतें नमीं ॥ विघ्नहरा गा दीन मी ॥ कर्मव्यापें व्यापलों मी ॥ नकळे मी कोण हा ॥ २ ॥ हें मीपण जें का धन ॥ सुखदुःखासी साधन ॥ तुझ्या पदीं असो गहाण ॥ भाव धन मज देयीं ॥ ३ ॥ प्रेम वागो संतगुणीं ॥ लक्षीं ठसो चक्रपाणी ॥ मुखीं उठो गद्यवाणी ॥ करीं न्हाणी स्वानंदा ॥ ४ ॥ हें आणिकाचेनी न होयी ॥ तूंची अससी या उपायीं ॥ विघ्नहर जगांठायीं ॥ नाम पाही गर्जत ॥ ५ ॥ संतचरित्राची उभवणी ॥ चरित्रीं तूंची नाथ धनी ॥ गूणनाथा तुझ्यावांचुनी ॥ ठाव निर्गुणीं असेना ॥ ६ ॥ विघ्ननाशका नमूनी ॥ नमूं माये हंसवाहिनी ॥ चत्वारि वाग्वरदायिनी ॥ संतगायनीं रंगा ये ॥ ७ ॥ माय कुमारी ब्रह्मवासी ॥ भवसागरीं नौका होसी ॥ दृश्यावीण रमविसी ॥ सखी होसी बुद्धीची ॥ ८ ॥ शब्दज्ञान कळे मती ॥ माते ही गे तव ज्योती ॥ जे कां प्रकाशीं घुडती ॥ तमा नीमती सर्वस्वें ॥९॥ देव देवी शब्दभाव ॥ तूंची हा अभिप्राव ॥ वदे आंतठाव ॥ लीलाभाव सगुणीं ॥ १० ॥ आतां नमो गुरूनाथ ॥ गूणभावा जो अतीत ॥ जो निश्चळ भेदरहीत ॥ मुमुक्षु तात नीज जो ॥ ११ ॥ जो कां अभिमानावेगळा ॥ भावभक्तीचा जिव्हाळा ॥ प्रेमाचा अपाड पूतळा ॥ सूखसोहळा सदांचा ॥ १२ ॥ सद्गुरूठायीं नारूप ॥ गूणातीत स्वरूप ॥ परी गूणचरित्रें अमूप ॥

साक्षिदीप जगासी ॥ १३ ॥ सगूण नटोनी गूणकीर्ती ॥ दावुनी उभवी भक्तिआर्ती ॥ सद्गुरू हा सर्वार्थी ॥ ऐक्यगती येकनाथू ॥ १४ ॥ शीर ठेवोनीया पायीं ॥ नमीयेली बापआई ॥ गुरू कीर्तीची नवाई ॥ प्रेमघायीं वर्णूही ॥ १५ ॥ अनेक रूप अनेक संत ॥ संत संतांमध्यें समत ॥ संतजाती हे निभ्रांत ॥ मुहूर्तिमंत आनंद ॥ १६ ॥ सर्वां नमूं येकभावें ॥ ऐक्यतेचे हो राणिवे ॥ ओवाळुनी जीवभावें ॥ चित्तीं संभवी बोलन तें ॥ १७ ॥ ही कथा पुण्यपावन ॥ सुरसरसीक प्रेमपान ॥ लावोनी येथें ध्यान ॥ ऐका सुजाण भाव हा ॥ १८ ॥ जाची लीला पडतां कानीं ॥ शांती बाणे मती लागुनी ॥ कामक्रोधा होय धूनी ॥ प्रेमपानीं पोसेल ॥ १९ ॥ श्रोतें द्यावें अवधान ॥ वक्ता नसे जयावांचून ॥ जगीं जो कां धन्यधन्य ॥ श्रोता जाण विचारी ॥ २० ॥ श्रोता हाची सागरू ॥ वक्ता चंद्र निर्धारू ॥ प्रेम उल्हासे वारंवारू ॥ विरह फारू न देखतां ॥ २१ ॥ श्रोता येथें अधिकारी ॥ जो कां अंतरींचा विचारी ॥ मार्मीकता जाची भारी ॥ नीज[1] व्यापारी नांदते ॥ २२ ॥ हाची संत सुजाण ॥ जाचे मुखीं संतगुण ॥ सदां ध्यास मी कोण ॥ वळखी आपण आपणा ॥ २३ ॥ प्रेमळाची प्रेमळी प्रीती ॥ प्रेमळ संतवसंतीं ॥ अनुभव फळ भार देती ॥ जेथें निती सुकाळीं ॥ २४ ॥ आतां ऐका नाथकथा ॥ एकात्मेचा सुपंथा ॥ भावभक्तीचिया हेता ॥ बोलूं गाथा सुखाची ॥ २५ ॥ श्रीगोदावरीचे तीरीं ॥ श्रीक्षेत्र पैठणपुरीं ॥ संत अवतरले निर्धारीं ॥ हितोपकारी जगासी ॥ २६ ॥ पूर्वीं ऋग्वेदी ब्राह्मण ॥ भानुदास नामेंकरून ॥ सज्जन अवतरे सुजाण ॥ कलीमान जा नाहीं ॥ २७ ॥ सदां सविता[2] आराधन ॥ त्रिकाळ करी अर्घ्यप्रदान ॥ भावभक्ती विशेष मान ॥ नामा ध्यान निरंतर ॥ २८ ॥ निंदानुवाद ना मुखीं ॥ जो सदां उदासी नीरखी ॥ साधकदशा निष्टंकीं ॥ संपे निकी पूढती ॥ २९ ॥ कांहीं दिनांचे अंतीं ॥ भास्कर साक्षात्कारा येती ॥ प्रगटल्या ज्ञानज्योती ॥ स्वानंदभरती होतसे ॥ ३० ॥ करिती पंढरीची वारी ॥ येका-

१ आत्म. २ सूर्य.

दशी पक्ष चारी ॥ हरीकीर्तन निसीमाजारीं ॥ प्रेमभारी करीती ते ॥ ३१ ॥ तयांपोटीं सूत संतती ॥ सूर्यसाक्षात्काराअंतीं ॥ झाली ह्मणोनी सूर्यकांती ॥ नाम त्याप्रती ठेविलें ॥ ३२ ॥ कोणीयेक समयांतीं ॥ अपूर्व वर्तलें जें क्षितीं ॥ लिहुं तेंची हें पुढतीं ॥ आनंदगती ऐकतां ॥ ३३ ॥ पंढरीचा येक ब्राह्मण ॥ करीत देशपर्योटण ॥ भिक्षुवृत्ती योगलक्षण ॥ रामनगरीं पातला ॥ ३४ ॥ रामराजा अनेगूंदी ॥ शाक्तधर्मी पक्षवादी ॥ हरीहराला जो कां भेदी ॥ अपवादी निंदकू ॥ ३५ ॥ सदां अनुष्ठान आर्चन ॥ देवी प्रसन्न असे जाण ॥ भारी मातला अभिमान ॥ कोणां जाण न मानी ॥ ३६ ॥ करीत असतां देवपूजा ॥ ब्राह्मण येत सहज वोजा ॥ मुखें बोले विठ्ठलराजा ॥ तेव्हां राजा त्या पाहे ॥ ३७ ॥ आशीर्वाद करूनी बैसे ॥ रामराजा तयासी पुसे ॥ कोठुनी येणें झालें असे ॥ सांगा खासें मजलागीं ॥ ३८ ॥ द्वीज सांगे तयाउपरीं ॥ मम ग्राम गा पंढरी ॥ विठुरायाची नगरी ॥ महापुरी जगीं हे ॥ ३९ ॥ नृपती ह्मणे विप्रवर्या ॥ आला आहेस कोण कार्या ॥ टाकोनिया सूत भार्या ॥ विठु आर्या ग्रामिंचा ॥ ४० ॥ स्वामी ज्ञातीचा भिक्षुक ॥ आहें याकारणें देख ॥ फिरे देश गा अनेक ॥ द्यावी भीक मजलागीं ॥ ४१ ॥ ह्मणे राजा ब्राह्मणासी ॥ फार देश फिरोनी येसी ॥ कोणठायीं देवी ऐसी ॥ देखिलीसी सांगपां ॥ ४२ ॥ किंवा तुझी पंढरी ॥ विठूची असे काय थोरी ॥ सर्व सांगें निर्धारी ॥ ऐकूं सारी मानसें ॥ ४३ ॥ देखे आमुची कुळस्वामिणी ॥ चारि वेदांची हे खाणी ॥ रत्नें जडलीं तीं कोंदणीं ॥ हीरे कोंदणीं झळकती ॥ ४४ ॥ बहूत येती लोक जे ॥ सांगती ऐसे हे पुजे ॥ देखीले ना सृष्टीं दुजे ॥ सकळही खुजे देविनें ॥ ४५ ॥ सर्व कीर्ती या देवीची ॥ वर्णिताती येथें साची ॥ आतां वदें तूंही साची ॥ थोरी कोणाची ऐकूं दे ॥ ४६ ॥ ब्राह्मण असे स्पष्टवक्ता ॥ अभिमान देखुनी तत्वतां ॥ ह्मणे कैंची गा तेजसत्ता ॥ परीस खापरा गाठील ॥ ४७ ॥ अगा आमुचा विठूची ॥ दासी पदाहुनी दुरची ॥ अनेक येती व्हावया शुची ॥ पंढरीची महिमा

हे ॥ ४८ ॥ रिद्धीसिद्धी नवविधी ॥ सदा राबती पदसंदीं ॥ सूरपाळ जेथें वंदी ॥ ऐसी गादी कवणाची ॥ ४९ ॥ पडे फणीपुच्छि पद ॥ उरगीं खवळे मद ॥ तोडोनी मर्यादाबंध ॥ डंसावया धांवतसे ॥ ५० ॥ तैसा राजा तेथ झाला ॥ लाली चढली नेत्रांला ॥ बोलता झाला तें ऐका ॥ ५१ ॥ अरे द्विजा अपमानीलें ॥ माझें दैवत तुवां भलें ॥ मातें चित्तीं त्रासविलें ॥ दावी भलें चालहें ॥ ५२ ॥ हें जरी देखेना मी डोळां ॥ तुला दावीन अंतकाळा ॥ अरे दुष्टा चांडाळा ॥ घाय घातला चित्तीं या ॥ ५३ ॥ राजा तैसाची उठला ॥ शिबिकेमाजीं आरूढला ॥ ब्राह्मण असे कैद केला ॥ सवें चालिला राजयाचे ॥ ५४ ॥ चित्तीं उमठे अनुताप ॥ वीकळ झाला देत धांप ॥ ह्मणे विठ्ठला मायबाप ॥ हाची ताप तोडावया ॥ ५५ ॥ निंदोनी बोलिलों रायासी ॥ पडलों बापा आजीं फसी ॥ बोलाऐसा न होसी ॥ देयी फांसी मजलागीं ॥ ५६ ॥ आतां नाहीं जीवआशा ॥ मूळ झालें देहनाशा ॥ तारीं तारीं जगदीशा ॥ आतां आशा तुझीची ॥ ५७ ॥ तुझी कीर्ती वर्णिली ॥ पुराणीं जी घोंकिली ॥ नाहीं रायें जरी देखिली ॥ मग होई होळीच ॥ ५८ ॥ अगा भक्तमानसतोषका ॥ दीनजनाचा तूं सखा ॥ विठ्ठला विश्वव्यापका ॥ दावीं कौतुका याजसी ॥ ५९ ॥ राखीं आतां ब्रीदावळी ॥ शांतवीं गा राजकळी ॥ मम दुःखातें या टाळीं ॥ वनमाळी माधवा ॥ ६० ॥ अच्युता गोविंदा जनार्दना ॥ तमहारका संकर्षणा ॥ मनमोहना जगजीवना ॥ आजीं दीना तारावें ॥ ६१ ॥ जरी नापाहील बोलिलों तें ॥ मारी सत्यची येथ मातें ॥ अपकीर्ती येईल तुतें ॥ मानेल तें करीं आतां ॥ ६२ ॥ ऐसा जडला असे ध्यास ॥ द्वीज झाला कासावीस ॥ तंव पातला पंढरीदेश ॥ चित्तीं विश्वास जडलासे ॥ ६३ ॥ सर्व गेले पंढरीआंत ॥ राजा देखे नेत्रीं तेथ ॥ पूर्णदेशीं मनोरथ ॥ भाव समर्थ पोचला ॥ ६४ ॥ तटस्थ झाला मानसीं ॥ चित्त निवे बाह्यदेशीं ॥ जावया राउळीं उसोसी ॥ फार त्यासी लागली ॥६५॥ रत्नखचित मंदिरें ॥ शोभायमान पताका धुरे ॥ राजगल्ली चौंफेरे ॥

ढोल नगारे वाजती ॥ ६६ ॥ अनेक संत टाळवीणा ॥ घेवोनि गाती विठुराणा ॥ कोणी वाचती पुराणा ॥ कोणी कोणा बोधिती ॥ ६७ ॥ बुक्या लाह्यांची उधळणी ॥ होतसे चारी बाजुंनीं ॥ थोर लहान समानी ॥ ज्ञातीवर्णी नांदती ॥ ६८ ॥ अभंगवाणी पवाडे ॥ गाती वेदांती निवाडे ॥ आत्म आनंद जेथ घुंडे ॥ भेद उडे सर्वांचा ॥ ६९ ॥ पाहोनी ऐसी पंढरी ॥ राजा मुरडे अंतरीं ॥ तंव पुढें देखिली नारी ॥ झाडपेड करणारी ॥ ७० ॥ शीरीं बुटी हातीं झाडु ॥ तराळीणवेश निवाडु ॥ मलीन तैलचिंद्या जोडु ॥ वस्त्र आभरू अंगींचा ॥ ७१ ॥ रूपें देखे कुळस्वामिणी ॥ परी डचकलासे मनीं ॥ नजीक जाऊनी तयेक्षणीं ॥ शिबिकेतुनी उतरला ॥ ७२ ॥ धरीयेले दोनी पाय ॥ ह्मणे काय गे हें माय ॥ कोण रूप कोण ठाय ॥ अभीप्राय कळवीं हा ॥ ७३ ॥ हांसोनि बोलली जगदंबा ॥ बा रे राजया येथील हीच शोभा[1] ॥ दासी असे ग्रामराबा ॥ काबाडकष्टी येथींची ॥ ७४ ॥ येथील मी असें दासी ॥ थोरी घेते तुजपासीं ॥ अभीमान मतीचा नासीं ॥ जोड पदासी विठुचे ॥ ७५ ॥ सकळ देवदेवोंचा धनी ॥ विठ्ठल हाची चित्तीं मानीं ॥ मजपासोनी प्रसाद पावोनी ॥ साधीं साधनीं ययासी ॥ ७६ ॥ ऐकोनी अभिमान सुटे ॥ द्विजा वंदिलासे नेटें ॥ ह्मणे विठ्ठल आहे कोठें ॥ न्हेयीं भेटे मजलागीं ॥ ७७ ॥ ब्राह्मण हर्षला मानसीं ॥ राजा तोषला चित्तासीं ॥ बंदी सोडुनी राउळासी ॥ पदचालीसी चालीला ॥ ७८ ॥ आदीं पुंडलीक वंदीला ॥ महाद्वारा आंत गेला ॥ रंगशिळेवरी पोचला ॥ आनंद झाला अपार ॥ ७९ ॥ जावोनी राउळाआंत ॥ विठुपदीं स्पर्शहात ॥ मस्तक ठेवी मग तेथ ॥ त्राहीं[2] ह्मणत दातारा ॥ ८० ॥ नेणता मी अपराधी ॥ मजमाजीं मलीन बुद्धी ॥ सदां दयाळा तुतें निंदी ॥ भेदवादी अमंगळ ॥ ८१ ॥ सर्व अपराध क्षमा करा ॥ अजीं तारावें पामरां ॥ देयीं पदीं सदां थारा ॥ जगदोद्धारा मजलागीं ॥ ८२ ॥ नेणता मी मती मलीन ॥ विसरलों तुझें ध्यान ॥ आतां लागलीसे तान ॥ स्वानन्द-

---

१ शोभे. २ रक्षीं.

पान करीं मातें ॥ ८३ ॥ तेथें राहे दीनवाणी ॥ दिन फार दासपणीं ॥ राजभक्ती चक्रपाणी ॥ तोषला मनीं तेधवां ॥ ८४ ॥ रोज ब्राह्मण समराधना ॥ करवी पक्वान्नें नाना ॥ भारी वांटिली दक्षणा ॥ विप्र जाणा तोषले ॥ ८५ ॥ जाणें आणिले पंढरीसी ॥ त्या द्विजाचें दैन्य नासी ॥ सदां वंदी संतसाधुंसी ॥ प्रीतीं एकादशी करीत ॥ ८६ ॥ गुमान वाटे सर्वांसी ॥ राजबुद्धी पालटे कैसी ॥ कोणा नकळे चमत्कारासी ॥ राजावांचुनी दूसरा ॥ ८७ ॥ भक्ती देखोनी निर्वाण ॥ तोषलासे विठ्ठल जाण ॥ ह्मणे राया माग वरदान ॥ इच्छा कोण मानसीं ॥ ८८ ॥ ऐकोनी तोषला मनीं ॥ राजा ह्मणे चक्रपाणी ॥ आतां चलावें येथुनी ॥ नगरालागुनी माजीया ॥ ८९ ॥ देव पडले संकटीं ॥ बोलुनी चुकलों ओठीं ॥ आतां जाणे हीची गोष्टी ॥ बरवी पोटीं वाटत ॥ ९० ॥ रुकार दिधला रायातें ॥ न्हेवोनि जाणे तुवां मातें ॥ रात्रभागीं गुप्तपंथें ॥ इच्छा तुतें जरी आहे ॥ ९१ ॥ ऐकोनी रावो आनंदला ॥ सेवकांलागीं हुकूम केला ॥ शिबिकेमाजीं विठुला ॥ त्वरेंच घाला नगरासी ॥ ९२ ॥ मग मध्यरात्रीचा अंतीं ॥ विठ्ठल शिबिकेंत घालिती ॥ बहु मेळूनीयां न्हेती ॥ नगराप्रती आनंदें ॥ ९३ ॥ स्थापुनी अंतरमंदिरीं ॥ राजा पुजी मंत्रोपचारीं ॥ चौकीपारे बाहेरी ॥ ठेवी हुषारी फार ती ॥ ९४ ॥ येतील पंढरीचे लोक ॥ त्यांचा रीघ न व्हावा देख ॥ पंढरपुरीं राउळीं लोक ॥ येती देख दर्शना ॥ ९५ ॥ काकडाआरती समय ॥ विठु न देखतां वाटला भये ॥ ह्मणती अनर्थ हा काय ॥ पंढरीराय काय झाला ॥९६॥ कोणी न्हेला देवनाथा ॥ काल येथें राजा होता ॥ आज नाहीं पाहूं येतां ॥ झाला न्हेता हाची हो ॥ ९७॥ आतां करावें तरी काय ॥ सर्व करीती हाय हाय ॥ ह्मणती विठ्ठले गे माय ॥ टाकिलें काय आह्मासी ॥ ९८ ॥ कोणी आले अनेगूंदी ॥ तेथें देव असे बंदी ॥ नाहीं दर्शनाची संधी ॥ कोण शुद्धी सांगनां ॥ ९९ ॥ पुढील कथा अलौकीक ॥ कलींत करिती संत देख ॥ भानुदास पुंडलीक ॥ वरदायक आणीती

॥ १०० ॥ नाथलीलामृत सुंदर ॥ पूर्वजांची कीर्ती विस्तार ॥ येथोनी ऐका निर्धार ॥ श्रोते सादर होउनी ॥ १०१ ॥ साधुचरित्रें गातां ॥ दुःखें नासती तत्वता ॥ सिद्धी लाधे आत्महीता ॥ अनंत गीतांतरीं ॥१०२॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित श्रीनाथलीला समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## अध्याय २ रा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंत सद्गुरवे नमः ॥ श्रीगुरु दत्तात्रेयाय नमः ॥ पंढरीहुनी देव गेला ॥ संतसाधु उपासनेला ॥ हाणी आलीसे वारीला ॥ झाला गलबला बहूत ॥ १ ॥ तंव आषाढी येकादसी ॥ आली तर्धी पंढरीसी ॥ साधु आले बहुदेशीं ॥ विठ्ठलासी भेटावया ॥ २ ॥ प्रतिष्ठानाहुनी संत ॥ भानुदास आले तेथ ॥ आकांत देखोनी बोलत ॥ देव कोणी न्हेलासे ॥ ३ ॥ लोक सांगती भानुदासा ॥ देव न्हेला दूरवासा ॥ दृष्टीं नये पुढे ऐसा ॥ आतां आशा खुंटली ॥ ४ ॥ रामराजा अनेगूंदी ॥ देव ठेवितो जी बंदी ॥ नाहीं जाण्याची तेथ संदी ॥ पडली मंदी पंढरी ॥ ५ ॥ ऐकोनी वार्ता श्रवर्णी ॥ भानुदास ह्मणती चक्रपाणी ॥ आणिल्या वांचुनी पाणी ॥ पीणें नाहीं पंढरीसी ॥ ६ ॥ तैसेंचीं उठोनि चालिले ॥ अनेगूंदीसी पोचले ॥ गांवा बाहेर राहिले ॥ ध्यान मांडिलें अंतरानें ॥ ७ ॥ जाचा भाव सर्वांभुतीं ॥ जोडली असे आत्मप्रचीती ॥ अनुभव तोषक मती ॥ धन्य ह्मणवी तिहीं लोकीं ॥ ८ ॥ सगुण करुनियां ध्यान ॥ भानुदासें लाविलें नयन ॥ विठ्ठला येई गा ह्मणोन ॥ अंतर ध्यान करीतसे ॥ ९ ॥ भक्तिनें वळला देवराणा ॥ सत्य पाहोनी धारणा ॥ पुढें करी त्या कारणा ॥ होयी देखणा ग्रंथार्थी ॥ १० ॥ प्रगटला सन्निधानी ॥ भानुदास जयेस्थानीं ॥ भक्तवत्सल पुंडलीक धनी ॥ कौस्तुभमणी भूषर्णी ॥ ११ ॥ निसी अंतीं तमारी ॥ जागवी भूतसृष्टी सारी ॥ चेतना ये भवबाजारी ॥ तैसा हरी प्रगटला ॥ १२ ॥ भक्ताहूनी नाहीं वेगळा ॥ परी हे सगुणलीला ॥ जनासाठीं कौतुकमाला ॥ गोवी सुढाला

प्रेम सुखा ॥ १३ ॥ दृष्टी उघडुनी भानुदासें ॥ पाहिलें तंव सावळा असे ॥ पाय धरीले उसोसें ॥ खेवखासे देती त्या ॥ १४ ॥ सद्गदें भरे देवराणा ॥ भक्तांचा वळखी कारणा ॥ भक्तीभाव अंतःकरणा ॥ होत दूणा हरीचा ॥ १५ ॥ देव बोले भानुदासा ॥ याची जाणे विश्वासा ॥ भक्तांची मला आशा ॥ भक्तभाव जैसा मी होयी ॥ १६ ॥ तुमची मला प्रिती बहू ॥ यावीण न कोणा सेवूं ॥ भक्तीवीणा वीधीनवू ॥ वश्य भाउ न माझा ॥ १७ ॥ भानुदास वदती तेथ ॥ देवा जाणे सारे हेत ॥ कारणीक सारे बेत ॥ कैची नीत तुजलागीं ॥ १८ ॥ तूं अभीमानावेगळा ॥ तूज नाहीं मायालळा ॥ आपपर या विटाळा ॥ ना गोपाळा तूं ठायीं ॥ १९ ॥ तूं निर्गुण निरुपचार ॥ तुझा नाहीं गा निर्धार ॥ कैचे तुजसी उपचार ॥ मज आदरें सांगसी ॥ २० ॥ पुंडलीक वरदें हें ॥ ऐकोनी बोलिलें पाहें ॥ अगा भक्ताधीन आहे ॥ वचन घें हें सत्यची ॥ २१ ॥ अगा हें जरी सत्य देवा ॥ वरी कां केला सांडावा ॥ येवोनी बैससी राजगांवा ॥ शब्दभावा दाविसी ॥ २२ ॥ संत रडती तुझा नांवीं ॥ सगूण भक्तवृंदें भावी ॥ पंढरी उदास सर्वही ॥ अनर्थ सर्वी मांडिला ॥ २३ ॥ आतां येसीना जरी तूं ॥ काया त्यागिती प्रेमवंतू ॥ उपोषणें करीती निष्ठावंतू ॥ सिद्धमहंतू तुझे जे ॥ २४ ॥ देव ह्मणती भक्तराया ॥ बंदी आहे स्थूळकाया ॥ अगा यया रामराया ॥ शब्दप्राया गूंतलों ॥ २५ ॥ याणीं केली सेवा फार ॥ पाहोनी मी झालों गार ॥ माग ह्मणतां वर ॥ मागे नर मजलागीं ॥ २६ ॥ गुंतोनीयां राजभाकें ॥ येथें आलों सत्य देखे ॥ आतां मज न्हेणें निकें ॥ कर्णें तुकें तुजलागीं ॥ २७ ॥ अगा सुजना संतप्रेमळा ॥ मला न्हेयी इया काळा ॥ कपट करूनी नृपाळा ॥ फसवुं वेळा आजचा ॥ २८ ॥ माझा नेम रायालागीं ॥ राहेन तुझ्या अनुसंगीं ॥ जंव संतमान न भंगी ॥ संतसंगीं मी दास ॥ २९ ॥ माझा संताचा अपमान ॥ होतां होय मज सीण ॥ मग जाइन येथुन ॥ ऐसें वचन गोविलें ॥ ३० ॥ आतां करावें हो ऐसें ॥ मम कंठीं जो हार असे ॥ हा तव कंठीं घालीतसें ॥

याचे मिसें राजा छळी ॥ ३१ ॥ अगा तूं भीउं नको मानसीं ॥ राजा जाचील परीयेसी ॥ सवड सांपडेल येण्यासी ॥ मज खासी पंढरीं ॥३२॥ ऐसा करोनी मनसुभा ॥ हार देती दिव्य प्रभा ॥ भानुदास संत उभा ॥ स्वानंदगाभा जातसे ॥ ३३ ॥ निसी माजील सर्व खेळ ॥ तंव झाला प्रातरवेळ ॥ जमला राउळीं राजमेळ ॥ कांकडेआर्ति समयासी ॥ ३४ ॥ अवलोकिती पंढरीनाथा ॥ तव हार नाहीं गळां होता ॥ राजा घाबरे हे जाणता ॥ शोध आतां करावा ॥ ३५ ॥ पारेकरी यांसी पुसे ॥ ते ह्मणती कोणी आंत नसे ॥ गेले रात्रभागीं विश्वासें ॥ जाग्रत माणसें येथ ही ॥ ३६ ॥ मग राहिली आरती ॥ राजा लागला शोधाप्रती ॥ द्यूतग्रामीं शोध करिती ॥ तव देखती भानुदासा ॥ ३७ ॥ कंठीं असे उघडा हार ॥ दुतें वळखिला चोर ॥ हाची ह्मणोनी निर्धार ॥ मग न्हेती राजगेहीं ॥३८॥ राजा पाहोनी संता ॥ क्रोधें झाला अग्नीहेता॥ ह्मणे चोरा हार हातां ॥ कोणेंमता आला असे ॥ ३९ ॥ चोरी करा-वया कारणें ॥ साधीलेती संतबाणे ॥ अरे तोंड कां लाजिरवाणें ॥ जगीं दावणें लाज नाहीं ॥ ४० ॥ भानुदास ह्मणती राया ॥ ही पंढरी-नाथमाया ॥ चोरिला नाहीं उपाया ॥ कंठठाया पडलासे ॥ ४१ ॥ राजा छळी बहुरीतीं ॥ बंदीं ठेविले पुढती ॥ हार न्हेउनी देवाप्रती ॥ घालुनी पुजी नृपवर ॥ ४२ ॥ तो दिन संपतांतीं ॥ निशी प्राप्त झाली क्षिती ॥ देव येवोनी भेटती ॥ बंदी तोडिती क्षणार्धें ॥ ४३ ॥ अगा सज्जना सीण झाले ॥ ह्मणोनियां देव बोले ॥ आतां पाहिजे मज न्हेलें ॥ पंढरीं गेलें पाहिजे ॥ ४४ ॥ सुजन अंतर पांडुरंग ॥ विखरतसे प्रेम-रंग ॥ मनोभाव संतसंग ॥ भक्तीरंग भावाचा ॥ ४५ ॥ भानुदास ह्मणती देवा ॥ कैसा तूजलागीं न्यावा ॥ काय करावें केशवा ॥ स्थूळ भावा न येसीं ॥ ४६ ॥ तूज आणिला बहूजणें ॥ मी येकटा कैसा न्हेणें ॥ तूंची देवाजी चालणें ॥ आणखी नेणें कांहींच ॥ ४७ ॥ पाषाणरूप जनदृष्टी ॥ मुहुर्तीं निर्गुण पारमेष्टी ॥ आणिलीयेली होवोनी कष्टी ॥ राजा तुष्टी न झाली ॥ ४८ ॥ अगा तूं सर्वव्यापक ॥ सर्व

देखणा मुळीं येक ॥ भक्त जहाले अनेक ॥ साम्यें सुख थोडियां ॥ ४९ ॥ जैसा जैसा भक्तभाव ॥ तैसा तूं त्या देवराव ॥ नाहीं तुज मुळठाव ॥ दासभाव ऊठवी ॥ ५० ॥ ऐकोनि तोषे पांडुरंग ॥ ह्मणे धन्य तुझा संग ॥ वाचा लाधली अभंग ॥ दावी रंग जनासी ॥ ५१ ॥ मी राहीन संपुष्टीं ॥ होउं नको उगां कष्टी ॥ जळो राजभक्ती नष्टी ॥ कर्मभ्रष्टी जाणिली ॥ ५२ ॥ शब्दांतूनी मोकळीला ॥ हाची लाभ मोठा झाला ॥ आतां न मानी राजाला ॥ चाल भला आतांची ॥५३॥ ऐसें बोलोनी वंहीलें[1] ॥ अंगुष्ट प्रमाण जहालें ॥ देव संपुष्टीं राहीले ॥ मग चालिले भक्तराज ॥ ५४ ॥ येके रात्रीमाजी जाण ॥ पंढरी केलें परायण ॥ कोणी न जाणे कारण ॥ भक्तीसाधन हरीचें ॥ ५५ ॥ अंत्य-प्रहरीं निशीमाजीं ॥ उभे केले रावजी ॥ विटेवरी पाउलें पुजी ॥ राउ-ळामाजीं पंढरींये ॥ ५६ ॥ विठ्ठल आला या भावें ॥ शब्दग्रामीं संभवे ॥ पहाण्याचेनी हांवें ॥ लोकथवे धांवती ॥ ५७ ॥ तों राउळीं दोघे ॥ भानुदास देव संगें ॥ स्तब्ध असती दोघे उगे ॥ जन रंगें देखती ॥५८॥ प्रथम नमिती भानुदासा ॥ अगाध मायेचा ईशा ॥ अह्मां दाविलें परेशा ॥ पुरे आशा तुझेनी ॥ ५९ ॥ प्रेमळ भोळे भाविक ॥ संतजाती जमा अनेक ॥ नामें गर्जती पुंडलीक ॥ वरदे देख विठायी ॥ ६० ॥ जयजयाकार ध्वनी ॥ गर्जन्नली चों बाजुंनीं ॥ पुजारी येती धांवुनी ॥ दाटी मानी न गणवे ॥ ६१ ॥ याची प्रचीत अद्यापवरी ॥ चालली असे पंढरीं ॥ भानुदासषष्टी बरी ॥ उत्साह पुरीं होतसे ॥ ६२ ॥ त्या दिवसाचे उपचार ॥ पैठणा जाती अद्यापवर ॥ संतचरित्र मनोहर ॥ जनोद्धार जाचेनी ॥ ६३ ॥ इकडे अनेगूंदीमाजी ॥ गडबड झाली देवकाजीं ॥ संत पहाती पान्यामाजीं ॥ गेला गाजी घेउन ॥ ६४ ॥ राजा ह्मणे आतां नये ॥ संत छळीला अन्यायें ॥ क्षमा देवाला न होहे ॥ लीला आहे धन्य ही ॥ ६५ ॥ ऐसे चमत्कार जनदृष्टीं ॥ संत

१ श्रेष्ठ.

दाविती व्हाया तुष्टी ॥ भक्तिधारणा सुष्टी ॥ व्हावी गांठीं ह्मणोनी ॥ ६६ ॥ संतां नलगे सिद्धीकाम ॥ परी हे सगूणीक काम ॥ देव दावी परम ॥ भक्तलिला करोनी ॥ ६७ ॥ यांसी पुत्र सूर्यकांत ॥ भानुदास वृद्ध होत ॥ कांहीं दीनीं समाधीस्थ ॥ जाले नेमस्त कर्मसूत्रें ॥ ६८ ॥ कांहीं दीन लोटल्यावरी ॥ सूर्यकांत वारी करी ॥ पंढरीची निर्धारी ॥ भावचारी प्रेमयुक्त ॥ ६९ ॥ परम भावीक संत ॥ भानुदासासम मानित ॥ कीर्ती प्रगटे जगा आंत ॥ संत संत ह्मणोनी ॥ ७० ॥ पांडुरंग उपासना ॥ भागवत भावसाधना ॥ करीतासे कांहीं दिना ॥ अंतीं जाणा सूत होत ॥ ७१ ॥ त्याचें नाम चक्रपाणी ॥ ठेविलें भक्तिमानी ॥ थोर होतां बाप साधनीं ॥ मुंजीबंधना आरंभी ॥ ७२ ॥ तयावरी करी लग्न ॥ आपण भक्तितें निमग्न ॥ अभीमान विरहीत नग्न ॥ कामविघ्न मोडिलें ॥ ७३ ॥ यावरी चक्रपाणी ॥ भार्या झाली गरोदणी ॥ दिनमान भरतांक्षणीं ॥ पुत्रनिधान प्रसवली ॥ ७४ ॥ मुळ नक्षत्र जन्मीं ॥ ज्योतिषी सांगती वर्मी ॥ शांती केली शास्त्रकर्मी ॥ पुढें नाम ठेविलें ॥ ७५ ॥ एका नाम बाळकासी ॥ वाढतसे मासदीसीं ॥ वर्षांआंत आईबापांसी ॥ वैकुंठासी प्रयाण ॥ ७६ ॥ चक्रपाणी निमाल्यावरी ॥ सूर्यकांत रक्षण करी ॥ बाळकाचें निर्धारी ॥ वर्ष चारी पर्यंत ॥ ७७ ॥ बाळ लक्षणीं दिसे धीट ॥ बाळाभ्यास भक्ती नेट ॥ येकांत राहे सदोदित ॥ ग्रामखेळ नेणेची ॥ ७८ ॥ आठवे वर्षी व्रतबंध ॥ पितामहा करी शुद्ध ॥ उपदेशिता कर्मबंध ॥ अर्थभेद पुसों लागे ॥ ७९ ॥ ब्राह्मण करती अचंबा ॥ पोर देते जबाबा ॥ विलक्षण ज्ञान बाबा ॥ हें कायबा कळेना ॥ ८० ॥ संध्यास्नानीं लक्ष नसे ॥ मी कोणयार्थी वसे ॥ शांती नाहीं उसोसे ॥ निजध्यासें चाळवी ॥ ८१ ॥ पुढील कथा बहु गोड ॥ श्रोत्यांची पुरेल चाड ॥ सज्जनाचें भाग्य होड ॥ उंहुं[1] कोड पुरावया ॥ ८२ ॥ सादर श्रोते अवधारिजे ॥ संतकृतीचे सवोजे ॥

---

१ कल्पना.

पुरती उभय रत्नकाजें ॥ पीके व्याजें भक्ती हे ॥ ८३ ॥ वक्ता नाथ सद्गुरू ॥ अनंतनामें लेखकाचारू ॥ बोलवी भक्तीनिर्धारु ॥ दीनपामरु तोषवी ॥ ८४ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित श्रीनाथलीला ॥ अध्याय २ समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## अध्याय ३ रा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंत सद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ अथ श्रीनाथलीला ॥ आतां नमुं गुरुवरा ॥ निर्गुणा निरुपचारा ॥ सगुण चरित्रीं थारा ॥ देईं दातारा मजलागीं ॥ १ ॥ प्रेमळ तूझी लीला-कीर्ती ॥ आवडती मनो आर्ती ॥ मायातमगर्ती ॥ तनुपर्ती करी हे ॥ २ ॥ देवभक्तांचा गोष्टी ॥ चित्ता करती संतुष्टी ॥ मोहमाया होत नष्टी ॥ दाखले बहुत याविषयीं ॥ ३ ॥ तूज नमोनीयां भावें ॥ आतां सगूण भरें हावें ॥ संतचरित्र या नांवें ॥ कथा ठावे असों दे ॥ ४ ॥ श्रोते आतां अवधानीजे ॥ सिंव्हावलोकनीं काजें ॥ वर्तलें श्रीपैठणीं जें ॥ ऐका वोजें[1] भावाचा ॥ ५ ॥ येका या नामें करोनी ॥ क्षेत्रीं वाढे भक्त-धनी ॥ पिशाच्य दीसे सधनानी ॥ अंतःकरणीं निर्मळ ॥ ६ ॥ कोणी हरिदास पुराणीक ॥ येतां नगरीं देख ॥ वाद करीत कौतुक ॥ स्वानु-बंध संबंधें ॥ ७ ॥ कोणी न करी शंका दुर ॥ वृत्ती नसे क्षणेक स्थीर ॥ अनुदिनीं करी विचार ॥ नेमनिर्धार स्वरूपाचा ॥ ८ ॥ रानींवनीं फिरावें ॥ पाहिजे तसें वर्तावें ॥ कोणासंगतीं नसावें ॥ काळ हरावे या रितीं ॥ ९ ॥ कोणी ह्मणती पोर पिसें ॥ वृत्ती प्रपंचीक नसे ॥ ब्राह्मणकर्म या कैसें ॥ येणें दिसे नाहिंसें ॥ १० ॥ ऐसें पाहुनी महा-पिता ॥ चिंताग्रस्त मनीं होता ॥ कुळीं पुत्र न रक्षिता ॥ दिसे त्राता अह्मांसी ॥ ११ ॥ सांगितलेलें नायके ॥ आपल्या मानें न देखे ॥ करतो काय हें ही नीके ॥ नय विलोके जनदृष्टी ॥ १२ ॥ असे गेले

---

१ प्रकाशें.

कांहीं दिन ॥ वरी वर्तलें जें कथन ॥ श्रोते ऐका कान देउन ॥ चरित्र सज्जन सुखाचें ॥ १३ ॥ येक दिनीं नगराआंत ॥ पुराणीक आला भाववंत ॥ उतरलासे देउळाआंत ॥ तेथें येत मूल हा ॥ १४ ॥ पहिलें करोनी नमन ॥ पुसे महाराज आपण कोण ॥ ते सांगती जाणुन ॥ वृती याची साक्षपी ॥ १५ ॥ बारे मी भिक्षुक ॥ पुराणीक हांसे भेक ॥ कुटुंब-पोषणकाम्यक ॥ येथ देख आलोंसे ॥ १६ ॥ बाळ बोले तयाप्रती ॥ देहअवस्था कोण गती ॥ कर्मे कोण रीतीं घडती ॥ बंध मती कैसेंनी ॥ १७ ॥ काय करावें नरजन्मीं ॥ हें सांगाजी आज तुह्मी ॥ जेणें पावेन आरामी ॥ देहधार्मी स्वामिया ॥ १८ ॥ हांसे आलें पुराणिका ॥ मान डोलवीत बाळका ॥ अवतारिक हा निका ॥ शब्द कौतुका कळों ये ॥ १९ ॥ यासी समाधान करी ॥ ऐसा गुरु निर्धारी ॥ जनार्दनपंत साचारी ॥ दुसरा सरी पावेना ॥ २० ॥ मुमुक्षुदशा निष्टंक ॥ बाळदशा अलौकिक ॥ देखोनी पुराणीक ॥ कारण देख सांगती ॥ २१ ॥ बाळा पाहुनी तुझी दशा ॥ प्रेम उपजे रे मानसा ॥ तुझी नासाया अंदेशा ॥ उपाय खासा सांगतों ॥ २२ ॥ येथोनी अष्टादश कोश ॥ दौलताबाद विशेष ॥ तेथें असती शांत पुरुष ॥ दत्तउपासक श्रेष्ठ जे ॥ २३ ॥ जनार्दनपंतनामें ॥ कारभारी राजकामें ॥ रामकृष्ण परनामें ॥ ऐक्य कामें जाणता ॥ २४ ॥ तेथें जरी जासी बाळा ॥ मानसासीं पडे ताळा ॥ शांती येईल सुढाळा ॥ शब्द चाळा सांडसी ॥ २५ ॥ तुझी शांती इतरांनीं ॥ नची होणें सत्य मानी ॥ माझें वचन धर ध्यानीं ॥ जाई निघोनी सत्वरी ॥ २६ ॥ ऐकोनी आनंदवाणी ॥ येका तोषलासे मनीं ॥ धन्यधन्य आज दिनीं ॥ झालों दर्शनीं तुमचा ॥ २७ ॥ आतांचि जाइन शीघ्र जाणा ॥ नमस्कारिलें ब्राह्मणा ॥ करोनीयां प्रदक्षणा ॥ बाळ कारणा निघालें ॥ २८ ॥ अंगीं टोपी बाळरीतीं ॥ अंगावरी जी कां होती ॥ त्याच पोषाकें पुढती ॥ त्वरें जाती नाथजी ॥ २९ ॥ येक-दीन येकरात्र ॥ चालोनी जाई तो पवित्र ॥ मुखें करो गुरुस्तोत्र ॥ भाव पात्र भक्तीचें ॥ ३० ॥ दौलताबादेसी पोंचला ॥ लोकांपासीं पुसूं

लागला ॥ जनार्दनपंत वहीला ॥ ठिकाणा मला सांगावें ॥ ३१ ॥ लोक दाविती हातें ॥ बाळ गेलें त्याचि पंथें ॥ पोंचल्या वाड्या आंतौतें ॥ झाले देखते जनार्दन ॥ ३२ ॥ सदरेवरीच होते ॥ बाळ लागलें चरणातें ॥ कर जोडोनी धीटमतें ॥ उभें तेथें राहीलें ॥ ३३ ॥ अवलोकोनी नयनीं ॥ स्वामी तोषले बहू मनीं ॥ आलींगिला प्रीतींकरोनी ॥ शब्द आननीं बोलती ॥ ३४ ॥ बारे बोले कवण तूं ॥ येथें आलासी कोण हेतु ॥ ऐकूं बोल सूखें तूं ॥ कळवी हेतू आपुला ॥ ३५ ॥ बाळ मूळचें धीट ॥ शब्दें दावी आपुली वाट ॥ स्पष्ट जिव्हा नीत भाट ॥ प्रेम पेट ऐक त्या ॥ ३६ ॥ आलों चालत दुरून ॥ ग्रामनाम पैठण ॥ रघुवेदी ब्राह्मण ॥ कुळीं कारण देह हा ॥ ३७ ॥ स्वामीची ऐकोनी कीर्ती ॥ आलों येथें दीनगती ॥ पदीं सेवा सांगा नीगुती ॥ इच्छा या अर्थी उठलीसे ॥ ३८ ॥ भीती वाटे देहभावी ॥ कोण मी मती नाठवी ॥ काळ गोष्टी नित्य नवी ॥ बुद्धी भवीं भीत हे ॥ ३९ ॥ घर नावडे स्वामी ॥ नाहीं गोडी कर्मधर्मीं ॥ ध्यास लागला कोण मी ॥ वळख धामीं असावी ॥ ४० ॥ आजवरी गेला काळ ॥ चिंताग्रस्त सर्व वेळ ॥ आजी आनंदकल्होळ ॥ चरणकमळ देखतां ॥ ४१ ॥ चित्तें जोडलों असें पदां ॥ हारली सर्व आपदा ॥ सेवा आतां सांगा सदां ॥ दासधंदा दिनासी ॥ ४२ ॥ ऐकोनी बाळभाषणें ॥ पंत तेथें धन्य ह्मणे ॥ हा अवतार नारायण ॥ मुमुक्षुमानें आलासे ॥ ४३ ॥ प्रेमपान्हा भरे पोटीं ॥ वोगरोनी वाहे ओठीं ॥ बाळा चित्तकसोटी ॥ धन्य धाटी लाधली ॥ ४४ ॥ ह्मणती राहे समाधान ॥ सेवा वेळोंवेळीं सांगेन ॥ नारायणपदीं ध्यान ॥ नीरंतर असों दे ॥ ४५ ॥ ऐकोनी आनंद झाला भारी ॥ चरण वंदिले पुढारी ॥ लाभ मानुनीयां अंतरीं ॥ सद्गुरुघरीं राहिले ॥ ४६ ॥ येकवीध भक्तिलक्षण ॥ बुद्धी तीव्र विचक्षण ॥ येकांगवृत्ती लक्षण ॥ पंचप्राण गुरुपदीं ॥ ४७ ॥ कांहीं दिनांतीं बाळका ॥ गुरू सांगती कौतुका ॥ लिहीणें शिके जाण कां ॥ कारण सुखा होईल ॥ ॥ ४८ ॥ प्रसादजी बोलिला मुखीं ॥ करीतसे त्याच रितीं कीं ॥ विद्या

लाधली निकी ॥ लोहचुंबुकीं लोह झटे ॥ ४९ ॥ रात्रौ गुरूपादसे-
वन ॥ भावें करावा प्रतीदीन ॥ वृत्ती वागे समाधान ॥ गुरूसेवन पै
होतां ॥ ५० ॥ भावाचा पुतळा येका ॥ शिष्यत्व देखोनी साम्यका ॥
स्वामी मानिती कौतुका ॥ प्रेमसुखां आकार हा ॥ ५१ ॥ ळळा जडे
स्वामिचा ॥ बाळ झालासे प्रितीचा ॥ प्रेमयुक्त बोलती वाचा ॥ हीशोब
आमुचा राखावा ॥ ५२ ॥ यवनराज नीतीमाजीं ॥ कारभारी दौलता-
बाजी ॥ जनार्दनपंत व्यवहारकाजीं ॥ जनकाजीं वर्तती ॥ ५३ ॥ हे
साधु ह्मणोनी कोणा ॥ ठाउक नसे नये ध्याना ॥ अवधूतदीक्षाकारणा ॥
बाणली जाणा नेटकी ॥ ५४ ॥ घरीं कारभार जमाखर्च ॥ राखावया
आज्ञा साच ॥ झाली असे त्या वेळींच ॥ फोड आंच फुटला ॥ ५५ ॥
प्रीतीनें सांगती सेवा ॥ गुरू जाणोनी अंतरभावा ॥ तोषकोत्तरें संभवा ॥
मनोभावा सांगती ॥ ५६ ॥ पितापुत्रांची प्रिती ॥ त्याहुनी सद्गुरुची
गती ॥ मुमुक्षु देखोनी द्रवती ॥ चंद्रकांती चंद्रसें ॥ ५७ ॥ कोणी येके
अवसरी ॥ निशीचा समयांतरीं ॥ गुरूसेवा सारुनी सारी ॥ बैसती वरी
हिशोबा ॥ ५८ ॥ महीना अखेरीचा ताळा ॥ जमेंत रुका गोंधळा ॥
रात्रीची येकांत वेळा ॥ लक्ष अतुर्बळा शोधीत ॥ ५९ ॥ स्नेहदीप पाज-
ळोनी ॥ लक्ष केला येकाग्रमानी ॥ शोध करितां ध्यानीं ॥ रुका साधनीं
सांपडे ॥ ६० ॥ हर्ष झाला भारी तेथ ॥ मारी हातावरी हात ॥ हास्य
केलें आनंदीत ॥ जनार्दनपंत जाग्रत ॥ ६१ ॥ पुसती येक्या काय
झालें ॥ चित्त कां रे आनंदलें ॥ अपरात्रिंचे वेळें ॥ काय देखिलें सांग बा
॥ ६२ ॥ बाळ ह्मणे स्वामी रुका ॥ सांपडला असे जो चुका ॥
हांसलों याचि कौतुका ॥ तुह्मा देखा जागवीलें ॥ ६३ ॥ स्वामी
निद्रेचिया मिसें ॥ अवलोकीत करीत कैसें ॥ येकाग्र देखोनी हर्षें ॥
युक्ती तोषें सांगती ॥ ६४ ॥ अरे जैसें रुक्यापासीं ॥ ध्यान लागलें
परियेसी ॥ तैसीच मती खासी राखी ॥ पायांसी हरीचा ॥ ६५ ॥ येका-
ग्रता जोडे आतां ॥ धंदा ठेवी परौता ॥ येइल तुज आत्महीता ॥
बोली सर्वथां माजी हे ॥ ६६ ॥ श्रवणीं परिसोनी गोष्टी ॥ आनंद न

माय पोटीं ॥ हर्षे कोंदली सृष्टी ॥ वृत्ति कष्टी हारपली ॥ ६७ ॥ ह्मणे झालों धन्य आजीं ॥ प्रसाद लाधलों आत्मकाजीं ॥ स्वामीआज्ञे सदां राजी ॥ वृत्तीमाजी नांदणें ॥ ६८ ॥ देहभाव कर्म मीटलें ॥ गूण भाव हरपले ॥ आपुले पदसाउले ॥ भक्तीं जोडलें हरीचे ॥ ६९ ॥ आद्य कर्म कीर्दखत ॥ आजिचानि सुटलें मत्त ॥ पुढील हुदा बहूत ॥ उत्तम पंथ जोडला ॥ ७० ॥ कागद शाइ टांक ॥ ठेवितां न वाटला धाक ॥ झाली अंतराची भाक ॥ पटली साक वचनाची ॥ ७१ ॥ जैसा स्नेहसूत्र-भरिणा ॥ दीप पेटे लावितां जाणा ॥ ज्ञान झालें प्रदीप्त जाणा ॥ हरी-चरणां चिंतावें ॥ ७२ ॥ सद्गुरु सांगती नेम ॥ मुख्य येथें मनोधर्म ॥ आकळावा हा परम ॥ अर्थसाम्य[1] कामासी ॥ ७३ ॥ येकाग्र करोनी मानस ॥ बैसावें येकांतीं समवेश ॥ टाकोनी माइकवास ॥ आत्मा स-र्वेश चिंतावा ॥७४॥ मी देहधारी न आठवी ॥ वृत्ती देहा बाह्य न्ह्यावी ॥ सर्वव्यापक पदवी ॥ भावें गोवीं चित्तासी ॥ ७५ ॥ हरी आहे सर्वांभूतीं ॥ जैसी प्रभा सूर्यज्योती ॥ दृष्टी सकळी चेवती ॥ हीच प्रचिति लक्षावी ॥ ७६ ॥ साधन ज्ञान गुरूमुख ॥ ऐकोनी भ्रांति पळे देख ॥ भासे देहावीण सुख ॥ तान भुक हरली ॥ ७७ ॥ पुढती काय दीनवरी ॥ साधनीं वर्तती शिष्य चारी ॥ जे शांतीचे कारभारी ॥ लोकोपचारी भा-वनें ॥ ७८ ॥ येकनिष्ठा गुरुवचनीं ॥ पाहुनी जनार्दनार्चनीं ॥ स्वामी जाणती ध्यानीं ॥ विष्णुसाधनी अवतरला ॥ ७९ ॥ याचेनी अह्मासी सुख ॥ हा भक्त स्वानन्दकारक ॥ आतां भेटवावा देख ॥ सद्गुरूनायक दत्त या ॥ ८० ॥ ऐसा करोनियां बेत ॥ येकनाथासी वदत ॥ ऐक बाळा माझी मात ॥ गुप्त हेत राखी हा ॥ ८१ ॥ तुज न्हेतों दर्शना ॥ सद्गु-रूचीया रे वनां ॥ चाले धीर असो ध्यानां ॥ विकल्प मना नसावा ॥८२॥ कोण्या रूपें देती दर्शन ॥ त्याचा नाहीं अनुमान ॥ प्रसाद मिळाल्या जाण ॥ तात्काळ भक्षावा ॥ ८३ ॥ येकनाथ ह्मणती स्वामी ॥ मज गुरू दुसरा कामीं ॥ नाहीं वाटत मनोधर्मी ॥ आपणावांचुनी दातया ॥ ८४ ॥ येतों

१ ऐक्य.

तुमचिया आज्ञे ॥ सांगाल त्या वागेन मानें ॥ गुरू हर्षले येणें मानें ॥ पुढें काननीं चालिले ॥ ८५ ॥ येकांत वनीं जाउनी ॥ चिंतिले सद्गुरू मनीं ॥ आले तेथें इच्छागमनीं ॥ वेष यवनीं धरिलासे ॥ ८६ ॥ येक श्वान बरोबरी ॥ हंडी असे बगलेअंतरीं ॥ जनार्दन भेटले येकोपचारी ॥ आलिंगिलें वंदितां ॥ ८७ ॥ जनार्दनस्वामी आणि दत्त ॥ बैसोनी करीत मात ॥ तेथें बाजु बसले येकनाथ ॥ बाळहेत रूपानें ॥ ८८ ॥ पाहोनी अवधूत योगी ॥ ह्मणती कोण या भार्गीं ॥ जनार्दना तव संगीं ॥ सांग सांगी मजसी ॥ ८९ ॥ अहो सद्गुरूसमर्था ॥ हा आहे आपुला सर्वथा॥ कृपादृष्टी पहातां ॥ सुखहेता पावेल ॥ ९० ॥ महा अधिकारी दास ॥ आपला आहे निःशेष ॥ आहे अंतरभावीं ध्यास ॥ आपुला यास ह्मणावा ॥ ९१ ॥ ऐकोनी जनार्दनवाणी ॥ अवधूत जाणती मनीं ॥ ह्मणती करी तव मानीं ॥ आग्रह नाणी कदां मी ॥ ९२ ॥ मग हंडी घेवोनि करीं ॥ श्वान दुभवी दृष्टोपचारी ॥ जो निजबोध ओतारी ॥ माया अघोरी दावीत ॥ ९३ ॥ दुध काढोनी हातें ॥ देती आधीं जनार्दनातें ॥ मांस खंड निरुतें ॥ दिलें तेथें स्वामीनें ॥ ९४ ॥ दुरूनी देखी येकनाथ ॥ आश्चर्य करी मनाआंत ॥ नेणें गती अद्वयें पंथें ॥ विकार होत मानसा ॥९५॥ ह्मणे यवनासंगतीं ॥ जेविती गुरू निश्चिती ॥ आपण कैसी करावी गती॥ आज्ञापिती तेधवां ॥९६॥ द्वैतभाव उभा अंगीं॥ जहालासे येका अंगीं॥ पुढें प्रसाद तयालागीं ॥ देती रंगीं अवधूत ॥९७॥ बोलाविला जवळी ॥ हाक मारुनीयां कोवळी ॥ बाळा भक्षी या वेळीं ॥ प्रसाद बळीं जम्निया ॥ ९८ ॥ धांवोनी आले नाथ ॥ पुढें केला सव्य हात ॥ यतीराज प्रसाद देत ॥ भक्षी ह्मणत आनंदें ॥ ९९ ॥ घेवोनी प्रसाद करीं ॥ तेथुनी फिरला माघारी ॥ वृत्ती निर्धार न करी ॥ ध्याया उदरीं ग्रास तो ॥१००॥ अविंदस्थिती वाटली ॥ गुरूवचनीं भुल झाली ॥ हात केला असे खालीं॥ ठेवीला तळीं प्रसाद ॥ १ ॥ मांसतुकडा श्वान पय ॥ टाकिला असे जो ठाय ॥ मानोनी ज्ञातीचा भय ॥ अभयपण त्यागिलें ॥ २ ॥ कांहीं वेळ राहोनियां ॥ दत्तें केली योगमाया ॥ गुप्त झाले त्या ठाया ॥ नाथराया

समजलें ॥ ३ ॥ गुरूआज्ञा भंगिली ॥ कर्में गती ही भुलली ॥ साधली घडी विघडली ॥ खंती झाली मागुनी ॥ ४ ॥ गुप्त झाले दत्तनाथ ॥ अविंद हो तो मानत ॥ नाहीं पुरला हेत ॥ अनुतापत अंतरीं ॥ ५ ॥ तव जनार्दनसमीप ॥ पुसती देखिला प्रताप ॥ प्रसाद भक्षीला कीं ताप ॥ देह पापनाशक ॥ ६ ॥ येकनाथ घाबरले ॥ तोंड नये बोलण्या बोले ॥ चित्त असे जी खचलें ॥ जाणीतलें स्वामीनें ॥७॥ अरे प्रसाद काय केला ॥ ह्मणे स्वामी मी टाकिला ॥ भूल झाली मतीला ॥ जाणतां लिला तुह्मी ही ॥ ८ ॥ अरे केलें हें काय ॥ सांगीतला असोनी उपाय ॥ नाहीं मिळणें ऐसी सोय ॥ दावि ठाय टाकिला तो ॥ ९ ॥ दावितां टाकीला ठाव ॥ तेथें नसे साक्षभाव ॥ गुप्त जहालासे सर्व ॥ देखोनि बोलती गुरूसी ॥ ११० ॥ स्वामी तुमची कृपा असावी ॥ तेथेंची मिळती दत्तगोसाई ॥ मम भाव दुजा नाहीं ॥ तूंची मायी माझी गा ॥ ११ ॥ जनार्दनपंतें जाणिलें ॥ बोलणें येकार्थ चांगलें ॥ दर्शन पुन्हा यासी केलें ॥ पाहिजें वहिलें भाविकां ॥ १२ ॥ तेथें प्रगटले मागुतीं ॥ जी कां गुणैक मुहुर्ती ॥ जयाची प्रीती भाव भक्ती ॥ रूप धरुनी यतीचें ॥१३॥ देखोनी अविंद कारभारी ॥ जहाले फारची अभारी ॥ येकनाथा धरोनी करीं ॥ पायांवरी घातला ॥ १४ ॥ केवढा शिष्यलळा ॥ वाढला गुरूचे गळां ॥ गहिंवरें दत्त कोवळा ॥ देखोनी कळा तयाची ॥ १५ ॥ बाळालागीं आलिंगिलें ॥ नेत्रीं प्रेमाश्रु आले ॥ कर स्पर्शले मस्तकीं ॥ वदती मुखें आत्रेय ॥ १६ ॥ जनार्दना येकनिष्ठ ॥ शिष्य हा गा वरिष्ठ ॥ पाहुनियां मी संतुष्ट ॥ झालों पुष्ट प्रेमानें ॥ १७ ॥ प्रसाद यांणीं टाकिला ॥ तरी प्रसादहेत वहिला ॥ याणें आधीं असे भक्षीला ॥ भाव रक्षिला येकनिष्ठें ॥ १८ ॥ तुझीया चरणीं भाव ॥ तोची मातें स्वभाव ॥ आवडे प्रीति राणिव ॥ भक्तिराव हा असे ॥ १९ ॥ हा होईल जन उपकारी ॥ भागवतधर्मी सदाचारी ॥ येकादश स्कंधावरी ॥ टीका करील जनभाषें ॥ १२० ॥ आणी भावार्थ रामायण ॥ करील उघड लक्षण ॥ आत्मप्रचीती खुण ॥ जगाकारणें दावील ॥ २१ ॥ स्वानंदेंगाभा प्रेमळ ॥ नि-

छावंत भक्त विमळ ॥ ऐसें बोलोनी कृपाळ ॥ दृश्य स्थूळ लपविलें ॥२२॥ आनंदले जनार्दनस्वामी ॥ प्रसाद मिळे येक्यालागुनी ॥ मग भक्षीला प्रीतीं मानीं ॥ द्वैत ध्यानीं न राहे ॥ २३ ॥ भाव भक्ती सम झाली ॥ बुद्धी स्वानंदें घुडली ॥ दृश्य वीरहीत चेतली ॥ देखणी झाली आत्मरंग ॥ २४ ॥ सहज समाधीलक्षण ॥ बाणतां गेलें मीपण ॥ वळखी भंगे दुसरा कोण ॥ मन अमन जाहलें ॥ २५ ॥ जिकडे दृष्टी धांवे पाहूं ॥ तीकडे जनार्दनदेहू ॥ ऐसा झाला येक भावू ॥ देव पाहूं दाटले ॥ २६ ॥ येकनाथीं येकपणा ॥ झाले जाणाया कारणा ॥ पुढील भाग धारणा ॥ विचक्षणा धरीं बा ॥ २७ ॥ संतचरित्र अमरावती ॥ प्रबोध यांत ऐरावती ॥ दृष्टांत चातुर्य चौदंती ॥ स्वेतकांती स्वत्वांची[१] ॥ २८ ॥ भावें अवलोकी श्रवणें ॥ अमरत्वप्राप्ती कारणें ॥ संतकथामृत पिणें ॥ शांती बाणे येथेंची ॥ २९ ॥ देवभक्त वेगळेंपण ॥ बुध न करीती कदां जाण॥ भक्तापासोनी देव जाण ॥ होय कारण जगासी ॥ १३० ॥ वत्सासाठीं धेनु दुभे ॥ जगा हीतकारणीं लाभे ॥ संताचें जें मन सुभे ॥ मुमुक्षु ओजें बोलती ॥ ३१ ॥ तेंची पय प्रेमबोध ॥ मिळेल करितां शोध ॥ होइल इंद्रियें अवरोध ॥ भेदाभेद मावळे ॥ ३२ ॥ पुढील कथा गहन ॥ नाथ-प्रवास लक्षण ॥ करूं जाती तीर्थाटण ॥ आज्ञा प्रमाण सद्गुरू ॥ ३३ ॥ तेंची कर्तेपणाविण ॥ अनंत आननीं कथन ॥ बोलती येका जनार्दन ॥ भाव कारण सत्यार्थीं ॥ ३४ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित ॥ श्रीनाथलीला ॥ अध्याय तृतीय समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ हरिःशरणं ॥

---

## अध्याय ४ था.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरू दत्तात्रेयाय नमः ॥ अथ श्रीनाथलीला ॥ श्रोतें सादर कान कीजे ॥ सांगेन संतचरित्र सूजें॥ जरी येथें मन रीजें ॥ येईल वोजें आनंद ॥ १ ॥ देवभेटी संतावीण॥ होणें नाहीं सत्य जाण ॥ अनुभवमार्ग संतलक्षण ॥ देहवर्तन देखावें

---

१ आत्मभावाची.

॥ २ ॥ प्रेम उपजे या ठायां ॥ तरी सुटेल देहमाया ॥ इत्सा लाधे राम गाया ॥ मोहमाया विटेल ॥ ३ ॥ आतां मागिल अनुसंधान ॥ येकनाथ जनार्दन ॥ असतां येकांत वन ॥ दत्त खूण पावली ॥ ४ ॥ समाधी लागली नाथांसी ॥ स्वामी सावध करिती त्यासी ॥ आणोनियां देहभावासी ॥ पुढें तयासी सांगती ॥ ५ ॥ बा रे जहालें जन्मकाम ॥ प्रसाद पावलासी परम ॥ आतां तीर्थयात्राक्रम ॥ कांहीं दीन करावा ॥ ६ ॥ स्वइच्छ करी गमन ॥ येकांत असावें सदां जाण ॥ अनुभव घेई फीरोन ॥ देशे कोण काय नीती ॥ ७ ॥ धर्म कर्म पारखी ॥ अंतरीं राहे सदां सुखी ॥ माया स्थूळ भावना पारकी ॥ सुक्षम निकी बुद्धी असो ॥ ८ ॥ कांहीं दीन क्रमील्यावरी ॥ मग यावें जन्मपुरीं ॥ तेथें रहावें दीन चारी ॥ पुढील परी प्रारब्धे ॥ ९ ॥ आज्ञा होतां श्रीगुरूची ॥ नाथचित्ता झाली रुची ॥ आज्ञा प्रमाण स्वामिची ॥ घडों तेंची आवडी ॥ १० ॥ ह्मणोनी पायीं शिर ॥ ठेविती नाथ साचार ॥ चालिलासे प्रेमपुर ॥ नेत्रद्वारें करोनी ॥ ११ ॥ दुसरे दिनीं आज्ञा घेउनी ॥ नाथ जाती तीर्थाटणीं ॥ गुरू ह्मणती बा परतोनी ॥ येईं ध्यानीं असों दे ॥ १२ ॥ पुन्हा स्पर्शोनी चरणा ॥ चालिलासे भक्तराणा ॥ जो कां भावाचा पाहुणा ॥ यदुराणा जापासी ॥ १३ ॥ करीत असतां पर्यटण ॥ वस्ती करिती बाह्य ग्रामांतुन ॥ वळखी न देती जाण ॥ भेद पूर्ण आपला ॥ १४ ॥ कृष्णातिरीं पंचकासीं ॥ येक खेडेंग्राम परियेसी ॥ नाम तया परियसी ॥ भक्तीमळा पडलासे ॥ १५ ॥ प्रातःकाळीं करावें स्नान ॥ सद्गुरूचें चिंतन ॥ पुढें येकाग्र जाऊन ॥ बैसावें रानीं आवडीं ॥ १६ ॥ गुरूवाक्य गती समाधी ॥ योग करावा चित्तशुद्धी ॥ साधीलेंची साधी ॥ आत्मरक्षणा जेवीं अन्न ॥ १७ ॥ दोन प्रहरपर्यंत ॥ तेथें असावें ध्यानस्थ ॥ नंतर उदरनिमित्य प्राप्त ॥ आहार सेवावा ॥ १८ ॥ तेथें येक चतुर्थवर्णी ॥ भावीक असे भक्ति चरणीं ॥ शेतकरी रात्रदीनीं ॥ त्याणें नयनीं देखीलें ॥ १९ ॥ त्याचे सेतानजीक ॥ जागा बैसावयाची देख ॥ तो साधु वळखोनी येक ॥ शेर दुध देत असे ॥ २० ॥ प्रातःकाळीं

स्नान करोनी ॥ दुध न्हेत तावोनी ॥ नाथआसनसन्निधानीं ॥ नमोनी चरणीं ठेवीत ॥ २१ ॥ नंतर जायी सेतासी ॥ कष्ट करी कुटुंबेसी ॥ कितेक दीन या रितीसी ॥ चालवी खुषीं प्रेमानें ॥ २२ ॥ ऐसें असतां येक दीनीं ॥ कुळंबी गेला दुजे ग्रामीं ॥ वसुल घेउनी राजकामीं ॥ दुरमानी पंच कोश ॥ २३ ॥ तेथें देउनीयां रुका ॥ पावती घेतलीसे देखा ॥ चित्तीं वाजे धुकधुका ॥ साधु देखा कोपती ॥ २४ ॥ रोजचा नेम टळला ॥ आज नेम वायां गेला ॥ त्वरें चाले वहीला ॥ शीघ्र आला गृहासी ॥ २५ ॥ घरीं येवोनी कांतेप्रती ॥ ह्मणे दुध साधुप्रती ॥ न दिल्यासी मजप्रती ॥ सत्वरगती देयीं गे ॥ २६ ॥ कांता आणुनी पय दे ॥ घेवोनी चालिला पदें ॥ वेळ लागला या वेधें ॥ अंतःकरण विरगळे ॥ २७ ॥ नजीक जंव पावला ॥ तव दीन माध्यान्हीं आला ॥ दुरोनी ठाव देखीला ॥ साधु भला आहे कीं ॥ २८ ॥ तंव तेथें महा सर्प ॥ साधुवरी फणी तल्प[1] ॥ करीत हा प्रताप ॥ देखोनी नवल मानिलें॥२९॥ तरूआड राहुनी ॥ पाहिलें समाधान मानीं ॥ ह्मणे ईश्वर प्रमाणी ॥ येथें रानीं राहिला ॥ ३० ॥ मिळतां त्याची झुळक ॥ नाग गुप्त झाला देख ॥ मग जावोनी जवळिक ॥ साधू देख नमियेलें ॥ ३१ ॥ तंव ते समाधि आसना ॥ संधी संपे उपासना ॥ नाथें उघडोनी नयना ॥ अवलोकिलें तयासी ॥ ३२ ॥ रोज दूध मिळे परी ॥ कोण आणी या व्यापारीं ॥ नाथ चित्त न पडे भरी ॥ शोध करी तयाचा॥ ३३ ॥ यांची समाधीची वेळ ॥ मध्यंतरीं दुध कृपाळ ॥ कुळंबी दे भावबळ ॥ दिवस सुकाळ देखीला ॥ ३४ ॥ पुसती बा तूं कोण ॥ तो ह्मणे सेवक प्रमाण ॥ शूद्र असे ज्ञातीवर्ण ॥ येतों दास हेतूनें ॥ ३५ ॥ प्रातःकाळीं रोज स्वामी ॥ येत असें दर्शना मी ॥ स्वामी असती अंतरधामीं ॥ वंदोनि मी जातसें ॥ ३६ ॥ आज झाली आपुली भेटी ॥ आणी चमत्कार देखिला दृष्टीं ॥ पाहिला न जो सृष्टीं ॥ झाली तुष्टी अंतरा ॥ ३७ ॥ भाव आळें मती सहज ॥ मनोरथ रोविलें बीज ॥ फळ आलें दृष्टी आज ॥

---

१ शय्या.

झालें काज माझें बा ॥ ३८ ॥ नाथ ऐकोनीयां बोली ॥ हासवदनीं मुद्रा केली ॥ मग बोलती बोली ॥ काय पाहिली गती तूं ॥ ३९ ॥ शूद्र ह्मणे देवाधिदेवा ॥ दीसतोसी मनुष्य भावा ॥ राहसी बाहेर गावा ॥ जाणलें भावा आजिचा ॥४०॥ शेषशयना साधुवेषा ॥ मातें तोषविलें जगदीशा॥ तुह्मावरी भुजंगेशा ॥ जाहलों अजी पहातां ॥ ४१ ॥ तुह्मावरी छाया सापें ॥ धरिली असे गा प्रतापें ॥ पाहोनी चित्त कांपे ॥ आतां प्रतापें वांचलों ॥ ४२ ॥ नाथें मनीं जाणितलें ॥ साधनासी विघ्न आलें ॥ आतां येथोनियां गेलें ॥ पाहिजे वहिलें शीघ्रची ॥ ४३ ॥ त्यासी बोलती बा आतां जाई ॥ घरीं आपुल्या लवलाहीं ॥ सेवा केली भावी तेही ॥ लीला दावी हरी तो ॥ ४४ ॥ तूंची धन्य पाही जगीं ॥ दर्शन झालें तुजलागीं॥ मी न देखेची स्वअंगीं ॥ भक्ती भागीं तूंची धन्य ॥ ४५ ॥ ऐसें सांगितलें तया ॥ त्याणें वंदोनियां पायां ॥ आतां येतों स्वामीराया ॥ कृपाछाया असों दे ॥ ४६ ॥ तो शूद्र गेल्यामागें ॥ नाथ पहाती अनुरागें ॥ येथें राहातां जनरंगें ॥ वृत्ती भंगे आपुली ॥ ४७ ॥ ऐसें मानुनीयां चालिले ॥ असती पंथा लागले ॥ दोन कोश दुरी गेले ॥ जन आले मागुनी ॥ ४८ ॥ तयां शूद्रें ग्रामाआंत ॥ सांगितला तो वृत्तांत ॥ आश्चर्य मानोनी तेथ ॥ लोक सर्व जाताती ॥ ४९ ॥ तंव तेथें साधु नाहीं॥ ह्मणती अभागी अह्मि पाही ॥ दैवें भेटी झाली नाहीं ॥ बोल लावी प्रारब्धां ॥ ५० ॥ सिद्धी देखोनी नयनां ॥ साधु ऐसा भाव मनां ॥ होतसे कौतुक जनां ॥ संत जाणा न मानी ॥ ५१ ॥ संत साधक अवस्थें ॥ सिद्धीबंड फसवीतें ॥ दक्ष तो न मिळे तेथें ॥ बाकी प्राकृते भुलती ॥ ५२ ॥ नाथ गेले तेथुनी ॥ नंतर कांहीं दिनमानी ॥ वृत्ती राखिली साधनीं ॥ येक आसनी न राहती ॥ ५३ ॥ रोज नित्य नवा ग्राम ॥ वस्तीलागीं देवधाम ॥ चिंतन स्वरूप काम ॥ होई आराम वृत्तीसी ॥ ५४ ॥ सदां नामस्मरण गुरूभावें ॥ प्रेमयुक्त गीत गावें ॥ अनुभव देशपरत्वें घ्यावें ॥ लक्ष न द्यावें जनकाजीं ॥ ५५ ॥ इकडे पैठणामाझारीं ॥ सूर्यकांत वृद्ध भारी ॥ पुत्र येक लोकोपचारी ॥

तोही परधामा गेलासे ॥ ५६ ॥ त्याचा पुत्र येक्या कोठें ॥ गेला न-
कळे कोण वाटे ॥ यासाठीं मती कष्टे ॥ तधीं येके ब्राह्मणें सांगितलें
॥ ५७ ॥ अहो तुमचा येक्या नातू ॥ होता दौलतेबादे आंतू ॥ कार-
भारी जनार्दनपंतू ॥ घरीं रक्षिती ययासी ॥ ५८ ॥ आतां नाहीं तेथें
जाणा ॥ गेले असती पर्याटणा ॥ तो प्रपंचीक नोहे जाणा ॥ कोण का-
रणा काळजी त्या ॥ ५९ ॥ गोष्टी ऐकोनी ऐसी ॥ सूर्यकांत दुसरे
दिवसीं ॥ हळु हळु दौलताबादेसी ॥ दोन दीसीं पोंचले ॥ ६० ॥
जावोनी स्वामीलागीं ॥ नमस्कारिलें प्रेमरागीं ॥ जनार्दनपंत तयालागीं ॥
पुसती भागीं राहतां कोण ॥ ६१ ॥ ग्रामा वस्ती पैठण ॥ रघुवेदी ब्रा-
ह्मण ॥ येथें आलों तें कारण ॥ समर्थ जाणती अंतरीं ॥ ६२ ॥ परी
सांगतों येक्या ॥ नामें माझा नातू देखा ॥ कोठें गेला शोध नीका ॥
सांगा देखा मजलागीं ॥ ६३ ॥ ऐकिलें असें वर्तमान ॥ आपल्या येथें
होता ह्मणोन ॥ आमुचा वंशीं येवढेंची संतान ॥ लागलें चिंतन तयाचें
॥ ६४ ॥ स्वामी सांगा सविस्तर ॥ कोठें गेलासे कुमर ॥ तो सांगोनी
समाचार ॥ वृत्तीथार करावा ॥ ६५ ॥ तें ऐकोनी स्वामी त्यासी ॥
बोलती बाळ गेलासे खुषी ॥ नकां करूं काळजीसी ॥ तुह्मापासीं येईल
॥ ६६ ॥ तो आहे साक्षात विष्णु ॥ तयां नाहीं सितोष्णु ॥ प्रपंचीक
लक्षणू ॥ नसे जाण तयांसी ॥ ६७ ॥ सद्गुरू आज्ञाधारी ॥ वर्ततसे
सदाचारी ॥ तुह्मासी युक्ती बरी ॥ ऐका निर्धारीं सांगतों ॥ ६८ ॥ मी
देतों येक पत्र ॥ तें ठेवणें जतन मात्र ॥ येईल भक्तीचें पात्र ॥ ग्राम
पवित्र पैठणी ॥ ६९ ॥ त्या वेळीं त्याचे हातीं ॥ द्यावें हें तुह्मीं पुढतीं ॥
पाहोनी येका निश्चिती ॥ राहील तेथें गुरुआज्ञें ॥ ७० ॥ विश्वासोनी
त्या वचनां ॥ पुढतीं केलें नमना ॥ त्या दिनीं राहिले जाणा ॥ पंतसदना
आनंदें ॥ ७१ ॥ पुढें चार दिन ठेवोनी घेती ॥ सूर्यकांतासी प्रीतनीती ॥
संत जाणोनी भावीक मती ॥ गौरव येती जनार्दनां ॥ ७२ ॥ नंतर
गौरवोनी दत्तवरद ॥ भानुदास सुतीं सद्गद ॥ जाती वंदोनिया पद ॥
जें अभेद भवीं या ॥ ७३ ॥ वरीं आले पैठणासी ॥ सदां करीती हरिचिंत-

नासी ॥ पुत्राविषयीं उदासी ॥ होई मानसीं रोजनिसीं ॥ ७४ ॥ ग्रामाबाहेर धर्मशाळा ॥ देखाव्या दिनीं दोन वेळां ॥ बाह्य ग्रामिचा देउळा ॥ त्रिकाळां पाहाती ॥ ७५ ॥ जनार्दनपंतें सांगितलें ॥ होतें जें कां वहिलें॥ गांवाबाहेर शोधलें ॥ वेळोंवेळां पाहिजे ॥ ७६ ॥ त्याच रीतीनें वर्तती ॥ इकडे नाथ दीन क्रमती ॥ निःसंग मती करून ॥ ७७ ॥ सदां सद्गुरूचिंतन ॥ भूतमात्रीं सम ध्यान ॥ भूतदया अनुष्ठान ॥ वाढे जाण चित्तांतरीं ॥७८॥ सदां असावें येकांत वासा ॥ तेथें चिंतावें जगदीशा ॥ देहभाव मी जी ऐसा ॥ माया आशा टाकुनी ॥ ७९ ॥ असें असतां वसुवर्षे ॥ लोटलीं हिंडतां प्रवासें ॥ गुरुवाक्य विश्वासें ॥ प्रेमें पोसे अंतरां ॥ ८० ॥ जन्मभूमीमाजी जावें ॥ यावें वाटलें स्वभावें ॥ दर्शन दुरोनि घ्यावें ॥ मग जावें परतोनी ॥ ८१ ॥ सांजवेळे ग्रामाआंत ॥ येक असे अश्वत्थ ॥ तेथें विश्रांतिचा हेत ॥ उतरले नाथ स्वभावें ॥८२॥ कोणीही न ओळखीती ॥ आला ह्मणती गोसाइ यती ॥ तंव सायंवेळे पुढतीं ॥ देखण्या येती सूर्यकांत ॥ ८३ ॥ येकनाथांसी पाहीलें ॥ परी नाची त्यांणीं ओळखीलें ॥ ह्मणती स्वामी कोठोनि आले ॥ येथें आपुले पाय हे ॥ ८४ ॥ महापिता वोळखीला ॥ पुढतीं नमस्कार केला ॥ मग नातू वळखीला ॥ प्रेमें धरिला पोटासी ॥ ८५ ॥ मग बोलती तयातें ॥ कोठें जाणें केलें होतें ॥ येरू बोले कर्मपंथें ॥ देहनातें विचरे ॥ ८६ ॥ देखोनिया योगाभ्यास ॥ सूर्यकांता उल्हास ॥ ह्मणे उद्धरिता वंश ॥ झाला खास पुत्र हा ॥ ८७ ॥ घरीं यावें ह्मणोनी ॥ सांगितलें प्रीतमानीं ॥ परी नाथ ती न मानी ॥ आज्ञा ध्यानीं गुरूची ॥ ८८ ॥ ह्मणे ताता मज वांटा ॥ नाहींच आश्रम थाटा ॥ माजीं मनें मानिला तोटा ॥ उदासी नेटांवरीतसे ॥ ८९ ॥ गुरुआज्ञा प्रमाण ॥ वागवीन मी देहकारण ॥ या वेगळें शाहाणपण ॥ सर्वथा जाण न करींच ॥९०॥ ऐकोनी निष्ठावंत ॥ घरीं आले सूर्यकांत ॥ मग पत्र घेवोनी जात ॥ करीं देत तयाचे ॥ ९१ ॥ सद्गुरू मुद्रा देखोनी ॥ नाथ संतोषले मनीं ॥ मस्तकीं आदीं वंदोनी ॥ मग फोडोनी वाचती ॥ ९२ ॥ पत्रीं कार्य

येवढें ॥ पत्र जेथें करीं पडे ॥ तेथेंची राहणें घडे ॥ वचन निवाडे पाळावें ॥ ९३ ॥ मग ह्मणती आज होनी ॥ जाणेना मजलागुनी ॥ सरली आजचानें फिरणी ॥ असावें आसनीं आतां या ॥ ९४ ॥ तेथेंची राहिले पुढतीं ॥ सूर्यकांत समाधान मानिती ॥ पौत्र देखोनी सज्जन निगुती ॥ आनंदती वेळवेळां ॥ ९५ ॥ गोदावरीतटीं राहे ॥ पुढील कथा परिसाहे ॥ पीयुषाहुनी गोड बाहे ॥ ऐकतां हे अमरत्व ॥ ९६ ॥ संतचरित्र अगाध कीर्ति ॥ मुक्ती साहित्याची पूर्ती ॥ प्रबोधाची हे स्फूर्ती ॥ श्रवणार्थें नीववी ॥ ९७ ॥ सद्गुरूनाथ कामधेनू ॥ मुमुक्षुवत्स अनंत मानू ॥ कासें लागल्या समाधानू ॥ देह मानू विसरला ॥ ९८ ॥ इति श्रीमदनंत सूरिविरचित श्रीनाथलीला समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## अध्याय ५ वा.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंत सद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ अथ श्रीनाथलीला ॥ नमोनी संतचरणासी ॥ स्फूर्ति उठे जी मानसीं ॥ तेंची लिहीन सावकाशीं ॥ प्रेमानंदासी आनंद ॥ १ ॥ प्रतिष्ठानीं गोदातटीं ॥ येकनाथ राहिले मठीं ॥ भाव भक्तीची हातवटी ॥ जगजेठी आकळिला ॥ २ ॥ हरीभक्ती जे अद्वैत ॥ तीच मुहुर्तीं मुहुर्तीमंत ॥ अवतरले येकनाथ ॥ भक्तीपंथ दावावया ॥ ३ ॥ वृद्धशांती जया पोटीं ॥ आब्रह्मजासमान[1] दिठी[2] ॥ अनंतब्रह्मांड सांचोटी[3] ॥ प्रेमगाठीं गांठिलें ॥ ४ ॥ सगुणभक्ती स्थूळभावें ॥ देवतार्चन पुजावें ॥ शालिग्राम विष्णु नांवें ॥ देवभावें पुजिती ॥ ५ ॥ जनांचीया उपकारा ॥ करिती लिला आकारा ॥ साधन दावी चतुरां ॥ अज्ञानतरा सराया ॥ ६ ॥ प्रेमयुक्त गीतप्रबंद ॥ गावें असती जे अभेद ॥ वाचें दाटे सद्गद ॥ जनश्रोत्रीं आनंदवी ॥ ७ ॥ मधूर प्रेमळ रसीक ॥ ऐकों येती जे कां भाविक ॥ हरे तयांची भूक ॥ शब्दसूख अपार ॥ ८ ॥ आनंदें क्रमितां काळ ॥ विजयश्री घाली माळ ॥ हरी वळलासे सबळ ॥ साहित्यबळ भ-

---

१ ब्रह्मदेवापासून मुंगीपर्यंत. २ दृष्टी. ३ खरेपणा.

क्तिचें ॥ ९ ॥ लग्नमानें नव्हती आस ॥ येकनारायण ध्यास ॥ अखंड तो प्रेम उल्हास ॥ गुरूदास भाव जो ॥ १० ॥ पत्नीनाम गिरीजा ॥ शांती गंगा शिरींजा ॥ साधीत परमार्थकाजा ॥ लक्षता जा भक्तीसी ॥ ११ ॥ विवाह जहाल्यावरी ॥ मुक्ती वळल्या चारी ॥ सिद्धी लोळती पायावरी ॥ कीर्ती चारी देशींये ॥ १२ ॥ श्रीगोदावरीचें स्नान ॥ चक्र-तीर्थीं करीती जाण ॥ तेथें सारूनी संध्या ध्यान ॥ येती मागुन घरासी ॥ १३ ॥ असे हयग्रीव शालिग्राम ॥ जो सर्वांमध्यें परम ॥ पुजा करावी येकनेम ॥ मनोधर्म आवडीं ॥ १४ ॥ कांहीं दिन लोटल्यावरी ॥ उद्धव नामें ब्रह्मचारी ॥ येवोनी लोटला पदावरी ॥ सेवाचारी राहिला ॥ १५ ॥ भाविक भक्त उद्धव ॥ कृष्णावतारीं संभव ॥ सांगती रुद्रस्कंद देव ॥ प्रेमभाव भागवतीं ॥ १६ ॥ यादववल्ली पत्रपुष्पी ॥ वसंत मानें सुपोसी ॥ कृष्णकंद भूमी कुसीं ॥ माधवीसी उद्धव ॥ १७ ॥ भाव मंडपावरतीं ॥ विस्तारिली बहुनीती ॥ प्रेमासी होय उत्पत्ती ॥ पिका येती आपैसी ॥ १८ ॥ शरदृऋतू प्राप्त झाला ॥ मोहभाव तेजेला ॥ असे आटणी घातला ॥ रस सोशिला आत्मज्योती ॥ १९ ॥ हेमंतप्राप्ति आधीं ॥ प्रेमभाव पोसवी संधी ॥ पक्कदशा प्रतिपादी ॥ निजबोधीं माधवो ॥२०॥ केला तया चिरंजीव ॥ बीजरूपें फळभाव ॥ बाकी सर्व माधवी संभव ॥ स्थूळभाव संपला ॥ २१ ॥ तोची कलीमाजी ठावो ॥ नाथशिष्य उ-द्धवो ॥ जाचा देखोनि प्रेमभावो ॥ नाथ देवो उल्हासे ॥ २२ ॥ या-चेनी सुख परमार्था ॥ हाची साहित्यकर्ता ॥ नित्य दावी क्षेमवार्ता ॥ भक्तीभर्ता नाथया ॥ २३ ॥ संतमहिमा अपार ॥ अगाधता विस्तार ॥ सायूज्यता निर्धार ॥ सहजाचार बोलती ॥ २४ ॥ असो हें नाथ आ-श्रमीं ॥ सेवाकरी परमधार्मी ॥ उद्धवनामें सर्व कामीं ॥ साहित्यधामीं पुरवीत ॥ २५ ॥ भजन पुजन सर्वकाळ ॥ करिती नाथ कृपाळ ॥ स-न्निध उद्धवबाळ ॥ अहिर्निशीं तिष्ठत ॥ २६ ॥ ऐसे लोटतां कांहीं दीन ॥ नाथपत्नी गर्भिण ॥ दिवस भरतां संपूर्ण ॥ पुत्र निधान प्रसवली ॥ २७ ॥ यथासांग सोहळा ॥ करोनीया तयां काळां ॥ नाम ठेविती

स्त्रियाबाळा ॥ पितृबळा जाणोनी ॥ २८ ॥ खरी भक्ती पितयासी ॥ ह्मणोनी हरी नाम त्यासी ॥ वाढतसे दिवसोंदिवसीं ॥ व्रतबंधासी अधिकारी ॥ २९ ॥ पुढें झालें मुंजीबंधन ॥ शास्त्र पढविती ब्राह्मण ॥ झालें सर्व अध्ययन ॥ वृत्तिमान फूगला ॥ ३० ॥ चारी शास्त्रें अध्यायन ॥ लाधल्यावरी केलें लग्न ॥ तंववरीं पितृआज्ञा प्रमाण ॥ पुढें मान फीरला ॥ ३१ ॥ बापवचन मानीना ॥ अंतरीं विपरीत कल्पना ॥ भाव बुडालासे जाणा ॥ द्वैतपणा विस्तारे ॥ ३२ ॥ दिपा पोटीं काजळी ॥ सूर्यानें मृगजलें भाविलीं ॥ तैसी हेही असे बोली ॥ वार्ता पुढिली ऐकावी ॥ ३३ ॥ शास्त्र विद्या सर्पिणीनें ॥ दंश केल्या अहंमानें॥ वीष चढलें देहध्यानें ॥ भक्तीमाना मूकला ॥ ३४ ॥ दैवगती बलीवंत ॥ पिता संत निंदित ॥ गेला असे कासींत ॥ द्वेष भरित अंतरीं ॥ ३५ ॥ पिता मुख न पाहवें ॥ ह्मणोनी जाणे संभवे ॥ मग इतर संत खेवें ॥ कैशा भावें मीळती ॥ ३६ ॥ शास्त्रवाद जंव आहे ॥ जागा तेथें अभिमान पाहे ॥ परमार्थ येथें नोहे ॥ सत्य पाहे सर्वथा ॥ ३७ ॥ समाधानी येथें नाहीं ॥ धारणा बुडाली पाही ॥ आटणीं पडला कर्मगेहीं ॥ निंदाबाई माजली ॥ ३८ ॥ दुजां पाहोनी श्वान ॥ भुंके तेथें क्रोधायमान ॥ शास्त्री वैदिकी जाण ॥ दुजां सुजाण न ह्मणे ॥ ३९ ॥ वादविवाद रात्रंदिन ॥ सदां तामसी वृत्तिमान ॥ ऐका पुढील वर्तमान॥ क्षेत्र पैठणा माजिलें ॥ ४० ॥ नाथदशा परिपक्व ॥ साधकतां जिणोनी अपक्व ॥ दैवी संपती संभव ॥ झाला उद्भव स्वानंदे ॥ ४१ ॥ येकाकार[1] बोली उठे ॥ अभंगवाणी मूखवाटे ॥ शांती सुखाचे पेटे ॥ भक्ती नेटें भावनें ॥ ४२ ॥ कृष्ण आले आवडीं ॥ सुखें वहाती कावडी ॥ उचिष्ट पात्रें करें काढी ॥ भाव बेडी पायींजा ॥ ४३ ॥ सर्वां भुतीं भगवद्भाव॥ जहालीया प्रगटे देव ॥ नाहीं कोणती उणीव ॥ रमाधव जे वाणी ॥४४॥ गुरूभक्त निशीम ॥ पाहोनी श्रीदत्त परम ॥ तोषोनियां अंतर धाम ॥ द्वारीं तिष्ठत राहिले ॥ ४५ ॥ कोणी एक दिनांतरीं ॥ पितृ श्राद्धनाथ

---

१ आत्माकार.

घरीं ॥ पिंडप्रदान अवसरीं ॥ येती द्वारीं दत्तराज ॥ ४६ ॥ फकीरवेष धरूनी ॥ अन्न मागती क्षुधामानीं ॥ येकनाथें त्या विलोकुनी ॥ पिंडान्नि तोषवीला ॥ ४७ ॥ करोनीया नमस्कार ॥ पुजिलासे यतेश्वर ॥ ब्राह्मणासी क्रोध फार ॥ ह्मणती आचार बुडाला ॥ ४८ ॥ पिंडान्नें फकीरासी ॥ पुजोनी केला संतोषी ॥ यासी ब्राह्मण ज्ञात कैसी ॥ बोलवेना आमुतें ॥ ४९ ॥ श्राद्धतिथीचा दिनीं ॥ भिक्षा न घालावी ब्राह्मणीं ॥ ब्राह्मण जेवल्यावांचोनी ॥ ऐसें मानी शास्त्राचा ॥ ५० ॥ मग पूसती क्रोधमानें ॥ येकनाथा कारणें ॥ अहो हें कर्म केलें उणें ॥ कवणां मानें सांगावें ॥ ५१ ॥ काय धर्म रक्षीलासे ॥ अधर्म हा आमुतें भासे ॥ नाथ बोलती वदन हास्यें ॥ पितर खासे तुष्टले ॥ ५२ ॥ मला न दीसे फकीर ॥ दत्तराज हे निर्धार ॥ सर्व कर्माचें हें सार ॥ घडलें निर्धार हा माझा ॥ ५३ ॥ ऐकोनी ऐसी वाणी ॥ क्रोधाचा पूर्ण खाणी ॥ सांचती चित्तांगणीं ॥ श्रेष्ठ ब्राह्मणीं तेधवां ॥ ५४ ॥ ह्मणती मानुं ना हें सत्य ॥ धर्मविरुद्ध तुमचा हेत ॥ आह्मी पाहुं तरी सत्य ॥ मानुं मात तूमची ॥ ५५ ॥ नाहींतरी ज्ञातीभागीं ॥ तुह्मा वर्तणें नाहीं जगीं ॥ नाथ ह्मणती हरीलागीं ॥ सर्व भार आमुचा ॥ ५६ ॥ जें होणें तेंची होईल ॥ आमुचें काय जाइल ॥ लाज आमुची धरील ॥ जो पाळील भावासी ॥ ५७ ॥ ऐसें वदतां तेथ ॥ फकीर अतीत होत ॥ भगवा वेष सज्ञानपंथ ॥ संन्यासी देखत द्विज ते ॥ ५८ ॥ छाटी लंगोटी कमंडलू ॥ भस्मचर्चित दिव्यभाळू ॥ रुद्राक्ष कर्णीं देती डोलू ॥ शिखासूत्र विरहीत ॥ ५९ ॥ मनमोहन वेष तो ॥ पाहुनी अचंबा होतो ॥ ब्राह्मण ह्मणती फकीर तो ॥ बहुरूपी असावा ॥ ६० ॥ तेव्हां बोलले वेदवाणी ॥ ब्राह्मण लागले चरणीं ॥ दंडवत लोटांगणीं ॥ दत्त ह्मणोनी जाणीला ॥ ६१ ॥ धन्य संतांचा भाव ॥ आज्ञेमाजीं वर्ते देव ॥ जैसा जैसा भक्तीभाव ॥ देव तैसा होतसे ॥ ६२ ॥ पुढें यती गुप्त झाले ॥ ब्राह्मण सर्व जेवीले ॥ आश्चर्य मानीत गेले ॥ विडे घेतले सकळिकें ॥ ६३ ॥ दक्षणां देवोनी ब्राह्मणां ॥ बोळविले नाथें जाणा ॥ पुढील ऐका कारणा ॥

लावोनी मनां भावीक ॥ ६४ ॥ ऐकों येकनाथकीर्ती ॥ जनार्दन संतोषी होती ॥ भेटावें जावोनी मती ॥ प्रती ययार्थी वाटलें ॥ ६५ ॥ मग आले श्रीपैठणां ॥ श्रीयेकनाथसदनां ॥ द्वारीं देखिला गुरुराणा ॥ वेद अनुमाना जा करिती ॥ ६६ ॥ देखोनिया दत्तराया ॥ जनार्दन लागती पायां ॥ अपूर्व देखोनी माया ॥ संतोषठायां मीळले ॥ ६७ ॥ ह्मणती स्वामी येथ उभे ॥ कोणनिमित्य लावण्यप्रभे ॥ ऐकावया मनसुभे ॥ चित्त उभें मानसीं ॥ ६८ ॥ दत्त ह्मणती जनार्दना ॥ तुझिया शिष्यविचक्षणां ॥ बंदी केला मज जाणा ॥ प्रेमकारणां भक्तिचा ॥६९॥ मी येथें द्वाररक्षिता ॥ झालों असे निरुता ॥ पोसलों पाहोनी भक्तीहेतां ॥ अपार कथा ययाची ॥ ७० ॥ ऐकोनी दत्तवचन ॥ जनार्दन ह्मणती धन्यधन्य ॥ येथोनी आतां परतोन ॥ गुप्त होऊन राहावें ॥७१॥ वाड्याआंत न जातां ॥ परतोनी गेले तत्वता ॥ ह्मणती पूर्ण मनोरथां ॥ आजीं करता श्रीहरी ॥ ७२ ॥ शिष्याचीये थोरीसाठीं ॥ आनंद सद्गुरूचे पोटीं ॥ स्वामी गुप्तकपाटीं ॥ त्या दिनाहुनी राहिले ॥ ७३ ॥ फाल्गुन वद्य षष्ठी ॥ रोजीं गुप्त होती कपाटीं ॥ कीर्ती शिष्याची चोखटी ॥ ऐकोनी पोटीं निवाले ॥ ७४ ॥ ह्मणती धन्य झालों जगीं ॥ भावभक्ती अनूसंगीं ॥ धन्य येका अनूरागी ॥ हित जगीं याचनी ॥७५॥ दौलताबादेमाझारीं ॥ गुहा आहे किल्यांतरीं ॥ लोक तेथें करिती वारी ॥ आद्यापवरीं साक्ष ही ॥ ७६ ॥ यावरीं क्षेत्र पैठणीं ॥ चक्रपाणी भरी पाणी ॥ श्रीखंड्या नामें करोनी ॥ नाम गाजे जगांत ॥ ७७ ॥ कोणां नकळे ही मात ॥ नाथघरीं मुहूर्तीमंत ॥ नांदतसे भगवंत ॥ ह्मणती शाग्रित नाथांचा ॥ ७८ ॥ पुढें येकादशावरती ॥ टिका केलिसे प्राकृती ॥ जगभाषा यथार्थी ॥ सिद्धांतगती प्रगटली ॥ ७९ ॥ अखंड भजन लेखन ॥ भूतदया अनुष्ठान ॥ जे भाविक सुलक्षण ॥ श्रोते जाण यापासीं ॥ ८० ॥ दहा अध्यायपर्यंत ॥ लिहीलें असें भागवत ॥ तेथें येक भक्तिवंत ॥ ब्राह्मण येत दर्शनां ॥ ८१ ॥ येकचक्र नगराहुनी ॥

आला असे मुमुक्षुमानी ॥ संतोषला नाथदर्शनीं ॥ साष्टांग चरणीं घातलें ॥ ८२ ॥ कांहीं दिन तेथ राहे ॥ कीर्तनीं प्रेमळता वाहे ॥ नाथ कामधेनू दोहताहे ॥ प्रेमपाना मुमुक्षां ॥ ८३ ॥ रात्रौ चाले वाचन ॥ प्रेमळ ऐकती संतजन ॥ सांगती भेद फोडुन ॥ व्यासपद्यग्रंथीचा ॥८४॥ कृष्णद्वैपायन नारळी ॥ बारा मासी नित्य फळी ॥ कोवळीं जून विस्तारलीं ॥ पुराणें बोलिलीं सर्व हीं ॥ ८५ ॥ परंतू शाहळीं कोवळीं ॥ श्रीफळ तें जुन्यावळी ॥ श्रीभागवत निगमावळी ॥ जे समोर बळी देवाचे ॥ ८६ ॥ अठरांहूनी निराळे ॥ ह्मालधारें वर्णिलें ॥ येकादश ह्माल झाले ॥ बाकी उरले धारे ते ॥ ८७ ॥ व्यासवाणी कवंचेसहीत ॥ श्रीफळ मुहुर्तीमंत ॥ आत्मभाव भरीत ॥ जिवन आंत राखिलें ॥ ८८ ॥ प्राकृत अविद्येचीं माकडें ॥ न पहाती याजकडे ॥ पाहिलें तरी वेडें ॥ रस खोबरें नेणती ॥ ८९ ॥ सज्जन हेची येथें नर ॥ करती याचा व्यापार ॥ फोडोनी आंतील गर ॥ मुमुक्षु अर्भकां देताती ॥ ९० ॥ असो या रीतीं भागवतीं ॥ फोड करोनी दाविती ॥ श्रोते तेथ तृप्ती पावती ॥ ह्मणती नीती वेगळी ॥ ९१ ॥ काळ भाव हरपावया ॥ नाथवाणी करी छाया ॥ ब्राह्मणें घेतलें मागोनिया ॥ नित्य वाचावया भावानें ॥ ९२ ॥ नाथ देती प्रेमेंकरूनी ॥ उद्धवकरें उतरोनी ॥ मग गेला घेउनी ॥ चरण वंदोनि नाथाचे ॥ ९३ ॥ तीर्थयात्रा करीत ॥ ब्राह्मण पोंचे कासींत ॥ भागीरथीस्नान करीत ॥ विश्वनाथ वंदिला ॥ ९४ ॥ येथोनी संन्यासीगर्वछेद ॥ ब्राह्मणाचा अहंमद ॥ शास्त्रवादी दंडभेद ॥ प्राकृत वंद्य होईल ॥ ९५ ॥ कर्तेपणावांचुनी ॥ परांपरी नाथवाणी ॥ बोलवीताहे साक्षी करोनी ॥ अनंत मानी विस्तार ॥ ९६ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित श्रीनाथलीलासमाप्त ॥ पंचमोध्यायः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

# ॥ हितसार ॥

## इंद्रवज्रा वृत्त.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीअनंतकोटिब्रह्मांडनायकाय नमः ॥ श्रीएकनाथाय नमः ॥सदां सर्वदां ध्यायि रे राघवातें ॥ नको काळ हा घालवूं वीषयातें ॥ धनाला मनानें सदां आठवावें ॥ हितां नाडणें पापखाणीं पडावें ॥ १ ॥ नको तूं मना घोरपंथांत जाऊं ॥ नसे सूख तेथें जिवाला अभावू ॥ नको कामना कामिनीची दुजाचे ॥ असें पाप ना दूसरें दुष्ट नीचें ॥ २ ॥ नको काम कल्पूं फुकांचा मनानें ॥ जसें देव ठेवी वसें त्याच मानें ॥ मनानें जपावें तुला तें नसें रे ॥ उगां भ्रांतिवारें भ्रमाचार सारें ॥ ३ ॥ असे भोग हा सूखकारी जिवाला ॥ दिसे मात्र साचा परी हाचि घाला ॥ मना रोग हा भावतो भोगयोगें ॥ कदां सूख नाहीं बहू दुःखभोगें ॥ ४ ॥ सुखां इच्छितां दुःख येतें स्वभावें ॥ सुखीं सूख तें येकटें ना स्वभावें ॥ दिनापालटां रात्र येती जसी रे ॥ कळा जाणिवेची तळां[1] मीळवी रे ॥ ५ ॥ परावें असें स्थूळ हें पंचभूतीं ॥ उगां तूं मना घेतली येथ बुंथी ॥ नसे भोग स्थूळां मना खेळ तूझे ॥ तनू मी असी मानुनी घेसि ओझें ॥ ६ ॥ जसें आपणां राहण्यां हो घराला ॥ बरें बांधिलें हें तयाआंत ठेला ॥ तयामाजि भोगी तदां भोग सारे ॥ घराला तयां त्यांत नाहीं चुरा[2] रे ॥ ७ ॥ प्रतीदीवसीं झाडलोटी करावी ॥ तसी देखरेखी बरी वागवावी ॥ परीवार सारा बरा आंत राहे ॥ मुलेंमाणसें दासदासी जमा हे ॥ ८ ॥ तयाचे रितीं स्थूळ हें जाण बापा ॥ विसाव्यास जागा भवीं व्याप्य[3] व्यापा ॥ कुटुंबी तुंची नांदसीं येथ साचें ॥ बरें भोगिसी भोग तेही भ्रमाचे ॥ ९ ॥ बरें माजवीलें कुटुंबास येथें ॥ मदांमोहकामावरीं क्रोधनातें ॥ अभीमान हा दादला वासनेचा ॥ मुळारंभ जोडे घरा हेतु याचा ॥ १० ॥ पुढें पुत्र झाला महामोह तो हो ॥ वरी कन्यका ती असे कूनिती हो ॥ व्यभी-

---

१ नाशां. २ भोगांश. ३ परमात्मा.

चार येथें गमे वास दोघां ॥ बहीणीसवें लग्न लाघी सओघा ॥ ११ ॥ असे भावसंवें बहीणीविवाहो ॥ अनाचार मोठा अविंदीच ही हो ॥ अशा भ्रष्टयोगें तयां ऊभयांसी ॥ पुढें पुत्र झाले अवीचारवासी ॥ १२ ॥ पहीला असे लोभ हा थोरला हो ॥ मदा वास दूजा तिजा काम तो हो ॥ असे धाकुटा क्रोध हा कूसदूना ॥ सदां तामसी दुःख तें मूळ माना ॥ १३ ॥ अशा बा रितीनें स्थुळामाजि साचें ॥ कुटुंबी मना नांदसीं भ्रांति नीचे ॥ कदां वीट नाहीं तुला या घराचा ॥ नसे शाश्वतीं जीर्ण तें वास साचा ॥ १४ ॥ मना नष्ट हें स्पष्ट जाणूनि सोडीं ॥ रघूनायकाला अर्जी हात जोडीं ॥ तुला देई तो दूसऱ्या रे घराला ॥ निराभास[1]ठायीं करी ऐक्यतेला[2] ॥ १५ ॥ तदां सूख वाटे मना देव भेटे ॥ तुटे कार हा संसृती[3] अंगिं मीटे ॥ बरा बोध हा मानसामाजि घेई ॥ नको मानुं तूं या तनूची बढाई ॥ १६ ॥ नसे शाश्वतीं सार कांहींच सिद्धी ॥ उगें रे उगें सर्व ही नष्टबुद्धी ॥ हटानें तटानें मठा बांधुनीया ॥ पटां रंगवीलें जटाजूटकाया ॥ १७ ॥ महंतीभरानें बरा नांदतोसी ॥ अभीमानयोगें बरा ताठ होसी ॥ कसी नाहिं रे लाज ती तूज अंगीं ॥ फजीती फुकां कां उगीं देहभागीं ॥ १८ ॥ बरा पोटधंदा सुखानें करीं तूं ॥ उगीं सोंग कां रे फुकां पाहिं बा तूं ॥ कशाची असे सिद्धि ती तूजलागीं ॥ जनांला भुली घालसीं रे अभागीं ॥ १९ ॥ जरी पिंड-ज्ञानी बरा जाहलासी ॥ तथापी मना नाहिं तें सूख तूंसी ॥ अभीमान हा नांवचे[4] ज्ञानयोगें ॥ दुणावे खरा रे खरा फीर मागें ॥ २० ॥ नसे तत्वशोधीं नसे आत्मबोधीं ॥ अभीमान हा सांचला सर्व बोधीं ॥ जसा देह झाला तयां काळ गांठी ॥ तसें ज्ञान तेथें अभीमान पोटीं ॥ २१ ॥ असें ज्ञानि मी वाटतें जासि पाहीं ॥ तयाचे दिठीं दूसरा हीण पाहीं ॥ असे दृष्टिनें काळ गेला रिकामा ॥ चुकेनाचि पाहें कधीं येमधामा ॥ २२ ॥ वदावें बरें ज्ञान तें याजलागीं ॥ समाधानि बाणे जयाचेनि भागीं ॥ जया

---

१ परमात्मठायीं. २ आत्मतेला, एकरूपतेला. ३ जन्ममरण. ४ जाणार नाहीं.

ज्ञानयोगें भुतां सर्व भार्गी ॥ घडे साम्यता[1] ऐक्यरूपें स्वभार्गी ॥ २३ ॥ अनूमान खुंटे तुटे वाद सारा ॥ तया हो दिनीं त्या गमे तो निवारा ॥ पुढें शांति सांचे क्षमा अंगिं जोडे ॥ सुखाचे लळे कोंवळे बाळेचाडें[2] ॥२४॥ दया सर्व भूतीं गया हीच तेथें ॥ भयां हारवीलें पयांणींच[3] पंथें ॥ अनूहात खोली बरी देखियेली ॥ मनानें तदां गाढ दीठीस केली ॥ २५ ॥ तदां स्तब्ध झाले तनू तीत[4] बोले ॥ मना आमनीं देशभार्गीं निवाले ॥ बरी तोषली आदिमाता भवानी ॥ गुरूलिंगकांती[5] कुमारी वयांनीं ॥२६॥ खुली केलि दृष्टी प्रकाशी उजेडा ॥ तमाचा तदां मोडला भ्रांतिवाडा ॥ रजाचा घडा तो तळां फूटलासे ॥ प्रकाशानियोगें तदां सर्व दीसे ॥२७॥ सबोधामृताचा घडा तेथ स्थापी ॥ जुन्याचा नवा वानवा हा प्रतापी ॥ झडे नोबती तो अनूहात बाजा ॥ निराभास हा जास रे त्यास साजा ॥ २८ ॥ असी संपती पावल्या सौख्य वाढे ॥ तदां मूखभार्गीं सखाराम जोडे ॥ परेचा परां देखुं ये ऐक्यतेनें ॥ परेठायिं ये भावनें ऐक्यतेनें ॥ २९ ॥ तदां चित्त चैतन्य ऐक्यान्वयानें ॥ सओघें स्फुरे लक्ष ना दृश्यमानें ॥ भ्रमाचें धुकें तेजयोगें निमालें ॥ गुरूकीरणीं जे बरें चेतलेले ॥ ३० ॥ असी संपती तीच सायोज्यमुक्ती ॥ बरी भाविकांचे कुशींचीच भक्ती ॥ निजाचा रुपानें हरी ऐक्य केला ॥ स्थुळांतूनि गेला निराभासिं ठेला ॥ ३१ ॥ अशा रीतिनें साज जेथें असे हो ॥ विदेहीच मुक्ती तयालागिं फांवो[6] ॥ असे सर्व धात्री रजांशेंच ज्ञानी ॥ स्थुळीं जाग्रतीं भासवी गूणमानीं ॥ ३२ ॥ पशूपक्षि ज्ञानी असे कीडमुंगी ॥ सदां स्थूळ भोगीं असे स्वार्थसूगी ॥ गुणाचानियोगें असे हारनिद्रा ॥ तमाची हिची जाग्रतीमाजि मुद्रा ॥ ३३ ॥ पुढें काम ऊठे रजोभावनेनें ॥ बिजाची कळा जाग्रती दृश्यमानें ॥ असे लिंगदेहीं[7] अभीमानकंदू[8] ॥ भवा वासरे नाश हाची सुगंधू ॥ ३४ ॥ असें ज्ञान हें सर्व भूतीं भरोनी ॥ बरें आभरे

---

१ ऐक्यता. २ बाळकौतुकें. ३ पायांनींच. ४ अतीत. ५ परमात्म मुद्राप्रकाशी, स्वानुभूति. ६ शोभो. ७ वासनात्मक देहीं. ८ रजोगुण.

सर्वभूतीं समानी ॥ कळा जाग्रती द्वादशी शोभताहे ॥ तसी षोडशी चेववीण्यास मोहें ॥ ३५ ॥ प्रभाते नभीं हो भवीं कोंदलीसे ॥ दिसे नास्तिकी दीठिलागींच पीसें ॥ घडामोडि साऱ्या असे भ्रांतिभागीं ॥ तमाची भुमी चेतली गूणभागीं ॥ ३६ ॥ तनू थोरली मानवी येथ आहे॥ अघोरीपणा व्हावया सत्य पाहे ॥ परी कोणि नाहीं बगी आपणातें ॥ फुकां नासती भ्रांतिनें दृश्यमत्तें ॥ ३७ ॥ सदासा उदारा दयासागरा रे ॥ करा आजि थारा पदीं या दिनारे ॥ मला जोडि हेची तुझे पाय रामा ॥ असे भावशेती निजाचेनि कामां ॥ ३८ ॥ गळो कामताठा अभीमान तूटो ॥ जळो मोहधंदा अगा क्रोध वीटो ॥ मना शांति देईं वरीं बोध खासा ॥ तुटो भ्रांतिपाशा अगा ईशईशा ॥ ३९ ॥ दिनाची दया केशवा येउ तूतें ॥ असें मागणें पूरवीं हेत माते ॥ कधीं दुष्टगांवीं नको वास राखूं ॥ असो संतभेटी प्रितीं प्रेम चोखूं ॥ ४० ॥ अनंता मवाळा गुणातीत योगा ॥ अनंतासि पाजा सबोधानुयोगां ॥ निराभासिं ठावो करीं गा सनाथा ॥ असो गोडि गीतां तुजी हेचि गाथा ॥ ४१ ॥

इति श्रीमदनंतसूरिविरचितहितसार समाप्तः ॥

---

## अथ प्रेमरंगप्रारंभः.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीएकनाथाय नमः ॥ विनोदार्थ वाणी गुणें या गणेशीं ॥ वदों आननीं नामलीला सुखासी ॥ नमूनी पदीं प्रार्थना प्रेमरंगें ॥ करी आवडीं दे मती ऐक्यरंगें ॥ १ ॥ मना प्रार्थना हेचि तूतें करीं मी ॥ नको वीसरूं ठाव घे अंतरांमी ॥ नको गुंतुं कोठें कदां लौकिकीं या ॥ अपाराकृती सर्वही जाण माया ॥ २ ॥ नराकार देहो मनूजा सुखाचा ॥ बरा लाधला नाससीं तूं फुकांचा ॥ अभीमानभारें सदां द्वेषनिंदा ॥ तमें माजसीं सोडिसीं हीतधंदा ॥ ३ ॥ कांता कांचन कारभारगतिचे कांचेतुळे रंग हे ॥ चित्ता चिंतन त्यागणें हरिगुणें राहे बहू सुख हें ॥ ना-

---

१ बारा कलांनीं युक्त आत्मरवी. २ चंद्र ह्म० मन. ३ परमात्मभाव.

माचा महिमा अपार पसरे साधू सुसंतांमुखें ॥ सद्यः प्राप्ति पदीं जडोनि नुरवी इच्छा मदादी भुके ॥ ४ ॥ देहावसानसमयीं समतां गमायां ॥ न्हेंयी लयास सकळी तनुरागमाया ॥ देहांतकाळवरिं जो अभिमान वागे ॥ तेथें समाधिसुख तेज जमां न वागे ॥ ५ ॥ रंगावें स्वरुपीं स्वबोधकसणीं प्रत्यान्वयें पाहुनी ॥ आत्मानंद सबाह्यदृष्टि उभवे नाहीं नफा याहुनी ॥ बाकी साधनिं सार साधत नसे भ्रांती कलौ लौकिकीं ॥ ज्ञानें पिंड न तत्वसादृश कळें सामावती लौकिकीं ॥ ६ ॥ जाचेनी सकळी कळा प्रभवती तो साच आत्मा उरीं ॥ भावें भावित भावना तनुमिषें बंधत्व स्वप्नांतरीं ॥ नाहीं जाग्रत जाहला समरसें कैसा सुखी होय तो ॥ घोटाळे विपरीत आपणपणें जाणे खुणें थोर तो ॥ ७ ॥ कमलनयनकृष्णा कौतुकां काय वाणूं ॥ समपण जडसाक्षी दृश्यता ही न वाणूं ॥ अजर अ[1]मरकंदा ईशईशा अनंता ॥ सदयहृदयछंदा ऐक्यकारा महंतो[2] ॥ ८ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित प्रेमरंग समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीएकनाथाय नमः हरिः शरणं ॥

---

## अथ निजभक्ति.

### श्लोक.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥ नित्या[3]न्वयानें निजभाव भेटी ॥ भेटी अभेटी करि जन्मतूटी ॥ तूटी अभावां समता प्रभावें ॥ भावें अनंता व्यतिरेकें[4] व्हावें ॥ १ ॥ आदी अनादी जगदेकराया ॥ वाढे स्वभावो समताकरायां ॥ माया जयाला मृगभास वाटे ॥ अज्ञानज्ञानें नच जाय वाटें ॥ २ ॥ जो दास भावें हरिदास त्याचा ॥ विश्वास प्राप्तीस्तव वेदवाचा ॥ जेथें अहंता समुळी निमाली ॥ तेथेंचि शांती सहजीक आली ॥ ३ ॥ जासी असे ही निजसूखशांती ॥ जी कां अजातीय गती स्व[5]भाती ॥ ना वर्ण दीक्षा रुप गूण तेथें ॥ भावें अनंतीं सकळीक जें तें

---

१ परमात्मा. २ अविनाशा. ३ अविनाशी रूपानें. ४ निराळें. ५ स्वकीय. ६ तूर्या.

॥ ४ ॥ वेदांत सिद्धांत स्वरूपसाक्षी ॥ वाचीक भावो सगुणेकपक्षीं ॥ पक्षीं अलक्षी सदचीद पक्षें ॥ पक्षाविणां तो निजलक्ष लक्षे ॥ ५ ॥ बहू शोधितां ग्रंथग्रंथी[१] फिटेना ॥ अहंभावना मानसाची विटेना ॥ बरा निश्चयो येकही तो असेना ॥ सदां बोलण्यासारिखें चालवेना ॥ ६ ॥ जरीं अंतरीं सौख्य व्हावें सदांचें ॥ असें वाटतें तेथ युक्ती मनाचे ॥ मनाचेचि दर्शें मनातीत व्हावें ॥ असा भक्तियोगू अतूल प्रभावें ॥ ७ ॥ तयां नाम स्वानुभुती नीजभक्ती ॥ दुजावीण जी स्वकायार्थयुक्ती ॥ इये प्राप्तिलागीं विधी संत कीजे ॥ तयां संतभावां अर्जी कान दीजे ॥ ८ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित निजभक्तिलक्षण समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ हरिः शरणं ॥

---

## अथ नवविध गोपी.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ॥
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनं ॥ १ ॥

## नवविध भक्ति.

१ श्रवणं[६]. २ कीर्तनं[७]. ३ स्मरणं[३]. ४ पादसेवनं[४]. ५ अर्चनं[१]. ६ वंदनं[५]. ७ दास्यं[२]. ८ सख्यं[८]. ९ आत्मनिवेदनं[९]. इति ॥

## शिखरिणी छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ ॐ नमः ॥ परमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानसनिवासाय श्रीरामचंद्राय नमः ॥ गुणाईशा देवा गणपति मला फार मति दे ॥ भवातें नाशाया कलिमल हरी बुद्धि बरि दे ॥ ति दे गा तूं विद्या जि उचित मनां मोह न करी ॥ करी शांती चित्तां गुण गिति मती घोळिवि बरी ॥ १ ॥ वदायां गूणातें मुळ रविपरें तूंचि असर्सी ॥ भले साक्षी देती भुवनिं कवि ते वाल्मिकऋषी ॥ जयाचे लीलेचा उघड महिमा राघवगुणां ॥ गुणांचा छंदालां

---

१ लिंगदेह गांठ.

करित शत ती कोटि गणना ॥२॥ दयाळा, दे थारा तव पदिं बरा सार कथनीं ॥ विवेकाची बाजू अनुभव घरां बोधमथनी ॥ दया शांती चित्तां सतत वसवी काम मिटवा ॥ तुझा या सोंडीनें निजपय सडा तूष उडवा ॥ ३ ॥ गुरूनाथा एका मजवर करा पाखर दिठी ॥ फिटो आशा तृष्णा वदवि भजनां अंतरिं उठी ॥ दयाळा दे आर्जी सुनिति सुफला ही नवविधी ॥ विधी जाला गातो सदपद कथा सागरनिधी ॥ ४ ॥ निधी शेषाभार्गी शयन पयनिधीमाजिं करि जो ॥ रिजो चित्तीं माझा रव वदवि गा अंतर रिजो ॥ कथेलागीं कान्हा रिजवि मननां रंग भरगा ॥ निजाचा हो हातें सुरस गित तें तूं भरिव गा ॥ ५ ॥ इति इष्टदेवताभिवंदन ॥

## मालिनी छंद.

नमन करुनि एका नाथपायीं कथेला ॥ मतिनरुपपसारा गोपती गोपबालां ॥ वदनिं रवसुधाही बाळलीलामिषानें ॥ पसरिन जग कानीं घेउं दे तें सुखानें ॥ १ ॥ वद तु वदनिं जिव्हे वेळ कां गे करीसी ॥ सटसट तुष झाडी शारदे ब्रह्मवासी ॥ नमुनि सति पुढें हो या हरी शामरंगा ॥ मति धृति गुण ऊठे तोचि बोलूं सुरंगां ॥ २ ॥ शिशुपणिं सगुणी हा नंदगेहां वसे हो ॥ [१]ब्रजजनसमुदायीं वाढतो कौतुकें हो ॥ सुजननगरि ही गा गोकुळी गौळियांची ॥ मुलपणिं रस ओती बोध लीलाहि तीची ॥ ३ ॥ सुपथनिति बरा हा नंद राजा पुरीं हो ॥ सुनिति रुचि करी ती राणि नंदा सती हो ॥ अनुदिनिं अनुतापी पुत्र झाला विचारी ॥ मदुसुदनरसाचा सावळा हीतकारी ॥ ४ ॥ तंव वय गत साठी नंदजीला असे ती ॥ निगम उपजलागे बोध हा जारनीतीं ॥ श्रुतिसम निति नारी फार त्या चाळवीती ॥ मथनकलिमिषानें लाविती चेतना ती ॥ ५ ॥ अवसर दिन होतां काळसूकाळकाळीं ॥ उदयसमयबोधां आरसा हा सकाळीं ॥ मुलसमिप बसोनी रीजवी माय ते हो ॥ तदिं तिन वरुषांचा कानु हा बोबडा हो ॥ ६ ॥ मनसिंदळ घरतिचा

---

१ आत्म. २ परमात्म. ३ कृपा. ४ गोकुळ. ५ मदनामक दैत्याचा नाश करणारा.

तो चोर पोरांमधीं हो ॥ बिंदिं गलिं फिरतो गे गोरसां नागवा हो ॥ तळतळति तमासे पाहुनी गौळणी त्या॥ झगमग गडणीया सांगु येती कळी त्या ॥ ७ ॥ जननिजवळिं होता पारखी चारि वाढां ॥ स्थिर नच घडि येका सावळा धीट मोठा ॥ तंव नजिक थवा तो पोंचला येउनीया ॥ उगिंच बसत मातें त्यांस हो पाहुनीया ॥ ८ ॥ मनिं गडबडला गे नाहिं हा सारसाक्षी ॥ परजनरितिरूपें देखणा सर्वपक्षी ॥ सुजननिति हिची गा काळमानाप्रमाणें ॥ वसति जनरितीतें शांतिचे बोधराणे ॥ ९ ॥ चपळहि तळपे हो मालिनीवृत्तरूपें ॥ बिजलिच जणुं भासे अंतरीं शब्द-रूपें ॥ सदयघन अनंताचे रमायास येते ॥ पुढति भ्रमरि विलासें रवां आयका ते ॥ १० ॥

### भ्रमरविलसिता छंद.

गोपी दाटी मिनलि निकटि ते ॥ देखूनीया हरि सति बघिते ॥ डोळे झांकी मग उगिं बसला ॥ हातीं मीठी निजदिठि कमलां ॥ १ ॥ दृष्टी ती चंचळ बघि वरतां ॥ वेष्टी कज्जल जलजसरिता[1] ॥ भाळीं शोभे कुरळनिलटिळा ॥ शामा बाळा तुं नव घननिळा ॥ २ ॥ दादा याचा उगिं घरिं बसतो ॥ ताता वाड्यामधिं नितिं गुततो ॥ बोधाभागीं अनुभव दिसतो ॥ ३ ॥ टाळायाला भवभयमदनां ॥ साधां आधीं तुमि मदुसुदनां ॥ नंदाबाळां सुरमुनिवरदां ॥ भावासाठीं मुलपणसवदां ॥ ४ ॥ सानां गोपा भ्रमेरस[2]भ्रमकां[3] ॥ बोला आतां मति शिखरिणिका ॥ रोषां टाका निजनिति सरका ॥ बोधा बांधा कटिं सुट नरकां ॥ ५ ॥

### शिखरिणी छंद.

बहू या हो नारी सदनिं हरिचा त्या मिळति गा ॥ कळीची ती साथी वदनिं वदती ते सतिस गा ॥ असे राणी नंदा मुल हरि जिचा मोहन धरी । तिला लक्षूनीया ह्मणति सति त्या मोह न धरी ॥ १ ॥ पुढें

---

१ जलज ह्म० कमल सरी ह्म० प्रमाणें ता ह्म० सुंदर भाव असे नेत्र. २ गोरस. ३ बरोबर फिरणारे.

आली ती हो जिस मुल नसे हारिणगती[1] ॥ गती जीची मोठी निपुण कुशळा शोधनरितीं ॥ बरी चौताळे हो घडित सुघडी बोलत कसी ॥ वरी घावा घाली परि मनिं तयाला जडलिसी ॥ २ ॥ अगे माते तूझा कुमर उमरीं सान परि गे ॥ बहू खोडीवाला बुडवि कुळिला गोकुळि हि गे ॥ ३ ॥ अगे आला माझा गतदिनिं घरा हा मुल तुझा ॥ बघूं लागे दृष्टी चलत पवना हा नट तुझा ॥ घरीं तेव्हां कोणी पति श्वशुर आणी दिरहि ते ॥ उनाचा तापानें घरिं लपुनिया गा तमिं[2] बसे ॥ ४ ॥ नसे देहाभागीं हळुच लपुनी मागुनि बरा ॥ धरी नेत्रां माझा दपटुनि करीं जोरहि बरा ॥ दिसे पोरावाणी परि सरि जि थोरांहुनि भली ॥ भली केली होळी विटवि बहु हा घालुनि भुली ॥ ५ ॥ तदां माझा बाई मनिं बहु चिडी गे जडलि ती ॥ उठें तेव्हां मी गे धट तंव तुझा काय पुढतीं ॥ करी चेष्टा भारी ह्मणत मजला धांगडि तुं गे ॥ नसे तूझा तो गे पति सति बरा मीच वर गे ॥ ६ ॥ मला घालीं माळा रिजविन तुला बोधनरितीं ॥ मुलें बाळें पूढें बहुत बरवीं होतिं सुनितीं ॥ रमे माझा ठायीं जडित प्रितिनें अंतर धरी ॥ बरी आहे संधी नसति अजि बापे रिपु घरीं ॥ ७ ॥ कसा चाळा याला मुलपणिं रती बोलत मुखीं ॥ नसे देण्या साक्षी त्रिभुवनिं दुजी या समतुकीं ॥ बडा बाब्या नष्टा रचलि मडकीं फोडित करीं ॥ करीं होती काठी बडवित पळे सोंगचि हरी ॥ ८ ॥ जसा भावीकांचा मनिं निजरतीं बोध उठतो ॥ निजध्यासा अंतीं घडत बरवा साक्षि निजतो ॥ पुढें बोधालागीं वरिति तनुभागीं अनुभवां ॥ भवातें टाळायां हरिगिति निती साज बरवा ॥९॥ असी होती नारी कळिरव वदे सारमितिनें ॥ वदे छंदें नारी शिखरिणि रुपें गोडवदने ॥ दुजी ऊठे तेव्हां मतितुनि बरी चामररिती ॥ अनंताला लुब्धे धरुन बसली जे ति पुढतीं ॥ १० ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित नवविध गोपीकथायां अर्चनविधी समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ हरिःशरणं ॥

---

१ शोधनगती. २ अंधारांत.

## दास्यविधी गोपी.

### चामर छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ पाहुनी यदूमणीं[1] सखी दुजी मनीं जिचा ॥ खोड गोड अंतरीं पैरी बरी धडा सुचा[2] ॥ बोलते रसां मिळावया सैखोल[3] बांवरी ॥ सांवरूनि पाटैवास[4] ते नवारसावरीं ॥ १ ॥ भक्ति दूसरी नवांतुनी बहू पतीपदीं ॥ सेवना[5] धनासमान मानिती रतीमधीं ॥ काळ वेळ जाणती निगा बरी सरे पुढें ॥ बोलती ति नंदराणि पाहुनी बरें कुँडें[6] ॥ २ ॥ काय गे तुझा मुला जरा भिती नसे दिसे ॥ पोर ती न ते बरोबरी हरी सिमा असे ॥ वाँणसी[7] मधीं पती बरोबरी सुखामधीं ॥ येवढ्यामधीं रवी दुपारिं वास दे दधी ॥ ३ ॥ हात पूसले मुखावरी मळी बहू तनू ॥ हांसतो बहू मुलांमधींतरा बरी तनू ॥ राहिला दरावजी उभा तदां बधी धँनू ॥ ४ ॥ धारणा घरामधीं बरी असे लळे मुलां ॥ जाति भागिं प्रीत मोठि हा ग चोर देखिला ॥ ५ ॥ नंदनन्दनासि फद फार गे सदां वदे ॥ या रितीस बोलतो तया धन्यास कान दे ॥ भाविकी स्वभाव तो घँरामधीं बराचिना ॥ त्यांस ऊठवी त्वरा ह्मणे करा चला वनां ॥ ६ ॥ पांच वाघ गायिपाठिं लागले असीं मुलें ॥ हाक मारिती निरामयीं तिसीं मिगाभुले ॥ ७ ॥ जात भोळि त्यामधीं खुळा स्वभाव जातिते ॥ वंदना बरी मि नाँमिका[10] घरीं अगाध ते ॥ सांगतो जळों घरें सती तुमी मला वरा ॥ सांडुनी रतीपणास या मला रतीं धरा ॥ ८ ॥ गे वरासनीं धरा मनीं सबोध तो धणी ॥ या भवां तरावयां वैयामधीं[11] मि गे धणी ॥ धाकुटा नको मला ह्मणूं बरा उरीं धरीं ॥ सूख घे पतीहुनी निरामयीं नसे सरी ॥ ९ ॥ कां उगीं गमाविता भैरां[12] निजासनीं तरा ॥ आसरां वरा तुला पटो मनीं जैरां[13] चुरा ॥ या रितीं वदे पुढें घरामधीं बरा सिरे ॥

१ परावाणीचे ठिकाणीं. २ उत्तम पुरुषाचा. ३ परमात्म. ४ पाटवनामक रेशमी वस्त्रास, कुशलपणास. ५ शुश्रूषा, जोपा. ६ वांकडें. ७ वाखाणसी. ८ कृष्ण. ९ अहंकार पतीचे ठिकाणीं. १० नामधारका. ११ तारुण्यांत. १२ तारुण्यांला. १३ ह्मातारपण.

गोरसां सिक्यावरी तळीं हरी उडे त्वरें ॥ १० ॥ फोडलीं ग गाडगीं दुधामधीं दधी मिळे ॥ लोणि त्यांतुनी बरा हरी मुखीं त्वरें गिळे ॥ कालवी भुमीवरी पडे मुते च त्यामधीं ॥ आयिके न गे मला खराबि थोर यामधीं ॥ ११ ॥ सात्विका मती पया निती विचार ते दधीं ॥ शोधनीं रसांतुनी वरा नवां निती निधी ॥ हारवावया भवां तरा बरी दिसे हिची ॥ कानिं घ्या भरोनिया रिती दुजी नवी रुची ॥ १२ ॥ चामरा वदे निती बसे तदां वरी दुजी ॥ स्वागता उठे पुढां उभी परा भुमीं रिजी ॥ आवडी अनंत साधनीं धणी हरी करी ॥ पाय साधनींच वंदनी रिती हिगा बरी ॥ १३ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचितनवविध गोपीकथायां दास्यविधी समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## ॥ अथस्मरणविधी ॥

### ॥ स्वागता छंद ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीयेकनाथाय नमः ॥ या रितीं वदनिं बोलुनि ती हो ॥ बैसली जवळ ते जननी हो ॥ दूसरि उठत घाबरि भारी ॥ चंचला नयनिं गोरटि पोरी ॥ १ ॥ भाव तो पतिपदीं निजदासी ॥ तीसरी रिति नवांतुनि खासी ॥ बोलते रसिक साजुक खासे ॥ गांठिल्या मनिं बहू सुख भासे ॥ २ ॥ बाइ मी घुसळितां दधि तें गे ॥ वांसरें मन तुझा मुल हागे ॥ सोडितो पळविगे मग त्यासी ॥ पाठिं लागुनि हरी दिनतासी ॥ ३ ॥ येउनी मग घरीं मजला गे ॥ सांगतो सुटलि ही बचडी गे ॥ बाहिरी मग मि ते धडियेला ॥ पाहतें तंव नसे ममतेला ॥ ४ ॥ सूटलें पळत मी निजरानीं ॥ मागुनी हरि तुझा करि धूंनी[1] ॥ खाउनी नवनितासि घडा गे ॥ वासनारहित भाविकसा गे ॥ ५ ॥ येउनी मग बसे सदरेला ॥ तोंड पूसुनि बरा

---

१ नाश.

रसलीला ॥ घेउनी बचडिती मग आई ॥ पातलें घरिं ग मी मुल गाई ॥ ६ ॥ तोंड मोडित उभा दरवाजीं ॥ नीत ना अजि तुझा दरवाजीं ॥ बांधुनी धृतिखुट्या मन तें गे ॥ पातलें निजघरीं रसभागें ॥ ७ ॥ पाहुनी नवनितां धुंणि कांपे ॥ चित्त गे तधिं बहू रवितापे ॥ भांबलें करुं कसें ह्मणुनीया ॥ लागलें तंव बघूं हरि गे या ॥ ८ ॥ पाहुनी मग मला दुर गेला ॥ जाउनी मग दुरी स्थिर ठेला ॥ बोलतो दुरुनि हा मजला गे॥ खादलें नच बरें दधि मीं गे ॥ ९ ॥ बाळकें बहु घरीं तुझिया गे ॥ मागुनी तंव तुझा सिरलीं गे ॥ खाउनी दधिदुधां पळतीं तीं ॥ सांगतो बरि धरी मज रीती ॥ १० ॥ सोडुनी घर तुं गे बहु दूरी ॥ काननीं फिरुं नको भवपूरीं ॥ आजपासुनि बसे निजगेहीं ॥ साधि तूं परम सोय मजा ही ॥ ११ ॥ वासना नवनितावरि सारा ॥ काढुनी नवनितांतुनि सारा ॥ चाळवी धृतिरवीमाधिं सारां॥ चाळि गे निजरुपीं भवसारां॥१२॥ टाळि हा मद मनांतुनि सारा ॥ कामनाधनि वरा मज सारां ॥ ओळखी धरि जुनी धडपूढी ॥ कां ग तूज बसलि हे हुडहूडी ॥ १३ ॥ चोर ते मजपुढें पळती गे ॥ काळही झुरत तो भजनां गे ॥ १४ ॥ माझिया भजनिं जे रिजले गे ॥ कामना दवडिली मनिंची गे ॥ होउनी रत रवी समभागां ॥ साधिला निजहिता पद जागा ॥ १५ ॥ चाळिती प्रथमता मन नीकें ॥ बोध ही रवि सुदोर विवेकें ॥ आत्मनी घटधृतीं दधिसारा॥ चाळिती अनुभवां बुध सारां ॥ १६ ॥ थोर ते मजहुनी मि तयाला ॥ सोडुनी नच रिजें ममतेला ॥ भाविकी मति मला घर साजे ॥ तेथ मी वसतसें रित भाजे ॥ १७ ॥ मीळसी जरि तुं गे समभागीं ॥ ऐसियां-तचि भली ममभागीं ॥ या रितीं वदुनि तो चपळा गे ॥ फार तो पळ-तसे सगुणी गे ॥ १८ ॥ तूं तरी जुनि बरी दिसतेसी ॥ हा फिरे दिन-निसीं घरघूसी ॥ लावि या भय तुं गे समजावी ॥ गोकुळी बुडविली मुलभावी ॥ १९ ॥ बोलुनी रिति असी स्वगता ती ॥ बैसली मग तदां

---

१ नाश. २ परमात्म. ३ सोडून द्या. ४ सर्व. ५ आत्मरूपाला. ६ पतिव्रताधर्मी.

भुवरीती ॥ शुद्ध कामनि उठे मनिं तेव्हां ॥ हा अनंत भरला रस तेव्हां ॥ २० ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचितनवविध गोपीकथायां स्मरणविधी समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## अथ पादसेवनविधी.

### शुद्धकामदा छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीयेकनाथाय नमः ॥ वदत चौथि ते पादसेवना ॥ अहंपणापती जो पुरातना ॥ सलगि फार ती त्या समागमें ॥ तरुण वास हा सारितां क्रमें ॥ १ ॥ नविच नौति ती प्राप्त जाह्ली ॥ भिति फिरावया वाट येकली ॥ नणंद धाकुटी धारणाधती ॥ वय मुली परी बोलकी निती ॥ २ ॥ असत सोबती ऊंजदारिंती ॥ निजलि गे तदां ना मला भिती ॥ अवचितां तुझा सूत पातला ॥ हंसत आंत तो येत येकला ॥ ३ ॥ न्हवति सासु ती तेधवां घरीं ॥ घरधणी वनां संधि ते बरी ॥ पुसत पोरिला चोरटा तुझा ॥ दुजि ति कोण गे येकली निजा ॥ ४ ॥ नच ति बोलली येकदोनही ॥ धरित तेधवां पोटिं गे सही ॥ मुलगि ते रडे ओरडे बहू ॥ उठत तेधवां घाबरी बहू ॥ ५ ॥ बघुनिया मला चोर हा पळे ॥ वदन मोडुनी दावितो बळें ॥ त्वरित मागचा दारिं[1] पातला ॥ बडवि दार तें नाचतो भला ॥ ६ ॥ वदत तेथुनी दार काढिगे ॥ नच भियें तुला हा उभा मि गे ॥ तुज मि गोष्ट ती फार चांगली ॥ बरिच ऐकिली नाहिं ती भली ॥ ७ ॥ बरवि गे मला रीत लागली ॥ खटपणा सुटे देवि पोचली ॥ नवस आइनें फार चांगला ॥ गुणहि तेधवां प्राप्त हो मला ॥ ८ ॥ वदुनि या रितीं दीनवाणिसा ॥ बसत तेधवां ओरडी घसा ॥ बघुनिया तयां पातली दया ॥ कडि ग काढुनी घेतला तया ॥ ९ ॥ बसत येउनी चंचळाकृती ॥ वरति खालती मान हालती ॥ मग तयास मी बोललीं असें ॥ सुटत रे तुझें वाटतें पिसें ॥ १० ॥

---

१ पुढीलदारी.

घडिभरीं उगीं तेथ हा बसे ॥ अवचितां पुढें वेड भूतसे ॥ घुमघुमी बहू शब्द अंतरीं ॥ तनु ति कांपवी काल गे घरीं ॥ ११ ॥ भय बहू मला वाटला तदां ॥ ह्मणत देव मी वास या पदां ॥ कुळिं मि तूमचा फार दीनचा ॥ वसत पिंपळी ठाव मूळचा ॥ १२ ॥ मज कसा तुमी सोडुनी दुजा ॥ भजतसा बहू देउनी पुजा ॥ भुक मला असे फार लागली ॥ बहुत काळ गे वाट पाहिली ॥ १३ ॥ मज तुं घालिं गे खावया दहीं ॥ दुध तुझा असे काय तें गृहीं ॥ मज खरें तदां वाटलें मनीं ॥ भिउन आणलीं तेथ विर्झणीं ॥ १४ ॥ घटघटा पितो सावळा तुझा ॥ वदत पूढतीं ऐक ती मजा ॥ १५ ॥ अजर आमरी ठाव आमुतें ॥ षडरिपूपिसें नाहिं जेथ तें ॥ गुणरुपाविणें वास मी करीं ॥ मरण जन्म ना माझिया घरीं ॥ १६ ॥ तिनहि काळ ते कांपती सदां ॥ पद चराचरीं वास दुर्मदां ॥ बहुत पातले माझिये नितीं ॥ नच तयांसि गे पूनरावृती ॥ १७ ॥ सुजन भाविकां खूण बाणती ॥ पर मि गे परीं ज्ञाण बांधिती ॥ वळवळा नसे जास कामिनी[१] ॥ तरति ते भवीं जे निकामनीं[२] ॥ १८ ॥ रसरसीक ते पावले तिरां ॥ मननशीलते धारणा उरा ॥ मनमळींतुनी पार पोंचले ॥ मजसभोंवते ते गडी भले ॥ १९ ॥ भुल भवाचिही तूमचा शिरीं ॥ अजुन काय ती सूट ना बरी ॥ धनमदास गे फार लुब्धतां ॥ हित नये मनीं फार सांगतां ॥ २० ॥ मज बघा दिनींनीशितें मनीं ॥ घरधन्याहुनी मी असें गुणी ॥ वर करी बरा सूख होउं दे ॥ रिजत वाक्य हें काय कामदे ॥ २१ ॥ निगमबोल हे गोड वाटती ॥ अनुभवी सदां पाठ घोकिती ॥ मद सरावया सार ओतिलें ॥ भिति भवीं जयां त्यांस हें भलें ॥ २२ ॥ निति असे जुनी फार दीनची ॥ सरि इचा दुजी कोण ना रुची ॥ मिळ मला तुं गे टांकुनी मदां ॥ मिपण सोडुनी ये वरीं पदां ॥ २३ ॥ वदत हें कुडें लागलें मला ॥ पळत तेथुनी नाहिं थारला ॥ नणंद पाठिसी लागली तदां ॥ फुकत कान हा हारवी मदां ॥ २४ ॥ मथुनि या रितीं पादसे-

१ कामाला. २ कामनारहित.

वना ॥ रवरसामृतीं बोधिलें धनां ॥ बसत शुद्ध ती कामदा पुढें ॥ उठत दूसरी ऐक ती पुढें ॥ २९ ॥ सखि उठे तदां पंचचामरी ॥ गित वदे उरीं रंगणीं बरी ॥ सुरस गोड तें सूखसाधनां ॥ सेव अनंत घे आपुल्या मनां ॥ २६ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचितनवविध गोपीकथायां पादसेवनविधी समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## अथ वंदनविधी.

### पंचचामर छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीयेकनाथाय नमः ॥ वदे पुढें तदां दुजी कळी हरीवरी मुखें ॥ मनीं बरा लळा परी वरी क्रुरी जसें तिखें ॥ जिला बहू अहंपणा रितींत वंदना नवी ॥ विधींतुनी सखी बरी सरे पुढें रसीं सवी ॥ १ ॥ मि या पुरींत चांगली कुळामधीं बहू दिनीं ॥ खरेपणा धरूनिया वसे गृहीं अशांतुनी ॥ पतीहि गे न जाचितो सुसासुबाइ माझि ती ॥ कधीं अगे विणो[2] न बोलली खरीच आइ ती ॥ २ ॥ दिरां सेही[3] करावया निजी मती नसे जरा ॥ परी पती पुरे हिशोबि सार राखिता खरा ॥ नगांभुषांबरा बहू घरामधीं सँराप ते ॥ पती पिता कृती उणी चिकूपणा सरे न ते ॥ ३ ॥ असी घरामधीं रिती पुरातनी वहीच ती ॥ तितालि सांवरी गुणामधीं उरीं शिरीं मिती ॥ निशींत मी निजें पतीपुढें मला ति झोंप गे ॥ बरीच लागली न जाग्रती जरा निजीं सुगे ॥ ४ ॥ भरामधीं गुणाचिया भवांत मी निजें खरी ॥ अहंपणापती निजे मधींच घोरती भरीं ॥ तशांत कोठुनी ग मूल हा निशीमधीं घरीं ॥ बरा त्वरा करूनिया सिरे घरांत भीतरीं ॥ ५ ॥ नकूळ घेउनी विचारतो समा वरी मिती ॥ अह्यामधीं भराचिया निसेंत पांघरूणि ती ॥ पटां मलीन मायिकां तळीं हळूच सोडुनी ॥ पराघरीं बसे तदां लपे गुणांस सोडुनी ॥ ६ ॥ धृतीअनूभवामधीं विचार सीरतो जसा ॥ तसा अह्यामधीं सिरे नकूळ तोचि सा-

---

१ गोडी. २ विनाकारण. ३ स्मरण. ४ कृपण.

रसा ॥ बरा मला उरामधीं डसे तदां उठे कसी ॥ पळावया त्वरा नसे पिसें जसें अगे तसी ॥ ७ ॥ भयामधीं मि ओरडें बहूत घाबरीरवा ॥ जसा अनूभवी विषासमींच वीषयां भवां ॥ अनूतपें बहूत तापलें तदां पती उठे ॥ ह्मणे मला भितीस तूं कशास गे उगीं धटे ॥ ८ ॥ मगे मि गे तयास तेधवां ह्मणे मला डसे ॥ उरामधीं भरा निजेचिया पती स्तनां डसे ॥ असेल तें असो परी मला बहू दिसे भिती ॥ मनामधीं धनाहुनी बहू पुढें दुरी गती ॥ ९ ॥ तयानि गे दिवा तदां निजासनीं अनूभवे ॥ प्रकाशला घरामधीं तदां नकूळ हा [१]भंवे ॥ विचार सासमे मनीं दिसे अनूभवावरीं ॥ खुणें सिमा धनी वरी दिसे तधीं धिरां उरीं ॥ १० ॥ मतीमधीं गती लिना सरी मला बरी दिसे ॥ तयास गे मि पाहुनी भिती उडे पुढें कसें ॥ बराच मुंगसा धिरा भरा तदां लपे तसें ॥ कुळी सरी न दूसरी बरी उरीं हरी दिसे ॥ ११ ॥ कसा तुझा मुलां [२]रेळा गळा बसे तदां बरा ॥ कळा अजूनिया उरामधीं बहूत गे बरा ॥ कसा पुढें पुरीं तुझा ग काळ तो सरे तरी ॥ वदे तुं गे मला रितीं किं सोडुं ही तुझी पुरी ॥ १२ ॥ अशा रितीं वदोनिया बसे तदां ति वंदना ॥ अनूभवी जनांमधीं पुरी तरा ठसे मनां ॥ अशा रसाविणा हरी भरे नची मनीं जरा ॥ चतूर हो धरा उरीं नवाविधींतुनी चुरा ॥ १३ ॥ सदोदितीं भजा हरी भवां तरावया धणी ॥ धनावरी सदां मना तुझी जसी ति घोंकणी ॥ तया रितीं जरी जरा घडी तरीं गडी धरीं ॥ मनामधीं जरा तुटो गमावुं तूं नको पुरी ॥ १४ ॥ नरापुरी तरावया खरी असे रमे तयां ॥ दया हरी तयांवरीं करी पुरी रमावया ॥ वदोनिया अशा रितीं बसे तधीं पुरीमधीं ॥ हि पंचचामरा तरा वदोनिया रसामधीं ॥१५॥ उठे दुजी दरावजीं उभी तदां वदे तरा ॥ असे जिलाचि नांव मालती बरें पुढें सरा ॥ अनंत मानसामधीं बसे हिसे दरावरी ॥ भरा समागमें वयां गमाविती खरी उरीं ॥ १६ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचितनवविध गोपीकथायां वंदनविधी समाप्तः ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

१ फिरतो. २ खोडी.

## अथ श्रवणविधि.

### मालती छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः ॥
बरि तधिं ती वदती दुजी खुजी ॥ रसरसिकांमधिं साधनास जी ॥
जिस पतिचा बहु गे लळा असे ॥ नवरस ते भरपूर जी असे ॥ १ ॥
श्रवणिं धरा श्रवणी[1] हि सार[2] वाणगी[3] ॥ विधि पहिली नव सारवाणगी ॥
मनिं धरितो तरतो भवामधीं ॥ सव गवसे मग बोध तो सुगी ॥ २ ॥
चपळ पळे भव सोडुनी मनीं ॥ मननशिळां धन सांपडे जनीं ॥ गित
हरिचें बहु गोड हें खरें ॥ वदन मनां करि त्यासची खरे ॥ ३ ॥
श्रवणि वदे मग तेधवां कसी ॥ सुरस रवामृत गोड फारसी ॥ ह्मणत
अगे मुल तूज हा कसा ॥ विटवित हा बहु गे मला कसा ॥ ४ ॥
नमित मि हो पतिला दिनापरीं ॥ श्रवणरसां मन गे बहू तरी ॥ मिपण
पती मज हा खरा असे ॥ परि मज मानित तो सदां असे ॥ ५ ॥
रमत मला बहु भावळा तदां ॥ मजवर प्रीत असे बहू सदां ॥ वदत
मि त्या रितिं चालती बरे ॥ मग मज सासु ति फार चांवरे ॥ ६ ॥
सदनिं सखा बहु तो रमे मला ॥ जसि ममता उरिं खात गोबळां[4] ॥
घर त्यजि जो वनिं जाउनी बसे ॥ मनममता प्रथमा सुटे नसे ॥ ७ ॥
तसि मज सासु खरी परी तिला ॥ नच बळ तें पतिचा लळा मला ॥
समरधिरासरि आसरी पती ॥ विरचि बरें धरिती खरी निती ॥ ८ ॥
भरदिन तो दिसतो दुतासि गे ॥ घुसळित तें दधिं तेधवांचि गे ॥
पळत तुझा हरि तेधवां घरीं ॥ सिरत बहू चपला सरीपरी ॥ ९ ॥
ह्मणत मला तुज वेड हें कसें ॥ घरिं बरि घूसळसी भिती नसे ॥
वन्हि वनिं लागत आजरोजिं गे ॥ जळतचि कानन फार वेळ गे ॥१०॥
पति तुज टाकुनि गे वनीं कसा ॥ कळत न ती कसि गे गती असा ॥
निमति बहूजण ते तयामधीं ॥ उठ चल तूं भलिगे वयामधीं

---

१ श्रवणीगोपी. २ आत्मा. ३ मासला. ४ इंद्रियबळाला.

॥ ११ ॥ बहुत मि घाबरि बावरी तदां ॥ भिति भरली तनुभागिं गे तदां ॥ उठुनि घरांतुन बाहिरी सरे ॥ तंव मुल हा दधि खातसे बरें ॥ १२ ॥ नवनित खाउनि सारलें तधीं ॥ बरी चपळाइ करी हरी सुधी ॥ वदन पुसोनि बरा पळे पुढें ॥ मम घर टाकुनिया ग ऊघडें ॥ १३ ॥ कपटकडी नच घातली असे ॥ घर मग संसृतिला न तें असें ॥ समशिल राहति जे रितीं भवीं ॥ तिच गत भासत आज लाघवी ॥१४॥ पुढतिं मि गे घरिं जेधवां बघी ॥ रस मन भूवनिंना असें उेघी ॥ सरलि वयांतिल सार गे गती ॥ सरलि वयांतिल सार सांगती ॥ १५ ॥ सरलि वयांतिल सार ती गती ॥ सरलि वयांतिल आज ही भिती ॥१६॥ वदनिं वदे असि ऐकंणी[1] सती ॥ समज मना भवनाशकी सती ॥ लिनपण भाविक भावनेमधीं ॥ रस भरतो धृतिशांतितें[2] दधी ॥ १७ ॥ मतिपय सुनिति ती भवां हरी ॥ जसि पतितें सुशिला रमे बरी ॥ मदभव हारवि ही हरीकथा ॥ कथनसुधाहुनि गोड ही कथा ॥ १८ ॥ मनन करी मन आजिं तूं बरें ॥ समजनभागिं वसे सदां बरें ॥ गित सदपाद रमापती भरें ॥ वदति तयास समाधि हीच रे ॥ १९ ॥ वदुनि सरी बरि ही सतीविधी ॥ श्रवणि सुजाणति हे बसे तधीं ॥ मिष नित मालतिछंद हा भला ॥ वदुनि बसे मग चंपका कला ॥ २० ॥ वदत ति सार कथामृता भली ॥ उपनिषदामृतवीधि फांबली ॥ सुख घरिं घेत अनंत पायिं त्या ॥ शयन धराधरि जास बाप त्या ॥ २१ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित नवविधगोपीकथायां श्रवणविधि समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## कीर्तनविधि.

### चंपकमाला छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ बोलत तेव्हां फारचि जिव्हा ॥ आलि पुढें ती चंचळ रीती ॥ आइग खोटा हा मुल मोठा ॥

---

१ श्रवण करणारी. २ स्वस्थ.

यास तुं बाई ना भय काई ॥ १ ॥ यां भवनाशां दुःखविनाशां ॥ सारसुरेशां ठावहि शेषां ॥ गोकुळ भ्रष्टे कामिनिकष्टे ॥ गोरसिं तुष्टे ऊरत उष्टें ॥ २ ॥ बाळग काळा भीत न काळां ॥ फार खराबा काल बराबा ॥ येउनि गेहां माघरिं गे हा ॥ चावट मोठा नष्टचि खोटा ॥३॥ मी मननीं गे सारमथीं गे ॥ पार सकाळीं वासरकाळीं ॥ गात गिताला भावमथीला ॥ कोठुनि आला राहि अबोला ॥ ४ ॥ मीपण जें गे मापति ते गे ॥ नामि तयाला मानित याला ॥ बोधपयाला घे वद-नाला ॥ मानयनीं गे मारित तें गे ॥ ५ ॥ दोर सुटे तो हा दधि खातो ॥ मी नय नातें चाळित होतें ॥ सर्वहि खाई गोरस बाई ॥ लाज नसे गे कांतरि हें गे ॥ ६ ॥ बोलत काई हा मज बाई ॥ हें घर माझें काय ग तूझें ॥ सार मि खाई स्थूळ तुं पाही ॥ गोकुळ सारें वृत्तित थारे ॥ ७ ॥ कोण तुं कैची सांग कशाची ॥ आस फुकां कां गोडि तनूची ॥ मी पर आहें तूं पर पाहें ॥ कांग फुकां हे संसृति थारे ॥ ८ ॥ ना मज तोटा मी ठक मोठा ॥ वारसनातें कोण ग मातें ॥ गूण सराया पाहुं मला यां ॥ स्थीरचराचा भार मि साचा ॥ ९ ॥ आगमपक्षीं गो-रस लक्षीं ॥ नीगमठायीं सूख समाई ॥ आजर मी गे हो परती गे ॥ ना कळ बाधी हा कलिं रोधीं ॥ १० ॥ हा भवसारा दृश्यनगारा ॥ काळचि याला नोबतवाला ॥ नादचि लुब्धा या श्रुतिशब्दां ॥ नामर-वाला सामचि माला ॥ ११ ॥ हावरें गेहीं तूं वर गे हा ॥ सोडि भवाला मी प्रतिपाळां ॥ माझि रमा गे पाय चुरी गे ॥ बाळ मि काळा जन्म सुकाळां ॥ १२ ॥ चार्ळेक चाळां आद्य मि काळां ॥ ना तिन ताळीं सार मि माळी ॥ कीर्तनिं तूं गे हें घर रीघें ॥ देइन ठावां तूज विसावां ॥ १३ ॥ या रितिं बोले काय ग झोले ॥ कोण तरा ही सांग ग आई ॥ चाळक ऐसा गोकुळिं कैसा ॥ बांध तुं याला ना करि काँलां ॥ १४ ॥ या रितिं बोले सुक्षम गेले ॥ काय करूं गे मा मज सांगे ॥ बोलुन बैसे दूसरी कैसें ॥ सख्य सतीला ऐक ति लीलां ॥१५॥

१ अंतर्गृहांत. २ स्वामी. ३ देहाचा. ४ गति देणारा. ५ वेळ.

चंपकमाला शोक निमाला ॥ बोलि रथोद्धता मग शुद्धाला[१] ॥ सार-रसातें हीच मथीते ॥ शोभति माथां ह्याचि अनंतां ॥ १६ ॥ ॥ १४२ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित नवविधगोपीकथायां कीर्तनविधि समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ हरिः शरणं ॥

---

## अथ सख्यविधि प्रारंभ.

### रथोद्धता छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रेया० ॥ बोलती मग पुढें सरोनिया ॥ मान हालवि बरी रसीकया ॥ सख्य जे वदति त्यांसही सरी ॥ कान द्या मन कथेंत आसरी ॥ १ ॥ ती ह्मणे पतिव्रता मि गे असें ॥ नाचतो मज जनीं कली नसे ॥ नेम गे मम पती असा करी ॥ बांधितो मुल तुझा अशा परीं ॥ २ ॥ बैसले जपुनि गे पती घरीं ॥ नीजसेज करुनी तदां बरी ॥ संधि पाहत निपूण ते बरे ॥ गूण सारुनि पलीकडे झुरे ॥ ३ ॥ काळ गे गति तुझा मुलांमधीं ॥ खेळतां सदनिं येत त्यामधीं ॥ दार तें उघडुनी हरी भला ॥ आंत येत हळुं चोर पाउलां ॥ ४ ॥ हात घालुनि शिक्यावरी बरा ॥ काढितो नवनितास बावरा ॥ येवढ्यामधिं बरें पतीतंया[२] ॥ धांवुनी धरिति घट्ट गे तयां ॥ ५ ॥ बांधिला निजरसीं सुतास गे ॥ बोधधारण तयावरींच गे ॥ रोदनां बहु करी तदां भला ॥ सावळा कळवळा ळळा गळां ॥ ६ ॥ पोर ते पळत चोर जा रितीं ॥ थोर ते वळखिती हि हो रितीं ॥ साधनावरिं जसा सबोध तो ॥ पावतो सुजन हो विचार तो ॥ ७ ॥ हा वदे पतिस गे बहू रितीं ॥ सख्य दाखवि तदां बहू हितीं ॥ गोड तो रस गे मजेचा असे ॥ साधि त्यां सतत सार हें असें ॥ ८ ॥ सोड गा स्थुळ तुं हें न आकळीं ॥ अंतरीं मज धरी गित आकळी ॥ बांधि तूं मज बरा परेवरीं[३] ॥ शांतिचा खुंट करी तया-

---

१ अविनाशाला. २ अहंकाररहित भावानें (आत्मभावानें). ३ परा वाणीचे ठिकाणीं.

वरीं ॥ ९ ॥ प्रेमदोर कमरेवरी बरा ॥ बांध गा मज असा करीं त्वरां ॥ सावधान धरि काळ लोटिं हा ॥ हीत मी वदत हें सुखें पहा ॥ १० ॥ ना गती मज जनीं रिपूंमधीं ॥ काम मोह मति ना कळे सुधी ॥ राहतो गुणभवाहुनी दुरी ॥ भाविकांसम असे सदां उरीं ॥ ११ ॥ चोरि ही नच करी स्वभाव हा ॥ पाहतो कसुनिया सकाम हा ॥ सूख हेंच समजा मुलामिषें ॥ बोध बोधित मि गा सदां असें ॥ १२ ॥ फार ती प्रिति तुमावरीं असे ॥ कारणीं सगुण मी रसां असें ॥ बाळ मी गुण बरे नवांरसीं ॥ त्यांतही सुरस जातही असी ॥ १३ ॥ मूसही नवविधी अनादिची ॥ ओतिते नवरसां सुधारुची ॥ १४ ॥ सार जाणुनि पती गहींवरें ॥ सोढिला मुल तुझा पती बरें ॥ बोलका बहु बरा रुचीकरी ॥ तोलतो समपुरीं निती खरी ॥ १५ ॥ हें मना धर तुं यास बोधनीं ॥ सूख घे निजपुरीं वळींतुनी ॥ बोलुनी मग रथोद्धता बसे ॥ सख्य हो असि रिजे वरेंावसें ॥ १६ ॥ बोलते दुसरि ते सुरांगणीं ॥ आत्म हें बदत सार हो गुणीं ॥ शार्दुळी वदत तेधवां वरीं ॥ हा अनंत रिजला तयावरी ॥ १७ ॥ ॥ १९९ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित नवविध गोपीकथायां सख्यविधि समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ हरिः शरणं ॥

---

## अथ आत्मनिवेदनविधिप्रारंभः.

### शार्दूळविक्रीडित छंद.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरुदत्तात्रे० ॥ बोले ते सति तेधवां तिजप्रती आत्मींच बोधी रित ॥ गोपी हे नववी नवामधिं बरी सारामृती हो रित ॥ आली जे निजरूपतें धरुनिया बोधास बोधी नित ॥ आनंदास अनंत मीळत तदां गोपालरूपीं सत ॥ १ ॥ बाळाला शिकवी बरा गुण तुं गे कारां मिटी यां अजि ॥ सारा गोंधळ घालितो हरि तुझा बाराकळीं काळजि ॥ चाला फार बरा न गे दिसत

---

१ देहीं. २ पतियोगें.

हा सांभाळ आतां सुत ॥ आनंदास० ॥ २ ॥ भानूचा उदयीं बरोबर मुलें घेऊन आला कळ ॥ सद्रेचा समुरीं मुते मुल तुझा हांसे जसें तें खुळ ॥ बैसे चावडि चोरवाट धरि गे गोपां सखा वारितें ॥ आनंदास अनंत० ॥ ३ ॥ ढोंगें फार करी मुली फितवितो पोरांस मारी बहु ॥ चोरीची बहु गोडि गे नवरसीं नारींस गोवी बहु ॥ वत्सें सोडुनि धांवतो सुत तुझा वारा जसा वाजत ॥ आनंदास अनंत० ॥ ४ ॥ घर्ती पाहुनि भूलतो खदखदां हांसे पुढें आननिं ॥ बोले त्यांस सभाधिटासरि बरा बोधामृता लक्षुनि ॥ चेष्टावाससरी तयामधिं हरी सारा वदे हांसत ॥ आनंदास अनंत० ॥ ५ ॥ पाहूनी ति गरोदरी सति तिला पूसे असें आइक ॥ कां गे थोर बहू दिसें उदर हें ढोलासरी माफक ॥ बोधानें सुनिती गमे हृदयिं ती शांतीरुपां साजत ॥ आनंदास अनंत० ॥ ६ ॥ बोले ते सति तेधवां मुल तुरे खोटी कसी रीत हि ॥ चाळा कां तुज लागला कुनितिचा गोष्टी जुन्या फारहि ॥ देहातीत कसा मला तरि वदे नामांरुपां नासित ॥ आनंदास अनंत० ॥ ७ ॥ आहें मी प्रथमा गरोदर निजीं सेजे पतीपासुन ॥ संभोगासरसीच गर्भिण बरी आत्मीं निती सांचुन ॥ झाले आठजि मास ते तिन दिनी चौथा असे चालत ॥ आनंदास अनंत० ॥ ८ ॥ बोले तीस तदां हरी मुल तुझा ऐकें बरी साजणि ॥ कैसी झालिस तूं गरोदर पतीपूढें वदे साजणि ॥ पोटामाजिं तुझा बहू दुखत गे आहे असें वाटत ॥ आनंदास अनंत० ॥ ९ ॥ बोले आत्मनिवेदनी निज मुला ऐके खुळा ही रित ॥ जैसा तूं जननीस रे उपजसी त्याचे परीं ही गत ॥ जाणे पोटभरी उंगे बस तुं रे बोलूं[1] नको चावट ॥ आनंदास अनंत० ॥ १० ॥ योगी जे निजरूप तेजस असंगी या भवीं सागरिं ॥ इच्छा मारुनि कामिकी स्वतनुतें बोधावरीं सांवरि ॥ वाक्याला जपतो भला श्रिगुरुचा भावीक तो नेमित ॥ आनंदास अनंत० ॥ ११ ॥ आत्माराम पती असे तनु सती गर्भा धरी ॐबिज ॥ शांतीचा उदरांत हें मुळ उठे सोहंपणें

१ बोलवीत.

पारज ॥ वीवेकान्वयमास ते नव पुरे भक्तीरसें शोधित ॥ आनंदास अ-नंत० ॥ १२ ॥ वाढे गर्भ तदां सुनीत बिज तें ऐक्यान्वयां सारज ॥ पूर्णानंद सदोदितीं भरत तो ब्रह्मीं भुतीं तत्पद[1] ॥ वाढे त्वंपदिं[2] तो बरा निजसुरा पेटीं जसा पारद[3] ॥ आनंदास अनंत० ॥ १३ ॥ अष्टाभावर्नि मास दीन गुण ते गेले भरोनी भर ॥ न्हेते जीवन घागरीं भरुनिया शांतीधृती शारद[4] ॥ मंदीरीं ममता पती जननिती जाची बहू दर्षित ॥ आनंदास अनंत० ॥ १४ ॥ ऐकोनी मग तो हरी निजमुखें बोले तयें सुंदरि ॥ नारी गर्भिण तूं समे निति ति गे कर्तव्यकर्मीं बरि ॥ वाढे स्थूळ अभीनती मिपण तें संसारसा वाढत ॥ आनंदास अनंत० ॥ १५ ॥ खाणी त्वंपद तत्पदीं सरि असे वादा श्रुती रीतहि ॥ गेले थोर बुडो-निया करमटीं ऐक्यां नसे ठावहि ॥ आतां ऐक रिती तुला बरि मि ती सांगेन हीतीं हित ॥ आनंदास अनंत० ॥ १६ ॥ आतां पूढति गे मला रित बरी बोधान्वयें आजरिं ॥ निर्गूणीं धरि भाव शोधनरितीं कारा मिटी यां जरि ॥ पोटीं शोध विवेक तो अनुभवी लक्षीं असो घोळत ॥ आनंदास अनंत० ॥ १७ ॥ नारी गे पति मी बरा मुल नसे संसारना-शास्तव ॥ झाला हा निजध्यास फार दिनिंचा पोटीं धरी आठव ॥ कौ-मारी मजला भजे सतिपणीं जेथें नसे मीमत ॥ आनंदास अनंत० ॥१८॥ सोडूनी मितुं या पदां समभवामाजीं असे वागत ॥ मंदीरीं निजअंतरीं निज बरी सोडी जरां बोधित ॥ नव्हे तूं स्थुळ लिंगकारण असू माहा भुतें खेळत ॥ आनंदास अनंत० ॥ १९ ॥ माया ही असुरी भुली भ-वपुरीं संसारसारामृति ॥ भ्रांती हीच अनादिची गुणमिती रीती भ्रमाला भृति ॥ जाळें मोहमदां मनां गुतविते कांहींच नाहीं भित ॥ आनंदास अनंत० ॥ २० ॥ सख्या ऐक तुं आद्यसार[5] मुळचें संबोधना आत्महीं ॥ सारीसार नवांहुनी बहु बरें आरामनीरामहिं[6] ॥ ज्ञातीगोत नसे वर्णाश्र-मपदां ठावा उमेचा गित ॥ आनंदास अनंत० ॥ २१ ॥ मानीं मानसिं

१ परमात्मपद. २ जीवात्मपदीं. ३ पारा. ४ निर्मळ. ५ परमात्मा, कृष्ण. ६ सर्वो-पद्रवरहित स्थळिं.

मानवी तनु हि गे काळासरीं नासत ॥ यूगें चार तनूस भोगति निती ऐके तुजा मानित ॥ ब्रह्माकार जन्मिच तो कृतयुगां साक्षी पुरी बाणत ॥ आनंदास अनंत० ॥ २२ ॥ त्रेतायांत मुलापरीं मन सदां खेळीं बळें ध्यासित ॥ द्वापारीं मन वीकल्पीत तट तो जोरामधीं धांवत ॥ आनंदास अनंत० ॥ २३ ॥ वृद्धाप्यीं कलिभाव तो थरथरा कांपे तदां घाणित ॥ दृश्यादृश्य मिटो घटो गितरवें भामे[1] तुझें हें मत ॥ बुद्धी बोधानिं शांत तूं रमवि गे लोभासि तोडी हित ॥ आनंदास अनंत० ॥२४॥ सूधा ही नवशोभनी हित गती बोधां धरी त्यां सत ॥ घोळावा सततीं मनामाधिं हरीं नारायणीं वाणित ॥ थोरां लाभत लाभ हा बहु भला घोरां मिटीओ सत ॥ आनंदास अनंत० ॥ २५ ॥ नाहीं नाम मला रुपां सरि नसे भक्तीवरीं भासतो[2] ॥ प्रेमानंदिं वसे भवीं सतत गे भ्रांतीस सोडून तो ॥ नाहीं गेहिं जरा मला अजर मी दृश्यां नसे मानित ॥ आनंदास अनंत० ॥ २६ ॥ हें सारें जग अंतरीं वसतसे गूणार्थ लीला वसे ॥ गूणाध्यक्ष सुरासुरीं मत मि गे संगी परी ना असे ॥ भावीकां मननीं बसे अडकुनी सौख्यामृतें रांगत ॥ आनंदास अनंत०॥२७॥ शास्त्रें भांडति आपसांत भविं या घालोनि भूली मतिं ॥ वंशां वर्णिति, भाट हे झटवुनी पूराणकीर्तीमितिं ॥ वेदां पार नसे अनंत असती ब्रह्मा नसे जाणत ॥ आनंदास अनंत० ॥ २८ ॥ बोले या रितिं गे तदां मुल तुझा नारी बरी आत्मनि ॥ मीळे भावबळें मनामाधिं तदां गेला असू[3]धामनिं ॥ सारें गोकुळ या रितीं फितविलें संसार तोडी पुत ॥ आनंदास अनंत० ॥ २९ ॥ ऐशा रीतिं वदूनिया बसत ती बोधी जसी हो धृति ॥ एका ठायिं मिळोन शोभत सती शांती धृती वाणिति ॥ गाती पादसरोजभाव बरवा टाळावया संसृत ॥ आनंदास अनंत० ॥ ३० ॥ माता हेचि विदेहिनन्दवनिता चित्तांतरां नाक्षप[4] ॥ ऐक्या मेळणिं मेळती सगुण ह्या निर्गूण जें हो रुप ॥ शांती उन्मनि नीजरूपिं पसरे या हो भवां नाशित ॥ आनंदास अनंत० ॥ ३१ ॥ भक्तीभाव धरा बरा

१ सुंदरी. २ प्रकाशित होतो. ३ कपटी. ४ वेगळेपणा नाहीं.

त्वरित हो सारा रसाचा भर ॥ गोविंदा मदुसूदना नरहरी गोपाळ गोपी पर ॥ भ्रांतीला मिटि या मला वरद तूं दे रे मुरारी गत ॥ आनन्दास-अनंत० ॥ ३२ ॥ घेऊं हें जन कानपुरीं नवाविधिरसां साधोनि बोधामृतां ॥ सूखातें हरि दे तयांस घर तें ना काळ भासा रतां ॥ पूरे अर्थ भवामधीं सकळ तो इच्छेमधीं वागत ॥ आनन्दास अनंत मीळत तदां गोपालपाईं सत ॥ ३३ ॥ ॥ १९२ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचितनवविधगोपीकथायां ॥ आत्मनिवेदनविधी समाप्त ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

## भक्त्यनुक्रम.

१ अर्चनं २ दास्यं ३ स्मरणं ४ पादसेवनं ५ वंदनं ६ श्रवणं ७ कीर्तनं ८ सख्यं ९ आत्मनिवेदनं ॥ इति नवविधीअभ्यासपद्धति ॥

---

### अथ श्रीमदनंतसद्गुरुरचित.

# सुदामचरित्र.

## श्लोक.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ श्रीएकनाथाय नमः ॥ नमन करुनि भावें प्रार्थितों गूणईशा ॥ गणपति मति देईं तोडिं यां मोहपाशां ॥ करिं अजि करुणा गा दातया दीनबंधू ॥ सदयहृदय देवा तूंचि गा सौख्यसिंधू ॥ १ ॥ नमिन मि निज देवी शारदा चत्ववाचा ॥ सुरनरवरदा ती माउली शब्द[1]वाचा ॥ निजहितगुण गाया प्रेम दे आदिमाये ॥ सदपदसुजनांची कीर्ति गाया त्वरें ये ॥ २ ॥ गुरुपद नमुनीया याच रूपेंस्वभावें ॥ गुणरुप गुरुठायीं नाहिं हो याच भावें ॥ अजि वदनिं वदो ही प्रेमवाणी सुवाणी ॥ सुखकर रसगाणीं सज्जनांची शिराणीं ॥ ३ ॥ गहिंवर बहु दाटे भाविकांचे लिलेनें ॥ इहसम दुसरा तो कोण ना रीतमानें ॥ बहुनृपमुनि झाले संतसाधू भुमीं हो ॥ परि सरि नच याची नाम सूदाम जाहो ॥ ४ ॥ हरिसखप्रितिभावो भावना ब्रह्म

---

१ वैखरी.

भावी ॥ द्विजकुळगुरुरावो ऐक्यता जासि ठावी ॥ दिन हिन दुबळा हा लौकिकीं हो प्रपंचीं ॥ निजहिर्ति सदरावो देखणा हा विरंची ॥ ५ ॥ तनमनधन सारें ध्यास जा कृष्णजीचा ॥ अभिमति तनुमाजीं नाहिं गा सत्यवाचा ॥ स्वपर नच जयाला ठाउकें मानसातें ॥ गुरुपदचि अनंता भाव दे मानसातें ॥ ६ ॥

## इंद्रवज्रा.

नसे वस्त्र अंगीं तनू रोड झाली॥ नसे पोट तृप्ती क्षुधा आंत जाळी ॥ मुलें लेंकरें संतती फार होती ॥ परी संपत्ती नाहीं हो त्यांत शांती ॥७ ॥ असे ती सती फार सूशीलजाती ॥ दरिद्रामधीं तोषवी जी पती ती॥ नसे निंद्य वाणी सदां हास्यमूखीं ॥ पती कष्टतां होतसे फार दुःखी ॥ ८ ॥ समस्तां मिळोनी नसे एक वस्त्र॥ कशाचें तयां भोजना पाकपात्र ॥ मुळीं तीन आडीवरीं पांच वांसे ॥ कवाडे कशाला नसे चोरपीसें ॥ ९ ॥ ऋतू उष्णकाळीं बहू ताप सोसी ॥ शिरीं वृष्टि तैसी त्या दिनीं तीहि सोसी॥ बहू हाल ते वर्णितां दुःख वाटे॥ हरे दातया काय हें कर्म खोटें ॥ १० ॥ नसे ग्रामधामीं कदां भिक्षुकी ती ॥ नसे सोयिरा आप्त कोणी विपत्तीं॥ भुमीं भागिचें वेंचुनीया कणांतें॥ गलीतावरीं काळ लोटी बहूते ॥ ११ ॥ भरेना कदां पोट तें अल्पही गा॥ निराची असे फार ती हो सुगी गा ॥ पिऊनी जळां पीळ पोटीं नळांचा ॥ मुलें आक्रुषें होति तीं हीन-वाचा ॥ १२ ॥ सदाचारयोगें अशा आश्रमातें ॥ अतीथीपुजा पंचयज्ञादि होते ॥ करी आदरें थोर औदार्ययोगें ॥ अनंता मनींमानसीं हाचि वागे ॥ १३ ॥

## शुद्ध कामदा.

वदत ते सती आपुल्या पती ॥ हरि तुमां असे मित्र हो क्षितीं ॥ बहुत वर्णितां बाळकौतुकां ॥ ह्मणतसां बरा आपुला सखा ॥ १४ ॥ अजि मला सुचे स्वामि ऐक तें ॥ वदतसें तुमां हीत आमुतें ॥ सदन स्नेहि तो माधवो बरा ॥ अजि चला तुमी दर्शनां त्वरां ॥ १५ ॥ दिनदयानिधी नाम वर्णितां ॥ दिनपणामधीं तुह्मि शोभतां ॥ अजिं

चला कसे दैन्य हारितो ॥ बहुत तोषवी सर्वसाक्षि तो ॥ १६ ॥ बहुत संपत्ती देइ नीगुती ॥ हरिल आपदां दैन्यदुर्मतीं ॥ बहुत चांगलें आजि सूचलें ॥ पति चला त्वरें फार हें भलें ॥ १७ ॥ वचन ऐकुनी ब्रह्मभाव तो ॥ वदतसे तिला बोल खोल तो ॥ निगम मानसां लक्ष दक्ष तो ॥ अजि अनंतिं हा पक्ष मानतो ॥ १८ ॥

### शिखरिणी.

अगे प्रीये ऐकें मम हृदयिंचें मानस बरें ॥ कसें मित्रालागीं दिनपण कथूं योग्य न बरें ॥ मनीं निःकामाचा सदयपणिंचा मोड उगवे ॥ नसे दृश्याभागीं मति अभिरुची[1] जाण बरवें ॥ १९ ॥ कसें घालूं त्याला नरतनुगुणें संकट बरें ॥ बरें नाहीं हीतां अभिमति पदां आजि घसरें ॥ दुरूनीया घेऊं वदनिं बरवें नाम हरिचें ॥ नको जाणें तेथें अनुभवपणें भोग सुरुचे ॥ २० ॥ असे निःकामाचा हरिसख बरा स्वात्मभुवनीं ॥ सुखी राहें तूं गे गतिन रुप हे भोग धरणीं ॥ असें प्रारब्धीं जें लिखित लिहिलें भोग बरवें ॥ तसें भोगूं सूखें दिन ढकलुं हे जेविं परवे ॥ २१ ॥ क्षणेका वस्तीचें तनुपण असे मृत्युभुमिचें ॥ नसे याला कांहीं हित अनहितीं भेदपणिचें ॥ मनाचे हे धंदे सकळ भ्रमणा भ्रांतिपण गे ॥ अगे मोहाब्धीचें लहरिपण हें द्वैत मन गे ॥२२॥ निराधारें राहूं हुरहुर बहू मानसिं नको ॥ नसे दैन्या ऐसें व्रत महिवरीं प्रेमचि पिको ॥ विपत्तीचा वेळें भजन घडतें माधवजिचें ॥ असें माचें नातें धवपण मुरवां तेथ नरुचे ॥ २३ ॥ सदानंदीं प्रेमा हरिगुणकथासारमथिका ॥ मिळे शांतीठायीं अनुभवरुपें शोधक निका ॥ वदों सूखें मूखें रव हरिकथा रात्रदिन ही ॥ अनंताला गोडी जडत बरवी साक्ष सदही ॥ २४ ॥

### वसंततिलका.

कांहो पती निति असी वदता मला ही ॥ निःकामता जरि असे

---

[1] गोडी.

तुमचा स्वगेहीं ॥ निःकामयोगमतिनें हरिलागिं भेटा ॥ तोटा नसे किमपि तो उभयांत मोठा ॥ २५ ॥ जाणें बरें दिसतसे अजि द्वारकेसी ॥ मोडूं नका वचन हें मनि व्हाच खूषी ॥ सर्वांतरीं[1] सम हरी हरिभेटि होतां ॥ द्वारावती[2] अनुभवी निजसूख हीतां ॥ २६ ॥ आहे तनू सगुण ही भविं मानवाची ॥ जोडी नसे दुजि असी तिन लोकिं साची ॥ लीला हरी जिचि मुखें सगुणेक गावी ॥ शांतीपदां मिळविण्यां सद्[3]भेटि ध्यावी ॥ २७ ॥ स्वानूभवास समसाम्यस्वभाव भेटी ॥ भेटीविणा नच दुजें सुख येथ पोटीं ॥ साक्षीविणा अनुभवो हरिवीण भावो ॥ जैसी प्रजा नृपविणें अभिमानि देहो ॥ २८ ॥ कांताविणें सति जसी हरिवीण बुद्धी ॥ सिद्धी नसे तपविणा समवीण शुद्धी ॥ शांती पदीं हरिजिचा ह्मणुनीच भेटा ॥ नाहीं अनंतसदनीं किमपीहि तोटा ॥ २९ ॥

स्रग्धरावृ०

पाहे चित्तीं विचारी अनुभवचतुरी देव सूदामदेवो ॥ कांता श्रद्धा निजाची सतिपणनितिची दाखवी ऐक्यभावो ॥ जावें भेटी हरीचा सदपद गमिचा आगमा पैल पक्षी ॥ दक्षी लक्षी सुबोधी नच गम इतरां पंथ संतींच पक्षीं ॥ ३० ॥ कांतेलागीं वदे तो सति बहु बरवें द्वारके आजि जातों ॥ वाणीचा या रसानें रव मुखमुसिनें भाव चित्तांत येतो ॥ आहे येथें उणावा दिनपणसमयो काय भेटीस न्यावें ॥ साक्षात्कारीं समोघीं हरिकरिं बरवें आदरें काय द्यावें ॥ ३१ ॥ जाऊं कैसा तरी मी रित उचित नसे रिक्त पाणीपणाची ॥ बोले आतां प्रिये तूं रुचिकर तुजला वाटतें आजि तेंची ॥ आहों आह्मी प्रपंची तनुमन करुनी साधनीं आगमाचा ॥ पाहें पाहें निवाडे बहु अवघड हे बोल गे सत्यवाचा ॥ ३२ ॥ सूचे कांते तदां ते शुचिमति श्रुतितें पाहणें आजि पाहें ॥ साधूपाशीं त्वरेनें पदर पसरुनी मागते स्वल्प पोहे॥ द्यावे आजी सबोधें सुजनसममदें काम हें आजि माझें ॥ न्यावें सिद्धी

---

१ आत्म. २ स्वानंदपुरी. ३ परमात्म.

त्वरेनें सद्पद्वद्नें मानणें नाच बोजें ॥ ३३ ॥ आणी मुष्टी गुणाचा तनमयपण[1] तें साधनीं साध्य झालें ॥ सूखालागीं जमावो गुण पृथकपणें हे पृथू येथ झाले ॥ गेलें दूरीत सारें प्रथम शकुन हा थोर भाग्येंचि झाला ॥ जोरा होई गुणानें सकळ कळपणें खोल हा बोल आला ॥ ३४ ॥ निर्वीकारीं गुणाची गरज नसतसे प्रत्ययीं वेगळें तें ॥ साकारीं[2] गूण बाहे पृथक पृथुपणें जाणती जाणते ते ॥ कार्याकर्मीं गुणाची बहुत सुगमता भक्तिगूणेंचि पाहे ॥ भेटीलागीं अनंतें सुगमपणमतें जोडिलें शब्द जोहे[3] ॥ ३५ ॥

## भ्रमरविलसित.

पोहे आणी तिन मुठिभर ते ॥ सेजाराचे बहु गुण वद्ते ॥ पांचाठायीं झटपट करुनी ॥ आली हो ती पतिप्रति सद्नीं ॥३६॥ स्वानंदाची सुगि बहु वद्नीं ॥ संतोषाची घडि मनद्मनीं ॥ बोले कांताप्रति सति बरवी ॥ ध्यावे स्वामी पृथु भय हरवी ॥ ३७ ॥ बांधायासी नच पट घरिं त्या ॥ पाणीपात्राविण अनुकुळ त्यां ॥ नाहीं कांहीं धड घरिं चिंदि ही ॥ दुर्भिक्षाची मुकुट पदवि ही ॥ ३८ ॥ बाणा गूणी मळकट चिंधिया ॥ गोळा केल्या सद्सुत समया ॥ गांठोडी ती नवविधठिगळी ॥ बांधायाला सुत नच सबळी ॥३९॥ गुंडाळीलें लटपट करुनी ॥ शामाभेटी सद्पदमथनीं ॥ संतोषानें मग द्विज वद्तो ॥ जातों आतां पथ बहु दुर तो ॥ ४० ॥ मूलेंबाळें तुजि तुज जवळीं ॥ सांभाळावीं निजप्रिति कवळी ॥ रात्री भागीं भरभर सगळी ॥ प्रातःकाळीं द्विजगण[4] रवळी[5] ॥ ४१ ॥ प्राप्ती बोधां अनुभव समयो ॥ भानूआदीं अरुणचि उदयो ॥ साधी मुहूर्ता विनय समज हा ॥ हाची आहे फलरुप पद हा ॥ ४२ ॥ चाले चाली स्थिरपणि गतिची ॥ चित्तीं चिंता अभिमति नसुची[6] ॥ अनंताला तळमळ मुळची ॥ गोडी मीळे अनुभवकुळिची ॥ ४३ ॥

---

१ तदाकार भाव. २ देहीं. ३ प्रणिपातरूप. ४ पक्षिसमुदाय. ५ किल्किलाट शब्द. ६ नसोच.

### स्वागता.

यदुपती पदिं हेत ठेवुनी ॥ द्विज तदां धरि मार्ग शोधनीं ॥ शकुन ते बहु चांगले तदां ॥ प्रथम कामिनि शीरिं त्या पदां ॥ ४४ ॥ नव घडा भरुनी जलें बरा ॥ समुर येत असे बहूत्वरां ॥ मुल कडेवरिं हो सुवासिनी ॥ वदतसे कुमरा तुं रे धंनी[1] ॥४५॥ सकळ देइन रे तुला घरीं ॥ सुखि असे घडि येक रे बरी ॥ द्विजमनीं रव हेत ऐकुनी ॥ बहुत तोषतसे स्वआसनीं ॥ ४६ ॥ पुढतिं तासहि वाम जाति ते ॥ बहुत लाभ शकून दाविते ॥ कळप धेनु समूर पातला ॥ अनुभवो समजे निमातुला[2] ॥४७॥ क्रमित पंथ पुढें सुदामजी ॥ सदय मानस साधु हाच जी ॥ वदतसे हरिनाम आननीं ॥ बहुत मंजुळ येतसे ध्वनी ॥ ४८ ॥ पदपदीं स्मरतां यदूविरां ॥ घडतसे मख हा समीं बरा ॥ ह्मणुनिया भविं या अनंत हा ॥ स्थुळरुपें नटला गुणाव हा ॥ ४९ ॥

### चामर.

प्रेमभाव ब्रह्मराव देहनांव द्वारका ॥ आद्य देश साधुभेष साधनाख्य साधकां ॥ संत हा सुदामदेव ब्रह्मनिष्ठ मूळचा ॥ भावभक्ति सांख्य[3]युक्ति नीजशक्ति कूळिचा ॥५०॥ सर्व कर्मसिद्धि अर्थ साधनार्थ साधिलें ॥ स्वानुभाव प्राप्त जेथ दृश्य अर्थ आटले ॥ गूणमुष्टि ऐक्यग्रंथि कर्मतंतुसाधनीं ॥ बांधुनीच पोंचले जि बाह्यदेश चालुनी ॥ ५१ ॥ नंदनंद नीजकंद[4] भावछंदिं ऐक्यता ॥ भक्तिजोर जेथ थोर नाहिं घोर ये हितां ॥ आननीं अनंत हा अनंत नाम गायि रे ॥ संतसाधुपादपद्मिं भाववृत्ति ताजि रे ॥ ५२ ॥

### शार्दूलविक्रीडित.

पूरी द्वारवती निती निगम ती नेती वदे वेद ती ॥ गूणातीत अतीत बोधकमती शब्दां नसे वाच्य ती ॥ बोलूं बाह्यदशां वनांउपवनां मूमुक्षुचा साधनां ॥ ध्या कानावरिं आमना मन जनां शांतीपदां साधनां ॥ ५३ ॥ आहे हा गड बोधिचा निज धडा वाडा निवाडा

---

१ शांतहो. २ बळावला. ३ परमार्थ विचार. ४ परमातम.

मनां ॥ प्राणापानसमानव्यान रमती ऊदान ऐक्यीं वनां ॥ स्वानंदें सततीं वसंत ऋतु हा राहे बरा काननीं ॥ संतांचीं सद मानसें स्फुरति तीं कोकीलकंबूध्वनी ॥ ९४ ॥ गाती सुस्वर गायनीं हरिकथा शोधानुभावां निती ॥ नीती पाहुनि नारदादिकमुनी संतुष्ट होती मतीं ॥ बोधाचा अरुणोदयो सममनोभावोप्रभा संभवे ॥ प्रेमाचीं कमळें सरोवरिं भलीं अष्टादळीं [1]ताटवे ॥ ९५ ॥ प्रेमाचे मकरंदसेवित बरें जाती अलीषड्पदी ॥ मूमुक्षुभ्रमरें अमोदरस तो सेवीत रुंजी मदीं ॥ रुंजीचा रव रौरवां मिटविण्यां कानीं धरी रे धण्या ॥ लीहीलें निजकागदीं अनुभवीं [2]गूंजामृतां बोधण्यां ॥ ९६ ॥ रावेमोर [3]गिंडावरीं बसुनिया ठावो रवो माधवो ॥ वीचारान्वयसांख्यशास्त्र सद ते शाखेवरीं संभवो ॥ नाना जाति तरू बरे सरळ ते जाती अनेकां नितीं ॥ फांदेपल्लवमंडणीं विलसती वायूगुणें डुल्लती ॥ ९७ वृक्षीं माधवि वेष्टुनी विलसते बुद्धीगती सुक्षमी ॥ गेल्या भेदुनि मानसां नवविधी कर्मींच त्या आगमीं ॥ रंगें शाम सुवासदायक फुलें आलीं भरां आभरें ॥ शांतीची सद साउली पसरली मध्यें समोघीं झरे ॥ ९८ ॥ कांटे ना गिड ते धडे निजगडे स्थीरांश ते शोभती ॥ आंबे नारळि फोफळी करदळी पारीजते शेवती ॥ द्राक्षाचे घड पीकले रसभरें पाके परीपक्व ते ॥ गोडीही बहु गोड स्वानुभव ते घेती चवी जाणते ॥ ९९ ॥ ऐसें हें वन द्वारके समिपचें संतोषदातें मनां ॥ सूदामा मनिं पाहुनी हरिखला [4]नौवेक हो आमना ॥ शोभा पाहत पूढतीं चलतसे द्वारावतीलागुनी ॥ नाहीं वर्णन आननीं घडत हें साक्षी अनूभावनीं ॥ ६० ॥ पोंचे ब्राह्मण द्वारकें तदुपरीं ऐकें मना पूढतीं ॥ नीतीचें घर हें सबोधकसणी ज्ञानास येथें गती ॥ खाणी नीगम खाणुनी अनुमतें हीरे जडीले गितीं ॥ नाथाचे सदनीं अनंतमतिनें चित्रेवळी लेप्यती ॥ ६१ ॥

---

१ ओळी, पंक्ती. २ स्वानंद. ३ सफळित वृक्षावर. ४ क्षणिक.

**वसंततिलका.**

द्वारावतीप्रति तदां द्विज पावलासे ॥ द्वारावरीं चवथिया दिनभावर्वेषें ॥ पारेकरी हुजुरचे मत जा पुकारी ॥ तूं कोण कोठिल द्विजा दिससी भिकारी ॥ ६२ ॥ सूदाम देव वदनीं मग तो स्वभावें ॥ भांबावुनी वदतसे हरिबंधुनांवें ॥ आजीं हरीस कळवा तुम्हि जाउनीया ॥ सूदामनामक असे सदब्रह्मकाया ॥ ६३ ॥ भेटीस येथ बहुवेळ उभा असें मी ॥ नीरोप मात्र कळवा हरिलागिं धामीं ॥ येईल धांवुनि सखा दिनबंधु माझा ॥ गांजूं नकां अजि तुमी नच अंत काजा ॥ ६४ ॥ ऐकोनिया द्विजमुखें रव या रितीचे ॥ हांसें बहू भरतसे जनमूखवाचे ॥ गाती कपाळ हरिचें मग ते शिपायी ॥ हीणाविती सकळही दुषणावघायी ॥ ६५ ॥ कोठें तुला दडविलें दिन येवढे हो ॥ झाला असे उदयकाळ बरा अजी हो ॥ आली दया मग तयां कळवीत मातू ॥ सायोज्यता पद समोघ मनोघ हेतू ॥ ६६ ॥ देवाधिदेव सहजासनिं बैसलासे ॥ स्वानंदकंद मनमोहन शाम दीसे ॥ माळा अपाद रुळते मणिकौस्तुभाची ॥ लावण्यदीप्ति उदयो समता प्रभेची ॥ ६७ ॥ वीशाळ नेत्र सहजीपण देखण्याचे ॥ आपापणा रिजविणें गतिं ऐक्यतेचे ॥ वंदोनिया जलधिजापतिचा पदातें ॥ वर्णीत ते मग शिपायि सुदामजीतें ॥ ६८ ॥ स्वामी अजी दिन बहू हिनकांति देहो ॥ सूदाम नाम वदतो ह्मणतो सखा हो ॥ बंधू असें हरिजिचा असि वाणि बोले ॥ कानीं पडे तंव हरी भुमिभागिं आले ॥ ६९ ॥ झाली बहू गडबडी मग देवरायां ॥ माया बहू दिनजनीं करितो उपायां ॥ आजी अनंतसदनीं द्विज पोंचलासे ॥ भावी अनंतदिन हा सुखभाव खासे ॥ ७० ॥

**विबुधप्रिया.**

धांवुनी पद वंदिले निजमस्तकीं सद प्रेम ते ॥ कृष्णजी बहु नाटकी मिठि घातली दिन मानिते ॥ भाविकां प्रतिपालनां हरिसारिखा दुसरा नसे ॥

देतसे मनिं मानिते निजसेवकीं प्रिति फारसे ॥ ७१ ॥ आदरें द्विज आणिला निजमंदिरीं बहु कौतुकें ॥ वाजती बहु ढोल ते सनया तशा करणे तुकें ॥ नाचती बहु अंगना धृपदें समींरव केकिचे ॥ तालछंद सबोधनीं सम ऐक्यतें गतिं आत्मिचे ॥ ७२ ॥ आसनीं बसवूनिया सद ब्राह्मणां प्रिति भावनीं ॥ नम्रतें कर जोडुनी जनबंदिसा हरि होउनी ॥ वीनवी बहु लाघवी मधुरोक्तिनें द्विजराजयां ॥ भाग्य हें मम आज गा उदयासनीं तव पायिं या ॥ आज हो बहु लाभ हा दिठिं देखिलीं तव पाउलें ॥ माउले बहु चांगले मनिं रूचलें सद प्रेमळे ॥ ७३ ॥ नाहिंगा जगिं आणि तो तुजसारिखा दुसरा सखा ॥ देखणा निजआत्मतें समसाधनीं तुळणे तुकां ॥ भाविका गुणसात्विका निढळाकृती तुझि ही लिला ॥ ऐकण्यां मन धांवतें गड प्रेमिचा नव गोडिला ॥ ७४ ॥ बोलुनी असि वाणि ती हरि बैसले समिपासनीं ॥ नाहिं गा हरिलागिं या उपमा महीं बहु शोधनीं ॥ भावची समऐक्यता मनिं पाहिजे हरि देखण्यां ॥ ऊपमा नच साक्षिची अनुभावनीं चवि रे धण्या ॥ ७५ ॥ सेवकां पादिं बैसवी बहु तोषुनी बरवा हरी ॥ भाविकावरि प्रेमता सुखसिंधुची लहरी सरी ॥ भक्तिचा निज दादला यदुकूळिंचा धणि माधवो ॥ हा अनंत मनामधीं दिनरात्र हो हरिसंभवो ॥ ७६ ॥

## दिंडी.

तदां आल्या कामिनी कृष्णजीचा ॥ प्रभा फांके मंदिरीं ऐक्यतेचा ॥ प्रथम आल्या फार त्या सहस्रसोळा ॥ श्रुती वेदांजवळि त्या होति गोळा ॥७७॥ तयापाठीं मागुनी महासिद्धी ॥ येति शांती अनुभवीं ऐक्यबुद्धी ॥ जणी अष्टा स्वानंदकारणी त्या ॥ हरीलागीं मिळणिचा नित्य होत्या ॥ ७८ ॥ झालि गर्दी मंदिरीं सर्व गोळा ॥ सुदामा तो गडबडे विप्र भोळा ॥ सकळ त्या हो लाविती डोइ पायीं ॥ सुचेनाची तेधवां द्विजां गेहीं ॥ ७९ ॥ कोणि घेती तीर्थ तें भावभक्ती ॥ कोणि पुष्पें वोपिती विविध

२ आत्मभावीं. ३ मयूराचे.

जाती ॥ कोणि भाळीं लाविती चंदनाला ॥ कोणि नेत्रीं पाहती ऐक्य-लीला ॥ ८० ॥ ब्राह्मणाची दृश्य ती बुद्धि धाली ॥ स्वानुभावो प्रेमता दृष्टि झाली ॥ देहगेहीं हेत ना ब्राह्मणाचा ॥ वाच्यवाचा परादि शांत साचा ॥ ८१ ॥ गेलि ममता टाकुनी दूर गांवां ॥ चित्त धालें अंतरीं ऐक्यभावां ॥ वदो तेव्हां विसरला बाह्यवाणी ॥ गूणतूटी जाहली अति-तवाणी ॥ ८२ ॥ ऐसि बाणे साक्षांतकारिं साक्षी ॥ अंतरिक्षीं दक्ष तो पक्ष लक्षी ॥ अनंताला लाधली येथ गोडी ॥ साक्ष देण्या अनुभवीं खूण थोडी ॥ ८३ ॥

## वसंततिलका.

ऐशा रितीं सकळ त्या हरिचा सुदारा ॥ भेटोनि वंदिति बहू सद त्या उदारां ॥ स्नानास नीर मग तें बहु आणियेलें ॥ घंगाळ रत्नखचितीं मधिं ओतियेलें ॥ ८४ ॥ गंगोदकें भरुनिया घट हेमपात्रें ॥ स्वासीक चंदन बरें निळरामपात्रें ॥ तेलें सुवासिक बरीं दवणागुलाबी ॥ जीं काढिलीं निजमुसींतुन थेंबथेंबीं ॥ ८५ ॥ चौरंग मांडुनि बरा वरि द्वीजराणा ॥ आणोनिया बसविला हरिनें प्रमाणां ॥ लावीयलीं प्रथम तीं सकळीक तैलें ॥ धूलें तसें पट बरें बहु जीर्ण मैलें ॥ ८६ ॥ अभ्यंगस्नान स्वकरें मग देव घाली ॥ खोली असे बहुत येथ रसाळ बोली ॥ जो तापला अनुतपें बहु काळ भारी ॥ वैरा-ग्यशील सदशोधन हीतकारी ॥ ८७ ॥ झाले बहु श्रम तयां हरि याच हेतू ॥ उष्णोदकें करुनिया श्रम हारवीतू ॥ आधीच भाविक स्वभाव मतींत भोळा ॥ सूदामनाम बरवें ह्मणुनीच बोला ॥ ८८ ॥ चोळीत पाठ उरपोट करें करूनी ॥ चूरीयलें पद बरें निज हेतमानी ॥ नाहीं मळी अमळता मुळचीच देहीं ॥ झाला ह्मणोनि हरि हा स्वसुखास स्नेही ॥ ८९ ॥ पूसीयलें सकळ अंग पितांबरानें ॥ वस्त्रें दिलीं बहु बरीं नववीधमानें ॥ न्हेसोनिया पित पटां उपवस्त्र सेला ॥ संतोषकारक मनां बहु होत त्याला ॥ ९० ॥ आणीयलें मग पुढें निजमंदिरातें ॥ स्वानं-

दभूवन बरें हरि भावनातें ॥ केली पुजा विधिरुपें सदवासुदेवें ॥ गंधाक्षता धुपदिपादि स्वभावभावें ॥ ९१ ॥ नीराजनें दिप बहू समया जडावी ॥ फांके प्रभा चहुं दिशें बहु ही नवाई ॥ मांडोनि पाट बरवे समअष्टभावो ॥ ताटें जडीत जडणी रस आत्मभावो ॥ ९२ ॥ रांगोळिया सरळ झोंक समोघ वेली ॥ चित्रें विचित्र कुशलावन-वाव बोली ॥ पंक्ती तदां बसविल्या विर यादवांचा ॥ जो आत्मबोधकमती असल्या विरांचा ॥९३॥ घेती मधीं द्विजवराहरि त्या समीपीं ॥ जो कौस्तुभांकित असे घननीळरूपीं ॥ पाहे अनंत सकळां प्रितभावमानें ॥ गोडी अनंत मतिला निजभक्तिमानें ॥ ९४ ॥

## शार्दूळविक्रीडित.

अन्नें वाढित शांतिचा करतळीं मुक्ती बऱ्या चौघिही ॥ दावी भाव स्वभाव सादरजना नामामृतें जोड ही ॥ आणी त्या नववीधभक्ति बरव्या ज्ञानामृतादायिनी ॥ आधीचा बहु वृद्ध ह्या सदगुणी बोधालयीं वासनी ॥९५॥ शाखा वाढित फार त्या बहु तरा भेंडे मुळे दोडकीं ॥ नाहीं वावडिं अंतरीं बहु बरीं पुष्टीकळा जोडकीं ॥ केळीं कारलिं बावचा फणस ते आणीक तीं वांयगीं ॥ रांधिलीं सगळीं अती रसिक हीं सोहंसुखा वानगी ॥ ९६ ॥ आंब्याचीं नव लोणचीं खिसमिसी कोशिंबिरी रायतीं ॥ नाना पापड सांडगे मिरकुटें क्षारादिकें तीक्ष्ण तीं ॥ मांडे घावण पोळिया क्षिरि तशा लाडू बहूतांपरी ॥ सूरोळया गुळपापडी पुरि वडे आपूप[१]-लाडू वरी ॥ ९७ ॥ दुग्धाचें बहु रायतें भरुनिया वाट्या पुढें ठेविल्या ॥ कानोले बहु चांगले मुरडिचे आणी जिलोब्या भल्या ॥ येलापेहिट सांदणें उकडिचीं रोट्या शिरा शिघ्रणी ॥ स्वादाची कुसरी चवी अनुभवी आहे वरी मंथनी ॥ ९८ ॥ सांबारीं कथिका[२] पनें बहु रुची कारे असे आजरीं ॥ वारीजाक्षघरीं नसे उणिवता अभ्यंतरीं ही सरी ॥ सोहं सुक्षम भात तो नृप असे भोज्यासनीं श्रेष्ठ ते ॥ वेळोनी बहु चांगला सुमनसा मध्यें

---

१ अनारसे. २ कढी.

मुदी ऐक्यते ॥ ९९ ॥ केला साखरभात केशरगुणें गोडी हरी जाणता ॥ पंक्तीचें बहु भाग्य हें नवविधी भक्तीगुणें ये हितां ॥ वाढीलें वरितें वरान्न पिंवळें दाटे मुदीचावरीं ॥ तूपें साजुक त्यावरीं पळिपळीं वाढीयलें सौभरीं ॥ १०० ॥ अन्नें शुद्ध घृतें मनें हरिगितें भावें तनू शुद्ध ही ॥ गोडी येथ बरी असे कुसरिची जेवी तयां ठावही ॥ वैराग्यें अनुतापले अनुदिनीं ज्ञानोदया पोंचले ॥ दृश्यांचें[1] खटलें तदां मिटुनिया बोधाब्धिला जोडले ॥ १०१ ॥ तेथें द्वैत सरे भरे सदयता ऐक्यान्वयो आभरे ॥ स्वानंदें मग भोजनां बसवि त्या हा हो हरी सौभरें ॥ भावें शोध करा घरां निजपुरां सारा धरा मावरां ॥ वारा ताप तपा मनीं अनुभवें जोरा करा रे नरा ॥ १०२ ॥ ऐसें हें हरिपंक्तिचें षडरसें जेवा बरें अन्न तें ॥ टांकोनी ममते सरा हरिघरीं सूदामपंक्तीसतें ॥ फूकां जन्म नका गमावुं उगिं हा लावा पदीं सार्थकीं ॥ वार्धक्यीं नच काम हें घडतसे बुद्धी तधीं भ्रांति कीं ॥ १०३ ॥ सर्वां मागुनि वाढिलें मिठ बरें पात्रें तदां पूर्ण तीं ॥ सर्वां स्वाद असे ह्मणोनि वरि हें वाढावयाची रिती ॥ जैसें वाक्य गुरूमुखें अनुभवां देते चवी अंतरीं ॥ बाणे बोधखुणें उणेपण नसे सद्भाव पात्रांतरीं ॥ १०४ ॥ शांतीचे सदनीं मती रमणुके जाई तधीं हें कळे ॥ स्वानंदें मग भोजनां बसति ते येकाग्रतेचे बळें ॥ जेवीतां नच कोण तेथ बहुसें पूरे ह्मणे आननीं ॥ वाढी जेथ रमा समानपणतें चिच्छक्ति ही साधनीं ॥ १०५ ॥ पट्टाची वनिता अनादि सरितातताचि ही कन्यका ॥ आका शंखजिची सकामभुलि हे नव्हे बरें साधका ॥ दैवीसंपति अष्टभावि बरवी नव्हे असूरीभुली ॥ बुद्धी जी दिनरात्र कृष्णचरणीं स्वानंदतें शोभली ॥ १०६ ॥ श्रद्धाभूक निमे स्वसूख तधिं तें देती बरे ढेंकरां ॥ जेवीले हरिपंक्तिला इहरुपीं आरामता आभरा ॥ संवेची मग आंचवोनि बरवें संसाररूपीं जलें ॥ केलें हो करक्षाळणादिक तधीं गूणास सोडीतलें ॥ १०७ ॥ झालें यारितिं येथ भोजन बरें चिंता मनाची हरे ॥ वारें काम समूहता दुरि

---

१ देहभावाचें.

लपे शांती स्वदेहीं भरे ॥ गेलीं तीं दुरितें सकोपमति गा गातां अजाती हरी ॥ नाथाचे पदिं हा अनंत मिळला केले असे आजरी ॥ १०८ ॥

## दोधक.

हिंमतवाले चित्तिं निमाले ॥ संसृति[2] धाले[3] बोल अबोले ॥ पानविडे ते मानस हेते ॥ कर्पुरकातें सौम्यचि नातें ॥ १०९ ॥ वेळलवंगा फार सवंगा ॥ अर्थ समोघा भावचि ओघा ॥ बोध सनातें पूगिफलातें ॥ जाइफळादी पूर्ण सुहेते ॥ ऐक्यसुरंगी रंगत रंगीं ॥ लाल सुलाली लालितवंगी ॥ ११० ॥ देत हरी जी भक्ति वरी जी ॥ प्रेमरसाला शक्ति सुताजी ॥ छंद अनंती शोधक मत्ती ॥ सर्वहि सत्ता या भगवंतीं ॥ १११ ॥

## पद.

भेटि श्रीकृष्ण सुदामजीची ॥ अंतरभावबळें ॥ ध्रुव० ॥ सुमन सेजें एकांत ॥ वरीद्विज तो निभ्रांत ॥ पुसतसे हरी मात ॥ परमएकांत जाणोनी ॥ १ ॥ भे० ॥ आहे सुखी कीं मम वहिनी ॥ भाव भक्तिची भगिनी ॥ कांता तुमची जी सदनीं ॥ आदि वदनीं सांगाहो ॥ २ ॥ भे० ॥ सुशील जीचा स्वभाव ॥ नाम ठेवाया न वाव ॥ शांतीसुखाचा जो ठाव ॥ प्रेमभाव भेटवी ॥ ३ ॥ भे० ॥ संतति संपति घरदार । वृत्ति भुमी नृपाधार ॥ सांगा सर्वही सारासार । कालोद्धार[4] कैसाहो ॥ ४ ॥ भे० ॥ बहुभाग्यें तुमची भेट । झाली सन्मुखही थेट ॥ भक्तिभावाचा हा नेट । अहंब्रेट[1] तोडुनी ॥ ५ भे० ॥ ऐकुनी बोले सुदामदेव । साक्षी तूंची स्वयमेव ॥ त्रिजगतीं तुझी ठेवें[5] ॥ देवाधिदेव अनंताचा ॥ ६ ॥ भेटी० ॥ ११२ ॥

## कामदा.

ऐक कृष्णजी सर्व जाणत्या ॥ काय सांगणें खूण बाणत्यां ॥ सर्व

---

१ अहंकार धारणकरणारे. २ देहीं. ३ तृप्त झाले. ४ कालक्रमणा. ५ आकार; बांधा.

भाव हा हेत तूमचा ॥ येथ ना दुजा लक्ष दक्षिचा ॥ ११३ ॥ संतती असे अष्टवर्गिती ॥ संपती दुरी आमुतें भिती ॥ तीन काळ गा सर्व काळते ॥ नांदती घरीं ऐक्य त्या मतें ॥ ११४ ॥ नाहिं भिक्षुकी वृत्ति भूमिका ॥ दीनलीनता कर्मिचा सिका ॥ वस्त्रहीन गा शीत सोसणें ॥ दुःख होतसे बाळकांगुणें ॥ ११५ ॥ फाटका असे एक तो झगा ॥ गांठि दीधल्या वेदमाप गा ॥ त्यांत तीं मुलें लेकलेकि त्या ॥ झोंप घेति गा सार जाणत्या ॥ ११६ ॥ भ्रांतिचें नसे लेश वस्त्र तें ॥ लौकिकीं सती नाच जाइ ते ॥ लाजुनी सदां मंदिरीं असे ॥ फोड फूटकी हेम तें नसे ॥ ११७ ॥ नाक ऊघडें पोट बांधिलें ॥ ओंठ वाळुनी गाल बैसले ॥ चालतां पथां झीट येतरे ॥ सूखवीषयीं पत्नि हेतरे ॥ ११८ ॥ कष्ट ते भुमीं धान्य वेंचुनी ॥ मान्य वेद तें कर्मशोधनीं ॥ यज्ञ आहुती पंचभौतिकीं ॥ त्यांत संतती आणि पांथकी ॥ ११९ ॥ काळकर्मणा वर्म यापरीं ॥ काम मूषकू सोडि कोठरी ॥ वासना घरीं मांजरी नये ॥ नाहिं भक्ष त्या प्रांत ऊभयें ॥ १२० ॥ वाट ना मळे पाय चालिची ॥ चाल एकली पादद्वैतची ॥ येत जात ना तेथ झोंपडी । ल्हानसी असे गांव ऐलडी ॥ १२१ ॥ कोण नेणती ज्ञात आमुची ॥ दैन्यवेळिं ना आप्त कोणिची ॥ तोंड ऊघडें नेत्र चौं दिसे ॥ मार्ग लक्षिती पोट-जाळसे ॥ १२२ ॥ हायहायरे हायदातया ॥ काय पूससी देह मानया ॥ बाळस्नेहि तो भाव जाणसी ॥ मान ऐक्यता सर्व लक्षिसी ॥ १२३ ॥ दैन्य पंथिचा देहदीप हा ॥ येथ पातला देख पंथ हा ॥ हे अनंतजी माय लाघवी ॥ साक्षि देह हा तूंचि गा कवी ॥ १२४ ॥

## पद.

ऐकुनी दिन हेत वाणी । देवतो सद्गदे । नेत्रींचा जलसमोघें स्पष्ट ते भाव दे ॥ ध्रु० ॥ सदयघन करुणेचा । हा हरी मूळचा । भक्तिभावें वश होई । प्रेमळा कूळिचा । नामरूप यां नाहीं वाच्यतें साक्ष दे ॥

---

१ आत्मता.

ऐकु० १ ॥ कृष्णजी मग त्या बोला ब्राह्मणालागुनी । ऐक्यमम हेत आतां । कान ते ठेवुनी । अनंताची बुद्धी भक्तीला भाव दे ॥ ऐ० २ ॥ १२५ ॥

## पृथ्वीवृ.

अगा द्विजवरा गुरू जगतिचा खरा तूंचिगा ॥ नभांतरिं दुजा नसे तुळणिला तुची एक गा ॥ मला तुची सगा दगा इतर तो भुमीभागिं गा ॥ सदां नमन पाउलीं करित मी मनां हो सगा ॥ १२६ ॥ मला अजि बरें स्मरे हृदयिं ते अगा खेळते ॥ मुलांमधिल आठवे द्विजवरा बहु खोलते ॥ गुरूघरिं तिघे अमी वसतसों तदांची रिती ॥ आठवे बहुत गा मनामधिं सदां दिवारात ती ॥ १२७ ॥ गुरू सतिरवें वनामधिं सख्याकडे वांकडें ॥ बहूश्रमुनिया शिरावरि धरूं मुळी लांकडें ॥ सडे उतरुनी तळांप्रति घरीं बरे येतसों ॥ तदां घन बहू पडे चहुं दिशें विजे भीतसों ॥ १२८ ॥ भिजोनि सगळे वटातळवटीं जरा राहिलों ॥ तधीं मम शिरावरी मुळि असे बहू भागलों ॥ अगा सदय मानसा किति तुझा मनाला ळळा ॥ वसे ममविरवीं वदों किति मुखीं स्वभावांबळां ॥१२९॥ शिरावरिल लांकडें तुवां उतरलीं अधीं आपुल्या ॥ मला हलधरासही उतरुनी करें आपल्या ॥ बरा मम शिरीं तुवां धरियला स्वताचा पटां ॥ तुवां भिजत राहसी द्विजवरा वटाचा तटां ॥ १३० ॥ श्रमां हरविण्यां रमा न बरि ती समीं आपुल्या ॥ तमा हरविण्यां वमातवतनू दुजा केतुल्या ॥ वसों व्रजपुरीं गडेसहित गा वनां जाउं ते ॥ सदां वळवुं गोधनें मनसुगोठणीं विचारामतें ॥ १३१ ॥ मला बसवुनी गिडातळवटीं सुबोधाचिया ॥ कदंब यमुनातटीं मतिचिया करूनी दया ॥ वनीं फिरसि तूं खडे रुतति तैं पदीं ऊघड्या ॥ कड्यावरुनिया सड्यावरि त्वरें तुवां रे गड्या ॥ १३२ ॥ वळोनि मग धेनु त्या भरदुपारचा पारिं गा ॥ अगा मज समीप आणुनि तुवां रहासी उगा ॥ सिदोरिशिकिकांमळी तुझि तुझाकडे रोज ती ॥ गती अनुभवाप्रती निज-

निती असे या गिर्ती ॥ १३३ ॥ तुला भिड बहू न बोलसि मुखें कधीं ना असे ॥ सकामशमनास ती सदयता मतीं हेतसे ॥ अमी सकळ ही बसूं गमतिनें तुला रे वनां ॥ सुगोधन वळावया श्रमवुं फार खातें मनां ॥ १३४ ॥ तसें तव रुपीं तमोगुण कधीं रजाची कळा ॥ अगा अमल-सात्विका सरळ ही तुझी गा लिला ॥ अगा तुजप्रती बहू हिणवुं तें सदा खातसे ॥ मनां जडलि ती सदां हुरहुरी नसे जातसे ॥ १३५ ॥ अजी कितिक आठवूं गुण तुझे सदाचारचे ॥ अपार सदमानसा पयनिधे मला ना सुचे ॥ गुणातित तुं गा मनां शमनता सुदामाकृती ॥ सुदाम-समता असीपदमतीं गती ही हितीं ॥ १३६ ॥ असे बहुत नाटकी वदतसे स्वसूरवासनीं ॥ धनी जगतिचा हरी निगम हा सुदासां मनीं ॥ सुबोधक कळामळा भुमिवरी कथा गोड ही ॥ सई करि अनंतनाथमुखिंची पढोनी वही ॥ १३७ ॥

## शार्दूलविक्रीडितवृ०

आले बोल सखोल नीगमचवी गोडी असे फाररे ॥ बोधाचे सडके-वरोनि चलतां दृष्टीं बरें येत रे ॥ जासी हींमत फार ती अभिमती त्यातें नसे ही चवी ॥ भावीकांप्रति संभवे सदगती भ्रांती सरे जां भवीं ॥ १३८ ॥ बोलोनी सकळीक ते शिशुपणामाजील हो गूण ते ॥ आले पूर्वस्थळावरीं पुनरपी ऐका कथा गोड ते ॥ स्वामी फार श्रमोनिया मम वरीं धूळी पदाची बरी ॥ झाडीली सदया परी भुक असे पोटीं तिगा संहरी ॥ १३९ ॥ बोले तो मग गा सुदाम हरिला स्तूती नको फार ही ॥ प्रीती मात्र असो सदोदित मनीं लीला तुझी गोड ही ॥ आज्ञा-धारक मानसीं मम मती मानी निती जाणसी ॥ वाणीसी मग काय हें नच रुचे वाणी झटे ही कुसीं ॥ १४० ॥ देवा काय तुला असी चट तरी दीनाहुनि दीनता ॥ मंदीरीं बरवी रमा असुनिया दासांघरीं भा-गतां ॥ दीनाची बहु गोडि गा तव मनां यासाठिं गा रीत ही ॥ संतोषास्तव आदरादिक खरें दैन्यान्वयां मान ही ॥ १४१ ॥ ऐसें शब्द-

खास त्या समजुनी बोले हरी कौतुकें ॥ तेंची वर्णिन आननीं अनुभवें संतोष येथें तुके ॥ आजीं होत असे मला बहुत गा आनंद चित्तांगणीं ॥ वाणी ही दिनवत्सला प्रतिपदीं पावो अनंतागुणीं ॥ १४२ ॥

**वसंततिलका.**

एकांतठाव बरवा समबुद्धिभावो ॥ सूदामदेव दुसरा हरि वासुदेवो ॥ पूसे द्विजाप्रति तदां मजलागिं भेटी ॥ दीली असे वहिनिनें अजि सोड गांठी ॥ १४३ ॥ आहे अजीं भुक बहू तुमचाच भेटीं ॥ द्यावें मला त्वरित गा श्रमता न पोटीं ॥ लाजे सुदाम तंव तो दिनकाळयोगें ॥ देऊं कसें पृथु तरी अनुमान वागे ॥ १४४ ॥ संकोच फेड नच ती दिनमानिं झाली ॥ कुक्षींत ती गठडि गा घ्रमबिंदु ओली ॥ लाजोनिया हरिजिचे सदसंपत्तीतें ॥ जी ठेविली लपवुनि हिणवाणिहेतें ॥ १४५ ॥ नाहीं ह्मणोनि वदनीं नच शब्द येई ॥ पाहे मुखां हरिजिचा सदभाव-गेहीं ॥ झोंबे करीं हरि तदां द्विजराजगेहां ॥ तेव्हां पडे भुमिवरीं पृथु-गांठी पाहा ॥ १४६ ॥ घेई त्वरें करपुटीं मुल नंदजीचा ॥ वर्णू किती सदयता निजभक्ति वाचा ॥ भक्तीप्रती क्षुधित हा घननीळ आहे ॥ भक्तांमनीं रमतसे सुखशांति पाहे ॥ १४७ ॥ गीतेंत हा वदतसे नर अर्जुनातें ॥ पार्था मला प्रिति बहू सदसज्जनातें ॥ योगीजनीं नच वसे नच त्या पयाब्धीं ॥ वैकुंठवासिं सुख ना मम मानसाब्धीं[1] ॥ १४८ ॥ राहे सदां सदनिं गा निजभाविकांचा ॥ स्वानंदकारक वसे सदशोध-नाचा ॥ आहे मनीं ह्मणुनिया वदनीं मला तें ॥ गाती गितीं रिजविती मनभूवनातें ॥ १४९ ॥ या यूगमानिं मन हें हरिनाम बोले ॥ दीनाप्रती क्षणक्षणां तुज बोल बोलें ॥ या हो अनंत सदनीं श्रवणें करोनी ॥ गीतांतरील अनुमोद अनंत मानीं ॥ १५० ॥

**उमा.**

घेत हरी करिं ते पृथु लक्षुनि नंतर सोडुनि पाहतसे ॥ पाहुनिया मग मारियली मुठ सात्विकता निट हेत वसें ॥ आननिं घालित होत

१ भावसमुद्रांत.

उताविळ सूक्षम सोज्वळ भावबळें ॥ दोन मुठी तळिं राहियल्या नग तेथ रमा मग येत बळें ॥ १९१ ॥ सर्वहि ते पृथु घेत करें बरि संसृति जर्जरिं कारण हें ॥ हे रज हो तमगूण भुमीवरि हांवरि ही वरि सत्यचि हे ॥ जेथ रमापति तेथ बरी निति शांति सबोध ति सात्विकता ॥ वास रमा करि तेथ रजादिक जाण तमोन्मुख भ्रांतिमता ॥ १९२ ॥ या रिति ते पृथु साक्षपकारक गूणत्रियांशक संपविले ॥ पूर्ण मनोरथ द्वीज मनोगत भाव स्वभावित कालबलें ॥ कांहिं दिनांवरिं राहि हरी घरिं स्वानंद मंदिरिं कृष्णजिचा ॥ येक दिनीं मग आठवलें घर निर्जर जर्जर आगमिचा ॥ १९३ ॥ सर्वहि आठवि अंतरिं सांठवि घेत असे चवि तेथचि गा ॥ बाळमुलें कसिं काय तरी घरिं खातपितात तिं शोधन गा ॥ आगम सर्वहि लक्षुनिया मनिं बेत करी धनि रोज बरा ॥ जाउं घराप्रति देइल तें हरि घेउनिया शिरिं हर्षभरां ॥ १९४ ॥ मेलिं किंवा जितिं नाहिंच ठाउक मानस रोषक होत असे ॥ या हरिचे घरिं राहियलों बहु नाहिं दया मनिं आलि असे ॥ पोटभरी तनु येथ मि हा बसलों फसलों स्वसुतांविषयीं ॥ ते सतिवीषयिं हाय मनां अजि जाउंच सत्वर या समयीं ॥ १९५ ॥ यारितिं मानसिं बोध करूनिच शोधक तो मग त्या हरिला ॥ पूसतसे दिनभाव मनोगत द्याजि निरोपचि आज मला ॥ फार दिनांवरिं येथ असें हरि जाइन गा घरिं आजदिनीं ॥ द्या मजलागिं निरोप सुखोन्मुख जाणसि मानस तूंचि धनी ॥ १९६ ॥ ऐकुनिया हरि ठीक ह्मणे मुखिं अंतरिं नंतर शोध करी ॥ काय तरी द्विजराजवराप्रति देणगि देउं ति या भुवरीं ॥ सायुजतापद स्वानुभवोमति हेमपुरी बरि यास सजे ॥ भावित यारितिं होत ततक्षणिं सर्वहि लक्षणिं शोभक जे ॥ १९७ ॥ साज मनोमय संसृतिहारक हेमकसोटिंत पांचमणी ॥ जोडियले मतिशोधक लक्षणिं बोधक तेजस सत्यपणीं ॥ बाळपणामधिं नामरसायण भावबळें घुटका वदनीं ॥ घेउनिया मग वर्णियलें गितिं अर्थ समोघहि तो न मनीं ॥ १९८ ॥ बाळक जे रितिं फाल्गुनपूनव लक्षुनिया बहु शंख करी ॥ नाच अनूभव भोगजि संभव

कामिनि लज्जित शब्द करी ॥ हौस अशापरिं जी जडली मति नामहरी-
रस पीत असे ॥ तीच अर्जी हि अनंतमती अनुमोदनिं कागदिं ली-
हिलिसे ॥ १९९ ॥

### इंद्रवज्रा.

बरा विप्र हा जेधवां द्वारकेसी ॥ असे पातला त्या दिनीं याजपाशीं ॥
बहु फाटका वीतरुंदीच पंचा ॥ दुबोटी चिंदी डोईला मान ईचा
॥ १६० ॥ बरी बांधुनी गांठुडी पैरव्याची[1] ॥ हरीनें घरीं ठेविली गौप्य
साची ॥ जसा चालिला विप्र हा हो घराला ॥ दिली आणुनी सत्वरें ती
तयाला ॥ १६१ ॥ ह्मणे चोर भारी सदाचार वाटे ॥ जसें पातलासे
चला त्याच वाटें ॥ गळ्यांतील माळा कटीचा पटाला ॥ तसा हाजि
सेला करी गा हवाला[2] ॥ १६२ ॥ बहू दीन झालें चलावें त्वरेनें ॥ मुलें
माणसें वाट पाती[3] मनानें ॥ असें ऐकुनीया बहू खिन्न झाला ॥ हरे
कर्मदात्या तुझी धन्य लीला ॥ १६३ ॥ नसे कोणही थोर तो तूज
ऐसा ॥ प्रचीती अजी आलि हे हेत ऐसा ॥ तदां टांकिलीं वस्त्रभूषांबरें
हो ॥ ह्मणे येत आतां असूंदे दया हो ॥ १६४ ॥ चलावें असें बोलुनी
पाय वंदी ॥ हरी हात जोडी जसा कोणि बंदी ॥ चले मार्ग तेव्हां
मनीं आठवी हो ॥ कसें मूख दाऊं सतीलागिं हें हो ॥ १६५ ॥ मुलें
धांवुनी येतिं तीं देखुनीया ॥ मलां तेधवां हातिं ना काय द्यायां ॥
करूं मी कसें आजि हें तोंड दाऊं ॥ घरीं जाउनीया तया काय पाहूं
॥ १६६ ॥ जरी रुक्मिणी फाटकें वस्त्र देती ॥ बहू चांगली मानसा
गोष्ट होती ॥ असें चालतां आठवीतो मनातें ॥ तदां पोंचले ग्रामसन्नीध
होते ॥ १६७ ॥ पुढें देखिली कांचनाची पुरी हो ॥ भ्रमे ती मती
मानसीं भ्रांति भावो ॥ ह्मणे चूकलों वाट मी साच वाटे ॥ पुना द्वारके
पातलों तेंचि वाटें ॥ १६८ ॥ असें चिंतितां हो पशूपाळ तेथें ॥ बरें
पातले गायि घेऊनि पंथें ॥ पुसों लागला त्यांजला ब्रह्मरावो ॥ दिसे

---

१ व्यवस्थेनें. २ स्वाधीन. ३ पहाती.

ग्राम या नाम सांगा मला हो ॥ १६९ ॥ वदों लागले गोप ते द्वीज-रायां ॥ सुदामापुरी नाम गा ग्रामठायां ॥ असें ऐकुनी वाटली हेळणा ती ॥ वदे मागुतीं तो वदा सत्यनीती ॥ १७० ॥ टवाळी नको नाम सांगा खरें रे ॥ दिसे चूकलों पंथ मी हा अजीं रे ॥ तदां गोप द्वीजां पुसों लागले हो ॥ अहो कोण कैंचे तुमी विप्रावो ॥ १७१ ॥ मुळीं कोण गांवूं वदा नाम त्याचें ॥ असा जात कोठें कथी तेंहि वाचें ॥ सुदामा वदे द्वारकेहूनि आलों ॥ पुना द्वारका देखुनी भ्रांत झालों ॥ १७२ ॥ सुदामा असें नाम यां देहभागां ॥ अवंतीपुराचा तुमी मार्ग सांगा ॥ असें ऐकुनी गोप ते बोलती हो ॥ अवंतीच झाली सुदा-मापुरी हो ॥ १७३ ॥ तुमां ग्रामभावां असें एक नाम ॥ धनी गा तुमी तूमचें सत्य धाम ॥ नको संशयो गा चला नीट ग्रामीं ॥ सुदामा खरें नाच वाटे स्वधामीं ॥ १७४ ॥ ह्मणे जाउं पूढें पुसों दूजयासी ॥ बरें तो वदे होउं त्या मार्गवासी ॥ मनीं या रितीं जाणतो भाव केला ॥ पुढें चालतां जाहला गा स्वलीलां ॥ १७५ ॥ बरा पातला ग्रामद्वारीं तदां तो ॥ जनीं ओळखीलें अहाकार होतो ॥ वदों लागले सर्वही ते स्ववाचें ॥ नृपा आमुचा सज्जना शांत वाचें ॥ १७६ ॥ नमूनी पदां पादधूळी शिराला ॥ बहू लाविती पूजिती विप्रभालां ॥ पुढें मात गा राजवाड्यामधीं हो ॥ तदां शीबिका घेउनी मंत्रि ये हो ॥ १७७ ॥ असे मंत्रि तो गा विवेकान्वयाचा ॥ करी सैन्य गोळा अनूभाव साचा ॥ भली भालदारी तदां हाक केली ॥ चलो आस्ति आस्ते निगा राखु बोली ॥ १७८ ॥ सदाचारयोगें पुढें सर्व आले ॥ सुखी लोक झाले मनीं हो निवाले ॥ बहू आरत्या घेउनी नागरीचा ॥ स्त्रिया पातल्या त्या कळा कुंकुमाचा ॥ १७९ ॥ बरे दासदासी शिपायी पथ्याचे ॥ तसें शेटवाणी बरें नागरीचें ॥ मिळोनी असे सर्वही चालिले हो ॥ सुदा-माप्रती जाउनी मीळती हो ॥ १८० ॥ बहू भ्रांति अंगीं भरे द्वीज-रायां ॥ कसी कोण लीला हरीजीचि माया ॥ असे नाटकी कौतुकी लौकिकीं हा ॥ नभामाजि सारा पसारा बरा हा ॥ १८१ ॥ पुढें मंत्रि

आला पदीं भाळ ठेवी ॥ करां जोडुनी तो वदे नम्र भावीं ॥ चला स्वामि बैसा शिबीका स्थळीं हो ॥ धरीलें शिरीं छत्र तें तन्मयीं[1] हो ॥ १८२ ॥ स्त्रिया आरती तेधवां त्या करीती ॥ बहू नम्रभावें कटीं वांकताती ॥ असा साज स्वानंद आनंदकारी ॥ अनंता मनीं संसृती हाचि हारी ॥ १८३ ॥

## शार्दूळ०

तासे ढोल तुते बरी चवघडे सिंगें तुतारे बहू ॥ घंटा झंगट झांज ताल करते वीणे सतारी जहू ॥ कोणी गात स्वतोषेंता[2] नवविधी भक्तीरुपें छंदते ॥ कोणी नाचत कौतुकें करुनिया तालासनीं मानते ॥१८४॥ यंत्रांचे बडिमार फार उडती उल्लाट यंत्रें तसीं ॥ जाती बाण नभांतरीं झटुनिया कामामदाची घसी[3] ॥ आले द्वारसमीप राजसदनां तेव्हां प्रिया पातली ॥ जातीची सुशिलामती पतिधृती राखीत चित्तीं भली ॥ १८५॥ आली आरति घेउनी चमकते जैसी नभीं वीज ते ॥ आले सर्वहि भाव ते हरिकृपें अंगीं बरे आयते ॥ लाजोनी बसली पुढें धुंडत[4] ती शोधान्वयें सज्जनीं ॥ बुद्धी आत्म सबोधनी बरवि गा जेवीं रवी बोधनीं ॥ १८६ ॥ पूर्वीचें रुप संपुनी नवकळा[5] आली असे आननीं ॥ पौर्णेंदूकळ फांकली चहुंदिसें साक्षी नये ती जुनी ॥ कांती हेमनगांबरें करुनिया दैदीप्यमानें भली ॥ चित्रीची जणु रेखिली गमत हे दूजाविधी बाहुली ॥ १८७ ॥ वीधीचा जनिता असे पुरविता तेथें नसे न्यूनता ॥ कांता शांतमता अशा स्वरुपिं हो कांतास आनंदता ॥ तेव्हां ब्राह्मण मानसामधिं बहू लज्जावतासारिखा ॥ नेत्रांचा पडदा जडोनि बसला पाहे तदां नासिकां ॥ १८८ ॥ भावीकेरितिचा स्वभावमतिचा याचा तसा हो तिचा ॥ दोघांची समसाम्यता प्रथमता आतां दिसे भेदिचा ॥ वंदोनी चरणां सरोनि वदते गूणान्वयां आद्य त्यां ॥ गूणातीत पती अतीत मुळचा संबोधनां[6] मीच त्यां ॥ १८९ ॥ बोलावें परतें रुचें नच

---

१ तदाकारी. २ आत्मानंदभावानें. ३ काळोकी. ४ शोभत. ५ नूतनकळा. ६ जागृत करण्याला.

रुचें जाणें कसें कोणतें ॥ रूसावें नच संभवे पतिमनीं नीती जुनी ऐक्यते ॥ ऐसा हेत परेंतं बेत करुनी बोले तदां आननीं ॥ ऐका तेंच अनंत भावबळ हो द्या कान तें लक्षुनी ॥ १९० ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित श्रीसुदामचरित्र संपूर्ण ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

---

## अथ ध्रुवचरित्र प्रारंभ.

### श्लोक मंदाक्रांतावृत्तं.

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीसद्गुरुएकनाथाय नमः ॥ हा गा देवा जळत हृदयीं भारि माझा उदारा ॥ कां गा आजून नच मजला पाहसी हे उदारा ॥ रंगो गा ही मति तवगुणीं हे रमेचा पती रे ॥ तोडी बंधांतुनि भवपुरीं देइ शांतीसुखां रे ॥ १ ॥

### मालिनि.

सकळ गुणइशागा दातया एकदंता ॥ गणपति मति दे तूं दुःखहारी महंता ॥ भजनपुजन नेणें कोटि अन्याय माझे ॥ पदर पसरितों मी पोटिं घाली भवोझें ॥ १ ॥ दिनहिन मतिचा गा नेणता मी सनाथा ॥ वरद कर असो तो माझिया जाण माथां ॥ तव गुणकथनातें दे गती या अनंता ॥ वदवि घडघडां तें राम माझा वदंता ॥ २ ॥ नमुं गुरु तुजला गा एकनाथा दयाळा ॥ सदय हृदय संता दीनदात्या मवाळा ॥ तंवपदिं शिर राहो होउनी ऐक्यगूणीं ॥ वदवि कथन तें जी भक्तिलीला सगूणी ॥ ३ ॥ निज रस मित ठेवा वाणगी आत्मनीची ॥ वरि सुजनकथा ती रंगुं दे अंतरूची ॥ पदिंपदिं रस छंदें पोसवी गा समर्था ॥ बळ तुजविण होतें ना अनंता सनाथा ॥ ४ ॥ १=९ ॥ नमिन मि जि कुमारी वाग्वरी शारदा ती ॥ वसन धवल अंगीं या जगीं रंगली ती ॥ मनिं भर गित माझा आननीं नाच तूंगे ॥ झडकरि वद ते गे गोडि रंगें असो गे ॥ १ ॥ रविकुळमणि तो गा भूप उत्ताननामें ॥ कृतयुग-

---

१ परावाणीनें ठिकाणीं.

निति पाळी पाद सत्पादकामें ॥ सुशिल गुण भराचे राज तो सार्वभौमा ॥ जनहि सकळ तें गा पाळितें जा हुकूमां ॥ २ ॥ सतिधृतिसम कांता सूनिती नाम तीसी ॥ वडिल हि पटराणी शांतिची खाण खासी ॥ सुरुचि दुजि असे ती धाकटी प्रीत तीसी ॥ कुनितिंत कुशला ते वीषयीं सार नासी ॥ ३ ॥ बहुत प्रित मनाची धाकटें भूलला हो ॥ चलत नित तिचा गा बोलण्यासारखा हो ॥ नच प्रित वडिलेची टांकिली वाट ती गा ॥ कधि नच तिस पाही भूलला दुष्टिणी गा ॥ ४ ॥ कुनितिंत भडवा तो जारिणी भूलतो हो ॥ घरिं निजसति सोडी गोडि नाहीं तिची हो ॥ भुलुनि भवभ्रमानें तो अहं या पदातें ॥ कवळुनि धरि पोटीं मीपणां आपदा ते ॥ ५ ॥ जरि नित बरि होती संगतीं नासते हो ॥ ह्मणुनि बरि असावी सोबती या जगीं हो ॥ सुमन परिमळातें ठेविल्या पात्रि देती ॥ कुशल निपुण ते हो शोधिती साररीती ॥ ६ ॥ सुनिति सुशिल भावें पाळिती आवडीनें ॥ बहु सुफळित हें गा बोधनीं पुत्रदानें ॥ मनमुरवणि इचानेंही बरी सूखदाती ॥ परि जन भुलले त्या वीषयीं जारनीती ॥ ७ ॥ भुप गमत तसा तो जाणुनी नेणता हो ॥ निति चुकत बरी ती सूरुचीसंगतीं हो ॥ परि कुळरुपभावें वंशितो बोध आला ॥ ध्रुव निज मुखनामें सूनिती श्रेष्ठिणीला ॥ ८ ॥ कधिं नच मुख त्याचें राजयें पाहिलें गा ॥ वंचत न घरिं तीचा स्वप्निंही भूप तो गा ॥ सुरुचि उपवरी ती जाहली जेधवां हो ॥ तधिंच विसरला हा सूरुची संगतीं हो ॥ ९ ॥ प्रथमभुपबिजानें गर्भ हा राहिलेला[1] ॥ सुनितिस ध्रुवनामें बोधनीं साच लीला ॥ जननलिखित नाहीं जाण केलें भुपानें ॥ मुलपणरितिं लेणीं घातलीं ना सुखानें ॥ १० ॥ हळहळ करि आई बाळ देखून तानें ॥ दिननिशिं रडते ती ना घरीं वस्त्र जूनें ॥ उदरभरति दाणें येति तें कोठिचें हो ॥ घृत मग नच तेथें पूसती कोण तीहो॥११॥ मद दिठिं भरला तो मातली सूरुची ती ॥ भुलवुनि बुडवीला भूप तीं दुष्टिणी ती ॥ तिस सुत उपजे त्या नाम हो उत्तमातें ॥ प्रितिकर बहु

१ जात.

वाया आवडे जीवनातें ॥ १२ ॥ अधमजनस्वभावा निंदकांची प्रिती हो ॥ खुळसर गमतो तो मीपणा मानि जो हो ॥ दिनभरिं जननिंदा चावडी हीच जाची ॥ भुलत मदिरमोहें यांजसी येम जाची ॥ १३ ॥ गतभुतगित सांगे गेलिये संपतीचें ॥ दिनहिनदुबळयांला मारितो शब्द-ठोंचे ॥ बुडवित वडिलांची कूळनीती जुनी ती ॥ जपुन फुकट माला अंतरीं ती कुनीती ॥ १४ ॥ मदभर धन डोळे कामिनीचे प्रितीचा ॥ दिनभर मुख पाहे हांसणें गंमतीचा ॥ अबलबलरितीनें चालतो बायक्या हा ॥ समजत नच याला कामश्वानापरी हा ॥ १५ ॥ करित नच जन-निंदा वीरळा या जगीं तो ॥ दिननिसिं हरिनामें अंतरीं घोंकि जो तो ॥ दिनजन बघुनीया दुःखि होतो मनातें ॥ किति वदुं सुजनांला जाणता जाणतो तें ॥ १६ ॥ वदत रुप अनंतीं मालिनीछंदरूपां ॥ मिनलि मननरूपें संगतीचा स्वरूपां ॥ वदत दुजि पुढें ती नाम तीला असें हो ॥ शिखरिणि गुणछंदें आननीं बोलती हो ॥ १७ ॥ ६=२३ ॥

## शिखरिणी.

वयां झालीं सालें गणितमित पांचांमधिंच तो ॥ मुलासंगें खेळे बिद-बिदिं तदां गा निपुण तो ॥ कळेना तो पीता कवण जनिता देखतचि-ना ॥ दुजीं मूलें त्याला दुखविति बहू बाप तुज ना ॥ १ ॥ कसा-रे झालासी सुत तुं असला कोण रितिनें ॥ नको अह्मांसंगें बसुं उठ कसा चाल रितिनें ॥ अशा त्या शब्दानें फुटत हृदयीं बालक तदां ॥ जयाचा नामाला वदति ध्रुव या हो जगिं सदां ॥ २ ॥ निघे तेथूनीया रडत घरिं तो बाळ ध्रुव गा ॥ अगा जाचा अंगीं नच भरलि ती हो नवति गा ॥ सकूमारी कांती वदन सुकलें कोमळपणें ॥ हरी जाला मानी निजमुलसखा भक्तिचगुणें ॥ ३ ॥ कसी देवा तूझी नकळत लिला अंतरिचि ती ॥ जयां तूझा प्रेमा कसविसि तयां आगमनिती ॥ जसा टांकींघायीं दगड परि तो देव बनतो ॥ तसा त्रासा सोसी जनकु-

---

१ जीवभावसंबंध.

टिलखोडी सुजन तो ॥ ४ ॥ घरीं आला तेव्हां बघुनि जननी फारच रडे ॥ पुसे माता कां रे रुदन करिसी तोंड मुरडें ॥ तुला कोणी बाळा दुख बहु दिलें वाटत खरें ॥ अरे ऊगें राही दिन मजवरी हे नच बरे ॥ ५ ॥ तुला पाहूनीया बहुत दुखतें अंतरिंच मी ॥ कशाला बाळा तूं मम उदरिं आलासि करमीं ॥ वदे आतां मातें कवण रितितें दुःख करिसी ॥ उगीं राहें आतां वद जलदिं ऐकूं तरि कसी ॥ ६ ॥ वदे तेव्हां तो गा ध्रुवमुल तिसीं आइ मज गे ॥ पिता कोठें आहे कवणसुत मी सांग बरि गे ॥ मला मूलें सारीं हिणविति बहू बाप पुसती ॥ नसे ठावा मातें उगिच असतों सोसुग किती ॥ ७ ॥ मुलाचा शब्दानें हळहळ उठे मायहृदयीं ॥ ह्मणे बाळा ऐकें भुपसुत तुं रे याचचि भुयीं ॥ धराधीशाचा तूं सुत परि कळा माझि उणि ती ॥ नसे प्रीती बा रे मजवरि जरा भूपतिचि ती ॥ ८ ॥ असे दीनावाणी सतत घरिं मी लाजत जनां ॥ कसें दावूं तोंडा हिनपण गमे अंतरमनां ॥ असे दूजी कांता भुलुनि तिजला नाडित मला ॥ कसी देवा नाहीं कळवळ जरा हे श्रम मला ॥ ९ ॥ असें ऐकूनीया ध्रुव समजला बोललि सती ॥ ह्मणे जातों आतां बघिन पितया आज निगुती ॥ नसे वैरी चित्तीं समगुण कळा बाळकचि तो ॥ भरे प्रेमाठायीं समजुनि पिता भूपतिच तो ॥ १० ॥ वदे माता बाळा पुनित सुशिला जाउं तुं नको ॥ तुला कोणी तेथें नच पुसति गा दूखवुं नको ॥ असे मोठी खोटी सुरुचि पतिला आवड तिची ॥ नको दीना वाणी वचुं तिथ तुं रे धीर धरची॥ ११॥ तया दीनीं राहे बसुन घरिं तो लेंकुरपणें ॥ दुजा दीनीं ऊठे उदयसमयीं भानुकिरणें ॥ रवीचा वंशातें कुळदिपमणी हाचि पहिला ॥ वदों कीती प्रेमा हरिभजनिं जो साच रिजला ॥ १२ ॥ मुलाचा छंदानें वसत सुजनीं बोधचि गुणी ॥ फळे शांती पोटीं सुनितिउदरीं शोधनगुणीं ॥ तयाचे नीतीला मिपणिं रमते नावडति गा ॥ भिती निंदेठायीं जनभिति हिची साचपणिं गा ॥ १३ ॥ पती छंदें नांदे बघुनि तिजला

जारिणनिती ॥ करी निंदा तीची परि जनिं तिला मानिति सती ॥ जयाची हो बुद्धी विषयिं रमली जारिण खरी ॥ सदां जारालागीं भुललि दिननीसीं या षडअरी ॥१४॥ भरे द्वैताछंदीं खुसमुसि सदां मानसिं उणी ॥ कुळालागीं डागा इजजवळुनी होत तिगुणीं ॥ अनंतां या ऐसें मतिगुण जनां आवडत ना ॥ वदे छंदें त्याहो शिखरिणिरुपें साधन मनां ॥ १५ ॥ २३ ॥ ३८ ॥

## शुद्धकामदा.

चलत तेथुनी बाळ तो तधीं ॥ नच असे जयालागिं आवधी ॥ सुदिन भासला तेधवां तयां ॥ विषयिं त्यागुनी जेविं योगियां ॥ १ ॥ सुदिनिं पोंचला राजमंदिरीं ॥ धिट बहू असे मूल अंतरीं ॥ भुपति बैसला जा स्थळीं असे ॥ समिप जाउनी हा उभा असे ॥ २ ॥ सकु-मरास त्या पाहुनी तदां ॥ प्रित भरे मनीं मोहिनीपदा ॥ उचलुनी वरीं घेइ बाळकां ॥ बसविला पदीं सूख कौतुकां ॥ ३ ॥ वदतसे पिता मूलरीतिनें ॥ सदगदें मनीं प्रेमप्रीतिनें ॥ रव रवे तदां कंठिं भूपती ॥ वदन न्याहळी चुंबितो प्रितीं ॥ ४ ॥ कळत कामिनी सूरुचीस तें ॥ निकट पातली पाहि मूल तें ॥ क्रिडत राजया पाहुनी दिठीं ॥ खवळली मनीं तोंड हिंपुटी ॥ ५ ॥ वसवसे तदां दंत खातसे ॥ ढकलिला मुलां लात देतसे ॥ ह्मणत काय रे ठाव हा तुझा ॥ बससि रे कसा ऊठ नीघ जा ॥ ६ ॥ भुपति नष्ट तूं दुष्ट सौतिचा ॥ मुलिं कसा बरा भास प्रीतिचा ॥ नच तुला असे लाज वाटते ॥ मि बरी नसे साच दीसते ॥ ७ ॥ हिणसुनी वदे बालकोत्तमां ॥ पुढतिं ना चढे राजआ-श्रमा ॥ वनगती तुला फार चांगली ॥ लिखित[1] जाणती मी असें भली ॥ ८ ॥ मम सुतास रे राजआसनीं ॥ विभुति माखुनी जाय तूं वनीं ॥ अचळ[2] साधि रे ठाव नीगुता ॥ विषयिं गाधि[3] ही नातळे हितां ॥ ९ ॥ जननि रे तुझी या पदां तुटे ॥ उगिच आज तूं बाळ धाकुटें ॥ नच

---

१ भविष्य. २ अविनाशी. ३ परमात्मठिकाण, राजआसन.

तुला भिती वाटली कसी ॥ कवण कौतुका बुद्धि ही असी ॥ १० ॥ निगमकाननीं जाउनी तपा ॥ बहुत आचरे तूंच कुळदिपा ॥ हरिगुणामधीं निपुण तूं बरा ॥ कुशल बोधनीं आमरीजरा ॥ ११ ॥ रव तिचे असे ऐकुनी पुढें ॥ बहुत दुःख तें वाटलें कुढें ॥ वदन खालतें घालुनी रडे ॥ कळवळा कसा सौतिला घडे ॥ १२ ॥ वदलि साचची वाणि ती निकी ॥ वचन बाणतें भेदि नेमकी ॥ उठुनि चालिला मूल तेधवां ॥ कठिण वाटलें तात तेधवां ॥ १३ ॥ अनुतपें जसा तापसी निघे ॥ तदनुसार हा मूल हो निघे ॥ जवळ पातला माय जा स्थळीं ॥ रडत आक्रुषें धाय मोकळी ॥१४॥ वदन पूसती माय तेधवां ॥ धरितहो कडे बाळ तेधवां ॥ पुसत तानयां सूनिती तदां ॥ रुदन कासया बोलरे सुधा ॥ १५ ॥ गतिहि कामदा बोलुनी असी ॥ सुख अनंत घे आपुले कुसीं ॥ धन मनामधीं हेंच वाटतें ॥ मननशील ते येथ जाणते ॥ १६ ॥

चामर.

काय रे मुला तुला असेंच गांजिलें दिसे ॥ बोल काय तें मला तुवां भला मुखामिषें ॥ तो वदे तिला तदां अजीं मि गे पित्याघरीं ॥ जाउनी उभा असें तदां मला पदावरीं ॥ १ ॥ घेतला प्रिती बहू करूनिया धरी धरां ॥ कामिनी तदां घरांतुनी भली असे क्रुरा ॥ लोटुनी मला पदांनिं गे तळां भुमीवरीं ॥ टांकिला असे तदां बहू हिणावुनी बरी ॥ २ ॥ बोलली किती वदूं दटावुनी भुपापुढें ॥ तात ना वदे तिला जरा भिये तिचापुढें ॥ रोदना करीत मी ग पातलों असें अजीं ॥ दीसतें बहू बुरें नको पुरी मला अजीं ॥ ३ ॥ ऐकुनी अशा रितीं ह्मणे सुता तिणें बरी ॥ देवपूजना विधीनरूप आपुल्या करीं ॥ दानधर्म याग वापिकूप तोय भोजनीं ॥ ४ ॥ कर्मरूप देणगी हरीचि ही लिला खरी ॥ शोक टाकि शांत होइ देव पाहि तूं उरीं ॥ सोड आश मोह फांस दुःख कां तरी सुखी ॥ राहि आजपासुनी वदे हरीकथा मुखीं ॥ ५ ॥ याविणें जगीं तुला नसे दुजा मुला बरा ॥ ध्यानधारणा गुरूमुखें बरी

करी त्वरा ॥ कोण बापमाय मोहफांश काळ जाण रे ॥ वास भ्रांति त्रास मानसीं बहू उगीं भरे ॥ ६ ॥ थोर जे समांगुणीं धनांतुटी करूनिया ॥ काननां मुळें फळें सदांच खाउनी कथा ॥ भाव नीजकाज साधि आज तूंचि साचरे ॥ घे करूनि हा धनी भवामधीं त्वरा बरें ॥ ७ ॥ काळमान सारि बा तुं थार बोध पाडिं जा ॥ नाथ येक पाद सेवितो [1]अनंत [2]यानिं जा ॥ चामरा वदे असी मुखीं कळा तळां ध्वनी ॥ दूसरी उठे बहू बरी मणीच बंधनीं ॥ ८ ॥

बोलत तेव्हां तो मुल सान् ॥ राहत कोठें गे भगवान् ॥ पाहिन वाटे आज मला ॥ बोलच तूं गे त्या हरिला ॥ १ ॥ भेटत कैसा गे जननी ॥ वास असे कोण्या सदनीं ॥ साधन याला काय रुचे ॥ मूल मि साना नाच सुचे ॥ २ ॥ जाइन तेथें आज बरा ॥ मागिन ठावा गे [3]निबरा ॥ ना मज कोणी ओढिल गे ॥ तें पद त्याला मागिन गे ॥ ३ ॥ सावध झालों आजि बरा ॥ हा उपदेशां योग्य खरा ॥ जो अनुतापी तापत गा ॥ काळ तयाला कांपत गा ॥ ४ ॥ संगमहा प्रेमा भरती ॥ बोधक जाणे यां निगुती ॥ रंग नवांवीधी भरला ॥ हा भव त्याला हो सुटला ॥ ५ ॥ सावध झाले ते रमले ॥ वीषयिं गुंते ते भ्रमले ॥ येम तयाला घालि गळां ॥ फांस जरेला खास गळां ॥ ६ ॥ भार भराचा नौतिमधीं ॥ घे सुख बारे ना अवधी ॥ ध्यान धरावें या रितिनें ॥ अंतरिं शोधा बोधनिनें ॥ ७ ॥ लावुनि राखेला तनुतें ॥ चालत बाळा ना भितते ॥ पूसत कांरे या रितिला ॥ सान तुं तान्या घे भितिला ॥ वर्ष तुलारे पंच भलें ॥ कोमल अंगा जां न भलें ॥ ८ ॥ योगि भले ना पार तयां ॥ सिद्धमुनी गा साधु जयां ॥ तूं तर पोरावाणि बरा ॥ काय सुचे रेही तुज तरा ॥ ९ ॥ बालक बोले गे जननी ॥ ना हरिलागीं सान मनीं ॥ भावभुकेचा तो इश गे ॥ मंत्रभुलीला ना भुल गे ॥ १० ॥ जाइन जातां पाहिन त्यां ॥ सोड तुं मातें मोहन त्यां ॥ देइन तूला ठाव

---

१ अविनाशी. २ ठिकाणीं. ३ जुनाट, अढळ.

बरा ॥ तोषल तो गे ईश बरा ॥ ११ ॥ बाण जसा तो हो सुटतो ॥ त्या धनुपासुनी उजू तो ॥ धांवत त्याचा हो गतिनें ॥ कानन वाटें रोधमनें ॥ १२ ॥ मातहि फांके राजघरीं ॥ बाळ पळाला फार दुरी ॥ शोक तयां हो भूपतिला ॥ वाटत तेव्हां फार भिला ॥ १३ ॥ निंदुनि तेव्हां सूरुचिला ॥ चालत हा गा भूप भला ॥ मोह बरा झाला मननां ॥ सोडुनि चाले त्या भुवनां ॥ १४ ॥ आज अनंता भेटल गा ॥ मोहजरा ही फेडिल गा ॥ माधव गा हा गोविंद गा ॥ यां मणिबंधां सत्वर गा ॥ १५ ॥

## शिखरिणी.

पिता तेव्हां गेला हुडकित मुला काननिं तदां ॥ उठे चित्तीं जाचे हळहळ बहू बाळक पदां ॥ भरे प्रेमा अंगीं कळवळ करी भूप बहु तो ॥ असे आधीं ताना वरि मुलसखा वंशदिप तो ॥ १ ॥ वनामाजीं पाहे तंव सुत पुढें चालत असे ॥ असें देखूनीया वदत कुमरां थांब तुं असे ॥ नको जाऊं बारे मज दुखवुनी काननिं दुरी ॥ फिरे आतां मागें पुरविन तुझी मानस पुरी ॥ २ ॥ असें ऐकूनीया वदत ध्रुव तो या रितिं बरें ॥ बरें बाबा ठेवीं मन भुवनिं तूं त्या सुरुचिरे ॥ नको आतां कांहीं घरधन तुझें बालक न मी ॥ तुझा आहे दूजा सुरुचिसुत तो गा दिनचि मी ॥ ३ ॥ पदें लोटीयेलें तुजसमुर तें आइसवती ॥ तदां कोठें गेला हळहळ तुझा सांग निगुती ॥ भली प्रीती चित्तीं प्रितकर बरी तीजवरि गा ॥ अगा दीनाचा मी तुजसम नव्हे तोलरितिं गा ॥ ४ ॥ बरा आलें वाटें सदनिं चल गा येत मि नसें ॥ नसे माझा अंगीं भर नवरसीं सूखचि नसें ॥ असें जातों मी गा नरहरिघरां मागिन तयां ॥ दुजा ना सीवे हो स्थिरचरिं मला देवऋषि या ॥ ५ ॥ असें ऐकूनीया मुलवचन तें भूप द्रवला ॥ खरी झाली माझा कारं चुक सख्या बोल रुचला ॥ नको टाकूं आतां मज जि ममता तातपणिंची ॥ तुला देतों गांवां सुखरुप वसे घे बरिरुची ॥ ६ ॥ तदां बोले ताता मि अजिं

रघुनाथापदिं बरा ॥ सुचे तें गा मागें रुचिकर मला जाच तुं बरा ॥ धरेचा बोले तो पति ध्रुवपिता देत नगरें ॥ अरे आतां मागें चल झडकरी तूं फिरची रे ॥ ७ ॥ मला देता आहे वदत पितयां बाळक तदां ॥ रमारंगापासीं बहु धन असे बोधनि पदां ॥ बरें देतों देशां फिर झटकरी आज नि-गुता ॥ असे देता ताता मनिं हरि बरा वाटत मतां ॥ ८ ॥ धरा सारी तूझी पटअभिषकां तूज करतों ॥ सुता चाले आतां उठ तुट नको भूप वदतो ॥ पुढें बोले ताना ध्रुव कुळमणी आइक पित्या ॥ मनाची झाली गा भवपुरिं तुटी आस नच त्यां ॥ ९ ॥ नको आतां मोहामधिं मज भरूं आयकत ना ॥ सुखें राहीं भूपा प्रित मजवरीं ठेविच तुं ना ॥ नसे आशा कांहीं जननिपितया आज बरवी ॥ रवीवंशालागीं दिप उजळि गा साधनभवीं ॥ १० ॥ सुटे ओढीचा तो शर पुनरुपी फीरत नसे ॥ गतीरूपें जातों बहु त्वरित तो नेमसरसें ॥ मनाचा ओढीनें मिहि चलत गा त्याच रितिनें ॥ न थारे आतां मी परत चल गा शीघ्र गतिनें ॥ ११ ॥ रवां यां ऐकोनी भुप मग निराशा करि मनीं ॥ ह्मणे दैवी कां हें मज हरि तुवां भाळिं लिहुनी ॥ खरा मी पापी गा स्त्रिसमजुतिनें ठार बु-डलों ॥ कुळां लावीयेलें दुषण बरवें साच विटलों ॥ १२ ॥ बरा डावा साधी घर बुडविलें या सुरुचिनें ॥ दगा झाला फंदें नवति भुललों रूप तरुणें ॥ खरी जाती नष्टी नरकिं पचवी रौरवपुरीं ॥ नसे ईला माया स्वहितिं फसवी वीषयपुरीं ॥ १३ ॥ वदे पाहूनीया पुनरुपिं मुलां देखुनि तयां ॥ अरे जातों आतां मज जवळि ये याच समयां ॥ मला भेटोनीया मग चल तुवां काननिं बरा ॥ असें बोलूनीया रडत भुप तो मोहचि बरा ॥ १४ ॥ दया आली तेव्हां मुल जवळ आला त्वरित तो ॥ मिठी मारी राजा हळहळ उठे फार मनिं तो ॥ मुका घेतां झाला वदन कुरवाळी निजकरीं ॥ भरे प्रेमा तेव्हां जळजळ उठे जाळत उरीं ॥ १५ ॥ वदे तातालागीं ध्रुव तंव पुढें शोधनरितीं ॥ भरी शांती चित्तीं शितळपण तें जाण निगुती ॥ त्यजी शोका राया सरि बरि मि गा

साधिन अजीं ॥ कुळातें दीपाला उदय करि गा साचचि मि जी ॥१६॥ असो द्यावी माया सदयहृदया गा पुढत ती ॥ असें बोलूनीया उठत मग तो सत्वरगती ॥ फिरे मागें राजा कळवळ बहू अंतरिं असे ॥ घरालागीं आला पुढति ध्रुव तो काननिं वसे ॥ १७ ॥ विवेकाचा ठायीं अनुभव सिरे त्याच रितिनें ॥ वनामाजीं गेला मुल सगुण तो ऐक्यगतिनें ॥ अनंताला माने हिच रित बरी भागवत हा ॥ जडो पायीं याचा मन प्रतिदिनीं योग्य भर हा ॥ १८ ॥ मुखामाजीं वाणी सिखरिणिरुपें या रितिं वदे ॥ सदां येकानाथा पदकमलिं गा थार मज दे ॥ अगा दीनाचा तूं सदय हृदया माधवप्रिया ॥ असो माझा माथां कर तव बरा प्रेम भर या ॥ १९ ॥

## पंचचामर.

वनाप्रती चले तदां उदासता मनीं बहू ॥ मुखावरीं कळा नसे सुके तनू उनें बहू ॥ उपास त्रास ध्यानिं ध्यास नामघोष आननां ॥ हरी अनाथ मी दया करी पतीतपावना ॥ १ ॥ मुरारि रे रमापती गती मला तुझी नसे ॥ कसा तुं गा दयाळुवा रळीसरी[1] दिठी दिसे ॥ बहूत लागली तुझा पदीं गुणानिधी प्रिती ॥ स्वसेवकांमधीं मला गणी अजीं दिगा निती ॥ २ ॥ कसी तुझा सनाथजी रुशां सिमां करूं मि ती ॥ दिनामधीं मि गा असे मुलासरी तुं दे गती ॥ न मंत्रजाणता न तंत्र ठाउकें गितांमधींमती नसे ॥ करूं कसें कुठें बसूं तनू कसूं सुचें कसें ॥ ३ ॥ अनूतपें बहू तपे निरामयीं बसे तदां ॥ चकोर जां रितीं निसीकरावरीं दिठी सदां ॥ मयूर त्या घनावरी प्रिती बहू वनीं करी ॥ तसा हरीपदीं ध्रुवा वसे मनांत अंतरीं ॥ ४ ॥ पडे रडे उठे बसे कळा हिना दिसे तदां ॥ न आठवी दुजा धनी तुझाविणा अहंमदां ॥ असो दया दिनाचि या भरे उरीं धिरा जरा ॥ त्वरा करा सिणा हरा भिकारि गा मुळीं खरा ॥ ५ ॥ भुकेमधीं घसा बसे सुखे मुखीं थुकी नसे ॥ पिसें

१ मनोनिग्रह होतांच.

जसें तयापरी वनामधीं ध्रुवा असे ॥ स्वभाव हा अशा रितीं सुभाविकी कळे हरी ॥ परी तयां गुरू नसे ह्मणूनिया मनावरी ॥ ६ ॥ विचार तो करी तदां वदे ऋषीस नारदा ॥ सख्या भुमीतळांवरीं ध्रुवां मुलां चला वदा ॥ उगां श्रमे बहू दिनापरी असेच वासरां ॥ बरा तुं जाउनी बि-जासनीं[1] तयां खरा करा ॥ ७ ॥ बहू मुनी तयावरी प्रिती असे मनां-तुनी ॥ परी तयां गुरू नसे अगा तुह्मी फुका ध्वनी ॥ करा निजी पुरा गुणी चला त्वरें असां तसे ॥ बसूं नका उठाउठीं मला बहू तयां असे ॥ ८ ॥ असे हरीमुखांतले रवां धरी मुनी तदां ॥ मनामधीं कळे कळा तया ध्रुवीं मुळा पदा ॥ बरें ह्मणूनिया चले वनां ऋषी मुनेंद्र तो ॥ गळा विणा पुरातना वदे हरीलिलाचि तो ॥ ९ ॥ वनामधीं तदां बरा गुरूमुनी त्वरें चले ॥ ध्रुवासमोर जाउनी उभा असे मुला भले ॥ बघी-तलें परी नसे कुडीवरी गळे मती ॥ दिठीस ते मिठी पडे भुमीवरी नि-चेष्टिती ॥ १० ॥ असा तयां बघूनिया दया बहू भरे मनीं ॥ कसा तरी वयीं मुला अनूतपें बरा गुणी ॥ पुढें वदे तयास गा मुनी गुरू तरा बरी ॥ अनंत रे मनामधीं धरी सदां शिरीं उरीं ॥ ११ ॥

## शार्दूलविक्रीडितवृत्त.

जो या भूवनत्रैत फीरत असे बोधी जनां स्वात्मनिं ॥ दीसे चंचळ थार जा नच घडी एका असे भूवनिं ॥ चाडीची बहु गोडि जां निति-मधीं नासी बरा तामस ॥ जो भक्तासनिं श्रेष्ठ होउनि बरा वागे मना गोडिस ॥ १ ॥ जो नारायणनाम गायक बरा गूणान्वयें शोभला ॥ विष्णूचें प्रियपात्र यास्तव असे जाणे कळा तो भला ॥ द्वैतांनासुनि शांति दे भवपुरीं नाहीं दुजा या रितिं ॥ साचा भागवतमूळपीठ गुरु हा तारी जनां दे रिति ॥ २ ॥ वीणा ब्रह्म स्कंधनीं चिपुळिया हाता-मधीं शोभत ॥ नाचे गावत नाम तें क्षणक्षणीं गीतांतरीं रंगत ॥ शीखा ऊडत शीरिची तडतडां पायीं बरें घुंगुर ॥ सोहंभाव भला असे रव-

१ परमासनीं

घणीं नादें भरे अंबर ॥ ३ ॥ ऐसा नारद पातला वनिं तया जेथें असे तो ध्रुव ॥ पाहूनी मुल तें वदे मग तया ऐका तयाची सेव ॥ रेरे बाळक कोण तूं निजसुरा किंवा असे मूर्छित ॥ बोले वेळ नको करूं झडकरी ऐकूं बरें वाटत ॥ ४ ॥ कोणाचा सुत तूं बरा धिट कसा या काननीं एकला ॥ आशा काय मनीं तुझा जडलिसे बोलें बरें तूं मुला ॥ सोडी शोक मनांतला सकळ तो होई बरा सावध ॥ ऐसें बोलुनिया करीं ढळवि त्या बाळां मुनी नारद ॥ ५ ॥ झाला सावध तेधवां ध्रुव बरा बैसे उठोनी त्वरां ॥ पाहूनी मुनिला भरे धिर मनीं आनंद भासे पुरा ॥ स्वानंदाश्रुभरें तदां नयन ते जैसें झरे वाहत ॥ पायीं त्या मुनिचा असे धुत बरें तेव्हां गुरू तोषत ॥ ६ ॥ मूखीं शब्द फुटे न तो तनु असे कंपे बहू फारची ॥ साष्टांगें प्रणिपात घालुनि ध्रुवें भावां मिळे साचची ॥ जैसी माउलि देखुनी चुकलिला मारी मिठी बाळक ॥ स्फुंदो स्फुंदत फारची गहींवरें कंठामधीं आटक ॥ ७ ॥ बोले नारद तेधवां उठ मुला बोले तुवां आननीं ॥ कांरे तिष्ठसि बाउगां भवपुरीं येकांत या काननीं ॥ बारे तूज पिता वदे कवण तो ऐकों तरी सत्वर ॥ बोले बाळक तेधवां स्ववदनीं ऐका भलें उत्तर ॥ ८ ॥ **स्रग्धरा** ॥ ११९ ॥ बोले तेव्हां ध्रुव मुनिवरा ऐक बा मूळवार्ता ॥ पीता माझा रविकुळमणी पाद उत्तान ताता ॥ दोघी कांता सुनिति सुरुची द्वेष त्यांचामधीं हो ॥ रायाला आवड सुरुचि[1] श्रेष्ठे सुनीतीस मी हो ॥ १ ॥ जन्मा आलों परि ममवरी प्रीत ना राजयाची ॥ नाहीं पाहे वदन कधिं ही जन्मपत्री कशाची ॥ पीता ठावा नच मज बरा गा मुनी राजयोगी ॥ खेळे पोरांमधिं कुमर ते टोंचिती अंतरंगीं ॥ २ ॥ पूसे माते कवण जनिता सांग गे या तनूला ॥ बोले तेव्हां जननि मजला भूप हा साच मूला ॥ ऐकोनीया जवळ पितया पोंचलों एक दीनीं ॥ प्रेमा रायां उपजत बरा घेत अंकीं त्वरेनी ॥ ३ ॥ मारी लाता सवत जननी शब्दबाणें उरातें ॥ फोडी घायीं रडत परते माउली सांगिलें तें ॥ बोले माता मज तदुपरी

---

१ रुचि.

नाहिं देवा पुजीलें ॥ यासाठीं मी वनवन फिरें देव भेटीस भूले ॥ ४ ॥ आहे इच्छा मनिं बहु मला देव भेटावयाची ॥ मागो ठाया नढळवि दुजा हांव ही मानसाची ॥ यासाठीं काननिं फिरतसे रात्रदीनीं दयाळा ॥ नाहीं शांती मनभुवनिं ती तारि गा तूं कृपाळा ॥ ५ ॥ देखोनी आज मुख तुमचें प्रेम दाटे मनाला ॥ संतोषें मी बहुत बरवा शांतिसूखासनाला ॥ स्वामी आतां मज पदरिं घ्या दीन मी गा सनाथा ॥ सांगा कैसें करूं मि तरि ते देवभेटीस आतां ॥ ६ ॥ बापा तारी समज बरवा मानसी सांठवावा ॥ चिंता फेडी रव कळवि तें प्रेमपोटीं असावा ॥ जाऊं सारी कॅलिमलमता ताप हा मीटवी गा ॥ भेटोंदे तो हरि मज बरा आननीं वाक्य सांगा ॥ ७ ॥ १२२ ॥

### दिंडी.

असें ऐकोनी मुनी वदे त्यासी ॥ अरे बाळा सान तूं त्रासलासी ॥ उगां कां रे हट्ट[1] हा तूजलागीं ॥ कसा होसी तापसी मुला जोगी ॥ १ ॥ देवभेटी फार ती दूर आहे ॥ भले गेले शोधितां तयां पाहे ॥ हट्टयोगें तो हरी नाहिं भेटे ॥ उगां त्रासा सोसिसी दुःखवाटे ॥ २ ॥ बरें ऐकें सांगतों रीत ती रे ॥ धरी ध्यानीं पूरती कान दीरे ॥ जया नाहीं रूप तें गूण पाही ॥ निराकारीं वास जा सत्य पाही ॥ ३ ॥ वेद जाला वर्णितां सीणले ते ॥ सदां शास्त्रें भांडती आपमत्तें ॥ नसे शब्दां ठाव तो वाच्यवाचें ॥ भूतांठायीं गूण ते दृश्य साचे ॥ ४ ॥ हरीमाया वीलसे तीनलोकीं ॥ येथ नाहीं सत्य तें तूं विलोकीं ॥ यासि बाळा साधनीं साधिती जे ॥ वदूं तेंची रूप रे ऐक [2]वोजे ॥ ५ ॥ सकळ झालीं साधनें पूर्ण जांचीं ॥ जन्म जन्मीं सोसुनी त्रास त्यांची ॥ पुजावीधी नेमनिष्ठ ते साचे ॥ सदा नामीं भावनीं ऐक्यतेचे ॥ ६ ॥ ज्ञानध्यानीं योग जे साधितातीं ॥ जया चित्तीं ना मली भवाचीती ॥ विवेकानें अंतरीं शोधिती जे ॥ तेचि जाती मीळोन रूपतेजें ॥ ७ ॥ १२९ ॥

---

१ अहंपण. २ भावार्थे.

## घनाक्षरी.

मुला ऐेक खरें तूज ॥ सांगतसें मीच आज ॥ भावबळाचें हें काज॥ बाळपणीं साधलिया ॥ १ ॥ आगमवीधीच कर्म ॥ नाहीं स्वरूपाचें मर्म ॥ वेद जाणे नाचि वर्म ॥ सत्यधर्म आत्मनिया ॥ २ ॥ विवेकची येथ दोर ॥ बोधरवी धैर्य थोर ॥ डेरा शांती शिरजोर ॥ आगमदधी चाळिया ॥ ३ ॥ निगम ते नवनीत ॥ तेथ ठेवि सारि प्रीत ॥ गुरूघरीं हीच नीत ॥ भवामधीं लाभ तया ॥ ४ ॥ भाव पाहिजे तो नीट ॥ वीषयीं असावा वीट ॥ ज्ञानबोधें मन धीट ॥ बाह्य उपाधि टाकुनी ॥ १ ॥ गुणत्रयाचें हें जग ॥ साजे दृश्यभास सोंग ॥ आद्यकर्म रूप भोग ॥ भवरोग हा साचची ॥ २ ॥ तमचि हा पशु स्थीर ॥ रजाचे कामिक वीर ॥ इच्छि स्त्रीपुत्र ना धीर ॥ मायिक हा लुब्धची ॥ ३ ॥ तिजा सत्वगुणराज ॥ ज्ञानविवेकाचें काज ॥ शांतीसुखां बरा साज ॥ पाप नाहीं आवडेची ॥ ४ ॥ २ ॥ याहुनी तो गुणातीत ॥ अलक्ष असे ती रीत ॥ निरामयीं गुंते प्रीत ॥ मीतंहीत जाणता ॥ १ ॥ कर्म करूनी अकर्म ॥ मर्म जाणुनिया धर्म ॥ काळभीतीस हें वर्म ॥ तोचि निपुण जाणता ॥ २ ॥ भूतदया अनुष्ठान ॥ मीपण तें ठेवी घाण ॥ शांतीधृतीवरी ठाण ॥ विवेकवंत पूरता ॥ ३ ॥ आपपर द्वैतभान ॥ नसे जेथें अनुमान ॥ अशास कशास ध्यान ॥ ब्रह्मानंद आनंदिता ॥ ४ ॥३॥ शोकमोह गेले दूर ॥ कामीं नसे हुरहूर ॥ अभिमान केला चूर ॥ हाची थोर जगीं या ॥ १ ॥ आत्मबोधीं झाला रत ॥ आभरली निर्जी नीत ॥ भव वाटे जगन्नाथ ॥ यमाचा भीत ना भयां ॥ २ ॥ निर्विकल्प निर्दोष ॥ अहंपणीं नाहिं सोस ॥ हरीकीर्तनांचा घोष ॥ सदां संतोष साच यां ॥ ३ ॥ देव जाचा बंदीजन ॥ गुलाम मुशाऱ्याबीन ॥ वर्ते सेवकारितीन ॥ धन्य जगतीं कीर्तिया ॥ ४ ॥ ४ ॥ मुला तुज आहे हांव ॥ घेइ येथ वरी धांव ॥ त्वरा करी बरा ठाव ॥ धांवधांव झडकरी

---

१ स्वभावित.

॥ १ ॥ उरीं धरी हरीध्यान ॥ नको धरुं अनुमान ॥ वृत्ति वागो रितीं सान[1] ॥ आत्मध्यान अंतरीं ॥ २ ॥ देव तुजसी भेटेल ॥ इच्छा मानसीं पुरेल ॥ काळ देखुनी पळेल ॥ हरी वळेल मंदिरीं ॥३॥ ऐसें वदोनिया कर ॥ मुनी ठेवी शिरावर ॥ बीजमंत्र[2] दे नीबेर[3] ॥ द्वादशसमअक्षरी ॥ ४ ॥ ९ ॥

## दिंडी.

असा बाळा देऊनि बीजमंत्रां ॥ निजानंदें मीळवी बोधेमात्रां[4] ॥ गुरू नारद थोर गा कृपाळू हा ॥ नासि कामां अहंतें दुःखमोहां ॥ १ ॥ निर्गम[5] सांगोनी मुनी गुप्त झाले ॥ ध्रुवाअंगीं बोधनीं तेज आलें ॥ सुखीं झाला तेधवां भजे देवां ॥ ऐक्यभावें अंतरीं वासुदेवां ॥ २ ॥ सर्वांभूतीं भासतो भास तेव्हां ॥ नसे दूजा भाव तो सख्य जेव्हां ॥ रमाकांता आठवी वेळ सारा ॥ साधियेलें सौख्य तें भक्तिसारा ॥ ३ ॥ निजीं लागे ध्यास तो बाळकाचा ॥ हरी भेटे तेधवां रंग साचा ॥ चहूं भूजीं ध्रुवाला धरी पोटीं ॥ प्रेम दाटे तेधवां मुला पोटीं ॥ ४ ॥ मिठी घाली पायिं त्या बाळ ताना ॥ तोषला गा भक्तिचा देवराणा ॥ ध्रुवा बोले तो हरी तेधवां गा ॥ माग पोटीं वांच्छिता फळाभागां ॥५॥ अरे बाळा तोषलों गुणा तूझा ॥ चित्तिं माझा रीजली ऐक्यपूजा ॥ माग देतों लोक हे तीन तूतें ॥ सार्वभौमा स्थापितों हीतमातें ॥ ६ ॥ असें ऐकोनीया वदे हरीला ॥ बाळ तो गा ऐकत्याचरीतीला ॥ गुरूवाक्यें बोधिला बोध जो कां ॥ अनंताला प्रेमळा सुटे धोका[6] ॥७॥ १४१॥

## शार्दूलविक्रीडितवृत्त.

हे नारायण वासुदेव कमलाकांता तुला मी नमी ॥ दे थारा तवपायिं गा मज बरा राहो मती ही समी ॥ मागूं नेणत आणि तें सुरवरा शांती बरी फार दे ॥ दे ठावा मजलागिं गा नरहरी ना दूसरा वास दे ॥ १ ॥ सर्वां अंतरभूत तूं घननिळा जाणीव ती तूं कळ ॥ कीती वर्णुं

---

१ अहंपणारहित. २ ॐ नमो भगवते वासुदेवाय. ३ शाश्वत, वासुदेवात्मक. ४ आत्मतूर्येला. ५ उपनिषद्भाग, कृष्णपक्ष. ६ भीति, जन्ममरण भय.

तुला नसे गति मला ध्यानास नाहीं बळ ॥ दीनाची करुणा तुलाचि अरुणा बोधामृता दायक ॥ वर्णूं ते किति गा जगीं रुप तुं गा चैतन्य तूं साम्यक ॥ २ ॥ ब्रीदा पाळिसि दीनवत्सलपणीं भक्तास तूं गा धनी ॥ मानी जे मनिं तें करी निति मि तें सांगूं किती आननीं ॥ पूजा नेणत ध्यानही गमत ना नामा असे घोकित ॥ तारी मार तुला रुचे कर तसे बोलूं किती गा गित ॥ ३ ॥ ऐसें बोलत तो इशास ध्रुव गा संतुष्ट झाला हरि ॥ प्रेमानंद उठे मनांतुनि बरा आलिंगनीं सांवरी ॥ आदी बाळक त्यांत भक्त निजरुपीं गुरू बरा नारद ॥ ज्ञाना काय उणें असे मग तयां शांतीसुखें शारद[1] ॥ ४ ॥ बोले अच्युत तेधवां ध्रुवमुला शाबास तूं रे भला ॥ संतोषें तुजला बघोनि अजि मी देतों पदा घे भला ॥ ना कोणी तुज ऊठवी सुरनरीं किंवा मुनी सिद्ध ते ॥ ना रे किन्नर अष्ट ते वसु बरे स्थाना तुझा सीवते ॥ ५ ॥ चाले सत्वर तूं अजीं अढळ तें देतो पदा बैस गा ॥ ऐसें बोलुन न्हेत तो हरि तदां देतो पदाला मगा ॥ ना ठावें कवणा नसे गति बरी जाया तया हो स्थळां ॥ तेथें स्थापुनि बाळकां कर शिरीं ठेवी बरा कोमळां ॥ ६ ॥ तारा सोम रवी ग्रहादिक बरे फेरा जयां घालिती ॥ सूरांचा ललना पतीसह ब-या देखो तयां पोंचती ॥ पुष्पें वृष्टि करोनिया बहुपरी कीर्ती मुखें वाणित ॥ लोकां तीन असे सदां अढळ जो भानूकुळीं शोभत ॥ ७ ॥ मातापीतर त्यासही गति हरी देतो बरी पूढती ॥ वैकुंठाधिपतेस या बहु दया भावीक त्यां दे गती ॥ यासाठीं भजनीं मती रुप हरी गातों सुखें किंकर ॥ गोविंदा गरुडध्वजा दिन अनंता ठेवी शिरीं तूं कर ॥ ८ ॥ १४० ॥

इति श्रीमदनंतसूरिविरचित ध्रुवाख्यानं संपूर्ण ॥ हरिःशरणं ॥

---

१ शुद्ध.

## अथ करुणाबत्तिसी प्रारंभः ॥

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंतसद्गुरवे नमः ॥ श्रीगुरु दत्तात्रेया० ॥ प्रथम नमीन नमी[1] गणनायक गौरिहरा[2]नुज सिद्धिसखां ॥ विधि[3]तनया नमुनी पुढतीं नमिला गुरु सत्पदिं[4] साम्यसुखां ॥ रव करुणाकर सादर मावर आभरला भर मानसिं या ॥ अनुभव[5]संभव सं[6]भविता जिव राजिवलोचन साधनिं या ॥ १ तळमळ चंचळ चंचळि हा जिव चंचळ संभव[7] भ्रांतिमुळें ॥ मनमद चंचळ आकृति चंचळ ना स्थिर कारण याचिमुळें ॥ धनगमनागमनीं भ्रमणीं भ्रमतां मन मोहमदी[8]रस सेवुनिया ॥ तळमळता तळि मीळवि हे वळवी चळवी मळवी असु[9] या ॥ २ ॥ असुपण नाहिंच भासच भासक भासत भावनिं भ्रांति पहा ॥ मृगजळ नाम तमाम भ्रमांत मृगास स्वभावि तृषार्थ पहा ॥ भ्रमिं भ्रमुनी भ्रमुनी भ्रमणा सरतां ठकती दमती स्थिरती ॥ नच निरसंभव शांत तृषा नच तद्वत संभव ही हिमती ॥ ३ ॥ कर करुणा अरुणां[10] उदयां सदया तुमि या तिमिरां[11] हरि गा ॥ गुण रजनी रजनीचर हे अरि काममदां सवितो[12] तुंचि गा ॥ सर[13] सद[14] या उदयां सदया अजिं या तनुची भ्रमणा सुटवा ॥ पद नमितों शमनार्थ समागम सज्जनमानससाक्ष[15]भवा ॥ ४ ॥ धनसुतकामिनि मानित ना मति ना धृति[16] तेथ ति या तनुची ॥ सुखकर सज्जनसंग मनोरम रंग प्रबोधित[17] दर्ग[18] शुची ॥ समजुनि या रितिं चातकसी मति टाह करीत मि निर्धनची ॥ रस[19]भरिता कविता जडता[20] हरण्यां सविता मतिछंद तुंची ॥ ५ ॥ दिनहिनमानसिं मानवि ही तनु प्राक्तनसंभवि संभवली ॥ भलि घडली परि ही नडली विषयीं जडली

---

१ नमस्कार करणारा, अर्ह. २ गौरिहराच्या स्वरूपापासून उत्पन्न झालेला. ३ सरस्वति, मति. ४ परमात्मपदीं. ५ परमात्मारूप. ६ पूर्ण होईल. ७ उत्पत्ति. ८ मदीरा. ९ प्राण. १० बोधा. ११ अज्ञानाला. १२ प्रकाश करणारा, सूर्य. १३ श्रेष्ठा. १४ हे अविनाशा. १५ साक्षरूप प्रगट होणाऱ्या. १६ धारणा. १७ आत्मप्रकाशित. १८ तदाकार. १९ स्वानंद परिपूर्ण. २० देहभाव.

भ्रमली फसली ॥ मदमदिरा पिउनी सर्वदा[1] सदें[2] तो स्वपणां[3]गतिला मुकलों ॥ हरहर मी फसलों चुकलों ठकलों हकनाक जेमें[4] तुटलों ॥६॥ अजि गिरकीं नरकीं सरकी उरकी समतें[5] मिळवी हरि रे ॥ हरिहरब्रह्म[6] न जाण मि जाणत जाणत चेष्टितें[7] सूत्रें[8] बरें ॥ जग नगरक्षण भक्षण शिक्षण संभवें[9]विद्भव भृंगमतें[10] ॥ गुण[11]भुतें[12] कारणें[13] वारणें[14] विश्वें[15] जि साक्षभुतें[16] मतिनें नमितें ॥ ७ ॥ नच सदुपाय उपाय मतींत अनीत समे जि भवांबुधि[17]ता ॥ क्षुधित असे दिन मी तुझिया पदरातळिचा तुंचि गा जनिता ॥ मति नच साधन जाणत जाणिव जाण जि माधव मानसिचें॥ जड तनु नास्तिक ना ठिक ना स्थिर जाणुनिया मति नाम रुचे ॥ ८ ॥ नरतनु मीपण मीपण जाणिव जागृति जागृत चेष्टविते ॥ द्विविध मनोद्भव संभव संसृति संचित प्राक्तन संभवते[18] ॥ अभिमतिबंधनिं बंधित होउनि कंदें[19] सुगंधित वीसरलों ॥ तळमळलों बहु लौकिक पद्धति भ्रांतित नाडुनि गा चुरलों ॥ ९ ॥ अजि विरलों दमलों मतितें वमलों तुझिया चरणीं फिरलों ॥ जनिं जनिता पुनिता तुंचि गा स्वहितां रविसा अवलोकियलों ॥ पदं[20]कमलोद्भवसंभविं संमतें[21] संमत हें जडलें वहिलें[22] ॥ तुज अजि वाटल तेंचि करी हरि मागत नाहिं जि आजि भलें ॥ १० ॥ मज नचि आसर आणिक या जगिं आण तुझी पदिं भृंगमती ॥ रुचल तुतें कर तें परि हें वय गा तवनामरसीं दि[23] गती ॥ तुज करुणा करुणाकर तूं नाम भवामाधिं[24] गाजत या जगतीं ॥ दिनहिन देखुनि तूं द्रवसी नवनीत उणें तुंकि[25] जाण गती ॥ ११ ॥ समय सुचीत

---

१ सर्व गोडी देणारा. २ परमात्मा. ३ अहंपणानें. ४ परमात्मप्राप्तीला. ५ ऐक्यतेला. ६ सत्व तम रज गुणात्मक. ७ देहव्यापार करविणारे. ८ चालक, परमात्मा. ९ रक्षण भक्षण शिक्षण यांच्या संभवानें युक्त असा जो भव (ह्म.) संसार. १० भृंगी कीटक न्यायें. ११ त्रिगुण. १२ पंचमहाभूतें. १३ मूळ. १४ हत्तीरूप जे स्थूळ. १५ जगत्. १६ आत्मरूप. १७ भवसागरभाव. १८ उत्पन्न होते. १९ परमात्मा. २० सच्चित्पदकमलप्रकाशापासून संभवणारे. २१ परमात्ममत. २२ श्रेष्ठ. २३ दे. २४ देहांत. २५ साखी, साक्ष.

उचीत दि लाघव चंचळता भवहारिव गा ॥ बहु वदतो ह्मणुनी नच राग तुला हरि येउ न तो उगिंगा ॥ तळमळला जिव जाणिवं[1] लाघव पाहुनि संभव या भविचा ॥ मति नच मानित मानवि हें हित खेळचि हा हरि सांभंविचा[2] ॥ १२ ॥ सदय दयाघन तूं सदंवासर[3] तूं जगनायक चाळक गा ॥ तवपदसेवकिं सेवक अर्भक[4] बाप तुला ह्मणि बाळ मि गा ॥ भवतरतां तरतां तरवे नच हा कवणां रितिनें मतिनें ॥ नच परपार अपार[5] समोघं जमाव पुराणकथानितिनें ॥ १३ ॥ विधिहरिशंकर संभव ऐक्य तुं संसृति कारण गूणरुपें ॥ निजजननीगति[6] निर्गुण[7] निर्मयँ[8] संभवं[9] चेष्टित आत्मरुपें ॥ जगनग चंचलं[10] गूणकृतोद्भव आत्मसमांगम[10] पंचभुतीं ॥ गुणकृत चेष्टित शक्तिहि जाणिव आकळितां इसि नाच गती ॥ १४ ॥ बहु ठकले हठयोगि जटाधर योगि अघोरिहि शोधभ्रमें ॥ परि अनुमान[11] समान न होत न शांतपणांत संवाद[12] गमे[13] ॥ किमपिहि मीपण नाच सुटे घण सिद्धपणा मनिं वागतसे ॥ सुखकर हा हरि ना करि गा अरि कामचि या घरिं पूर्ण वसे ॥ १५ ॥ फणि सदनांतरिं वागत देखुनि रात्रिंत झोंप नये मग ती ॥ चडफडती गति काळभयें मग चंचळता बहु ना स्थिरती ॥ घर मग सोडुनि देइ ततक्षणिं सेज करी दुजुया घरिं ती ॥ तदनुरुपाकृति काम जि संभव जाग्रत तोंवरि नाहिं धृती ॥ १६ ॥ भजन न जाणत पूजन नाहिंच साधन जोडित ना घुसलों ॥ सहज समागम देहचि जाणुनि ना स्थिर यास्तव गा रुसलों ॥ तवपदभागिंहि जाग्रति ठेवुनि मानसिं नेणिव[14] भासवितो ॥ समसुख वांच्छित मानस यास्तव गीतरुपें तुज जाणिवतो ॥ १७ ॥ नरतनु शाश्वत नाहिंहि जाणुनि अर्ज असे तुजपासिं हरी ॥ हकिगत सर्वहि घेइ जि ऐकुनि तोषं[15] रमापति याउपरी ॥ चरण-

---

१ अहंभावाचें कौशल्य. २ शिवशक्तीचा. ३ परमात्मरूप सूर्य. ४ सर्वव्याप्त. ५ आत्मरूप. ६ स्वात्मतूर्या. ७ उदकरूप. ८ सृष्टि. ९ नाश पावणारे. १० संयोग. ११ स्वरूपमान. १२ आत्मचर्चा, स्वाद. १३ गति. १४ आत्मा. १५ प्रसन्न हो.

रजोद्भवसंभविचा कण मस्तकिं स्पर्शवि गा निगुती ॥ पुनित करा अघिता शुचिवास[1] मनामधिं द्या मजलागिं हितीं ॥ १८ ॥ बहु कविनें गतकाळ दिनें दिधलें मतिनें कवितें मथले ॥ हरिगुणगायक जे तरले ह्मणुनी लिहुनी जनिं दाखविले ॥ शुकसनकादिकनारदतुंबरअंबरिषेश्वर हे वहिले ॥ सनकसनंदन वाल्मिक शौनिक व्यास पराशर दाखविले ॥ १९ ॥ कलिमधिं शोभत संत वसंत भले पदिं जे जडले टिकले ॥ सदपद सेवुनि शांतकुलोद्भव[2] संसृतिपासुनि जे सुटले ॥ शिरिं जडिले टिकले जडिते मुकुटावरि[3] कोंदणि जे निळसें ॥ अनुभवखाणिस खाणुनि अर्थविवेकिं सबोध सुसंत असे ॥ २० ॥ तवभजनीं महिमा महिला सुनितीकरसा मजला दिसला ॥ ह्मणुनि मना अजि ध्यास बहू पदिं प्रेमपुरस्कर हा जडला ॥ मम हरि लाज तुला असणें गरिबावरती सदयाउदिता ॥ मिळवि सुखाब्धिस त्या लवणां जलसें समतें विरते जडता ॥ २१ ॥ मयुर तृषार्थ समान मनामधि पामर हा तव पादजलां ॥ सदघन तूं अजि वोळ बरा हरि वाट मि पाहतसें बसला ॥ आजिं करुणा कर सागर सत्य तुं मीन मि गा जलसंभविचा ॥ लहरिसमागमिं फेंकु नको मज प्राणचि संभव हा जलचा ॥ २२ ॥ मुल जननीकडियेवरचें सुटलें जतरेमधिं तें मगतें ॥ अरभक चंचळ रोदन मांडित मार्ग न सूचत त्या मतितें ॥ चहुं दिशि दृष्टि विलोकित तें जननीस जसें अपुलें वहिलें ॥ तदनुरुपें मजला मतितें दिसतें सदया वदतों रुचलें ॥ २३ ॥ अरिदमना भवनाशन कारण अंबुचि या पदिचें तुझिया ॥ सुख सम शांत स्वओघ[4] बरा जगतीमधिं वाटत गा सदया ॥ दिनहिन जे जन आठिवती तुज त्यांवरि गा तुझि पूर्ण दया ॥ किति सदया सरुं मी दमलों अजि गा असुं दे तुजलागिं दया ॥ २४ ॥ जगनगसूत्रकळा[5] सकळां तिनलोक समान जमाव गती ॥ मतिरुप त्या गति देउनिया जगिं खेळविसी जड स्थूळमती ॥ सम सकळांमधिं जाणिव जाग्रति गूण तुझा रज

१ परमात्मठिकाण. २ शांत देहीं. ३ कीर्तिरूप मुकुटावरी. ४ स्वरूप. ५ क्रियाशक्ती, त्रिगुण.

हा मुळचा ॥ अरिभयसंभव याजसि वेढित चंदनकाननिं तो फणिसा ॥२५॥ नरहरि केशव माधव यादव अच्युत वामन शाम हरे ॥ उरगवहान पयाबुंधिवासक गोपिपयोधर गोपति रे ॥ सुखकर संगति सज्जनमानसहंस मुरारि रमापति गा ॥ अभय तुझा कर पामरिं या धर शांति मनामधिं या भर गा ॥ २६ ॥ मदुसुदना तुजवांचुनिया मजला जगिं गा नच कोण बरें ॥ झडकरि धांव स्वभाविक मायासिं संकट नीरसि आजि बरें ॥ कमलसुलोचन हासित आनन भाल विशाल सुशामल तें ॥ मजप्रति दाखिव मानसतोषक स्वानुभवामृत गा पुरतें ॥ २७ ॥ तनु ठकली विटली उठली तुटली घडि ही अजि आगमिंची ॥ निजगतिलक्षण लक्षित मुद्रित[1] आत्मचराचर ऐक्य तुंची ॥ प्रिति न रुची जगतीं दुसरी तनुची असुची जडली पदिं ती ॥ ममनभावस्वभाव तुं जाणसि काय वदूं अजि गा पुढतीं ॥ २८ ॥ पदिं शमतां ममता हितसें मजला गमतें सदया बरवें ॥ नच दुसरें समतें सम ती रिति या जगतीं बहुतीं परवें[2] ॥ जपतपसाधन सर्वहि यास्तव योगिमुनीवर हे महिला ॥ बहु ठकती परि पार नसे हरि कोणच जाणत ना वहिला ॥ २९ ॥ अभिमति नाडुनि ढोंग जगाकृति सत्यमती विरळा[3]विरळी ॥ स्वमंद[4]शमार्थेजमाव सुसंत नभांत अमोघ[5] सदास[6] वळी[7] ॥ मति कवळी विरली स्थुळ ही दिठि गा मग शांतचि आभरली[8] ॥ हरिरसिं मीनत पूढति जाग्रति संसृति सर्वहि नासियली ॥ ३० ॥ सुजनसमागम रोज असो हरि कूजनसंगति दूर करी ॥ गितरवभाषण प्रेमळ आमळ कानिं पडो मज अंतवरीं ॥ मलिनमती जड ही झडवी दडवी मजला पदिं गा निजिंचा ॥ अरिभयनाशक ठाव बरा मज हाचि गमे भविं या मुळचा ॥ ३१ ॥ इति करुणा अरुणा सगुणाकृतिनें दिधलें मतिनें गायियली ॥ तळतळली मति ही ह्मणुनी कविता वदनीं जडली वहिली ॥ घुडलि[9] भली रसना

१ चिन्हित. २ देहभावी. ३ क्वचित. ४ अहंमद शमास अर्थसंचय जांचा. ५ सफल, भजनशील. ६ निजभक्त. ७ पंक्ति, मंडळी. ८ आलंकृत झाली. ९ शोभली, रंगली.

तुझिया गिर्ति गा प्रिति दे मज या पुढतीं ॥ अनिति अनंतिं न ती रुचती ह्मणुनी वदनीं वदती सुगती[1] ॥ ३२ ॥ इति श्रीमदनंतसूरिविरचित करुणाबत्तिसी समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ हरिः शरणं ॥

---

## पारिजातफूल.

### पद ( चा० लावणी.)

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीमदनंत सद्गुरवेनमः ॥ श्रीयेकनाथाय नमः ॥ येकदीनिं तो द्वारकापुरी हरीभक्त बोधनक्त[2] पुरुषसूक्त[3] विवेकतक्त सूखसागरीं ॥धृ०॥ मुनिजि पातला नारदाख्य तो ब्रह्मसना तनजुना प्रेममना रोजदिना कळिच घोरतो ॥ हरिसमीपगा येउनी तदां उठतकृष्ण शांतघृर्ष्ण[4] नाहिं उष्ण भाविं तृष्ण नासि आपदा ॥ मुनिस बैसवी आसनावरी जोडि हात कृष्णनाथ राहेसाथ मूनि हात धरितदांकरीं ॥ भुवनसुंदरा ऐकगाहरी येकदीनिं तो० ॥ १ ॥ बहुत लाघवा काय कामतें भृगूनाहिं दास पाहि नाम गायि मान नाहिं मीच नाहिं तें ॥ सकळ-जाणता-तूं रमावरा देइं थार करीं गार नीज विचार सारासार आपुला करा॥वदुनिया असें सर्व बैसले तंवफूल भ्रांतिभूल पारिजकूल कळीमूळ मुनिनें दीधलें ॥ बहुत तोषला स्वास आमरी येकदी० ॥ २ ॥ हरिजि तोषला पुष्प देखुनी करीं घेउन स्वास लेवुन जात घेउन न्हेत देउन पट्ट साजनीं॥ मुनिस फावली संधि ती बरी आली लहर कळी बहर मन गहर उठेत्वर विणा सांवरी ॥ मुनिवराप्रती सत्यभामिचा त्वरें येत बोले तेथ भामेहेत प्रीतसेत प्रेम भिमकिचा ॥ तुजवरी हरी प्रीत नाकरी येकदी० ॥३॥ ऐक सुंदरी मात सांगतों पारिजफूल स्वर्गमूळ खासभूल घेउन कृष्ण तो ॥ मीग आणिलें प्रीतिनें बहू दीलें न्हेउन प्रीति गोवुन प्रेमिं होउन सख्यभाउन रिजलगे बहू ॥ सवतगे तुझी प्रीत तीजसी तूजवर नाची भर उगांवर दावीपर रतग तीजसी ॥ मुळिच आगिती त्यावरी मुनी घालि विंजण कर्पुरधण तेल्यमण कळीवन देत चेतुनी॥बहुतक्रोधतो भरत सुंदरी येकदी० ॥४॥

---

१ परमात्मगती. २ केवळ आत्मा. ३ नारायणमंत्र गाणारा. ४ दयाळू.

पडत भूमिसी तेधवां घुसी गलित चीर नगन स्थीर मतिबधीर बसत तीर विरहमानसीं ॥ तंव जि पातला रात्रभागिं तो नंदबाळ भूमिपाळ पायिंभाळ सर्वकाळ ठेवितीचतो ॥ रुसली पाहुनी बोलतो हरी सखे कांग दुःख सांग उगिंच राग चित्तभाग नाससी उरीं ॥ कवण दुःखतें बोल लौकरी येकदी० ॥ ५ ॥ मनिंच जागिती आगि दूसरी हाले न मान प्रेतचि जाण कुसडि घाण स्वास न प्राण पेटत अंतरीं॥धरुनिया करीं ऊचली हरी मनमोहन वृत्तिदोहन खेळे जोबन वारिज लोचन घे मांडिवरी ॥ मुखजि पूसलें पीतपालवीं नाहिंवीट[1] वृत्ति धीट मूखदीठें[2] फिरवी मीठ बहुत लाघवी ॥ उघडि नेत्रहो तेधवां बरी येक० ॥ ६ ॥ झडक दीधली कृष्णजी करीं नेट फार हट्टीनार न विचार जसी धार ती कटारी ॥ वदत लावुनी कृष्णजीस रे तूंरे चोर जार पोर मसीं घोर दिला थोर आतां जायिरे ॥ सवत ती बरी पुष्पदीधली घेइं मुका तीचा सुखां मजनका वरी फुकां नाहिं रीजली ॥ कपट नाटक्या घातली सुरी येक० ॥ ७ ॥ वरिवरीं उगां गोडबोलणीं नाहिं लळा प्रेमबळा उगींकळा घननिळा मीच ठेहणी ॥ रुपनसे मला प्रीत कैंचि रे झुरे मनीं रात्रदीनिं मोरावाणि घनपाणि देखुनीच रे ॥ कपट नाटका तूं मुळीं ठका उगीं नका आतां झुका मज-विका सौतिसुखा सोडि कौतुकां ॥ नकटि मी असें रुक्मिणी बरी येक० ॥ ८ ॥ फुलबरें दिलें सौतिमंदिरीं तीचिरूच मीगानीच उगांकीच जाणें मीच तूज रे हरी ॥ वदत तेधवां कृष्ण तीजसी बरा ढंग कांगगुंग कळे न रंग वृत्तिभंग सांगतों तुसी ॥ मम मनीं असे हेत ऐकगे तीज फूल तूज मूळ वृक्षकूळ नको भूल द्वारिं लाविगे ॥ कळत ना कसें वेड-नातरी येक० ॥ ९ ॥ रितिस या तिणें ऐकुनी मनीं जरा धीर वृत्ति स्थीर उडे त्तीर सूखभर वाटला मनीं ॥ मग जि हांसली मीठि घातली चुंबि मूख घेत सूख तानभूक रूखरूख पळत आंतुलीं ॥ समजुती करी कौतुकातरी धन्यराज कीर्तिबाज नीजसाज ऐक्य काज माज अंतरीं ॥ सुजन पाळका योगमंदिरीं येक० ॥ १० ॥ सुरतरू बरा आणुनी तदां

---

१ अवीट. २ दृष्टि.

सफा जेथ लावि तेथ यशघेत शांति देत हीचि संपदा॥ नवतिचा भरें सूर हा तरू प्रेममाप मन आप वारि ताप काळ साप अजर आमरू ॥ भक्त रक्षणा बोध दक्षणा हा अनंत रची पंथ यशवंत गुरु संत ऐक्यलक्षणा कौतुकें बहू मुनिबरा घरीं येक० ॥ ११ ॥ इति श्रीमंदनंतसूरिविरचित पारिजातफूल-( सत्यभामाशांतवन ) वर्णन समाप्त श्रीकृष्णार्पण मस्तु हरिःशरणं.

---

## अथ मानसपूजा प्रारंभ.

### वसंततिलका छंद.

श्रीगणेशायनमः ॥ श्रीमदनंत सद्गुरवेनमः ॥ श्रीएकनाथायनमः ॥ पीता जगा जगतिचा[1] जगअंतरा रे ॥ तूझी लिला[2] न वदवें दिनवत्सला रे ॥ कांता तुझी उदधिजा पदभागिं दासी ॥ कैसा पुजूं तुज मि गा न सुचे मनासी ॥ १ ॥ आहे दिनामधिं जमा धनहीन देवा ॥ वीधी कसा सम घडे मज वासुदेवा ॥ देवा तुझा भजनिं गा विधि हात जोडी ॥ तेथें नरां तुज रुपीं धन केवि जोडी ॥ २ ॥ नाहीं मला समजुती तव तंत्रमंत्रीं ॥ नाहीं गती अवगमे[3] षडकोण यंत्रीं ॥ भावा भरीं दिनपणें मनमानमानें ॥ सेवा रुचे मज असी समभोगतानें[4] ॥ ३ ॥

### आसनविधि-स्रग्धरा छं० ॥

विष्णूपत्नी भुदेवी अजि मम मनीं आसनीं साह्य व्हावें ॥ भूतें जीं कां पुजेला सम कुळ नसती येथुनी दूर व्हावें ॥ शांती व्हावी मनाला मिपण मतिची कल्पना नास मातें ॥ आद्ये तूवां अनादी स्थुळें[5]-निजजनिते इच्छिलें सिद्धि न्हे तें ॥ १ ॥

### शिखाबंधन स्र० छं० ॥

देवी तूं ऊर्ध्वमूले जगनगरुपे पालके वीरुपाक्षे[6] ॥ आहारार्थें तुला गे प्रितिकर जननी मांसशोणीत भक्षे ॥ तुष्टे देवी शिखाबंधिं सदगति सुंदी[7]

---

१ जगद्रूपा. २ त्रिगुणलीला. ३ समजत. ४ आत्मभाग भावानें. ५ देहरूप आत्मा उत्पन्न करते. ६ ज्ञाननेत्रे. ७ शुद्धि.

शुद्धही बुद्धि देई ॥ देतो ग्रंथी तुलाही विरगुठि समते दुष्टनाशार्थ येई ॥ १ ॥

### भस्मोद्धारण शार्दूलवि० छंद. ॥

त्रैलोकीं त्रिगुणे तुवां वससि गे प्रीये शिवाचे गडे ॥ वीभूतीरुप संभवे तनुंसुते[1] नासी अघें औघडें ॥ लल्लाटीं शिरिं कंठि सर्व तनुला लावूं अजीं सौभरीं[2] ॥ हारावी मति दुष्ट ही जडरुपीं शांतीसुखां आभरी ॥१॥

### मानसबोध.

आतां सावध मानसा स्मर तुवां विश्वंभरा केशवा ॥ जाचा ध्यानिं रमोनियां मुनिजनीं संतुष्ट केलें जिवां ॥ दीनांचा कनवाळु जो सद हरी ध्यानीं अजीं सांवरी[3] ॥ देई तो तुजला भली गति जगीं कामादिकां संहरी ॥ १ ॥

### तीर्थध्यान.

### वसंतति० छंद.

स्थापीयला घट बरा निजहेमकांती ॥ सिंधू कुसीं वसति ते मुख विष्णुज्योती ॥ कंठे हरा स्मरुनियां मुलब्रह्मवासा ॥ मध्यें दिसे गणसखा नमिला सुवासां ॥ १ ॥ भागीरथी शरयु गे यमुने सुगोदे ॥ भीमे प्रभे तुं प्रवरे निजहीतबोधें ॥ कृष्णे गडे घटप्रभे मलनाशनार्थें ॥ यावें अजीं सकळही हरिपूजनार्थें ॥ २ ॥

### ध्यान.

द्वंद्वातका गुणहिता निजसूखधामा ॥ शामा रमा पदिं रमे समवृत्तिकामा ॥ शांतीसुखास्तव तुझी सगुणाकृती ही ॥ नांदे जगीं गुणरुपें हरि आपदा ही ॥ १ ॥ गोविंद माधव हरी मदुसूदनारे ॥ दामोदरा नरहरी नरपाळका रे ॥ कृष्णा मुकुंद घननीळ सुआनना रे ॥ हारी अरी मदगजा करुणाकरा रे ॥ २ ॥ कीरीट कुंडल धृती वनमाळ कंठीं ॥ कौस्तूभमंडितमणी निजतेजभेटी ॥ सायूध मानकरते चहुंवेदखाणी ॥

---

१ तनुवर्धने. २ आनंदानें. ३ आकलन करी.

वेदांत[1]सिद्ध मतिते निगमा[2]वखाणी ॥ ३ ॥ पाणी गदाधृत अरीमद[3]कंदनाशां ॥ अंबूज शंखवरदा सदचक्रवासा ॥ पीतांबरा धर कटीं लघु घंटिकांची ॥ पंक्ती वळी अमनतें सदमौक्तिकांची ॥ ४ ॥ भेटे अजीं मम मना झड झेंप घाली ॥ भावां भरोनि रमणें निजहीतबोली ॥ दिनाहुनी दिन मि गा दिनदातया रे ॥ देईं मला तव पदीं सुखशांतवारे ॥ ५ ॥

## पूर्वासन—विबुधप्रिया छंद.

मांडिला गुण आगमीं चवरंग हा चवकोनिचा ॥ रेखिले रविसोमते षडद्वादशी कळ दीप्तिचा ॥ भावनें करुनी मनें सगुणोक्तिनें वरि बैसला ॥ रक्षिता निजसेवकां मति बाळकें मनिं रेखिला ॥ १ ॥ कूळ तूं गुरु रूप तूं निजहेत तूं मनमोहना ॥ मोहनाकृति शोधना हितबोधना पयदोहना ॥ तेजसा हृदमानसा सदकोमला असुवाहना ॥ पाहिमां दिनवत्सला निधिवासका सुख दे मनां ॥ २ ॥ १६ ॥

## पाद्य—कामदा छंद.

शांति जान्हवी नर्मदा शुची ॥ वृद्धगौतमी त्र्यंबकी भुची ॥ कृष्णि चंचला ताम्रपर्णिही ॥ बोध आत्मनीं सज्जनीं मही ॥ १ ॥ दृश्य हेम हे कुंभ साजिले ॥ ऐक्यते जलीं पूर्ण सांचले ॥ सच्चिदापदीं सर्व ओतिले ॥ शांतिकारणें अर्थ गोविले ॥ २ ॥ १८ ॥

## अर्घ्य—शार्दूलवि० छंद.

तीर्थें[6] सर्वहि साम्यतें मिळुनिया उष्णोदकें संचलीं ॥ पाणीमाजि सुबोध अर्घ्य वदनें भावोनिया ओतिलीं ॥ स्वामीनें कर धूतले मळिनसे मोहाब्धि जाचे कुशीं ॥ आनंदें कर पूसिले निलपटें हासीत पाहे मसीं ॥ १ ॥ खंडे चंदन पत्नरी परिमळी मैलागिरी सात्विकी ॥ कृष्णागीर अहंमती उगळुनी सोहंमती सूक्तिकी ॥ पुष्पेंगंधसुअक्षता

---

१ परमात्मसिद्ध मति. २ आत्मोत्पत्तीची खाणी. ३ अहंपणानाशाकरितां. ४ शुद्धा, हे परमात्म कृष्णा. ५ मला रक्षण कर. ६ तीर्थोदकें.

सकलही ऐक्यान्वयाचा विधीं ॥ सिद्धीबुद्धिसमागमें विधिकरें घेई प्रितीचे सुधी ॥ २ ॥ २० ॥

**आचम्य—मालिनी छंद.**

नवविधिजडिताची आणिली पंचपात्री ॥ विधिकृत पळि साची ओतिली हेमयंत्रीं ॥ करिं करपुटि तेव्हां सिद्ध गोकर्णमानें ॥ सुखकर हरि घेता अर्घ्य हें आचमानें ॥ १ ॥ २१ ॥ **मधुपर्क** ॥ भरुनि कनकवाटी शर्करें गोरसानें ॥ दधिदुधमदभारें सुघृतें साध्यमानें ॥ विनवणि बहु केली मानिली स्वामिनीनें ॥ दिनजनकनवाळू तोषला भक्तिमानें ॥ १ ॥ २२ ॥

**पंचामृतस्नान—छं० वसंतति०**

प्रार्थोनिया बसविले मग स्नानयोगां ॥ पंचामृतें दधिदुधादिक सर्व भोगां ॥ पर्वापरीं सरि नद्या सकळीक आल्या ॥ शांतीजलें करुनिया समतें मिळाल्या ॥ १ ॥ न्हाणीत पाणि मधुपर्कसमोघयोगें ॥ योगांत योग कपिला अजि षष्ठि ओघें ॥ पर्वामधीं मिसळलें मन शुद्ध केलें ॥ संतोषयुक्त मतिनें मज धन्य केलें ॥ २ ॥ २४ ॥ **अभिषेक** ॥ वैडुर्यमाणिकनिळमुक्तसुपुष्कराजा ॥ रत्नादिकी नवखणी असुरी भुभूजा ॥ आणीयले अभिषकां मग प्रार्थुनीया ॥ केली दया मजवरी तम झाडि काया ॥ १ ॥ केला अभीषक तदां नखशीखमानें ॥ मानें दिसे सगुणते निगमार्थपानें ॥ जाला दया बहु असे निजसेवकांची ॥ पूजा करी अभिषकें अजि मी तयाची ॥ २ ॥ २६ ॥

**स्वच्छीकरण—कामदा छंद.**

वस्त्र आणिलें अंग पूसण्यां ॥ मोलमाप ना श्रेष्ठ देखण्यां ॥ वास रेशमी भास भक्तिचा ॥ हे मृदू बहू तंतु निष्ठिचा ॥ १ ॥ पूसिलें करें मस्तकीं अधीं ॥ अंग त्यावरी ऐक्यते विधी ॥ हस्त देउनी भाव भक्तिचा ॥ श्रेष्ठ ऊठवूं पंथिं युक्तिचा ॥ २ ॥ २८ ॥

---

१ सुवर्ण, आत्म. २ यथालाभ, परमात्म. ३ ऐक्यतें. ४ पुण्यकालांत, आत्मकालांत. ५ प्रकाश.

## वस्त्रधारणा—शुद्धकामदा छंद.

कटितटीं बरा उंच रंगिचा ॥ अरुणकांतिचे[1] तेज दीप्तिचा ॥ सुपट पीवळा देव नेसले ॥ मम मनामधीं सूख सांचलें ॥ १ ॥ २९ ॥ **उपवस्त्र** ॥ जरिची उत्तरी शालजोडिही ॥ बुटविधी नवी सुक्षमी सुही ॥ जडित जोडणी स्कंधिं जोडिली ॥ सुखकरा उरीं दिव्य शोभली ॥ १ ॥ ॥ ३० ॥ **यज्ञोपवीत** ॥ निजमुसीमधीं हेम ताविलें ॥ दिठित सुक्षमीं अर्थ गुंतले ॥ त्रिवळि तंतुचें ऐक्यग्रंथिनें ॥ सुगमजानवें ओपिलें मनें ॥ १ ॥ ३१ ॥

## अलंकाराचा मंत्र—वसंतति० छंद.

वेदांत सांख्य मति कुंडलि भव्य दीप्ती ॥ भानूशशीहुनि बरी सम आत्मज्योती ॥ वैराग्यज्ञान उभयाकृति ऐक्यसूक्ती ॥ मुक्तें बरी उपजलीं नववीधयुक्तीं ॥ १ ॥ तूरा करोनि बरवा सिरपेच झेला ॥ माणीक पांच निळ जोडणि कोंदणाला ॥ हीरेजडीत मुकुटावरि जोडियेले ॥ ज्ञानामृतां पिउनिया पुनितेव झाले ॥ २ ॥ कंठीं सरी घडविली निजखाणि माजीं ॥ माळा गळां सुजविली अनुभूतकाजीं ॥ मुद्रांकिती सद मती दशे[2]अंगुलीती ॥ ब्रीदावळी मणकटीं चिदकंकणें तीं ॥ ३ ॥ वैराग्यपेटि घडली बरि मेखला हो ॥ संधी मनाचि सुखशांतिसमोघते हो ॥ स्वानूभुतें निजकरीं नग ठायिंठायीं ॥ जोडीयलें प्रितिमनें भ्रमतोषवाई ॥ ४ ॥ आनंदला मग वरी मज दीठिं पाहे —— प्रेमास मानस मिळे तधिं हेत धाले ॥ केली कृपा मजवरी अरि दूर केले ॥ ५ ॥ ३६ ॥ **प्रतिष्ठासन** ॥ सिंव्हासनीं जडियले मणि अस्तिभाती ॥ साजेप्रभावळिवरी घड त्यास मोतीं ॥ छत्रें निशाण विंजणे बरी सूर्यपानें ॥ अब्दागिरें सकिरणीं जडलीं मनानें ॥ १ ॥ स्वामीस हातिं धरुनी वरिं बैसवीलें ॥ पद्मासनें बसति ते समध्यानतोलें ॥ पाहोनिया हरिप्रभा स्थुळभूक धाली ॥ केली कृपा मजवरीं द्विमती निमाली ॥ २ ॥ ३८ ॥

---

१ बोध. २ ब्रह्मरंध्रीं, परब्रह्मीं.

## चंदनाविषयि० –शार्दूलवि०

केलें बारिक वाटुनी सुरभिचें स्वासीक तें केशर ॥ रेखीलें बरवें क-रोनि सखया ते सांकळी सुंदर ॥ कस्तूरी रगडोनिया उटि दिली टीळा वरी चंदनि ॥ मैलागीर सुलाल चंदन तसा पन्नीर श्रेष्ठी धनी ॥ १ ॥ ॥ ३९ ॥ **पुष्पाक्षता** ॥ जाईमोगरिसेवतीबकुल ती जूई अणी मालती॥ चंपे तेगरं[१] कांचनी कणरिणी[२] नाना तरा शोभती ॥ केले हारतुरे बरे तु-ळसि त्या माजीं बऱ्या गोविल्या ॥ साम्याच्या नव अक्षता सकळही कुंकूमयोगें भल्या ॥ १ ॥ नाथाला पुजिलें भलें निरखिलें संतोष झाला मनां ॥ गेली सोडुनि वासना मम मनापासोनि आजीं वनां ॥ शांती आलि मनामधीं प्रित जडे पायीं हरीचा बरी ॥ संसारांतुनि सोडवी हरि खरा साक्षी अर्जी आभरी ॥ २ ॥ ४१ ॥

## धूपश्लोक–वसंततिलका.

गुग्गूलऊदधुपसाज दशांगुली हो ॥ उदबत्ति ऊद बरवाच जनार्दनी हो ॥ स्वामीपुढें नवविधी रितियोगमानें ॥ लावीयला धुपणिला सद्-पद्धतीनें ॥ १ ॥ सूगंधकार हरिची तनुही अमोघी ॥ ओघीं सबोध चुर चंदन अग्निओघीं ॥ ॥ स्वानंदयोग भरला धुपस्वास तेथें ॥ संतो-षमान बरवे अजि देव येथें ॥ २ ॥ ४३ ॥ **दीपश्लोक** ॥ जोडीव जोड जडिती समया बहू त्या ॥ नीरांजनें कुरवड्या नव वाति होत्या ॥ सत्वेंच शुभ्र मुळचा घृतयोगमानें ॥ दीपीं प्रभा बहु जडे निजआत्मज्ञानें ॥ १ ॥ कापूरमेणबतिफानसचंद्रज्योती ॥ ज्योती बऱ्या नवविधी निज-तेजवाती ॥ आनंद आज मतिला बहु देत देवो ॥ भावावरी प्रित खरी नवलावठेवो ॥ २ ॥ ४५ ॥

## नैवेद्य–वसंतति० छंद.

ताटें जडीत बरवीं सदप्रेमयोगें ॥ रत्नें जडाव जडणी नववीधभागें ॥ वाट्या भरोनि षडरसें समिपानुभागीं ॥ ठेवीयल्या अनुभवें स्वपणानुभागीं

१ तगर. २ कण्हेरी.

॥ १ ॥ शाखा बहू क्षिरवडेपुरिफेणिया त्या ॥ सीरा बरा घट असे कण मोकळा त्या ॥ स्वादिष्ट आमटि बरी कढि सांडगेही ॥ मूदी सफेत बरव्या नृप भात तोही ॥ २ ॥ केल्या घड्या चवघड्या बरव्याच पोळ्या ॥ आपूप लाडु घिवरादिक सर्व पोळया ॥ कोशिंबिरी मिठ मिरी बहु रायतीं तीं ॥ मंत्री वरान्न वरि असे शिखरींच भाती ॥ ३ ॥ स्वामीपुढें प्रितिकरें मनहेतमानें ॥ ठेवीयलें अनुभवें नववीधध्यानें ॥ प्रार्थीयलें दिनपणें मग वासुदेवां ॥ आली दया सदयता मुळचीच देवां ॥ ४ ॥ हातें निजीं करुनिया मुखिं ग्रास दीले ॥ जेवीयले स्वमुखिं हो पुनिताव झाले ॥ संतोष आज मजला बहु थोर झाला ॥ हा लाभ लाभत अजीं अनुमोदभेला ॥ ५ ॥ ५० ॥

## हस्तप्रक्षाळण—शार्दूलवि० छंद.

तृप्तीला करणार जो जगतिला तो भावयोगें हरी ॥ जेवीला मम हस्तकें कवतुकें आनंद झाला उरीं ॥ स्वामीचे कर धूतले मुखहि तें उष्णोदकें स्वासिकें ॥ पाणी पूसुनि पालवी करचिरें आणीयले कौतुकें ॥ १ ॥ शांतीचा सुख आसनीं बसविले स्वामी बरे बैसले ॥ तेव्हां मी कर जोडुनी नमियलें वाटे बहू चांगलें ॥ माझी प्रीत बहू हरी करितसे शांती करी मानसां ॥ झालें सूख बहू मनां अजि खरें सांडी न या सौरसां ॥ २ ॥ ५२ ॥ तांबूल० ॥ पानें चांगलिं नागवेलि वरि तो लावोनिया हो चुना ॥ सूपारी करपूर घोळित बरी कंकोळ वेळा मना ॥ खैरीकात लवंग जायफळ पत्री वर्ख सोनेरि तो ॥ वीडा देत हरी करीं ममकरीं घेती बरा मान तो ॥ १ ॥ केली आरति कूरवंडि बरवी नीराजनीं कर्पूरी ॥ दीली ती मग दक्षणा निजरुपें सोनेंहिरे आभरी ॥ प्रार्थीलें अधिकोत्तरें क्षम असो माझी पुजा श्रीहरी ॥ मानोनीच अनंत हा अजि दिनीं सप्रेमता आभरी ॥ २ ॥ ५४ ॥ इतिश्रीमदनंतसूरिविरचित मानसपूजा समाप्ता ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ॥ हरिः शरणं ॥

## अथ स्फुटश्लोक.

### शार्दूलवि०

श्रीगणेशाय नमः ।। श्रीमदनंतसद्गुरवे नमः ।। श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः
कृष्णा कृष्णनदीस्वओघ जननी ध्यानीं मनीं चिंतनीं ।। स्नानीं दान निदानकाळसमयीं नामें गतीदायनी ।। वेण्या वेशवती तिजी जगगती विद्यानिती कोयना ।। सावित्री सुखदायनी अमल ते ध्यायीं सदां तूं मना ।। १ ।। कृष्णे तृष्णा हरावी जरि मति भजवी तूजिया अंतराची ।। रामालागीं भजावें विमलमनगतीं साधनें आणिनाची ।। देहार्थाची नसावी प्रिति जगगतिते मोहकी घात माया ।। नाहीं कोणी सुखाला सुखकर हरिची जाणुनी लाग गाया ।। २ ।। माया दुजाची जगिं मानिलीया ।। दूजेपणा हे स्थुळअर्थ ठाया ।। अंतीं असूखां मुळ येथ दीसे ।। पीसें भ्रमाचें जगतीं विलासे ।। ३ ।। भिक्षा मागुनि जेवणें हरिरसीं चित्ताप्रती राखणें ।। प्रेमातें बहु पोसणें सदजनीं[1] संवाद[2] ते ऐकणें ।। धैर्यानें असणें विवेक धरणें कोणां न बोले उणें ।। भक्तीचें बहु मोकळें मन तुझें संतोष या मानणें ।। ४ ।। अभ्यासें प्रगटे परी लटिकतें ना सूख त्याचेमधीं ।। बुद्धीवाद अनेक जल्प गति हे काळा नसे आवधी ।। नानाकार असार माधवगुणावांचूनिया या भवीं ।। गोसावी नच आश्रमीं सहजतें जागा सुखांसंभवी ।। ५ ।।

---

## अथ श्रीएकनाथस्तुति.

### आर्या.

श्रीगणेशाय नमः ।। श्रीमदनंतसद्गुरवे नमः ।। श्रीगुरुदत्तात्रेयाय नमः
श्रीएकनाथ सदयाप्रति भावें नमूनिया पद मागें ।। अनुरागें निजरंगें आगम हटला भवोघनद मागे ।। १ ।। साधू संत मुनीवर पाय जयाचे मनोघ भाव रितीं ।। सेवुनिया अजरमती रमती ते विसरोनि अभाव-रिती ।। २ ।। गुरुभक्ती बाळपणीं सुगम गम करोनिया बळकटली ।।

---

१ संतजनीं. २ आत्मचर्चा.

लिनता सदय घनोघीं वहात गेलीं मनोजभवखटलीं ॥ ३ ॥ झाली ज्ञानाज्ञानापासुनिया अतीत मति अविनासी ॥ धावुनि ये स्वतोष हरि पाहुनिया समगति यादवि नासी ॥ ४ ॥ यादवि मोडुनि जोडी माधवजी सुयोग प्रतिष्ठानीं ॥ भूतदयानुष्ठानीं तोषवि तो भागवत अधिष्ठानीं ॥ ५ ॥ सद्भावें गंगोदक आवडिनें बहु भरीत कावडि जो ॥ पाहुनि तो श्रीनाथें किमपिहि त्यातें ह्मणे न कावडिजो ॥ ६ ॥ जा तेजानें न दिसे भवगतिमाजीं हरिविण आन दुजा ॥ त्या तेजानें उभवे उभयांमधिं भाव तेथ नाणि दुजा ॥ ७ ॥ गाती बहु कविभावें या नव नव कवनें करोनि सिद्धीतें ॥ आगमिं ह्या आवडती निर्गमोदधि[1] गतीस गंधी[2] ते ॥ ८ ॥ स्वानूभुति भोगश्री भोगि तयां काय भोग अंतरले ॥ सिद्धीतोषैक[3]चित्तानंतादर स्वात्मभोग[4] अंतरले ॥ ९ ॥ अंतर लेणें त्याला विबुध गती अतीत जे भव भरणीं ॥ तरणी निगमगमानें किरणें व्यापी सबाह्य[5]ते करणी[6] ॥ १० ॥ गुणवर्या मर्यादा करवेना आगमोक्तिनें निगमां ॥ निगमागम जांचें यश गाती विधि नारदादि जाउगमां ॥ ११ ॥

---

## ॥ श्री अमृतराययश ॥

कोण नेट कवितेचें वैभवयश अमृतेश कटावाचें ॥ नटणें झाल्या पटुनी प्रथम तयाचेंच गीत नटावाचें ॥ १ ॥ जांचें स्वात्मविबोधिक चरितामृत कृष्ण रामनामानें ॥ दैवें जडतां मतियां गीतरसीं भव अभाव नामानें ॥ २ ॥ स्वानूभव निगमागम उगम जया अंतरांत आदरला ॥ पतिर्त करुणदयोघबळ[9]योगान्वय भावंमोद[10] पाजरला ॥ ३ ॥

---

१ आत्मोदधि. २ दुर्गंधी. ३ सिद्धीनें संतोष पावणारें जें चित्त त्याला अपार भीति. ४ परमात्मभोग. ५ अंतरबाह्य भावाला. ६ इंद्रियीं. ७ आत्म्याचे, परमात्म्याचे. ८ अहंभावरहित. ९ परमात्मस्वरूपशक्तीयोग त्याचा अन्वय. ह्म० रूप जाला. १० आत्मानंद.

## श्रीगुरुदेवदत्त.

### अभंग.

जनार्दनजनीं, जन्माये अजन्मी । आत्मबोधधामीं, विरक्तांच्या ॥ १ ॥ विरक्तीचा पती, भावअवीनाशी । कांताकांतोल्हासी, समोद्भवें ॥ २ ॥ अनन्य विच्यार, संचरे सुगर्भीं । विदेहीवैदर्भी, सुक्तीकेंत ॥ ३ ॥ जनन पावला, वाच्यांशसुदर्शे । निमेभवोत्कर्ष, मागधांचा ॥ ४ ॥ अष्टधा प्रकृती, परिवाराचार । नामया संसार, सारयाचें ॥ ५ ॥ अनंत जनाचें, समीकरणाहे । जनार्दन पाहे, स्वात्मबोध ॥ ६ ॥

१

चिंता आवर्तनी, चित्त दग्ध होणें । जन्मनाश भेणें, जाग्रतींत ॥ १ ॥ नाम या संसार, अहंकार देहीं । प्रबळ माया ही, अनिर्वाच्य ॥ २ ॥ पहातां नलागे, ठिकाणाधी अंत । प्रवृत्ती असंत, बाह्योन्मूख ॥ ३ ॥ अनंत पहाणें, जिणोनी परावे । आपणां पहावे, अभंगाहे ॥ ४ ॥

२

विश्वं[1]कृतनेमा, लागीं नोलंघीतां । होय विश्वकृं[2]ता, अतीतजो ॥ १ ॥ तोची सर्वसाक्षी, सर्वांतरवासी । देहीं अवीनाशी,-पणीं जागे ॥ २ ॥ मानवी हा काय, कृतकृत्ययार्थी । स्वार्थपारमार्थी, आर्ती नुरे ॥ ३ ॥ अनंतपणानें, मीपण गळालें । सुभाग्य फळालें, आत्मज्ञान ॥ ४ ॥

३

आत्मज्ञानी जो तो, विरक्तची होतो । वित्पन्न न होतो, स्वानूभवी ॥ १ ॥ वित्पत्तीच्या बळें, बोले परी चित्तीं । अनूमानगूंथी, नोगं[3]वेची ॥ २ ॥ वर्तवेना तैसें, बोलल्या प्रभावें । श्रोत्यां कैसा भावे, सत्यभाव ॥ ३ ॥ स्वानूभवी जो तो, वर्तनींच दावी । स्वभाव पदवी, न बाधीतां ॥ ४ ॥ शास्त्रप्रचीतीनें, वसणारे जन । कराया नमन, सिद्ध होती ॥ ५ ॥ होती जे नास्तीक, आस्तीक या संगे । ऐसीया प्रसंगें, आत्मज्ञानी ॥ ६ ॥ मुढज-

---

१ देहवर्तनाकरितां वेदांनीं केलेले जे नेम त्यांला. २ देहभावकृत, देहकर्तेपणा.
३ जात नाहीं, मोकळीक होत नाहीं.

नासही, वाटे जीवलग । ऐसें मोही जग, स्वानूभवी ॥ ७ ॥ भवीं जैजैकार, निर्वीकारी याचा । अनंत जनाचा, अंकींलाहे ॥ ८ ॥

४

मत्तवादि याचें, सत्य नसे कांहीं । असत्य प्रवाहीं, फसलाहे ॥ १ ॥
माजवी महंती, पंथीं कोंडी जनां । नयासंतमना, तुवां मानू ॥ २ ॥
मर्यादा करीतो, पर्या तो दर्याचा । दर्या नव्हे याचा, आर्यभाव ॥ ३ ॥
कायीकाहे दृष्टी, मायीक प्रवृत्ती । वृत्तीतें निवृत्ती, ठायीं नये ॥ ४ ॥
पाहिजे विरक्ती, आधीं भ्रम नाशां । मिथ्या हा तमाशा, मनीं वाटे ॥ ५ ॥
जया वाटे मिथ्या, संसार तयासी । विरक्ती आपैसी, चित्तीं उभी ॥ ६ ॥
नतो पक्षपाती, नतो जनवादी । [१]अनादीच्या [२]नादीं, चित्तगोवी ॥ ७ ॥
कोण मी कैसा हें, ऐसाहे विच्यारी । मन व्यभीच्यारी, नाहीं ज्याचें ॥ ८ ॥
नहा पढो वेद, नपाहूं शास्त्रादी । सांपडे [३]अनादी, भाव पोटीं ॥ ९ ॥ अनादी बोलीजे, आदी नाहीं तयां । लाभतां वि[४]नया, वर्तवी जे ॥ १० ॥
आत्मप्राप्ती होतां, समाप्ती व्याप्तीची । परी वर्तनाची, आगम्यता ॥ ११ ॥
अनंतावधानी, अनंत संधानी । अनंत लक्षणी, लक्षातीत ॥ १२ ॥

५

तृषीतां जीवन, तोषवी पोसवी। क्षुधीता जेववी, अन्न जोतो ॥ १ ॥
धन्य वाटे जैसा, तैसा विरक्तासी । वचन विलासी, वक्तावडे ॥ २ ॥ आत्मज्ञानी आत्मा, प्रतीपादी जो तो । मिथ्या जीव, होतो जया बोधें ॥ ३ ॥
अनूमान नसे, प्रमा[५]णची सारें । वचनीं संचरे, श्रोतियांच्या ॥ ४ ॥ ऐसा अ[६]ध्यात्माचा, भोक्ता कोणी होय । अनंत न होय, पर तया ॥ ५ ॥

६

अनेक ग्रंथांचें, करी पारायण । परी नारायण, नये देखूं ॥ १ ॥
अनेक साधनीं, साधीतां शीणला । परी न बाणला, हरी चित्तीं ॥ २ ॥
बहूत धुंडीले, देश संतझूंडी । यतीदंडी मूंडीं, लेश नाहीं ॥ ३ ॥ भ्रमाचा उणाहे, झाला कांहीं टांक । दपटोनी नाक, धरी करीं ॥ ४ ॥ करी जप

---

१ अनंताचा. २ छंदीं. ३ अनंत. ४ आत्मवर्तनां. ५ प्रत्यक्षच, खरे. ६ आत्मज्ञानाचा.

तप, महा अनूष्ठानें । व्यापीली कष्टानें, जरादेवी ॥ ५ ॥ अंतरींच पाहे, अभेदें श्रीहरी । नये जनांतरीं, दावूं दूज्या ॥ ६ ॥ स्वमतें स्वानंदी, आपणां तोषवी । अनंत तो भवीं[1], स्वयें आहे ॥ ७ ॥

७

परम पवित्रें, संतांचीं चरित्रें । नामाधार स्तोत्रें, अच्युताचीं ॥ १ ॥ गाती ते सांगातीं, आत्मास्थितीवंता । न गाती अहंता,-वंत जीव ॥ २ ॥ नसंत आग्रही, करतें अनूग्रहां । पंथ त्यांचा महां, निराधारी ॥ ३ ॥ निरारी वर्तन, नामसंकीर्तन । निराधारीपण, कार्याकार्यीं ॥ ४ ॥ आर्यावर्तीं जना,-चिया समूहांत । होय कृष्णनाथ, ऐसा एक ॥ ५ ॥ अनेक तयानें, प्रणीत जाहले । मनाकारें भले, निर्वीकार ॥ ६ ॥ अनंतवर्तनीं, वर्ते परात्पर । सद्बुद्धीचा वर, अव्यय जो ॥ ७ ॥

८

भिकारी धारक, वेश देशांतरीं ॥ संत नामधारी, वस्ती बहू ॥ १ ॥ दाते दान करा, ह्मणोनी हाकाटी । मारिती ती निकी, काकस्वरीं ॥ २ ॥ संत न स्वभाव, पावती हे नर । मती पोटपर, वागताहे ॥ ३ ॥ अनंत न यांसी, निंदी किंवा वंदी । संगीताच्या छंदीं, सहजाले ॥ ४ ॥

९

ज्ञानज्ञानातीत, जयाचें वर्तन । आत्मसंकीर्तन, करणारा ॥ १ ॥ करणारा होय, भवरोगातीत । रोगीयां प्रचीत, बाणे याची ॥ २ ॥ भवरोगी थोडे, सर्व जन नाहीं । वचन प्रवाहीं, जाणवेल ॥ ३ ॥ भवकामनाहे, अनीवार जेथें । भवरोग तेथें, न मानावा ॥ ४ ॥ रोगी हा खराहे, परी नाहीं बाधा । मानीना आपदा, भोगभोगें ॥५ ॥ भवभ्रमी यया, जनांला वदावें। रोगी वळखावे, उदास जे ॥ ६ ॥ जया न सोसवे, त्रितापघर्षण । मरण चींतन, बहु बाधे ॥ ७ ॥ नावडेची इष्ट, जन वाद वार्ता । जाणवी अनर्था, जाणवी ज्या ॥ ८ ॥ कैसी चिंता मिटे, कोण जनीं भेटे । भेटीनें वोखटे, आटोपेल ॥ ९ ॥ ऐशासी वदावा, भवरोगानंता । समर्थाच्या पंथा, स्वीकारी हा ॥ १० ॥

---

१ देहीं.

१०

संतोक्ती न माने ऐसे जे व्युत्पन्न । ह्मणवोती धन्य आपणांतें ॥ १ ॥ जनांसही मान्य होऊत विद्वान । परी अभिमानवंत खरे ॥ २ ॥ जरेनें जर्जर होती हयराणे । तळमळ होणे नची दूर ॥ ३ ॥ विश्वासिलें नाहीं आत्मपद ज्यांणीं । मृत्यूलाभ हाणी भोगणेची ॥ ४ ॥ प्रकृतीचा वाढे अंश ती जाणावी । अविद्या मानवीं स्वहितार्थी ॥ ५ ॥ नाश जन्म बाधा त्रितापझाडणी । नव्हे अभीमानी जनालागीं ॥ ६ ॥ संतोक्ती ज्या मान्य न होय तो नर । असंत पामर भवांधाहे ॥ ७ ॥ विजातीवांचुनी विषमता नाहीं । संतासंतीं पाहीं विरोधाहे ॥ ८ ॥ संतांचें मानेना नमानी जनांचें । मत्त ऐसीयाचें उन्मत्ताहे ॥ ९ ॥ आपणां न जाणे अनंता तवं तो । माननची देतो कवणासी ॥ १० ॥

११

अज्ञान जाणणें सुषुप्ती अवस्थे । ठायीं जे कां वस्तें तयालागीं ॥१॥ अन्यथा ज्ञान हें वर्ते जन जे तें । जाग्रतींत मत्तें नानाकारें ॥ २ ॥ देही अहं वदे न तो देहीं वस्ता ॥ मिथ्या वरी आस्ता नस्ता कोणी ॥३॥ पुस्तां कोणी यया कोण तूं ह्मणोनी । सांगवेना जनीं कवणासी ॥ ४ ॥ ह्मणोनी अन्यथा ययां वसे नाम । अपूर्ण सकाम देहवरी ॥ ५ ॥ सज्ञान बोलिजे मिथ्या मानी भवां । जाग्रतींवैभवा लागूनिया ॥ ६ ॥ उदासीन वृत्ती वर्ते प्रवृत्तींत । वेदां[1]त प्रणीतें[2] वाच्यवीत ॥ ७ ॥ वाच्यवीत वाणी नेती नेती जीती । अजीताची मती ज्ञानवंती ॥ ८ ॥ चौथी ती अवस्था होय विज्ञानाची । सर्वातीत साची सर्वपणीं ॥ ९ ॥ साक्षी स्वामिणीही अनंत शिराणी । स्वानूभुती राणी आत्म स्फूर्ती ॥ १० ॥

१२

संत क्षमावंत महामत[3] धारी । प्रगटे मुरारी जयां छंदें ॥ १ ॥ स्वानंदें वर्तन वसे या भुवनीं । ज्ञानाज्ञानपणीं नुर्ते पुर्ते ॥ २ ॥ हर्ते पुण्यपापा पर्ते भवतापा । कर्ते व्याप आपा समतोलें ॥३॥ मोलें न बोलती-

---

१ उपनिषद्ध भाग, निगम. २ रचित, कृत. ३ परमात्ममत.

बोलवीतां जनीं । बोलिजेती ॥ ४ ॥ बोल ते अबोल प्रतिमा[1] दर्शक । अनंत वर्षक मनोल्हास ॥ ५ ॥

१३

आत्मावस्थावंतां संताचें वर्तन । जनीं जनार्पण[2] मन कर्ते ॥ १ ॥ स्वतंत्रपणाचें मत्त नादरिती । परंतंत्रें[3] वृत्ती वर्तवीती ॥ २ ॥ प्रवृत्तीमाझारीं वागतां बेजारी । न होती हजारीं चेष्टवितां ॥ ३ ॥ सेजारी न टिके कोणी जिवाजारी । भवभ्रमाकारी करारीनें ॥ ४ ॥ बरवा बरव्यां खोटा खोट्यांलागीं । अनेक प्रसंगीं नित्य नवा ॥ ५ ॥ वैभवां यां संतां विभागी जनाहे । विरक्त मनाहे ज्याचें तोची ॥ ६ ॥ अनंत होयिजे श्रीहरीचा[4] दास । तोची भोगी खास आत्मावस्था ॥ ७ ॥

१४

न जें बोलूं येयी वाच्य तें प्रमाण । अनिर्वाच्य जाण बोलीयले ॥१॥ बोलीयले संत स्वानूभवाचारी । अनन्य[5] विचारीं वर्तणारे ॥ २ ॥ न बोलवेची प्रत्ययावांचुनी । आत्मावस्था जनीं सर्व जनां ॥ ३ ॥ विलोकितां ज्यांत लक्षनची पोंचे । अनीर्वाच्य साचें वाच्य जे तें ॥ ४ ॥ अनंतभवाचें भान मिथ्य करी । अभंग श्रीहरी वाच्य जाण ॥ ५ ॥

१५

वेदसृष्टीक्रम उपपादीताहे । वेदांत कर्ताहे मिथ्य भव १ ॥ उपक्रम आणि उपसंव्हारीक । प्रमणाहे ठीक विधी क्रमी ॥ २ ॥ वेद प्रणीतांसी भव सत्याकार । सकामविकारवंत होती ॥ ३ ॥ होती हे अनेक प्रवृत्ती निष्णात । ययांसी वेदांत विषमाहे ॥ ४ ॥ वेदांती क्वचीत निरास विषयीं । कैवल्य पदवी लायकां यां ॥ ५ ॥ विश्वव्यापकाचे भक्त अनूरागी । नाहीं जन भागीं उभयार्थी ॥ ६ ॥ एकादा उपजे कालांतरीं कोणी । अन्य यया होनी धन्य होय ॥ ७ ॥ कैवल्य ज्या पदीं लोळे बळीद्वार । पाळ सरदार अनंताहे ॥ ८ ॥

---

१ आत्म प्रतिबिंब. २ जनार्दनार्पण, आग्रह वृत्तिरहित मनाचें वर्तन. ३ परमात्मतंत्रानें. ४ स्वानुभूतीला हरण करणारा जो अनंत त्याचा. ५ परमात्म.

१६

संत शाश्वतार्थी नाशार्थी असंत । विरोधाचा पंथ उभयांत ॥ १ ॥ भवभ्रमभारें अनेकत्व दिसे । जन नाम वसे जिवां ययां ॥ २ ॥ अनेकांत एक जया दर्शनाहे । अनेक तो पाहे आपणांत ॥ ३ ॥ दुजा नची दिसे जयां कोणी जनीं । तयासी सज्जनीं वंद्य कीजे ॥ ४ ॥ अनंत जयाचें तयां मानताहे । संतासंतीं आहे विषमत्व ॥ ५ ॥

१७

संतासंतपदा हुनी जो वेगळा । तया अंगीं कळा सर्व देशी ॥ १ ॥ मिळे सज्जनांत तर्धीं वाटे संतां । गलीत अहंता वंत होय ॥ २ ॥ संत हा वंदनीं योग्य पारमार्थी । अनर्थांची वार्ता नाहीं यांत ॥ ३ ॥ असंत संगमीं मिळाल्या बोलती । व्यवहारीं नीती श्रेष्ठ याची ॥ ४ ॥ जाणता सर्वही संसारसंधान । बहू व्यवधानवंत दिसे ॥ ५ ॥ दिसे प्राणमित्र अनंतीं अनंत । अनिर्वाच्य पंथ सहजी हा ॥ ६ ॥

१८

जैसें जयां वाटे लावीतियें वाटें । तयां ऐसा वाटे थोडा जनीं ॥ १ ॥ वांटेकरी होय समर्थानुग्रही । न राखी संग्रहीं पर भाव ॥ २ ॥ परभाव बा हा प्राकृत जाणणें । प्रकृतीवींदाणे प्रभवे तो ॥ ३ ॥ अहंभाव तयां बोलती जाणते । प्रत्ययें बाणिते परमात्मा ॥ ४ ॥ जाण ते अनंता अंतक जिवाचे । अभंग पदाचे वक्ते संत ॥ ५ ॥

१९

सगूण निर्गूण भिन्नभावें दिस्ती । सहज हे नस्ती एक दोनी ॥ १ ॥ नस्ती परी दिस्ती जनाच्यार पंथी । सदाच्यारवंतीं न मानिजे ॥ २ ॥ दिना हे ह्मणोनी रात्री नाम झालें । रवी नस्तां आले पदनिशी ॥ ३ ॥ जेथें भानू वसे तेथें नाहीं रात्री । गुणागूणधात्री ठायीं तेवीं ॥ ४ ॥ मा[1]या रजनीचे कृष्ण शुक्ल पक्ष । जोडुनिया लक्ष दक्षा पाही ॥ ५ ॥ बाही आत्मज्ञान प्रभानंत कीर्णीं । गुणागूणा वर्णी नातळे जी ॥ ६ ॥

---

१ त्रिगुण.

२०

तीर्थें व्रतें योग याग अनुष्ठानें । देहअभिमानें कर्णें घडे ॥ १ ॥ देह ममत्वार्थीं विटलेला भंट[1] । करण्यां प्रगट लायकाहे ॥ २ ॥ प्रगटे भावार्थें जयां आत्माराम । तयां हे हराम कर्मधर्म ॥ ३ ॥ मायावी मत्तांचा पत्ताही न उरे । देहीं गुरगुरे आत्मा जधीं ॥ ४ ॥ प्रगटला ज्याणें तया ग्रासी आगी । तेवीं अनूरागीं जिवारोप ॥ ५ ॥ अनंतानूभवें संतां नित्य नवे । पण भोगे जिवें न जीववे ॥ ६ ॥

२१

नामाचा महीमा निजधाम दावी । अहंभाव गावीं नदे राहूं ॥ १ ॥ भेदादी प्रवृत्ती विवंचनवारी । भोगवी संसारीं आत्मस्थिती ॥ २ ॥ देहींच विदेही पण जागे सत्य । प्रत्ययें अनित्य स्वप्नभावें ॥ ३ ॥ अनंतदर्शनीं नसे आदीअंत । दिसे भगवंत भूतमात्रीं ॥ ४ ॥

२२

श्रवणीं बाणे तें नेत्रीं उगवतें । जनीं प्रगटतें तेंची तेंची ॥ १ ॥ मनानें मानिलें प्रमाण भूताहे । तयां लागताहे तदाकारें ॥ २ ॥ न मानी पिशाच्या तयां लागे नाची । ह्मणोनी मनाची बाधा सारी ॥ ३ ॥ अनंत भावना भुतीं संसारांत । नेणवेची मात मी कोणही ॥ ४ ॥

२३

जयां भावें कृष्ण मानीताहे जन । तयां न सज्जन भजताती ॥ १ ॥ भावाठायीं वसे विभक्ती उभयां । संत आणि मायावंत जनीं ॥ २ ॥ अवतारी हरि गोपीकामभोक्ता । न माने विरक्तांलागीं ऐसा ॥ ३ ॥ जनालागीं प्रीती जयां विषयाची । प्रतीही तयाची वर्णीयेली ॥ ४ ॥ थोरी गाती तिही बारा गांव गिळी । अग्नी वनमाळी नग्नकाळीं ॥ ५ ॥ गोपाळाच्या मेळीं नानात्वें खेळला । पर्वत धरीला करांगुळीं ॥ ६ ॥ नाना मारियलीं पाखरें किडुवें । मायावी मानवें नेणतीयां ॥ ७ ॥ जयाशी वंदिती शिवादी सुरेश । एकदेशी वेशधारी न तो ॥ ८ ॥ सत्य

---

१ एकांगवीर.

तो सगूण स्वरूपी न झाला । उदरासी आला सज्जनांच्या ॥ ९ ॥ स्वरूप तयाचें संत वर्णनीय । संपन्न विनय नय ज्याणें ॥ १० ॥ अहं मातुलांत करूनी प्रगटे । भक्तीयोगें नटे बहू भाव ॥ ११ ॥ अनंत ब्रह्मांडें जयाचे उदरीं । तया नाम थोरी गिरीधारी ॥ १२ ॥

२४

आपुल्या संगितीं आपण रंगती । अन्य न वर्णिती स्वभावाच्या ॥ १ ॥ पर दर्शनानें पारुषले होती । ऐसी वसे रिती कवीची ज्या ॥ २ ॥ कवि तो अतीत जनोघ कृतीच्या । अनन्य प्रीतीच्या मत्तें वागे ॥ ३ ॥ अनंत अवस्था बाणली अभंग ॥ तियेचा प्रसंग नित्य नवा ॥ ४ ॥

२५

भाव भक्तीयोग नासी भवरोग । संयोगवियोग कारक जो ॥ १ ॥ आत्मप्राप्ती होय जया भक्तीभावें । योग तो न पावे कामीकासी ॥ २ ॥ भवीं ज्या उदासी तोची भव नासी । आतळे तयासी भावानन्य ॥ ३ ॥ सर्वाभूतीं सम आत्मा अवलोकी । तोची प्रीय लोकीं सर्व लोकां ॥ ४ ॥ काळ धोका भंगी अभंगप्रसंगीं । अनंत तरंगी भावोदधी ॥ ५ ॥

२६

सहज समाधि यया योगबळें । अंतरीं आकळे योगियाच्या ॥ १ ॥ योग तो जाणिजे सहजावृत्तीचा । मत्त आग्रहाचा वास नसे ॥ २ ॥ त्यागूनी स्वतंत्रपणाचा आवेश । परतंत्रें वेश वागवी जो ॥ ३ ॥ योगी तो अनंत भुवनीं स्वतंत्र । पदाच्यार मंत्र वाच्यवीता ॥ ४ ॥

२७

संत वृत्तीवंत असंतीं नवसे । विरोध या वसे उभयांत ॥ १ ॥ संता हे निभ्रांत आत्मसाक्षात्कारी । असंत विकारी भवभ्रमीं ॥ २ ॥ माया यामिनींत निद्रिस्त जनाहे । सज्जन जागाहे दीनोदयीं ॥ ३ ॥ अनंता हे जन आपणां नेणते । सज्जन जाणते आपणासी ॥ ४ ॥

२८

आपणां जाणतां कायिक अहंता । जायी जेवी अंता दिवारात्री ॥ १ ॥

आपुली आपणा बाणतां प्रचीती । अवंगे[1] प्रवृत्ती स्वप्नन्यायें ॥ २ ॥ सर्व साक्षीभूत स्फूर्ति अंतर्यामीं । स्फुरे ती विश्रामीं कारकाहे ॥ ३ ॥ अनंत नातळे जन्म नाश भ्रांती । संत या सिद्धांतीं स्वयें साक्षी ॥ ४ ॥

२९

आत्मसाक्षात्कारी वर्तती जनांत । तया वर्तनांत अप्रमाण ॥ १ ॥ नये करावया लक्षण जनासी । नुरीं एकदेशी वृत्तीयोगें ॥ २ ॥ जेवीं तो आरसा सन्मुख आलिया । दावी रूपकाया वसे तसें ॥ ३ ॥ ऐसें अनेकांसी अनेकपणानें । एकांत दिसणें ज्याचें तयां ॥ ४ ॥ स्वयें नसे कांहीं सर्व त्यांत पाही । अनंतरितीही आत्मज्ञान्यां ॥ ५ ॥

३०

कोवीद बोलावा स्वानूभवी वक्ता । भवभ्रममुक्ता विरक्तासी ॥ १ ॥ कवित्वाची शक्ती हरि सुदर्शनीं । विलोकनीं जनीं न देखवे ॥ २ ॥ उदासी आभरे मनोल्हास भंगे। श्रृंगारादी रंगे ज्यांत रस ॥ ३ ॥ फिके नवरस करी ऐसी हांव । घेत असे धांव नित्य नवी ॥ ४ ॥ अनंतकवींत कोवीद श्रीरंग । तयानें अभंग भावोगवे ॥ ५ ॥

३१

नोगमे वेदांतीं नित्य नवेंपण । उगवे हें धन कृष्णाननीं ॥ १ ॥ कृष्णाननाहुनी कृष्णप्रणीतासी । लाभलें जयासी तयां कृष्ण ॥ २ ॥ दुजानची वाटे स्वभावेंची थाटे । द्वैतभाव आटे नाठवीतां ॥ ३ ॥ मनोल्हासीं थाटे वचनीं प्रगटे । स्वानूभव नेटें सहजार्थी ॥ ४ ॥ कर्तेंपणा अंतीं कवीत्व श्रीहरी । करी दासांतरीं वसोनिया ॥ ५ ॥ अनंतदासांचा धनी दास होय । दास जो कां होय सर्वात्मक ॥ ६ ॥

३२

भोळयांभाविकांसी भक्ती विठ्ठलाची । सगूण गुणाची मनोगती ॥ १ ॥ बरें खोटें होय तें ह्मणे विठ्ठलें । सर्व होय केलें ऐसा ध्यास ॥ २ ॥ न जाणे सर्वत्र विठ्ठलची एक । जयानें अनेक रूपां आलें ॥ ३ ॥ ऐसा

---

१ अवघे, सर्व.

जाणे तोची भक्ताहे अद्वैत । सर्व अवगत याचीलागीं ॥ ४ ॥ अनंत आपण होऊनीयां वसे । परी नची फसे मायामोहीं ॥ ५ ॥

३३

अनेक जाणता जाणता आपणां । अधीक न उणा कोणां ह्मणे ॥१॥ गाणें त्याचें जनां वाटेल वोगाणें । बाणे त्यां हैराणेपण नसे ॥ २ ॥ वसे मीपणाची [1]बुंथी वेगळोनी । दिसे नयाजनीं अंध जनां ॥ ३ ॥ आत्मदृष्टीहीन मानवते हीन । चिंतामग्न दीन दिनरात्रीं ॥ ४ ॥ देह ममत्वानें भाविलें अन्यथा । जन्म नाश माथां वाहियला ॥ ५ ॥ अनंत नामया संसार जाहलें । संतानंतें दिलें स्वानूभवें ॥ ६ ॥

३४

धनार्थीं ममत्व जनार्थीं ममत्व । वसतां समत्व कां वदसी ॥ १ ॥ सांगसी अध्यात्म कोरडें कासया । दायादांची माया न त्यागिली ॥ २ ॥ दायाद् कामादी अनिवार झाले । कैसे तुझ्या बोलें परतती ॥ ३ ॥ रोगी वैद्य स्वयें दुजा सांगे काढा । रोगाचा न झाडा होय याणें ॥ ४ ॥ अनंत सांगणें मिथ्या क्रियेवीण ॥ ५ ॥

३५

हरि गावा हरि अंतरीं वसावा । जनांत दिसावा सर्वाठायीं ॥ १ ॥ हरिवीण कांहीं नाहीं हा विचार । चित्तीं वारंवार वाढवावा ॥ २ ॥ वाढल्या हा भाव देह अहंभाव । होईल अभाव स्वप्नवत ॥ ३ ॥ हरीसाक्षात्कार निर्धारें होयिजे । वरींनची किजे चिंतनची ॥ ४ ॥ सहजें होयिजे अभ्यासबळानें । अनंतकळानें आकळीजे ॥ ५ ॥

३६

जयां भाषणानें निवारे भ्रमणा । तयां रमारमणा पदीं ठाव ॥ १ ॥ जयां अहंभाव नातळे वर्तनीं । तयां संकीर्तनीं हरी भेटे ॥ २ ॥ भेटे भाविकांसी अभाविकां ठाव । नाहीं तो प्रभाव देखण्याचा ॥ ३ ॥ जा-

---

१ आवरण.

ववेना पासीं जातां संतापासी । वास संतापासी मात्र मिळे ॥ ४ ॥
अनंत अनन्य धन्य भाव योगी । करी भवरोगी रोगमुक्त ॥ ५ ॥

३७

भवबाधा जयां जाहली तो रोगी । उदासीन भोगी पद देहीं ॥ १ ॥
ययां भवदर्द झाला हे ह्मणावा । दुजासी मानावा भवकामी ॥ २ ॥
भव आवडला तयासी संतांनीं । कदांही वचनीं न बोधावा ॥ ३ ॥
न जीरे कामिकां आत्मबोध वार्ता । जनापासीं कर्ता ताप वाढे ॥ ४ ॥
बोधीतां विरक्तां वक्ता वंद्य होय । श्रोता धन्य होय अनन्य तो ॥ ५ ॥
संतानंत गीत सहज गतीचे । अनंत नीतीचे अंतातीत ॥ ६ ॥

३८

द्वैताहे पढळ अढळ नयनां । वरी तो शयनाप्रती जाय ॥१॥ चर्मो नेत्रो घडे देखी दृश्याकडे । भुलोनी सांपडे अपभ्रंशीं[1] ॥ २ ॥ अष्टधा प्रकृती जन्य वंश वृत्ती । सुंदर निगुती प्रभुतायी ॥ ३ ॥ आत्मदृष्टी देखे अभंग प्रसंगीं । अनंत उदधी कल्पमती ॥ ४ ॥

३९

ऐसा थोडा जनीं प्रभावे मानव । नाशी अहंभाव भवभ्रमीं ॥ १ ॥
देहींच विदेही पद आलें हातां । आत्मज्ञान होतां मानवींया ॥ २ ॥
आत्मदर्शनानें भेद मावळला । दृश्य दर्शनाला अदेखणा ॥ ३ ॥
देखती चर्माचे नेत्र चर्मकूट । नाहीं अनसूट देखण्या त्या ॥ ४ ॥ भेदें खेदोदयी होय ममत्वानें । मोह सोमपानें भानभुले ॥ ५ ॥ कोण मी नेणवे जिव भावालागीं । माया मदरंगीं अभासाहे ॥ ६ ॥ आहे हा स्वतंत्र नची आत्मानंत । परतंत्रीं मंत्र सूचविता ॥ ७ ॥

४०

जनींवनीं साखो नेणवे हा मूर्खो । गुंगे आपपर्का प्रमाणुनी ॥ १ ॥ मानुनी अनेका कृती भवभ्रमा । बाह्य उपक्रमां[2] प्रतीपादी ॥ २ ॥ तयानें दाविले जन्मनाश जयां । अभंग विलया ठायीं वास ॥ ३ ॥ संतीं न

१ अपायीं, २ वर्तनां.

उदेला असंतीं बुडाला । नाकळे मुढाला सर्व जो तो ॥ ४ ॥ भेदभान जाय सगाइतो गाय । आपुलाची न्याय अन्यायही ॥ ५ ॥ पराग अभंग मानस सुगंध । पसरे अनंग पूर्णानंतीं ॥ ६ ॥

---

## ॥ निरनिराळया चालीचीं सुरस पदें ॥

**चाल**—हरिभजनावीण काळ घालवूं नकोरे—**ताल दादरा.**

निगम[1] गुरू स्वहित करुं ॥ अजित वरूं नामीं ॥ ध्रु० ॥ परम प्रभाकार उभा ॥ स्वात्मवास चित्तसुभा ॥ वेगळोनि शून्य नभा ॥ वागुं सूखधामीं ॥ निगम० ॥ १ ॥ काल[2]अती समयिं निती ॥ सहज बोध आत्म गितीं ॥ वाणि वाद वाक्य गती ॥ स्वानंद विरामीं ॥ निगम० ॥ २ ॥ अगुण सगुण ऐक्य भाव ॥ स्वात्म सिद्धि सहज ठाव ॥ सदानंत रूप नाम ॥ नीज हीत कामीं ॥ निगम० ॥ ३ ॥

**चाल**—सदर ॥ २ ॥

सदां मुखें सदाशिवां जिवा गात जारे ॥ ध्रु० ॥ विसरुं नको किमपि यास ॥ सकळ जगीं इतर त्रास ॥ विषय विषम करुनि ग्रास ॥ मरसी फुकां रे ॥ सदां० ॥ १ ॥ रूप रंग सर्व नाश ॥ काय धरुनि याचि आस ॥ मोहबंध लोभपाश ॥ सकळीक वारे ॥ सदां० ॥ २ ॥ भेद नको थोर सान ॥ ठेवि भाव येक मान ॥ लावि नीजरूपिं ध्यान ॥ भव हा निवारे ॥ सदां० ॥ ३ ॥

**चाल**—सदर ॥ ३ ॥

हरि भजनीं सतत असो भाव मानवारे ॥ ध्रु० ॥ काय करिसि इतर काज ॥ नाहिं कसी तुजसि लाज ॥ कोण तुझी सूत भाज ॥ ममता फुकां रे ॥ हरि० ॥ १ ॥ नाशिवंत देह जात ॥ यांत कैसि सुख मात ॥ हरीवीण सकळ घात ॥ अरिचा करींरे ॥ हरिभ० ॥ २ ॥ अहंभाव आदि नाश ॥ राहे मनीं निरा[3]भास ॥ नको धरूं कवण आस ॥

---

१ आत्म. २ कालातीत. ३ परमात्मरूप.

वळखी जनां रे ॥ हरिभ० ॥ ३ ॥ निरामय निरंजन ॥ अनंत मती प्रेमिं धन ॥ झालें गातां जनवन ॥ समान सदां रे ॥ हरिभ० ॥ ४ ॥

॥ ४ ॥

**चाल**—भुत जबर लागलें बाइ लागलें बाई ॥ झालि झडपण करुं गत कायीग ॥ या चालीवर ॥

छंद गोविंद तोडित बंध ॥ भव होयी परमानंद ॥ ध्रु० ॥ गातां गूण याचे वाचें ॥ डोल येती अमनाचे ॥ छंद० ॥ १ ॥ काया माया हरवोनी ॥ ध्यान जडे नीज मनीं ॥ छंद० ॥ २ ॥ अनंत रंगें अनुभव खाणी ॥ नित्य नवी गीत वाणी ॥ छंद० ॥ ३ ॥

**चाल**—सदर ॥ ॥ ५ ॥

रंग अभंग भरला अंगीं ॥ देहातीत देह संगी ॥ ध्रु० ॥ जगाकार जगन्नाथ ॥ भेद तूटे ऊरे मात ॥ रंग० ॥ १ ॥ नुरे वार्ता आपदुजी ॥ मति हरीपदीं राजी ॥ रंग० ॥ २ ॥ अनंत वाणी सहजाची ॥ अनुवादे मानवाची ॥ रंग० ॥ ३ ॥

॥ ६ ॥

**चाल**—विटेवरी कमलनयन रुक्मिणीपती० ॥

हरी धरा प्रेमबळें मानसामधीं ॥ सतत भाव नीज छंद वासना पदीं ॥ ध्रु० ॥ भेद नको भूत जनीं कपट वांकडें ॥ भ्रांति गमे जनन-बंध बहुत सांकडें ॥ मोहपाश हाचि गमे अंगनाकडे ॥ सावध हो अंतवरीं मात हे सुधी ॥ हरी धरा० ॥१॥ कलिंत कथा सार ह्मणुनि सांगती कवी ॥ वाल्मिकादि आद्य मुनी जाहले भवीं ॥ रामनाम जपुनि काम भाव हारवी ॥ अनंतनय सुगम काय सज्जनामधीं ॥ हरी० ॥ २ ॥

॥ ७ ॥

**चाल**—अरे गौळ्याच्या मुला झोंबसी ॥ ( येकनाथकृत )

नको येउं आमुच्या घरीं हरिरे ॥ ध्रु० ॥ लौकिक मतिचा अहं दादला ॥ बहु तामसि गुरगुरी ॥ हरिरे० ॥ १ ॥ ममता सासू नणंद कल्पना ॥ चाल न याची बरी ॥ हरिरे० ॥ २ ॥ गोकुळ सकळीं अनंत छंदें ॥ संसृतिदर संहरीं ॥ हरिरे० ॥ ३ ॥

॥ ८ ॥

**चाल**—आज मोरे सतगूरु आये मिजवान ॥ तन मन धन जीरा करुं खुरबान ॥
या चालीवर—( धरमदासकृत ).

कास यासी मांडितोसी खोटे मठाचार ॥ वायां जटाभार शिरीं ह-टाचे प्रचार ॥ ध्रु० ॥ सा चार ह्मणताति नाहीं जाचा पार ॥ नीर्फळ सकळहि करी उपचार ॥ कास० ॥ १ ॥ जाणिवनेणिव नाहीं जेथ हेत ॥ पंथ पसंत कसें ह्मणूं येति तेथ ॥ कास० ॥ २ ॥ अनंत अनुभव निज संत विचार ॥ परसुनि अभिमतिं देत डिचार ॥ कास० ॥ ३ ॥

**चाल**—सदर ॥ ॥ ९ ॥

सगुन सुहागनि सखि समुझाय ॥ मधुर मधुर माधो बेनु बजाय ॥ ॥ ध्रु० ॥ जमुनाके नीर तीर मंगल धाम ॥ गय्या चरावत पूरन काम ॥ सगुन० ॥ १ ॥ भवभ्रमनाशक जाके बैन ॥ सब घट माहिंतो नैनको नैन ॥ सगुन० ॥ २ ॥ अनंत मतिका प्रेम बिलास ॥ सुनत सुनत भयउ अभिमति नास ॥ सगुन० ॥ ३ ॥

॥ १० ॥

**चाल**—सच्चित्सुखघनहरिपरमात्मा स्थिर चरिं० ॥ ऋषि ताल किंवा सुरफाक्ता ॥

चिन्मय निज हरिपद ॥ भावुनि अभिमति वध ॥ दुस्तर हा भवमद बा बा बा ॥ ध्रु० ॥ करुणाकर माधव ॥ चरणाधर घन नव ॥ वरि भाव सुबोध लव ॥ बा बा बा ॥ चिन्मय० ॥ १ ॥ मनुजा सुखधाम अभय ॥ उभवी मति न्याय विजय ॥ अनंत प्रेम उदय ॥ बा बा बा ॥ चिन्मय० ॥ २ ॥

**चाल**—सदर ॥ ॥ ११ ॥

संसृतिमोचक हरि ॥ नर सारथि जो हरि ॥ वागवि चाबुक शिरिं ॥ जो जो जो ॥ ध्रु० ॥ भक्तभाव बहु मनिं ॥ शक्त नाहिं जनिं वनिं ॥ नक्त तेथ समपणिं ॥ जो जो जो ॥ संसृति० ॥ १ ॥ नष्टगती भंगित ॥ कष्ट रिपू दंडित ॥ इष्ट मतीमंडित ॥ जो जो जो ॥ संसृति० ॥ २ ॥ अनंत भेद हरी ॥ सुसंत भावभरी ॥ मंहंत[1] पंथ दुरी ॥ जो जो जो ॥ संसृति० ॥ ३ ॥

---

१ अविनाशी.

॥ १२ ॥

चाल—या बलमाके दरस करोरी ॥ ( मानपुरीकृत ) हिंदुस्थानी भाषा.

जगमो मौजी रंग रंगेला ॥ खेलत माधव आपि अकेला ॥ ध्रु० ॥ समता शांती गरबन माला ॥ स्वातम चंदन चरचित भाला ॥ जगमो० ॥ १ ॥ सुगंध सुमनें तुलसिकु पाला ॥ सब शितलाई बनिहुं गुपाला ॥ जगमो० ॥ २ ॥ गोकुलमाहीं अनंतबाला ॥ मति जमुनाके तिर प्रतिपाला ॥ जगमो० ॥ ३ ॥

॥ १३ ॥

जगमो काल अकाल भयो ॥ जिस मन भावै समता उदयो ॥ध्रु०॥ जगसो न्यारो निज निरधारो ॥ भ्रमको नास कियो ॥ जगमो० ॥ १ ॥ आस नही है मनमो तनकी ॥ बिधि[१]को भाव गयो ॥ जगमो० ॥ २ ॥ अति काल गती निजपगमाहीं ॥ अजरामृत प्रेम पियो ॥ जगमो० ॥ ३ ॥

॥ १४ ॥

करिजो अपनो सुफल बिचार ॥ त्यजभव रजत बिकार ॥ ध्रु० ॥ घट घट सांई अलख गुसांई ॥ भारवौ निज हित सार ॥ करिजो० ॥ १ ॥ सहज प्रभावै समता भावै ॥ छांड चला अबिचार ॥ करिजो० ॥ २ ॥ ग्याना ग्यानकि गठडि बांधो ॥ व्हांमो नहि निरधार ॥ करिजो० ॥ ३ ॥ अनंत शयनीं स्वात्म निधीजा ॥ पग मिळणी अबिकार ॥ करिजो० ॥ ४ ॥

॥ १५ ॥

सुखदायक प्रभुके गुन गाय ॥ रैनदीन कर घाय ॥ ध्रु० ॥ जा भव माहीं आन उपायीं ॥ सबहि अखारत जाय ॥ सुख० ॥ १ ॥ काम खलादिक काल हयरानीं ॥ जानी नाहक जाय ॥ सुख० ॥ २ ॥ अनंत संगम मानव गेहीं ॥ साधन भाव उपाय ॥ सुखदायक० ॥ ३ ॥

॥ १६ ॥

जागोरे जोगिया जग माहीं ॥ मनको मनसे समझाई ॥ ध्र० ॥ मत भुल जडसो बढत भरम मति ॥ मोह लोभ मदघायी ॥ जागोरे० ॥ १ ॥ कठन पराई निहावन भाई ॥ अंतकुं दुःख मिलाई ॥ जागोरे० ॥ २ ॥

---

१ रजोगुणी अहंकाराचा.

अंत आदिबिन आतम घट घट ॥ नामरूपबिन साईं ॥ जागोरे० ॥३॥ अनंत सिंधू अनुभव लहरी ॥ सहज पनें झुलवाई ॥ ४ ॥ जागोरे० ॥४॥

॥ १७ ॥

सोही ब्रह्म सनाथ जगाय ॥ सबघट माहि समाय ॥ ध्रु० ॥ समभावनकी बडि चतुराई ॥ जनम जनमकी कमाय ॥ सोही० ॥ १ ॥ आतम ज्योती तूर्या[1] भाती ॥ गून निसी हर वाय ॥ सोही० ॥ २ ॥ अनंत संतन सत भावोसे ॥ निज गतिप्रेम न माय ॥ सोही० ॥ ३ ॥

॥ १८ ॥

भेक अनेक न मोहरियेक ॥ नेह बनो निजलेख ॥ ध्रु० ॥ कोइ नहि दूजो अंतर खोजो ॥ आगम रूप अलेख ॥ भेक० ॥ १ ॥ निरगुन नहि है सगून नहि है ॥ नहि है येक अनेक ॥ भेक० ॥ २ ॥ सहज पनोका खेल अनंतीं ॥ आतम भाव स[2]लोक ॥ भेक० ॥ ३ ॥

॥ १९ ॥

**चाल—ठुमरी** ॥ देखो देखो सखि छबि मोहनकी–( सुरदासकृत )

देषो देषो सखि छबि मोहनकी माहिं गोधनकी मन दोहनकी ॥ध्रु०॥ आपन हलीजो जीयन घेरो ॥ सुद बिसरी सब तन मन धनकी ॥ देषो० ॥ १ ॥ जहां तहांके कामबिसारी ॥ पूरन परि भइ नित कीसनकी ॥ देषो० ॥ २ ॥ अनंत गूनातित गुनलीला ॥ नीत नई जिन मति संतनकी ॥ देषो० ॥ ३ ॥

॥ २० ॥

**चाल**—धीर समीरे यमुना तीरे वसति वने० ( जयदेवकृत अष्टपदी )

गुरुघर बहु दुर लक्ष अगोचर ॥ अहंमतीचा भर असल्या ॥ ध्रु० ॥ न मिळे साधन योग मखादी ॥ बहूत युक्ती मधिं कसल्या ॥ बाकि काय हे प्राकृत तेथें ॥ अखंड सद्गुरु घरिं वसल्या ॥ गुरु० ॥ १ ॥ विकल्प बुद्धी स्वधर्म हारी ॥ बहुगति मतिचा ना सरल्या ॥ स्वात्मशोधनीं चित्त न लागे ॥ कामोन्मुख भव आदरल्या ॥ गुरु० ॥ २ ॥ काळ कृतांतारीधन जेथें ॥ भाव बळाविण गुरगुरल्या ॥ जाणिव मतिहे

---

१ प्रकाश. २ देखणा=साक्षी.

ग्रासुनि सकळी ॥ लाभ गमे मग पद धरल्या ॥ गुरु० ॥ ३ ॥ संत बहू घरिं येति परंतू ॥ समागमना सम नसल्या ॥ जैशा तैसे सहज स्वबोधें ॥ दीनपणावरि बहु डसल्या ॥ गुरु० ॥ ४ ॥ विषयीं विटुनी अनूताप जडे जो ॥ मुमुक्षुपंथें भरभरल्या ॥ अनंतसंगम आत्म स्वबोधें ॥ स्वानंदजलीं गति मग तरल्या ॥ गुरु० ॥ ५ ॥

॥ २१ ॥

जय ब्रह्मानंदा नंदा ॥ जय परमानंदा नंदा ॥ साचपदीचा मीजीबंदा ॥ ध्रु० ॥ देवकिनंदन कंसांतक मुनि मानस भावमिलिंदा ॥ लागो तव पदिं ध्यान निरंतर ॥ हरुनी मायिक फंदा ॥ जय० ॥ १ ॥ गूणातीता सत्ताभासा तुर्यात्मक गोविंदा ॥ उन्मन गातां कीर्ती तूझी श्रीधर बालमुकुंदा ॥ जय० ॥ २ ॥ गोपीमानस विरह विहारा मोचक संसृति बंदा ॥ अनंत सहजीं नाथजनार्दनिं लेखक मति नवसिंदा[1] ॥ जय० ॥ ३ ॥

॥ २२ ॥

चाल—मजला वरिल सुभद्रा काय.

हरिला अवलोकित राधा ॥ चंचल चोर दिठी ॥ ध्रु० ॥ आनन हास्मित लज्जित मान ॥ कंजें[2] विलोकित पुंज निधान ॥ साध्य समागम अंतर ध्यान ॥ परि अनुमान लज्जेचा ॥ हरि० ॥ १ ॥ प्रेमरसें भरला भाव ॥ नाहीं अन्योक्तीचा ठाव ॥ ऐक्यवटे मनोभाव ॥ देवराव आलिंगी ॥ हरि० ॥ २ ॥ दोघां झाली भेटाभेट ॥ नीजभक्तीचा हा नेट ॥ तोडिलें अविद्येचें बेट ॥ अनंत नेट भक्तीचा ॥ हरि० ॥ ३ ॥

॥ २३ ॥

चाल—अमरपुरीसम शोभा जियेची ॥

परम पदान्वय ध्यानीं विराला ॥ आनंद मतिते अपार उदेला ॥ ध्रु० ॥ जगनग सकळी ब्रह्म सदोदित ॥ अनुभव स्वरूपीं सहजीं निमाला ॥ परम० ॥ १ ॥ चिन्मय व्यापक आत्मा एकची ॥ श्रीगुरुवचनीं नय ये

---

१ कारकून. २ कमल—सुंदर.

भराला ॥ परम० ॥ २ ॥ अनंत उगमीं निगम मनोधी ॥ विजय सुभावन अलक्ष पराला ॥ परम० ॥ ३ ॥

॥ २४ ॥

॥ मालवणी भाषेंतील पदें ॥

माजना माजना माजना ॥ आनंद पोटांत माजा माजना ॥ ध्रु० ॥ आपुन हुनांन हरिन बोलावल्यान ॥ मुर्लेचा नादान डोलवल्यान ॥ मनातूंन दूर माजा जायना० ॥ १ ॥ संसाराचा सांकडां वारल्यान ॥ वांकडां बोलूंन तार्ल्यान ॥ बोलावल्यावांचुन ऱ्हायना० ॥ २ ॥ खेळतत् पोरां मेळूंन सारीं ॥ टेळत दूरून त्याकां नारी ॥ अनंत भुल्लो गायना० ॥ ३ ॥

॥ २५ ॥

लपय गो लपय गो धंज दूद लोनी लपय गो ॥ ध्रु० ॥ पोरांसकट गोप्लो यातासा ॥ वाणसेचा खिडकींत दीस्तासा ॥ सोप्तिक कोनाक बलयगो ब० ॥ १ ॥ चाव्रोबाव्रो होउन बाक्तसा ॥ बाल्यांक पायल्यान सोक्तासा ॥ दादाचे बायलेक पलय गो प० ॥ २ ॥ मनाक् यै तसां भक्तासा ॥ तन मन लाउन तक्तासा ॥ अनंत आनंद कलय गो क० ॥ ३ ॥

॥ भूपाळी ॥

प्रबोध प्रातःकाळ झाला गुण निशी सरली ॥ यमुनाजला जाती नारी रिती वाट नुरली ॥ ध्रु० ॥ सासुर्वासी माहेरिणीं दोनी सम ठायीं ॥ घेउनि कुंभ शीरीं ॥ चालताती घायीं ॥ प्र० ॥ १ ॥ गाती गाणीं सारंगपाणी वाणी सुस्वरी ॥ वामन माधव अच्युत ऐसें नामोच्चारी ॥ प्र० ॥ २ ॥ भाव भक्ती प्रेम ठाव गांव गोकुळी ॥ अनंताचा मनो ओघीं ऐक्यची सकळी ॥ प्र० ॥ ३ ॥

॥ आरती ॥

साधक साधन सारा शिद्धांतान्वय वासा ॥ संसृतिमोचक भासा करुणालय देशा ॥ सबाह्याभ्यंतर साक्षी नित्या निजध्यासा ॥ समान बुद्धी व्हावी चुकवा गुण त्रासा ॥ १ ॥ जय देवा जय देवा जय सद्गुरुनाथा ॥ अनाथ जनका ध्यातों निर्भय मति सत्ता ॥ ध्रु० ॥ निर्गूणा निःसंगा नि-

जबोधा रामा ॥ कामांतक प्रियपात्रा मुनिजन विश्रामा ॥ निगमागम-ध्यासा निर्जर गतिधामा ॥ चैतन्यात्मक व्यापा प्रत्यय घनश्यामा ॥ जय० ॥ २ ॥ सुर नर मुनिवर योगी सनकादिक खासे ॥ भवगति अनुभवें तरले निज ध्यासें ॥ वाल्मिक नारद वंद्यावंद्य तव ध्यासें ॥ सद्यःसूख प्रचीती मुमूक्षां आसे ॥ जय० ॥३॥ तारक कीर्ति वाचे ठायीं सहजाची ॥ मनोभाव अर्पण शांती विनयाची ॥ पूर्वांवी आवडी पूरविली फुढती ॥ अनंत अपराधी दास जग नीती ॥ जय० ॥ ४ ॥

**हिंदुस्थानी दोहरे ॥**

सत्‌गुरु संगें बिहांव[1] करले ॥ राहे माहिं मगन ॥
अनंत भोग स्वारथ पूरन ॥ लज्जा त्याग नगन ॥ १ ॥
निजकी लीला अनुपम जगमो ॥ सुगमो होत अपार ॥
निज सुख दायी अनंत मायी ॥ परमातम अबतार ॥ २ ॥
भवगति माहीं सुख कहि नाहीं ॥ गायी माधो गून ॥
होजा निर्भय अनंत संगत ॥ अनुभव जोग निपून ॥ ३ ॥
घडि दिन जावत सोनहि आवत ॥ आगेकि नहि सूद ॥
अनंत घटघट चीन्हो भाई ॥ हो रहियो मजबूत् ॥ ४ ॥
पतित उधारे अनाथ तारे ॥ बिरोध कीन्हो मुक्त ॥
अनंत माहीं अरिमित्र सम ॥ सोही माधो उक्त ॥ ५ ॥

---

१ लग्न–ऐक्य.